**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**शिवसेनेचे बेपत्ता कार्यकर्ते श्री. रमेश गोवेकर यांच्या तपासाबाबत औचित्याचा मुद्दा**

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, एका अतिशय गंभीर विषयाकडे मी आपले लक्ष या औचित्याच्या मुद्याद्वारे वेधू इच्छितो. आज पुष्कळसे आमदार बाहेर उपोषणाला बसलेले आहेत. श्री. रमेश गोवेकर हे सिंधुदुर्ग जिल्हयातील कार्यकर्ते नाव्हेंबर पासून बेपत्ता आहेत. हा विषय सर्व स्तरावर गेलेला आहे. पोलिसांनी प्रत्येक वेळी सांगितले की, "आम्ही त्याचा शोध घेत आहोत." एवढेच नव्हे तर सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या समुद्रकाठावर एक मृतदेह मिळाल्यानंतर तो मृतदेह चार-पाच दिवस असाच ठेवून दिला आणि त्यामुळे तो मृतदेह कोणाचा आहे हे ओळखता येऊ नये इतकी भयानक परिस्थिती त्या मृतदेहाची झाली. या पार्श्वभूमीवर हे प्रकरणत हायकोर्टात गेले. हायकोर्टाच्या पार्श्वभूमीवर माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले होते की, " रमेश गोवेकरचा 8 दिवसात शोध घेऊन त्याला हजर करतो." आज चार महिने होऊन गेले तरी या बेपत्ता माणसाचा पत्ता लागत नाही. त्याची पत्नी, आई, 2 मुले अक्षरशः अपले वडील कधी घरी येतील याची वाट पाहात आहेत. तो हयात आहे की नाही याची माहिती मिळत नाही, अशा प्रकारे कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भात महाराष्ट्रामध्ये भयानक परिस्थिती निर्माण झालेली आहे. सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, या प्रकरणी आपण माननीय गृह मंत्र्यांना निदेश द्यावेत की, त्यांनी उपोषणकर्त्यांना भेटून उपोषण मागे घेण्यास सांगावे. कोणत्याही परिस्थितीमध्ये श्री. रमेश गोवेकर या व्यक्तीचा शोध घेऊन त्याच्या कुटुंबीयांना त्वरित दिलासा देण्याची आवश्यकता आहे हे मला सुचवावेसे वाटते.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, गंभीर गोष्ट ही आहे की, मी आताच सभागृहामध्ये येत असताना सभागृहातील चार माननीय सदस्य खाली उपोषणाला बसल्याचे मला दिसून आले. एका राजकीय पक्षाचा कार्यकर्ता बेपत्ता होतो आणि 4 महिने झाले तरी त्याचा शोध लागत नाही ही बाब अतिशय गंभीर आहे. याबाबतीत सरकारकडून ज्या प्रकारे तपास पूर्ण व्हायला पाहिजे तसा तो होत नाही त्यामुळे या सरकारबद्दल संशयाचे वातावरण निर्माण झालेले आहे. माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले होते की, श्री.रमेश गोवेकर याचा 8 दिवसात शोध लावतो. तो शोध अजून लागलेला नाही. याबाबतीत आपल्या विधानपरिषदेच्या 4 माननीय सदस्यांना खाली बसून उपोषण करावे लागते ही गोष्ट राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने आणि लोकशाहीच्या दृष्टीने योग्य

. .2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी पुढे सुरु......)

नाही.माझी विनंती आहे की, शासनाने ही गोष्ट गंभीरपणे घेतली पाहिजे. तेव्हा सभापती महोदय, या प्रकरणी हे सभागृह संपण्यापूर्वी शासनाने निवेदन करावे, असे आपण शासनाला निदेश द्यावेत. सभापती महोदय, आम्ही लोकशाहीमध्ये आहोत की, हुकूमशाहीमध्ये आहोत ? लोकशाही संपत चालली आहे काय ? एखाद्याला कोणी मारले तर त्याचा पत्ता लागणार नाही काय ? आज एका पक्षाच्या कार्यकर्त्याच्या बाबतीत असे झाले, उद्या दुस-या पक्षाच्या कार्यकत्याच्या बाबतीत असे होईल. तेव्हा  सभापती महोदय, ही गोष्टी सरकारने गांभीर्याने घेऊन त्वरित निवेदन करावे असे निदेश आपण सरकारला द्यावेत अशी आपणास विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. तपासाचा निर्णय काय आहे तो सांगा, असे कोर्टाने सरकारला सांगितले. कोर्टामध्ये हे प्रकरण जेव्हा उभे राहिले त्यावेळी मी तेथे होतो. या प्रकरणी पोलिसांची भूमिका संशयास्पद आहे हे स्पष्ट आहे. सिंधुदुर्ग येथील चौपाटीवर रात्री एक-दीडच्या सुमारास एक मृतदेह आढळला. त्यावेळी पोलिसांनी किल्ल्यावरुन बॅटरी मारुन सांगितले की, तो मृतदेह 4 महिन्यापूर्वीचा असून तो सडलेला आहे. म्हणजे रात्रीच्या वेळी बॅटरीच्या प्रकाशामध्ये तो मृतदेह 4 महिन्यापूर्वीचा आहे हे पोलिसांना समजले. त्यानंतर पोलिसांनी असेही सांगितले की, रमेश गोवेकर 3 लाख रुपये घेऊन निघून गेलेला आहे. पण तो कोठे निघून गेला हे मात्र पोलीस सांगत नाहीत. त्या मृतदेहाची डीएनअे टेस्ट मिळत नाही असे वर्तमानपत्रातून छापून आलेले आहे. सभापती महोदय, या प्रकरणी पोलिसांची भूमिका ही संशयास्पद आहे. पोलीस कोणाच्या तरी दबावाखाली आहेत अशी परिस्थिती आहे.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, या प्रकरणामध्ये सरकारने कोणीही कितीही दबाव टाकत असले तरी त्याकडे लक्ष न देता रमेश गोवेकर यांचा खून झाला आहे किंवा ते बेपत्ता आहेत याचा शोध घेणे आवश्यक आहे. सभापती महोदय आपणच या प्रकरणामध्ये न्याय मिळण्यासाठी सरकारला निदेश द्यावेत. आमदार उपोषणाला बसले आहेत त्यांच्या समोर तरी याबाबतीत सरकारने निश्चित भूमिका स्पष्ट करणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री. गडकरी यांनी सूचना केल्याप्रमाणे या विषयावर सरकारने निवेदन केले तर त्यातून सरकारची भूमिका स्पष्ट होईल.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, रमेश गोवेकर प्रकरण नोव्हेंबरमध्ये मध्ये उघडकीस आले होते. त्यावेळी मी स्वत: पोलीस महासंचालक आणि पोलीस अधिक्षक यांच्याकडे जाऊन त्यांना विनंती केली होती की, या प्रकरणामध्ये रितसर चौकशी झाली पाहिजे. त्यावेळी निवडणुकीचा काळ होता आणि त्यातून वेगवेगळे विषय निर्माण होत होते. पोलिसांनी तात्काळ चौकशी करावी अशी विनंती आमच्या पक्षाने देखील केली होती. आज इतके दिवस झाले तरी या प्रकरणामध्ये काय झाले ते आम्हांला कळलेले नाही. म्हणून सरकारने याबाबतीतील भूमिका सभागृहासमोर ठेवावी अशी आमची विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी औचित्याच्या माध्यमातून जो प्रश्न उपस्थित केला त्यावर सन्माननीय सदस्य श्री. नितीनजी गडकरी,श्री.दिवाकर रावते आणि कर्नल सुधीर सावंत यांनी आपले विचार व्यक्त केले. एकूण प्रकरण अत्यंत गंभीर आहे. गेले दोन महिने याबाबतीत स्पष्ट मागणी करुन सुध्दा त्या कार्यकर्त्याचा ठावठिकाणा लागत नसेल तर ती गोष्ट निश्चितच योग्य नाही असे मला वाटते. श्री. गणेश नाईक यांना मी एवढेच सांगेन की, गृहमंत्र्यांना याबाबतीत अवगत करावे. आमदार या प्रकरणासंदर्भात उपोषणाला बसलेले आहेत. त्यांची भेट होईल असे पहावे. त्याचप्रमाणे पोलीस विभागाला तातडीने तपास करण्याबाबत सूचना द्याव्यात. आतापर्यंत केलेल्या तपासामध्ये कोणती प्रगती झालेले आहे याचे निवेदन आज सदन संपण्याअगोदर सरकारने करावे.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, आपण दिलेल्या निदेशांची पूर्ती केली जाईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, जे सदस्य उपोषणाला बसले आहेत त्यांचा सभागृहात बिझनेस आहे. प्रश्नोत्तरे आहेत,लक्षवेधी आहे. तेव्हा उपोषणाला बसलेले सदस्य

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील...

तात्काळ सभागृहात कसे येतील आणि आजच्या कामकाजात भाग कसे घेतील यादृष्टीने व्यवस्था झाली पाहिजे अशी माझी आपणांस विनंती आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण या विषयावर योग्य निर्णय दिलेला आहे आणि आज निवेदन करण्याचे निदेश शासनाला दिलेले आहेत. हे प्रकरण गंभीर आहे आणि त्यानुसार आपण निदेश दिले त्याबद्दल मी आपला आभारी आहे. सरकारतर्फे विनंती करावी आणि सदस्यांनी तात्काळ सभागृहात यावे. शक्यतो संसदीय कार्यमंत्री उपोषणकर्त्यांना भेटले तर चांगले होईल आणि सदस्यांना सभागृहाच्या कामकाजात सहभागी होता येईल.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी सभागृहात येऊन कामकाजात भाग घ्यावा अशी सभापतींनी विनंती केली आहे हे माझ्यावतीने आपण सदस्यांना सांगावे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, संबंधित खात्याच्या मंत्र्यांनी सदस्यांना सभागृहात येण्याबद्दल सांगितले पाहिजे.

----

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे.

## स्वयंरोजगार खात्याचे प्रधान सचिव यांनी केलेला गैरव्यवहार

**(५) * १२८३२ श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे , श्रीमती कांता नलावडे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोजगार व स्वयंरोजगार खात्याचे प्रधान सचिव यांनी पूर्वी फिल्मसिटीचे व्यवस्थापकीय संचालक असताना राष्ट्रीय एकात्मता या विषयांवर हम सब एक है नावाच्या कार्यक्रमाचे आयोजन पाच शहरात २६ जानेवारी,२००१ या दिवशी करावयाचे ठरविले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकरीता झी व बीफोरयु या टी.व्ही कंपन्याबरोबर करोडो रुपयांचा करार करण्यात आला होता व या करारानुसार जमा झालेली मोठी रक्कम ओशिवरा येथील बँक ऑफ महाराष्ट्रच्या शाखेत जमा केली हे खरे आहे काय,

(३) असल्यास, काही कारणाने हा कार्यक्रम रद्द झाल्यावर बँकेतील रकमेचा गैरव्यवहार करुन तसेच आपल्या अधिकाराचा गैरवापर करुन संबंधीत प्रधान सचिवाने पैसे दुसरीकडे वळविले हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन गैरव्यवहार करणाऱ्या सचिवांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. अशोक चव्हाण** : (१) होय.

(२) होय.

(३) व (४) या प्रकरणाची चौकशी करण्याकरीता चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आलेली होती. चौकशी पूर्ण करुन अहवाल प्राप्त झालेला आहे. त्यामधील चौकशी अधिकाऱ्यांच्या निष्कर्षास असहमती दर्शवून चौकशी अहवालाची प्रत शासनाच्या असहमतीच्या टिप्पणीसह श्री. गोविंद स्वरुप तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांच्याकडे नियमानुसार पाठविण्यात आली होती. त्यावरील त्याचे अभिवेदन सामान्य प्रशासन विभागास प्राप्त झाले असून त्यावरील पुढील प्रक्रीया सुरु आहे.श्री. गोविंद स्वरुप हे व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र चित्रपट,रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ या पदावर कार्यरत नाहीत व त्यांच्यावरील विभागीय चौकशी अंतिम टप्प्यावर आलेली आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, ता.प्र.क्र. 12832

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, हा प्रश्न रोजगार खात्याच्या प्रधान सचिवांनी केलेल्या गैरव्यवहारासंदर्भातील आहे. फिल्मसिटीचे तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक असताना त्यांनी केलेल्या गैरव्यवहारासंदर्भातील हा प्रश्न आहे. याबाबतीत माननीय राज्यमंत्र्यांनी सभागृहाला याप्रकरणातील पूर्ण माहिती दिलेली आहे. प्रकरण निश्तिच गंभीर आहे याबाबतीत अजिबात शंका नाही आणि शासनाने अशा घटनेमध्ये कोणाला पाठीशी घालण्याचे कोणतेही कारण नाही. सभापती महोदय, या प्रकरणामध्ये दोन्ही प्रकारे चौकशी झालेली आहे. विभागीय चौकशी झालेली आहे तसेच लाचलुचपत प्रतिबंधक खात्यामार्फतही चौकशी झालेली आहे. दोन्ही चौकशींची विभिन्न मते शासनासमोर आलेली आहेत.... (यानंतर श्री. खर्चे पी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्र. 12832........

श्री. नितीन गडकरी : महोदय, यासंदर्भात मला हरकतीच्या मुद्दयाच्या माध्यमातून असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, या विषयामध्ये चौकशी करण्यासाठी सरकारने लॉ कमिशनचे अध्यक्ष श्री. चौधरी यांना चौकशीसाठी नेमून त्यांच्यामार्फत चौकशी केली होती. एक उच्च पदस्थ व आय.ए.एस. अधिकाऱ्याची चौकशी लॉ कमिशनचे अध्यक्ष असणाऱ्या व्यक्तींनी केल्यानंतर पुन्हा सामान्य प्रशासन विभागाकडून चौकशी करण्यासाठी शासनाने पुढाकार घेतला, मग पहिली चौकशी करण्याचे कारण काय होते ? दुसरी बाब म्हणजे जी चौकशी श्री. चौधरी यांनी केली त्यांनी दिलेला अहवाल माननीय मुख्यमंत्र्यांनी अथवा कॅबिनेटने मान्य केला आहे की नाही ? अशा वेळी एका उच्च पदस्थाने चौकशी केल्यानंतर त्यांचा जो अहवाल मिळतो त्यावर सामान्य प्रशासन विभागाचे सचिव पुन्हा रिमार्क्स मारतात हे योग्य आहे काय ? म्हणून जी चौकशी पहिल्यांदा करण्यात आली व अहवाल दिला तो रिजेक्ट करण्यात आला काय ? तसा अधिकार माननीय मुख्यमंत्री आणि कॅबिनेटला आहे काय ? म्हणून यासंदर्भात लिगल तपासणी केल्याशिवाय दुसरी चौकशी करणे अथवा दोन्ही चौकशा चालू ठेवणे हे बेकायदेशीर आहे तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या नियमांच्याही विरुध्दच आहे. म्हणून दोन्ही चौकशांच्या संदर्भात मंत्री महोदय जी माहिती देत आहेत त्यामुळे कन्फयुजन निर्माण होणार आहे.

**सभापती** : मी आपल्याला हरकतीचा मुद्दा मांडण्यासाठी परवानगी दिलेली नाही. परंतु या विषयाच्या अनुषंगाने आपण प्रश्न विचारावा. तसेच आपण जे मुद्दे मांडलेले आहेत त्याबाबत माननीय मंत्री महोदयांनी माहिती द्यावी.

श्री. नितीन गडकरी : महोदय, आपण माझ्या मुद्दयाबाबत निर्णय देण्यास हरकत नाही. परंतु शासनाची याबाबतीतील कृती ही संपूर्णपणे असंवैधानिक व बेकायदेशीर आहे. कारण एकाच प्रकरणाच्या दोन चौकशा होऊ शकत नाही हा माझा मुद्दा आहे तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या नियमांचा आधार घेऊनच हा मुद्दा मी मांडलेला आहे, त्याबाबत माननीय मंत्री महोदयांनी स्पष्टीकरण करावे.

श्री. अशोक चव्हाण : महोदय, शासनाने यासंदर्भात जी कार्यवाही केली आहे ती पूर्णपणे कायदेशीर प्रक्रिया विचारात घेऊनच केलेली आहे. विभागीय चौकशीमध्ये सामान्य प्रशासन

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12832............ श्री. अशोक चव्हाण .......

विभागामार्फत जे दोषारोप पत्र ठेवण्यात आले आहेत त्यांच्या अनुषंगाने तत्कालिन सचिव, विधि व न्याय विभाग श्री. डी.एन.चौधरी यांनी चौकशी करावी असे ठरले होते. त्यांनी या दोषारोप पत्रांच्या अनुषंगाने चौकशी केलेली आहे. दुसरी बाब म्हणजे या प्रकरणामध्ये आर्थिक गैरव्यवहाराचा संबंध असल्यामुळे तत्कालीन एम.डी. यांच्याकडे हे प्रकरण पाठविले होते. त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे हे प्रकरण सोपविण्यात यावे असे सांगितले. मी सुरुवातीलाच स्पष्ट केले की यामध्ये कोणाचेही समर्थन करण्याचा प्रश्न नाही. ज्यावेळी श्री. डी.एन.चौधरी यांनी त्यांच्या चौकशीचा अहवाल शासनाला सादर केला त्यावेळी त्यांनी आपल्या अहवालामध्ये Charges are not prooved. असे म्हटले होते. परंतु तो अहवाल आम्हाला मान्य नव्हता म्हणून शासनाने त्या अहवालाला असमर्थता दर्शविली. म्हणून मुद्दाम सांगू इच्छितो की, यापुढची प्रक्रिया लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने करावयाची आहे. त्यात सामान्य प्रशासन विभाग, संसदीय कार्य विभाग, विधि व न्याय विभाग अशा सर्वच विभागांचा संबंध असून केवळ सांस्कृतिक कार्य विभागापुरते हे प्रकरण मर्यादित राहिलेले नाही. यातून जे निष्पन्न होणार आहे त्याबाबत अंतिम कारवाई सामान्य प्रशासन विभागालाच करावी लागणार आहे.

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12832...

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या प्रकरणाची खरी सुरूवात लोकलेखा समितीमध्ये झाली. या व्यवहारास महालेखापालांनी आक्षेप घेतला होता. हा प्रश्न लोकलेखा समितीमध्ये मी, या सदनाचे सदस्य श्री.विलास अवचट व विधान सभेचे सदस्य श्री.गिरीष बापट अशा तिघांनी मिळून उचलून धरला होता. लोकलेखा समितीच्या साक्षीच्या वेळी संबंधित सचिवांनी मगरुरीने आणि बेजबाबदारपणे उत्तरे दिली होती. महालेखापालांच्या आक्षेपावर लोकलेखा समितीमध्ये जवळ जवळ अर्धा दिवस संबंधित सचिवांची साक्ष झाली. तेव्हा पासून अद्यापपर्यंत शासन या प्रकरणाचा तपास करीत आहे. म्हणजे दीड वर्षाचा कालावधी उलटून गेल्यानंतरसुध्दा या प्रकरणी शासन निर्णयाप्रत येत नाही यात नेमकी कोणती गोम आहे, हे कळत नाही. तेव्हा संबंधित सचिव हे निवृत्त होण्यापूर्वी शासन निर्णयाप्रत येणार आहे काय ? असा माझा सवाल आहे.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, विभागीय चौकशी आणि ॲन्टी करप्शनची चौकशी पूर्ण झालेली आहे. आता शासकीय पातळीवर अंतिम प्रक्रिया तातडीने सुरू करण्यासाठी पावले उचलण्यात आली आहेत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा प्रश्न मर्यादित स्वरूपाचा आहे. तो भारतीय प्रशासन सेवतील एका अधिकाऱ्याशी निगडित असा आहे. भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्याच्या चौकशीची प्रक्रिया कशी असते ? त्यांची विभागीय चौकशी होते की, एखाद्या अधिकारी नियुक्त करून चौकशी होते ? त्यांच्या चौकशीच्या अहवालावर अंतिम कारवाई केली जाते काय ? असल्यास, या प्रकरणाच्या संबंधातील चौकशी पूर्ण झाली आहे काय ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्याची विभागीय चौकशी पूर्ण झाल्या नंतर तत्संबंधीचा अहवाल केंद्र शासनाला यु.पी.एस.सी.मार्फत पाठविण्यात येतो व त्यांचा कन्सेन्स घेऊन पुढची कार्यवाही केली जाते.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, काल मर्यादित स्वरूपाचा प्रश्न उपस्थित झाला होता. जो तपास झाला त्यास शासनाने असहमती व्यक्त केली आहे. चौकशी अधिकाऱ्यांने आरोप सिध्द होत नाही असे देखील सांगितले आहे. परवा जेव्हा प्रश्न विचारण्यात आला होता, तेव्हा करोडो रुपयांचा भ्रष्टाचार करण्यात आला आहे, असे शासनातर्फे राज्यमंत्र्यांनी कबूल केले होते. ..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12832...

प्रा.बी.टी.देशमुख....

तेव्हा संबंधित सचिवांना निलंबित करण्यात येईल काय ? असे विचारले असता प्रक्रिया सुरू आहे असे उत्तर देण्यात आले. भारतीय प्रशासन सेवतील अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यासंबंधीची कायद्यानुसार जी प्रक्रिया आहे ती लागू केली पाहिजे या मताचा मी देखील आहे. त्याप्रमाणे संबंधित सचिवांना निलंबित करण्यासंबंधीच्या कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे काय ? नसल्यास, त्यात कोणत्या अडचणी आहेत ? येथे संबंधित सचिवांनी करोडो रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे हे खरे आहे काय ? असा प्रश्न विचारला असता त्यास 'होय' उत्तर मिळते. पण जी प्रक्रिया सुरू व्हावयास पाहिजे ती सुरू होत नाही हे बरोबर नाही.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, संबंधित सचिवांना निलंबित करण्याच्या निर्णयावर शासन आलेले नाही. संबंधित सचिवांना निलंबित करण्याचा निर्णय सामान्य प्रशासन विभागाला घ्यावा लागेल. सांस्कृतिक विभाग हा निर्णय घेण्यास सक्षम नाही, हा मुद्दा मला सभागृहाला सांगितला पाहिजे. या प्रकरणातील ॲन्टी करप्शन ब्युरोचा अहवाल आला आहे. भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्या विरुध्द कारवाई करावयाची असेल तर सामान्य प्रशासन विभाग, विधि व संसदीय कार्य विभाग यांनी विहित केलेली कार्यवाही पूर्ण करावी लागते. ती पूर्ण करून तातडीने हा प्रश्न मार्गी लावण्याचा आमचा प्रयत्न आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.भारवि.... 14:20

ता.प्र.क्र.12832....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या प्रकरणामध्ये भ्रष्टाचार झाला या मतापर्यंत शासन आलेले आहे. म्हणूनच चौकशी सुध्दा सुरु करण्यात आलेली आहे. परंतु ज्याने भ्रष्टाचार केला तो आय.ए.एस.अधिकारी असल्यामुळे शासनासमोर निलंबनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. परंतु मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, जर आय.पी.एस.अधिकाऱ्याकडून असा प्रकार घडला असता तर त्याला सक्तीच्या रजेवर पाठविले गेले असते. त्यामुळे या प्रकरणाचा निर्णय लागेपर्यंत या अधिकाऱ्याला रजेवर का पाठविले जात नाही ? कारण ही व्यक्ती जर सेवेत राहिली तर तिला चौकशीमध्ये हस्तक्षेप करण्यास वाव मिळू शकतो. जर आपण या अधिकाऱ्याला सक्तीच्या रजेवर पाठविले तर जो सिग्नल इंडिकेट व्हाववयास हवा तो हाईल. मागच्या वेळी जेव्हा महानगरपालिके संदर्भात प्रश्न चर्चेला आला होता त्यावेळी, सन्माननीय मंत्री महोदयांनी आय.पी.एस.अधिकाऱ्याशी निगडीत बाब असल्यामुळे त्याचेवर कारवाई करता येणार नाही असे सांगितले होते. त्यामुळे माझा प्रश्न आहे की, शासन या अधिकाऱ्याला सक्तीच्या रजेवर पाठविणार आहे काय ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, सदरहू व्यक्ती सध्या फिल्मसिटीच्या व्यवस्थापकीय संचालक पदी कार्यरत नाही. तसेच ती व्यक्ती या विभागात सुध्दा कार्यरत नाही. त्यामुळे या अधिकाऱ्याचा चौकशीमध्ये हस्तक्षेप होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, व्यक्ती कोणत्या प्रशासकीय सेवेतील आहे हा मुद्दा नाही. कारण या ठिकाणी शासनाने भ्रष्टाचार झाला असे मान्य केले आहे. हा अधिकारी लवकरच निवृत्त होणार आहे. शासन या भ्रष्ट अधिकाऱ्यावर कारवाई करीत नसल्यामुळे बाहेर चुकीचा सिग्नल जात आहे. एखाद्या क्लार्कने जर भ्रष्टाचार केला तर, त्याला ताबडतोब निलंबित केले जाते. त्याचा संसार उध्वस्त होईपर्यंत त्याच्यावर कारवाई केली जाते. गरीबाने केलेला भ्रष्टाचार हा भ्रष्टाचार होतो, मग उच्च पदस्थांनी केलेला भ्रष्टाचार हा भ्रष्टाचार होत नाही काय ? महोदय, या अधिकाऱ्याने शासनाच्या पैशांचा भ्रष्टाचार केलेला आहे. म्हणून माझा पहिला प्रश्न असा आहे की, या अधिकाऱ्याला सक्तीच्या रजेवर पाठविण्यासाठी शासनाकडून दिरंगाई का होत आहे ? तसेच माझा दुसरा प्रश्न असा आहे की, हा अधिकारी केव्हा सेवानिवृत्त होणार आहे ?

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12832....

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, ऑगस्ट महिन्याच्या आसपास हा अधिकारी निवृत्त होईल अशी माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. त्यामुळे तत्पूर्वी हे प्रकरण निकाली निघावे असा शासनाचा प्रयत्न राहील.

कर्नल सुधीर सावंत : महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो योग्य आहे. कोणतीही कारवाई ही प्रक्रियेनुसार झाली पाहिजे. कारण हा आय.ए.एस.अधिकाऱ्याचा प्रश्न आहे. भ्रष्टाचार झाला हे शासनाने मान्य केले आहे. तो कोणत्या आधारे झाला हे तुम्हाला माहीत आहे. सबस्टॅन्शिअल विषयावर चर्चा करावयाची असेल तर त्याला वेगळा वेळ द्यावा लागेल. चौकशीची जी प्रक्रिया आहे ती पूर्ण झाली की नाही हा महत्वाचा मुद्दा आहे. हे प्रकरण इकॉनॉमिक ऑफेन्स विंग कडे दिले होते तर ते कोणत्या कलमाखाली व नियमाखाली दिले होते ? कारण एकाच प्रकरणाच्या दोन चौकशा होऊ शकत नाहीत हा सामान्य प्रशासन विभागाचा नियम आहे. त्यामुळे दुसरी चौकशी का आणि कोणत्या नियमाच्या आधारे झाली ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, दोन्हीही चौकशा कायद्याच्या चौकटीत बसूनच करण्यात आलेल्या आहेत. ए.सी.बी.कडून या प्रकरणी 409, 420, 120, 13(1)(अ), 13(1)(ड) व 13 (2) अशा कलमाखाली चौकशी झाली आहे.

--------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## <u>दोन तारांकित प्रश्न एकत्र घेण्याबाबत</u>

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रश्न क्र.9 आणि प्रश्न क्र.57 हे दोन्हीही प्रश्न साधारणत: सारखेच आहेत. त्यामुळे प्रश्न क्र.9 ज्यावेळी चर्चेला येईल, त्याच वेळी प्रश्न क्र.57 वर सुध्दा चर्चा घेण्यात यावी.

**सभापती** : आपण ज्यावेळी प्रश्न क्र.9 वर येऊन पोहोचू त्यावेळी बघू.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( तारांकित प्रश्न )**

**मुंब्रा व कौसा (जिल्हा ठाणे) येथील जरी कारखान्यातील**
**१७ बालकामगारांची करण्यात आलेली सुटका**

**(१) * १२७४७ श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. फौजीया खान , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री. संजय दत्त , मेजर सुधीर सावंत , श्री. सुधाकर गणगणे , श्री. गोविंदराव आदिक :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंब्रा-कौसा (जिल्हा ठाणे) येथील देवरीपाडा श्रीलंका या भागातील ७ जरी काम करणाऱ्या कारखान्यावर छापा मारुन दिनांक २६ डिसेंबर, २००५ रोजी वा त्या सुमारास सुमारे १७ बाल कामगारांची शासनाने मुक्तता केली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, सदर बालकामगार कोणत्या राज्यातील असल्याचे आढळून आले,
(४) तसेच सदर बालकामगारांकडून काम करुन घेणाऱ्या कारखानदाराविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. बाबा सिद्दीकी, श्री.गणेश नाईक यांच्याकरिता** : (१) कामगार उप आयुक्त, ठाणे यांच्या अध्यक्षते खाली बाल कामगार टास्क फोर्स,ठाणे यांनी दिनांक २६-१२-२००५ रोजी मुंब्रा कौसा येथील देवरीपाडा, श्रीलंका या भागातील ७ जरी काम करणाऱ्या आस्थापनांवर धाडी टाकून १७ बाल कामगारांची सुटका करण्यात आली आहे हे खरे आहे काय.
(२) होय.
(३) १७ बाल कामगारांपैकी १६ बिहार व १ पश्चिम बंगाल राज्यातील आहेत.
(४) सदर बाल कामगारांकडून काम करुन घेणाऱ्या ८ मालकांविरुध्द पोलीस विभागामार्फत भा.दं.स.कलम ३७४ व बाल न्याय (काळजी व संरक्षण) अधिनियम,२००० चे कलम २३ व २६ अंतर्गत मुंब्रा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच कामगार आयुक्त कार्यालयामार्फत बाल कामगार (प्रतिबंध व निर्मुलन) अधिनियम,१९८६ अंतर्गत कारवाई करण्यात येत आहे. तसेच सर्व मालकांना प्रत्येक मुलामागे रु.२०,०००/-पुनर्वसन फंडामध्ये जमा करण्याच्या नोटीसा पाठविण्यात आलेल्या आहेत.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांना या प्रश्नाचे उत्तर दुरुस्त करावयाचे आहे का ? कारण उत्तराच्या क्रमांक 1 मध्ये शेवटी, " 17 कामगारांची सुटका करण्यात आली आहे हे खरे आहे काय. " असा प्रश्नच विचारलेला आहे.

श्री. बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, उत्तराच्या क्रमांक 1 मध्ये शेवटी, " 17 कामगारांची सुटका करण्यात आली आहे हे खरे आहे काय. " याऐवजी " 17 कामगारांची सुटका करण्यात आली आहे हे खरे आहे. " असे वाचण्यात यावे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSK/ MHM/ SBT यापूर्वी श्री. बोर्डे .. 14.25

**ता.प्र.क्र.12747...**

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्यांच्या, पाण्याच्या, विजेच्या प्रश्नाइतकाच बालकामगारांचा प्रश्नही महत्वाचा आहे. राज्य शासनाने या संदर्भात चांगली पावले उचलली आहेत. सुटका झालेल्या बालकामगारांना त्यांच्या राज्यात पाठविण्याची व्यवस्था देखील झाली आहे. परंतु माझा माननीय मंत्रीमहोदयांना स्पेसिफीक असा प्रश्न आहे की, सुटका झालेल्या बालकामगारांसाठी शासनाने आणखी काही उपाय केलेले आहेत का ? त्याचप्रमाणे आपण नोटीसा दिल्याप्रमाणे, मालकांकडून किती फंड जमा करण्यात आला आहे ?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, ठाणे में मालिक की तरफ से 80 हजार रुपये जमा हुए हैं. पूरे महाराष्ट्र में 9 लाख 80 हजार रुपये जमा हुए हैं. बाल मजदूरों के लिए अलग अलग योजनाओं के तहत कार्य किया जा रहा है. प्रोजेक्ट ऑफ इंडिया युनायटेड स्टेटस स्कीम के तहत 5 जिलों में बाल मजदूरों को शिक्षा देने की व्यवस्था की जाती है. इस प्रोजेक्ट के तहत केन्द्रीय सरकार से 2007 तक के लिए 2.48 करोड़ रुपये प्राप्त हुआ है. ये पांच जिले हैं-अमरावती, औरंगाबाद, गोंदिया, जालना और मुंबई उपनगर. ट्रांझिट स्कूल 160 है और 7760 बच्चे पढ़ रहे हैं. वोकेशनल कोर्सेस 83 है, इसके अन्तर्गत 2840 बच्चे पढ़ रहे हैं. नेशनल चाईल्ड लेबर प्रोजेक्ट (LCPL) के अन्तर्गत 13 जिले सिलेक्ट किए गए हैं. ठाणे, सोलापुर,पुना,सांगली,कोल्हापुर,नाशिक,धुले, जलगांव, अहमदनगर, नंदुरबार,यवतमाल, नांदेड़ एवं बीड ये 13 जिले सिलेक्ट किए गए हैं. इनमें से 6 जिलों में यह स्कीम अमल की जा रही है, ठाणे, सोलापुर, धुले,यवतमाल,नांडेड़ एवं बीड. स्पेशल स्कूल 136 खोले गए हैं, इनमें 6625 बच्चें पढ़ रहे हैं. इस हेतु कुल 8.43 करोड़ रुपये प्राप्त हुए हैं.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, बालकामगारांचा प्रश्न अत्यंत ज्वलंत असा प्रश्न आहे. मी 17 तारखेला विचारलेला बालकामगारांवरील प्रश्न राखून ठेवण्यात आला होता. तरी, हा राखून ठेवलेला प्रश्न केव्हा घेण्यात येणार आहे, की मला आताच त्या प्रश्नाचे उत्तर मिळणार आहे ?

**सभापती** : आपण विचारलेल्या व राखून ठेवलेल्या प्रश्नाचे उत्तर आता देण्यात येणार नसून, तो प्रश्न स्वतंत्रपणे घेण्यात येईल.

...3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 12747....**

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, " मुंब्रा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. " असे आपण उत्तर क्रमांक 4 मध्ये दिलेले आहे. तरी, मी आपल्याला असा प्रश्न विचारु इच्छिते की, या प्रकरणामध्ये नेमकी कोणती कारवाई करण्यात आली आहे ? आणि केलेली कारवाई पुरेशी कडक आहे का ? कारण सभापती महोदय, मालकांवर अत्यंत कडक कारवाई केली तरच या प्रकरणासंदर्भात काही उपाय होऊ शकतील.

श्री. बाबा सिद्दीकी : उत्तर में स्पष्ट लिखा है कि Section 374 of IPC के अन्तर्गत कार्रवाई की गई है.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी, माननीय मंत्रीमहोदयांना विचारत आहेत की, आपण संबंधितांवर काय कारवाई केली ? क्रिमिनल गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्यात आली आहे का ? परंतु या संदर्भात माननीय मंत्रीमहोदय नेमके उत्तर देत नाहीत. माननीय मंत्रीहोदयांनी उत्तर क्रमांक 4 च्या शेवटी असे सांगितले आहे की, " तसेच सर्व मालकांना प्रत्येक मुलामागे रु.20,000/- पुनर्वसन फंडामध्ये जमा करण्याच्या नोटीसा पाठविण्यात आलेल्या आहेत". तरी, माझा यासंबंधी माननीय मंत्रीमहोदयांना स्पेसिफीक प्रश्न आहे की, मालकांनी आपण दिलेल्या नोटीसांप्रमाणे पुनर्वसन फंडामध्ये सदर रक्कम जमा केली आहे का ?

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**ता.प्र.क्र.12747....**

श्री. बाबा सिद्दिकी : सभापती महोदय...

**सभापती** : मी आपणास उत्तर देण्यास सांगितले नाही.

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदय, माझा मंत्री महोदयांना असा प्रश्न आहे की, जरी कारखान्यात काम करणारे बाल कामगार आता कोठे आहेत ?

श्री. बाबा सिद्दिकी : सभापती महोदय, ये बाल मजदूर जरी के कारखाने में काम करते थे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, बाल कामगार कारखान्यात काम करीत होते हे मंत्री महोदयांनी मान्य केलेले आहे. हे 17 बाल कामगार आता कोठे आहेत ते सांगावे ?

श्री. बाबा सिद्दिकी :सभापती महोदय, 17 बाल कामगारों में से 16 बाल कामगार बिहार के थें इसलिए उनको बिहार भेज दिया गया है. एक कामगार वेस्ट बंगाल का है, उसे उसके माता-पिता अपने साथ घर ले गए हैं.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, या सभागृहामध्ये बाल कामगार या विषयावर बऱ्याच वेळा चर्चा झालेली आहे. या बाल कामगारांकडून जरीचे काम करुन घेण्यात येते, ते त्यांच्याकडून थांबविण्यात आले पाहिजे. यापूर्वी अनेक वेळा शासनाच्यावतीने घोषणा करण्यात आलेल्या आहेत. आता परत 17 बाल कामगार सापडलेले आहेत. यापूर्वी आम्ही ठाणे शहरामध्ये धाडी टाकून 30 बालकामगारांची सुटका केलेली आहे. यानंतर ते बालकामगार कोठे गेले हे आम्हाला माहिती नाही. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, बाल कामगारांना कामावर घेण्याच्या घटना वारंवार घडत असतांना व बाल कामगारांना कामावर घेऊ नये असे कायद्यानुसार बंधन असतांना याकडे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होते. अधिकारी व मालक वर्ग यांच्यामध्ये संगनमत होऊन कारखान्याचे मालक बालकामगारांना कामावर ठेवतात, म्हणून या मध्ये जे अधिकारी दोषी आहेत आहेत त्यांच्यावर शासनाने काय कारवाई केलेली आहे ? किंवा आता शासन काय कारवाई करणार आहे ?

श्री. बाबा सिद्दिकी : सभापति महोदय, 18.05.2005 को टास्क फोर्स गठित की गई है. यह टास्क फोर्स लेबर विभाग के कमिश्नर एवं एन.जी.ओ. के सहयोग से अपना काम कर रहा है.

.....2



**ता.प्र.क्र.12747....** श्री. बाबा सिद्दिकी ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

इस टास्क फोर्स ने मुंबई में 15 और ठाणे में 12 जगहों पर छापा मारा है. अगर कोई अधिकारी मालिक को सहयोग कर रहा है तो आप मुझे जानकारी दें. मैं उनकी जांच करुंगा. अगर जांच में कोई अधिकारी दोषी पाया जाएगा तो उनके खिलाफ ठोस कार्रवाई की जाएगी.

श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सांगितले आहे की, बाल कामगार अनेक कारखान्यांमध्ये काम करीत होते. तारांकित प्रश्नावलीमध्ये दुसरा प्रश्न असा आहे की, किमान वेतन कायद्यानुसार जसे विडी कामगारांना किमान वेतन मिळते किंवा नाही त्याचप्रमाणे आपण ज्या ठिकाणी घाडी टाकल्या त्या ठिकाणी या बाल कामगारांना किमान वेतन मिळते काय ?

**सभापती** : सन्माननीय सदस्य, हा प्रश्न वेगळा आहे.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, आम्ही या संदर्भात कारवाई करण्यासाठी एक "टास्क फोर्स" तयार केलेला आहे. खरे पाहिले तर कामगार आयुक्त कार्यालयामार्फत "टास्क फोर्स" काहीही काम करीत नाही. भिवंडी येथील जरी कारखान्यामध्ये काम करणारे जे बाल कामगार आहेत त्यांचे मोठया प्रमाणात लैंगिक शोषण होत आहे. त्यांना 10 x 10 च्या रुम मध्ये काम करावे लागते. म्हणून माझा प्रश्न असा आहे की आपले "टास्क फोर्स" नक्की काय काम करीत आहे ते मंत्री महोदयांनी सांगावे ?

श्री. बाबा सिद्दिकी : यह टास्क फोर्स लेबर विभाग के कमिश्नर, मुंबई महानगरपालिका के सहयोग से काम कर रहा है. इस टास्क फोर्स ने क्या कार्रवाई की है, उसकी जानकारी मैं इसके पहले के प्रश्न में दे चुका हूं. मैंने बताया कि इस टास्क फोर्स ने मुंबई में 15 और ठाणे में 12 जगहों पर छापा मारा है. दिनांक 18.5.2005 को टास्क फोर्स का गठन किया गया है.इसके अलावा अगर आपके पास कोई जानकारी है तो आप मुझे दें. इस प्रश्नोत्तर काल के बाद आप मेरे पास आए और मुझे जानकारी दें. मैं आज ही टास्क फोर्स के साथ जाकर कार्रवाई करुंगा.

---------------

यानंतर श्री. सांगळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MJS/ SBT/ MHM/ प्रथम श्री.विठ्ठल खर्चे .... 14:35

**किमान वेतन कायद्यानुसार भिवंडीतील विडी कामगारांना वेतन मिळणेबाबत**

**(२) * १५०६८ श्री. दिवाकर रावते , श्री. विलास अवचट , श्री. अरविंद सावंत , डॉ. दीपक सावंत :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या किमान वेतन कायद्यानुसार एक हजार विडी मागे ५९ रुपये देणे बंधनकारक असतांना भिवंडी शहरातील विडी कामगारांना केवळ ३५ रुपये वेतन दिले जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, सदर विडी कामगारांना एक हजार विडी मागे ५९ रुपये देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबा सिद्दीकी, श्री. गणेश नाईक यांच्याकरिता**: (१) शासनाच्या किमान वेतन कायद्यानुसार एक हजार विडीमागे रु.६२.४० देणे बंधनकारक आहे हे खरे आहे. परंतु भिवंडी येथे "सेल्फ पर्चेस" पध्दतीवर विडी वळण्याचे काम होत असल्याने वळलेली विडी दर हजारी रु.७०/- प्रमाणे दुकानदाराला विकली जाते. विडी वळण्यासाठी येणारा खर्च वजा जाता विडी वळणा-यास रु.३२/- ते रु.३५/- मिळतात हे खरे आहे..
(२) क्षेत्रिय सरकारी कामगार अधिकाऱ्यानी चौकशी केली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही. कारण भिवंडी येथे "सेल्फ पर्चेस" पध्दतीवर विडी वळण्याचे काम होत असल्याने मालक व कामगार संबंध प्रस्थापित होत नाहीत.

श्री.दिवाकर रावते : पहिल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये किमान वेतन कायद्यानुसार १००० विडीमागे रु.62.40 देणे बंधनकारक असल्याचे मान्य करण्यात आलेले आहे. याबाबत शासन कोणत्या प्रकारची उपाययोजना करणार आहे ?

श्री.बाबा सिद्दीकी : पहिल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये स्पष्टपणे नमूद केलेले आहे की, विडी कामगार विडी तयार करण्यासाठी आवश्यक असलेले तंबाखु व तेंदूपत्ता स्वत: खरेदी व विडी वळण्याचे काम करतात. वे खुद चीजे खरीदते हैं और खुद बेचते हैं इसलिए उनक बारे में मिनिमम वेजेस एक्ट लागू नहीं होगा. इस जगह वे खुद मालिक है और बीड़ी तैयार करके व्यापारी को बेचते हैं.

श्री.नितीन गडकरी : किमान वेतन कायद्यानुसार १००० विडीमागे रु.62.40 देणे बंधनकारक असतांना सुध्दा विडी वळणा-यास फक्त 32 ते 35 रुपये मिळत असल्यामुळे विडी कामगारांचे शोषण होत आहे. विडी वळणा-या कामगारांना 1000 विडीमागे रु.62.40 मिळू शकतील यासाठी बंधन करणे आवश्यक आहे. परंतु या ठिकाणी विडी कामगारांना 1000 विडीमागे

...2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. १५०६८**                                    श्री.नितीन गडकरी.....

केवळ 32 ते 35 रुपये मिळत असल्यामुळे त्यांचे शोषण होत आहे व दुसरीकडे व्यापा-यांना संरक्षण मिळत आहे. किमान वेतन कायद्याप्रमाणे सेल्फ पर्चेसवर विडी वळणा-यांना रु.62.40 एवढी रक्कम मिळण्यासाठी शासन काही दुरुस्ती करणार आहे काय ?

श्री.बाबा सिद्दीकी : 1966 के कानून के सेक्शन 43 के अन्तर्गत यह स्पष्ट है कि सेल्फ एम्पलायमेंट के अन्तर्गत निजी व्यव्हार के लिए यह कानून लागू नहीं होगा.

**सभापती** : मजदूरों का शोषण न हो इसलिए मिनिमम वेजेस एक्ट बनाया गया है.

श्री.गणेश नाईक : लोक स्वत: तंबाखू व तेंदूपत्ता खरेदी करुन विडी तयार करुन व्यापा-यांकडे देतात. परंतु व्यापारी मोठया प्रमाणात तंबाखू व तेंदूपत्ता खरेदी करीत असल्यामुळे विडी बनविणा-या कामगारांना 1000 विडया तयार करण्यासाठी किमान वेतन कायद्याप्रमाणे रु.62.40 एवढी रक्कम देणे शक्य होते. म्हणून त्या शहरातील विडया बनविणा-या लोकांची संघटना करुन सहकारी संस्थेमार्फत मोठया प्रमाणात तंबाखू व तेंदूपत्ता खरेदी करण्याची तरतूद केली तर त्यांना किमान वेतन कायद्यानुसार ठरविण्यात आलेली रक्कम देता येऊ शकेल.

श्री.विलास अवचट : सेल्फ पर्चेसच्या बाबतीत विडी बनविणा-या कामगारांची संघटना करुन त्यांना उत्तेजन देणे ही वेगळी बाब आहे. परंतु विडी कामगारांना किमान वेतन कायद्याप्रमाणे ठरविण्यात आलेली रक्कम मिळण्यासाठी शासन कोणत्या प्रकारची उपाययोजना करणार आहे ?

श्री.गणेश नाईक : त्या शहरातील विडया बनविणा-या लोकांची संघटना करुन, त्यांना विश्वासात घेऊन त्यांची एक संस्था निर्माण करुन मोठया प्रमाणात तंबाखू व तेंदूपत्ता खरेदी करण्याची तरतूद केली तर त्यांना किमान वेतन कायद्यानुसार ठरविण्यात आलेली रक्कम देता येऊ शकेल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. सेल्फ पर्चेसमध्ये 1000 विडयांमागे व्यापा-यांना फक्त 32 ते 35 रुपये द्यावे लागत असल्यामुळे त्यांचा फायदाच आहे.

( यानंतर श्री.सुंबरे .....

अधृधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 15068 ...

आणि फायदा जो आहे तो उद्योगपतींचा आणि व्यापाऱ्यांचा. मग आपण किमान वेतन कायदा कशासाठी केला ? ही एक पळवाट आहे. उद्योगपती आणि व्यापाऱ्यांनी कामगारांकडून स्वस्तामध्ये काम करून घेण्यासाठी सेल्फ पर्चेस वा सेल्फ एम्प्लायर पद्धत काढली आहे. अशा पद्धतीने प्रत्येक वेळी झाले तर आपण केलेल्या किमान वेतन कायद्याला काही अर्थच राहणार नाही. तेव्हा प्रत्येक काम करणाऱ्याला किमान वेतन मिळाले पाहिजे त्यासाठी या कायद्यामध्ये दुरूस्ती करून, या बाबतीत व्यापारी आणि उद्योगपतींवर बंधने आणण्याच्या दृष्टीने कार्यवाही केली पाहिजे. त्यासाठी आज त्या दृष्टीने आपल्याकडे काही पर्याय वा उपाय नसेल तर उद्या त्या दृष्टीने विधेयक आणून या कायद्यात दुरूस्ती करण्याचा निर्णय आपण घेतला पाहिजे. तरी त्या दृष्टीने आपण प्रयत्न कराल का ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गडकरी यांनी जो मुद्दा मांडला आहे त्याबाबतीत मी आपल्याला सांगू इच्छितो की, ज्या ठिकाणी मालक आहे आणि त्याच्यासाठी काही कामगार काम करीत असतील तर त्यांना किमान वेतन कायदा लागू होतो. परंतु येथे जे स्वत:च मालक आहेत, जे स्वत:च हा उद्योग करीत आहेत, त्यासाठी बाजारातून तंबाखू आणि तेंदूपत्ता विकत आणून विड्या तयार करून व्यापाऱ्यांना विकत देतात त्यांना हा किमान वेतन कायदा लागू होऊ शकत नाही. म्हणूनच मी मघाशी सांगितले की, अशा घटकांच्या सोसायट्या तयार करून त्यांच्यासाठी रॉ मटेरिअल बल्क पर्चेस केल्यास कमी किंमतीमध्ये रॉ मटेरिअल त्यांना मिळू शकेल आणि त्यातून त्यांना रोजगार वाढून तो 64 रूपये पर्यंत जाऊ शकेल. तेव्हा या दृष्टीने या लोकांच्या बाबतीत प्रयत्न व्हावयास पाहिजेत इतकेच मला येथे सांगावयाचे आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, सेल्फ एम्प्लॉईड किंवा सेल्फ पर्चेस असे शब्द वापरून, कायद्यातून पळवाट काढली जाते पण खरोखरी प्रत्यक्षात हे लोक त्यांच्याकडे कामगार म्हणून काम करतात की नाही ?

श्री. बाबा सिद्दीकी : नाही.

श्री. यशवंतराव गडाख : सभापती महोदय, या ठिकाणी आता सन्माननीय सदस्य श्री.गडकरी वारंवार सांगत आहेत की, कायद्यातून काढलेली ही पळवाट आहे. याबाबतीत मी आपल्याला सांगू इच्छितो की, आमच्या नगर मध्ये असे अनेक विडी कामगार आहेत की त्यांना

...... आय 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडाख (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 15068 .....

विडी कारखानदार तंबाखू आणि तेंदूपत्ता पुरवितात आणि मग हे कामगार स्वत:च्या घरी जाऊन त्यापासून विड्या वळतात आणि कारखानदारांना वा मालकांना आणून देतात. तेव्हा हा प्रकार लक्षात घेऊन, ही जी पळवाट आहे ती लक्षात घेऊन ही पळवाट बंद करण्यासाठी कायद्यात त्या दृष्टीने दुरूस्ती आपण करणार आहात का ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, असे असेल तर त्या घटकांना किमान वेतन मिळेल या दृष्टीने व्यवस्था केली जाईल.

श्री.विलासराव शिंदे : सभापती महोदय, यामध्ये विडी तयार करून देणारेच तंबाखू आणि तेंदूपत्ता विकत घेत असतील आणि त्यापासून विड्या वळून त्या व्यापारी-कारखानदार यांना देत असतील तर त्यांना किमान वेतनानुसार दर देण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. पण आता येथे सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे व्यापारी बाजारातून तंबाखू-तेंदूपत्ते विकत घेऊन या लोकांना विड्या वळण्यास देतात आणि त्यांच्याकडून विड्या तयार करवून घेतात. म्हणजे त्यांचे संबंध तसे पाहिले तर मालक आणि कामगार असेच असतात पण प्रत्यक्ष कागदावर मात्र ते आणले जात नाहीत. ही कायद्यातून काढलेली एक पळवाट आहे. ती पळवाट बंद करण्यासाठी शासनाने जरूर विचार करावा. तरी शासन यासाठी प्रयत्न करील काय ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, ही पळवाट बंद करण्याचा शासन निश्चितपणे प्रयत्न करील.

****

...... आय 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अनुदानास निकषपात्र ठरणाऱ्या माध्यमिक शाळांची यादी जाहीर करणे व अनुदान मंजूर करणे**

**(3) * 12755 श्री. रामदास तडस , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे , प्रा. बी. टी. देशमुख : तारांकित प्रश्न क्र.9330 ला दिनांक 16 डिसेंबर 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) माहे मे,2004 मध्ये केलेल्या मूल्यांकनात ज्या माध्यमिक शाळा अनुदानासाठी अपात्र ठरल्या होत्या अशा आणि सन 2000-2001 मध्ये विना अनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या व मूल्यांकनानुसार अनुदानासाठी पात्र ठरणाऱ्या व दिनांक 27 ऑक्टोबर,2005 च्या शासन निर्णयान्वये घोषित करण्यात आलेल्या 915 शाळांच्या मार्च,2006 पर्यंत अनुदान वितरण करण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(2) अनुदान वितरित केले असल्यास केव्हा केले आहे,
(3) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ, प्रा. वसंत पुरके यांच्याकरिता** : (1), (2) व (3) आदिवासी उपयोजना क्षेत्र व आदिवासी उपयोजना बाह्य क्षेत्रातील 75 शाळांचे अनुदान दिनांक 10 मार्च, 2006 च्या आदेशान्वये वितरीत करण्यात आले आहे. उर्वरित शाळांबाबत तरतूद उपलब्ध झाल्यावर अनुदान वितरित करण्यात येईल.

( यानंतर श्री. सरफरे .... जे 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 12755...

श्री. रामदास तडस : सभापती महोदय, प्रश्न असा आहे की, बिगर आदिवासी विभागातील शाळांना आपण अनुदान केव्हा देणार आहात?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, ज्या बिगर आदिवासी भागातील 840 माध्यमिक शाळा आहेत त्यांचे मूल्यांकन झाले असून त्याची यादी घोषित केली आहे. त्यांना 30 मार्चपर्यंत अनुदानावर आणण्याचा प्रयत्न असून या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्याबाबत आजच माननीय अर्थमंत्र्यांशी व माननीय शिक्षण मंत्र्यांशी चर्चा केली. तरीपण या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात आली नाही तर कॉंटीजन्सी फंडामधून त्यांना कोणत्याही परिस्थितीत अनुदान देण्याचे निश्चित झाले आहे.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, शासनाने सभागृहाची दिशाभूल केली आहे. या प्रश्नाच्या पहिल्या भागाला उत्तर दिले आहे तर दुसऱ्या भागाला उत्तर दिले नाही. पहिल्या भागामध्ये "मे-2004 मध्ये केलेल्या मूल्यांकनात ज्या माध्यमिक शाळा अनुदानासाठी अपात्र ठरल्या होत्या अशा आणि सन 2000-2001 मध्ये विना अनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या शाळांच्या बाबतीत"... आणि दुसरे असे की, "दिनांक 27 ऑक्टोबर, 2005 च्या शासन निर्णयान्वये घोषित करण्यात आलेल्या 915 शाळांची यादी जाहीर केली." यापैकी पहिल्या प्रश्नाला "आदिवासी उपयोजना क्षेत्र व आदिवासी उपयोजना बाह्य क्षेत्रातील 75 शाळांचे अनुदान दिनांक 10 मार्च 2006 च्या आदेशान्वये वितरीत करण्यात आले" . आता आपण सांगितले की, बिगर आदिवासी क्षेत्रातील शाळा मार्चपर्यंत अनुदानावर आणण्यात येतील. म्हणून प्रश्न असा आहे की, ज्या 500 शाळा अनुदानावर येणार आहेत त्यांची यादी आपण 31 मार्चपर्यंत जाहीर करणार काय? बिगर आदिवासी शाळांची यादी जाहीर केलेल्या दिनांकापासून त्यांना अनुदान देणार काय? कारण 27 ऑक्टोबर 2005 ला यादी जाहीर होवून 5 महिने झाले. यादी जाहीर झालेल्या दिनांकापासून अनुदानाची व्यवस्था करण्यात येईल असे जी.आर. मध्ये स्पष्टपणे म्हटले आहे. म्हणून प्रश्न असा आहे की, निकष पात्र ठरलेल्या शाळांची यादी 31 मार्च 2006 पर्यंत जाहीर करणार काय? आणि बिगर आदिवासी क्षेत्रातील शाळांना 30 एप्रिलपर्यंत अनुदान मिळेल अशी व्यवस्था करणार काय?

श्री. हसन मुश्रीफ : ज्या शाळांची यादी जाहीर केली आहे त्यांना एप्रिलमध्ये अनुदान देण्याचा प्रयत्न करीत आहोत. आणि ज्या शाळांची यादी जाहीर करावयाची आहे...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 12755...

श्री. व्ही. यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, प्रयत्न करु असे उत्तर देण्यात आले आहे, मंत्रिमहोदयांनी निश्चित असे उत्तर दिले पाहिजे.

श्री. हसन मुश्रीफ : उद्या सभागृहामध्ये अर्थसंकल्प मांडण्यात येणार असल्यामुळे प्रयत्न करु असे सांगितले आहे. उद्याच्या अर्थसंकल्पामध्ये जर तरतूद करण्यात आली नाही तर कोणत्याही परिस्थितीत त्यांना अनुदान देण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : "कोणत्याही परिस्थितीत अनुदान देवू, प्रयत्न करु" या वाक्यांचा अर्थ समजावून सांगा.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या करीता नियोजन विभागाकडून आऊट लेट मागितला आहे. तो मिळाला नाही तर मंत्रिमंडळाच्या उपसमितीपुढे हा विषय आणून कॉटीजन्सी फंडामधून अनुदान देण्याची व्यवस्था करु.

श्री. नितीन गडकरी : "मंत्रिमंडळाच्या उपसमितीपुढे ठेवणार असे म्हणता, अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात आली तर म्हणता" याचा अर्थ काय? आपण आम्हाला निश्चित असे उत्तर द्या.

श्री. हसन मुश्रीफ : उद्या अर्थसंकल्प मांडण्यात येणार असल्यामुळे आणि अर्थसंकल्पामध्ये या करीता तरतूद केली आहे की नाही हे माहीत नसल्यामुळे तसे सांगितले आहे.

**सभापती** : आपण तीन वेगवेगळी उत्तरे दिली आहेत, त्याऐवजी आपण एकच ठाम असे उत्तर द्यावे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, कोणत्याही परिस्थितीत त्यांना एप्रिल महिन्यामध्ये अनुदान देवू आणि त्याकरीता 30 मार्चपूर्वी यादी जाहीर करु.

----

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**गडचिरोली जिल्ह्यात केरोसिनचा होत असलेला काळाबाजार**

**(४) * १४७६९ प्रा. जोगेंद्र कवाडे , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. रमेश निकोसे :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात केरोसिनचा मोठया प्रमाणात काळा बाजार सुरु असून केरोसीन वाटपात सुसूत्रता यावी व सामान्य जनतेला केरोसीन योग्य भावाने मिळावे अशी मागणी दिनांक ६ डिसेंबर, २००५ रोजी वा त्यासुमारास गडचिरोली जिल्हा कॉंग्रेस कमेटीचे अध्यक्ष प्रकाश इटनकर (जि.प.अध्यक्ष) यांनी मा. उपमुख्यमंत्र्यांना शिष्टमंडळाव्दारे भेटून केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनील तटकरे** : (१) अशा आशयाची तक्रार श्री. प्रकाश इटनकर यांनी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक २४ नोव्हेंबर, २००५ च्या पत्रान्वये केली आहे. या तक्रारीची प्रत मा. उपमुख्यमंत्री यांना अग्रेषित केली आहे हे खरे आहे.

(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने गडचिरोली जिल्ह्यातील केरोसीन वितरणाची चौकशी करण्याच्या सूचना नागपूर विभागाच्या विभागीय दक्षता पथकास देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. रमेश निकोसे : गडचिरोली व महाराष्ट्रातील सर्व जिल्हयामध्ये हॉकर्स आणि होलसेलर्स यांना समान कोटा दिला जात नाही. यामध्ये काही लोकांना जास्त तर काही लोकांना कमी कोटा दिला जातो. सर्वांना सारखा कोटा दिला तर तक्रारीला वाव रहाणार नाही. त्यासाठी शासन प्रयत्न करील काय?

श्री. सुनील तटकरे : माननीय सदस्यांचा प्रश्न भिन्न स्वरुपाचा आहे. हॉकर्स आणि किरकोळ परवानेधारक यांच्यासाठी सरकारने नवीन धोरण स्वीकारले नाही. हॉकर्सला जोडलेले जे ग्राहक आहेत आणि रिटेलर्सला जोडलेले ग्राहक आहेत त्यांना सम प्रमाणात कोटा देण्याचा शासन प्रयत्न करीत आहे. तसे आदेश निर्गमित केले आहेत.

(यानंतर श्री.किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 14769 (पुढे सुरु...

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, गडचिरोली जिल्ह्यातील जिल्हा कॉंग्रेसचे अध्यध्य श्री.इटनकर यांनी राष्ट्रवादीच्या उपमुख्यमंत्र्यांना जिल्ह्यामध्ये रॉकेल मिळत नाही, काळाबाजारामध्ये ते रॉकेल विकले जाते अशाप्रकारचे तक्रारीचे निवेदन दिलेले आहे, हे खरे आहे काय ? याला उत्तर दिलेले आहे की, "सदर तक्रारीच्या अनुषंगाने गडचिरोली जिल्ह्यातील केरोसीन वितरणाची चौकशी करण्याबाबतच्या सूचना नागपूर विभागाच्या विभागीय दक्षता पथकास दिलेली आहे". त्यानंतर या दक्षता पथकाने कोणती कारवाई केली, किती लोक या प्रकरणामध्ये सापडले? याची माहिती दिलेली नाही. याबाबतीत सरकार टर्कामायसीनची गोळी घेऊन बसलेले आहे. त्यांनी काय चौकशी केली ? कॉंग्रेसचे जिल्हा अध्यक्ष तक्रार करतात, त्या संबंधात राष्ट्रवादीचे मंत्री दखल घेत नाहीत, असा प्रकार आहे काय ?

श्री.सुनील तटकरे : त्यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे पत्राद्वारे तक्रार केलेली आहे, त्याची कॉपी उप मुख्यमंत्री महोदयांना दिलेली आहे. दोघांनीही याबाबतीत कारवाई करण्याबाबत विभागाला कळविलेले आहे. त्याप्रमाणे विभागाने विभागीय आयुक्तांच्या दक्षता पथकास चौकशी करण्यास सांगितले होते. तक्रारीमध्ये घाऊक विक्रेत्यांबद्दल तक्रार होती. त्याची चौकशी करत असतांना चौकशी पथकास आढळून आले की, गडचिरोली जिल्ह्यामध्ये डेपो नाही. खरे म्हणजे घाऊक वितरणाचा डेपो हा त्या त्या जिल्ह्यामध्ये असणे आवश्यक आहे. त्याबाबत ऑईल कंपनीला कारवाई करण्यासंबंधी लिहिलेले आहे. याबाबत घाऊक परवाना देत असतांना त्या ठिकाणी डेपो असणे आवश्यक आहे. या सगळया गोष्टींची चौकशी करत असतांना, जे किरकोळ विक्रेते आहेत त्यांची चौकशी करण्याचे राहिलेले आहे, त्यांची चौकशी करण्याच्या सूचना सरकारने दिलेल्या आहेत.

श्री.नितीन गडकरी : ही तक्रार 24 नोव्हेंबर 2005 रोजी केलेली आहे, असे असतांना यासंबंधातील चौकशीला इतका विलंब लागलेला आहे. शासनाला यांची लायसन्स रद्द करण्याचा अधिकार आहे. यापूर्वी अशाप्रकारची अनेक लायसन्स रद्द करण्याची कारवाई झालेली आहे. त्यानंतर स्थगिती आदेश देण्याचीही कारवाई वारंवार केलेली आहे. ज्यांना लायसन्स दिलेले आहे त्यांच्याकडे डेपो नाही. म्हणजे ते निकष पूर्ण करत नाहीत. याबाबत कलेक्टर या प्रकरणामध्ये लायसन्स रद्द करु शकतात, लायसन्स जप्त करु शकतात. त्याबाबत कठोर कारवाई करु शकतात. या संदर्भाने आयुक्तांचे दक्षता पथक काय करत आहेत ? ज्यांच्याकडून कायदेशीर अडचणी पूर्ण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

ता.प्र.क्र. 14769 (पुढे सुरु..

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु..

होत नाहीत, त्या सर्व संबंधित लोकांचा परवाना रद्द करण्याचे आजच्या आज आदेश आपण देणार आहात काय ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, कोणी तक्रार केली हा प्रश्न नाही. सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य तक्रार करतात, याचे गांभीर्य आम्हाला निश्चितपणे आहे. सन्माननीय सदस्यांच्या सर्वच तक्रारी या गांभीर्याने घेतल्या जातात. आयुक्तांच्या दक्षता पथकाने सरकारला अहवाल दिलेला आहे. त्या अहवालाची तपासणी आजच पूर्ण होईल. त्यांनी त्या ठिकाणी डेपो ठेवला पाहिजे,त्याबाबतचे त्यांनी पालन केलेले नाही. ही बाब निश्चितपणे तपासून उद्या संध्याकाळपर्यन्त त्यांचा परवाना निलंबित करण्याची कारवाई केली जाईल.

श्री.श्रीकांत जोशी : हा प्रश्न 45 दिवस अगोदर विचारलेला असतांना, विभागीय आयुक्तांच्या दक्षता पथकाने रॉकेल वितरकांची चौकशी पूर्ण केलेली नाही. दक्षता पथकाने चौकशी काय केली ? हे स्पष्ट उत्तरामध्ये आलेले नाही. विभागीय आयुक्तांच्या कार्यालयातील डेप्युटी आयुक्तांनी याबाबतची चौकशी केल्यानंतर या प्रकरणी कोणती कारवाई केली जाणार आहे ? श्री.सुनील तटकरे : दक्षता पथकाचा अहवाल राज्य सरकारला प्राप्त झाला. त्यांनी केवळ घाऊक परवानाधारकांची चौकशी केलेली आहे...

श्री.श्रीकांत जोशी : त्यांच्याकडून अहवाल प्राप्त झालेला आहे काय ?

श्री.सुनील तटकरे : त्यांचा घाऊक विक्रेत्यांच्या संबंधात अहवाल प्राप्त झालेला आहे. त्यामध्ये काही त्रुटी आढळलेल्या आहेत, त्याबाबतीमध्ये उद्या संध्याकाळपर्यन्त कारवाई करण्याचे अभिवचन दिलेले आहे.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/ MHM/ SBT प्रथम श्री. किल्लेदार 14:55 वा.

ता.प्र.क्र. 14769 ..... श्री. सुनील तटकरे ...

किरकोळ विक्रेत्यांच्या बाबतीत त्यांनी चौकशी पूर्ण केली नसल्यामुळे ती तातडीने करण्यासंबंधीची सूचना शासनाकडून देण्यात आलेली आहे. मी मघाशी सांगितले आणि आता परत सांगतो की, याही बाबतीत सखोलपणाने निश्चित कालावधीमध्ये चौकशी पूर्ण केली जाईल.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/ MHM/ SBT

**राज्यातील रास्त भाव दुकाने व रॉकेल विक्री बचत गटाकडे सोपविल्याने सदर परवाना धारकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(५) * १२७६० प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील , श्री.सागर मेघे , श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. जगदिश गुप्ता , प्रा. फौजीया खान , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. सदाशिवराव पोळ, श्री. वसंतराव चव्हाण , श्री. विनायकराव मेटे , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्रीमती कांता नलावडे , श्री. श्रीकांत जोशी , श्री. गुरुमुख जगवानी , श्री. विलास अवचट , डॉ. दिपक सावंत , श्री. अनंत तरे , श्री. अरविंद सावंत , प्रा. जोगेंद्र कवाडे , श्री. रमेश निकोसे , श्री. प्रकाश शेंडगे :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाने राज्यातील सर्व रास्तभाव धान्य दुकाने व रॉकेल विक्री बचत गटाकडे सोपविण्याचा निर्णय घेतल्यामुळे सध्या अस्तित्वात असलेल्या दुकानदारांना व परवानाधारकांना पर्यायी व्यवसाय उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सध्या रास्त भाव धान्य दुकाने व रॉकेल विक्री केंद्र चालविणाऱ्या परवाना धारकांच्यावर बेकारीची कुऱ्हाड कोसळणार असल्याने त्यांना स्वतंत्र व्यवसाय करण्यासाठी मदत करण्याचा शासनाचा विचार आहे काय,

(४) त्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री.सुनील तटकरे** : (१) हे खरे नाही.
(२),(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने राज्यातील सर्व रास्त भाव दुकाने व रॉकेल विक्री केंद्रे बचत गटांना देण्याचा निर्णय घेतलेला आहे आणि त्यासंबंधीची घोषणाही माननीय मंत्रिमहोदयांनी केलेली आहे. प्रत्यक्षामध्ये त्यासंबंधीची कार्यवाही जिल्हा स्तरावर सुरु झालेली आहे. परंतु या ठिकाणी प्रश्नाला उत्तर देत असताना माननीय मंत्रिमहोदयांनी अशा स्वरुपाचा निर्णय घेतलेला नाही किंवा हे खरे नाही असे उत्तर दिलेले आहे. "हे खरे नाही", "प्रश्न उद्‌भवत नाही" अशा प्रकारची उत्तरे देऊन वेळ मारुन नेण्याचा प्रयत्न केलेला आहे. याबाबतीत वस्तुस्थिती काय आहे ? महाराष्ट्र शासनाने रास्त भाव धान्य दुकाने व रॉकेल विक्री केंद्रे बचत गटांना देण्याचा निर्णय घेतलेला आहे की नाही ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/ MHM/ SBT प्रथम श्री. किल्लेदार 14:55 वा.

ता.प्र.क्र. 12760 ....

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, या ठिकाणी जो प्रश्न विचारलेला अहे त्याबाबत "हे खरे नाही" असे उत्तर दिलेले आहे. या ठिकाणी प्रश्न असा विचारलेला आहे की, महाराष्ट्र शासनाने राज्यातील सर्व रास्तभाव धान्य दुकाने व रॉकेल विक्री बचत गटाकडे सोपविण्याचा निर्णय घेतल्यामुळे सध्या अस्तित्वात असलेल्या दुकानदारांना व परवानाधारकांना पर्यायी व्यवसाय उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला आहे हे खरे आहे काय ? तसा निर्णय शासनाने घेतलेला नाही त्यामुळे "हे खरे नाही" असे उत्तर दिलेले आहे. पहिल्या प्रश्नाला अनुसरुनच उत्तर दिलेले आहे.

प्रा. शरद पाटील : हा प्रश्न प्रामुख्याने महिला बचत गटांना ती दुकाने देण्यासंबंधीच्या निर्णयातून निर्माण झालेला आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, जसा प्रश्न विचारलेला आहे तसे उत्तर दिले असल्याचे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले. या ठिकाणी "हे खरे नाही" असे उत्तर दिलेले आहे. मग खरे काय आहे ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, अस्तित्वात असलेल्या दुकानदारांना पर्याय देणे हा विषय सरकारसमोर नाही हे खरे आहे. राज्यातील रास्त भाव दुकाने महिला बचत गटांना देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे हे खरे आहे. त्यासंदर्भात काही दुकानदार उच्च न्यायालयामध्ये गेलेले आहेत. उच्च न्यायालयाची या निर्णयाला स्थगिती आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, राज्यातील रास्त भाव धान्य दुकाने आणि रॉकेल परवाने बचत गटांना देण्यासंबंधीचा निर्णय झालेला आहे असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले. या राज्यामध्ये हजारो स्वस्त धान्य दुकानदार आणि रॉकेल परवानाधारक आहेत. त्यांच्याकडून रॉकेल परवाने आणि स्वस्त धान्य दुकाने काढून घेण्यासंबंधीचा जो निर्णय शासनाने घेतला आहे त्याच्या मागचे कारण काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या अंतर्गत आज राज्यामध्ये अंत्योदय योजना, अन्नपूर्णा योजना या अंतर्गत दारिद्रय रेषेखालील लोकांना सवलतीच्या

...4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/ MHM/ SBT

ता.प्र.क्र. 12760..... श्री. सुनील तटकरे ....

दराने अन्नधान्य देतो तसेच केरोसिनचे वाटप नियतनाप्रमाणे देत असतो. राज्यात 50 हजार रेशन दुकाने आणि 55 हजार रॉकेलचे किरकोळ विक्रेते आहेत. महिला बचत गटांचे सबलीकरण करणे हा विषय वेगवेगळ्या उपाययोजनांच्या अंतर्गत राज्य सरकारपुढे होता. म्हणून हे कार्य सुध्दा त्यांच्याकडे सोपविण्याचा निर्णय घेतला.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, राज्यातील 50 हजार दुकानदार बेरोजगार होणार आहे. त्यांचा काही दोष नसताना आणि दुकाने सुरळीत चालू असताना त्यांना बेरोजगार करुन दुसऱ्या वर्गाचा विचार शासन करीत आहे. महिला बचत गटांना जर सक्षम करावयाचे असेल तर वेगवेगळ्या योजनांच्या अंतर्गत काही घोषणा शासनाला करता येतील. परंतु त्यांच्याकडून दुकाने काढून घेऊन यांना देणार आणि त्यांना बेरोजगार करणार हे संयुक्तिक वाटत नाही. म्हणून शासन याचा फेरविचार करणार आहे काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, हा निर्णय घेण्याच्या पाठीमागे एक कारण असे होते की, उच्च न्यायालयामध्ये याचिका क्रमांक 196/2001 झालेली होती. त्यांनी आयुक्तांची नियुक्ती केलेली होती. त्या आयुक्तांची नियुक्ती करीत असताना जो अहवाल प्राप्त झालेला आहे त्यामध्ये महाराष्ट्रामध्ये सुध्दा जवळपास 50 टक्के धान्य हे लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नसल्याचा निष्कर्ष त्या स्तरावर काढण्यात आला.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या सर्व गोष्टींचा विचार करुन शासनाने धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, सार्वजनिक वितरण व्यवस्था के द्वारा महिला बचत गटों को सशक्त बनाने के निर्णय का मैं स्वागत करती हूँ. लेकिन मैं माननीय मंत्री महोदय से यह प्रश्न पूछना चाहती हूँ कि बचत गट को दुकान देने का जो निर्णय लिया गया है, उसमें कहीं तो ऐसा तो नहीं होगा कि पुराना दुकानदार अपनी ही महिलाओं का बचत गट बनाकर फिर से उसी दुकानदार के पास दुकान दे दी जाए. क्या इसमें बचत गटों की सीनियरिटी का ख्याल रखा जाएगा और पुराने बचत गट को प्राधान्य दिया जाएगा ?

श्री. सुनील तटकरे : एका दुकानाच्या हद्दीमध्ये 4 किंवा 5 बचत गट असतील तर त्यांची आर्थिक स्थिती, त्यांनी केलेला कारभार याची माहिती घेतली जाईल आणि ग्रामसभेने निवड केलेल्या बचत गटाचा प्राधान्याने विचार केला जाईल. या निर्णयाला उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे. परंतु नव्याने निर्माण होणारी दुकाने 15-20 दिवसामध्ये बचत गटाकडे सोपविण्याचे काम राज्य सरकार निश्चितपणे करील.

श्री. धोंडीराम राठोड : ग्रामसभेने निवड केलेल्या बचत गटांना प्राधान्य दिले जाईल असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. ग्रामसभेने घेतलेला निर्णय योग्यच राहील असेही नाही. पाच बचत गटापैकी एका गटाला दुकान दिले तर अन्य बचत गट न्यायालयामध्ये जातील आणि त्यामधून अनेक प्रश्न निर्माण होतील. आता माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे जुन्या दुकानदारांकडील दुकाने काढून ती बचत गटांना देण्यात येणार आहेत असा समज लोकांमध्ये पसरलेला आहे. त्यामुळे दुकानदारांच्या विरुध्द खोट्या तक्रारी होऊन ती दुकाने बंद पाडण्याचे प्रयत्न होतील. तसेच दुकाने मिळण्यासाठी बचत गटांमध्ये रस्सीखेच सुरु होईल. म्हणून याबाबतीत शासन काही विशेष धोरण ठरविणार आहे काय ?

श्री. सुनील तटकरे : याबाबतीत उच्च न्यायालयाचा निर्णय आल्यानंतर शासन विचार करील.

. . .2. . .



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 12760.....)

श्री. नितीन गडकरी : 50 हजार दुकानदारांचे परवाने रद्द करुन ती बचत गटांना देण्याच्या शासन निर्णयाला उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे. ही कल्पना स्वागतार्ह आहे. यामध्ये राजकारण येता कामा नये. 50 हजार दुकानदारांचे परवाने रद्द करण्या ऐवजी 50 हजार नवीन दुकाने बचत गटांना द्यावीत. ज्या 50 हजार दुकारदारांना परवाने दिलेले आहेत त्यांना आपण बेरोजगार का करीत आहात ?

श्री. सुनील तटकरे : मघाशी सांगितल्या प्रमाणे राज्य सरकारने ठरविलेल्या निकषानुसार जी नवीन दुकाने निमार्ण होणार आहेत त्या दुकानांचे परवाने बचत गटांना देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला त्याबाबतीत उच्च न्यायालयाचा निर्णय आल्यानंतर निश्चितपणे विचार केला जाईल.

श्री. उल्हास पवार : शासनाने घेतलेल्या निर्णयामुळे 50 हजार दुकानदार रोजीरोटीपासून वंचित होणार आहेत. ही दुकाने महिला बचत गटांना देण्याचा घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे. 50 हजार दुकानदारांना परवाने देत असताना स्वातंत्र्य सैनिक, माजी सैनिक, अपंग असा क्रायटेरिया लावलेला असेल तर त्याबाबतीत शासन काय निर्णय घेणार आहे ?

श्री. सुनील तटकरे : मी मघाशी सांगितल्या प्रमाणे या प्रकरणी उच्च न्यायालयाचा निर्णय प्राप्त झाल्यानंतर शासनाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यापूर्वी या संपूर्ण बाबी मंत्रिमंडळापुढे ठेवल्या जातील. मंत्रिमंडळ त्यावर विचार करील.

श्री. नितीन गडकरी : रेशनिंग दुकानदार उच्च न्यायालयातील याचिका मागे घ्यायला तयार आहेत. पण ते जेव्हा तुमच्याकडे येतील त्यावेळी तुम्ही त्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करायला तयार आहात काय ?

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. शिगम 15:05

ता.प्र.क्र. 12760....

**सभापती** : राज्यातील स्वस्त धान्य दुकानदारांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची अशी ही बाब आहे. सन्माननी सदस्य श्री. नितीनजी गडकरी यांच्या प्रश्नाला जरी आपण उत्तर दिले नाही तरी सन्माननीय सदस्य श्री. गडकरी हे आपल्या चेंबरमध्ये येतील आणि चर्चा करतील.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी जी भावना व्यक्त केले आणि महिला बचत गटांना दुकाने देण्याचा निर्णय केला त्याचे मी स्वागत केले आहे. असा प्रयोग व्हावयाला पाहिजे आणि आमचे समर्थन आहे. सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार यांनी विचारल्याप्रमाणे अपंग,स्वातंत्र्य सैनिकाचा मुलगा किंवा मुलगी,अनु.जाती किंवा अनु.जमातीचा दुकानदार अशा ज्या लोकांना दुकाने दिली असतील त्यांचे धंदे एकदम बसणार आणि ही माणसे रस्त्यावर येणार आहेत. ज्यांनी चुकीच्या पध्दतीने दुकाने घेतली असतील त्यांच्यावर शासनाने जरुर कारवाई करावी. परंतु 50,000 दुकानदारांवर एकदम तलवार फिरवून चालणार नाही. हे दुकानदार आहेत त्यांना मी उद्या बोलावून घेतो आणि सांगतो की शासन तुमच्या बाबतीत सहानुभूतिपूर्वक विचार करायला तयार आहेत तुम्ही हायकोर्टातील केस मागे ध्या. मॅटर कोर्टात सबज्युडीस आहे. शासन जर सहानुभूतिपूर्वक आणि पॉझीटीव्ह विचार करायला तयार असेल तर दुकानदार कोर्टातील केस विड्रॉ करायला तयार आहेत.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, हा निर्णय मंत्रिमंडळाने विचारपूर्वक घेतलेला आहे. 50,000 दुकानदारांप्रमाणे राज्यातील 5-6 कोटी जनतेच्या जीवनाशी निगडीत असलेला हा प्रश्न आहे. उच्च न्यायालयाचा निकाल प्राप्त झाल्यानंतर याबाबतीत शासन विचार करील. उच्च न्यायालयाचा निकाल प्राप्त झाल्यानंतर किंवा कोर्टातील केस विड्रॉ केल्यानंतर आता सन्माननीय सदस्यांनी ज्याकाही सूचना केलेल्या आहेत त्या मी मंत्रिमंडळासमोर ठेवतो आणि त्यावर निश्चितपणाने विचार केला जाईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सभागृहाची दिशाभूल होत आहे. सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी जो प्रश्न विचारला होता त्यावर उत्तर देताना शासन याबाबतीत सहानुभूतिपूर्वक विचार करील असे आपण सांगितले. 50 हजार लोकांच्या जीवनमरणाचा हा प्रश्न आहे. उच्च न्यायालयाचा निर्णय आल्यावर शासन त्यावर पॉझीटीव्ह विचार करील. शासन जर

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 12760

श्री. नितीन गडकरी..

पॉझीटीव्ह विचार करणार असेल तर दुकानदार केस विड्रॉ करायला तयार आहेत. मंत्रालयात एक बैठक बोलवावी आणि शासनाने त्याप्रमाणे सांगावे.

. श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, उच्च न्यायालयातील पिटीशन मागे घेणे अथवा न घेणे हा दुकानदारांचा प्रश्न आहे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे उच्च न्यायालयातून याबाबतचा निर्णय आल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्या सर्वच भावना मी मंत्रिमंडळासमोर ठेवीन आणि सरकार निश्चितपणाने याबाबतीत यथायोग्य वेळी सहानुभूतिपूर्वक विचार करील.

यानंतर श्री. खर्चे पी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. कानडे..... 15:10

तारांकित प्रश्न क्रमांक 12760 ........

श्री. जयंत प्र.पाटील : बचत गटांचे नॉर्म्स ठरवितांना ते कोणत्या तऱ्हेने ठरविणार आहात ? कारण केवळ 7 महिला एकत्र आणून एका दिवसात बचत गट तयार होऊ शकतो. म्हणून ज्या बचत गटांचे कार्य किमान तीन वर्षांपासून चांगल्या प्रकारे चालू आहे व चांगली उलाढाल असेल अशा बचत गटांच्या बाबतीत विचार करणार की नाही ? याप्रमाणे निकष ठरविणार काय ?

श्री. सुनील तटकरे : महोदय, जे बचत गट अगोदरपासून कार्यरत आहेत, ज्यांची आर्थिक उलाढाल चांगली असेल त्यांना प्राधान्य देण्यात येईल. केवळ रेशन दुकान मिळण्यासाठी बचत गट तयार झाले असतील तर त्यांचा विचार शासन करणार नाही.

श्री. विलास अवचट : महोदय, यासंदर्भात जे लोक न्यायालयात गेले आहेत त्यांच्या बाबतीत न्यायालयाचा निकाल लागल्यानंतर अशा दुकानांना मान्यता देतांना कुपोषणाच्या बाबतीत ज्या भागातून तक्रारी असतील त्या भागाला शासन प्राधान्य देणार काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, शासनाचे प्राधान्य पहिल्या प्रथम अशाच विभागांना आहे. ज्यावेळी शासनाने यासंबंधीचा निर्णय घेतला त्यावेळी पहिल्या टप्प्यामध्ये आदिवासी भागात ज्या ठिकाणी कुपोषण मोठया प्रमाणात आहे त्या भागात अंमलबजावणी प्रथम करण्यात येईल.

श्रीमती मंदा म्हात्रे : महोदय, महिला बचत गटांना रेशन धान्य दुकान देण्याबाबत जो निर्णय घेतला तो स्वागतार्ह आहे पण या बचत गटांना अशी दुकाने देत असतांना तीन वर्ष तो बचत गट कार्यरत असल्याची अट घातली तरच खऱ्या अर्थाने या बचत गटांना न्याय मिळणार आहे. या अनुषंगाने शासन धोरण ठरविणार आहे काय ?

श्री. सुनील तटकरे : जे बचत गट तीन वर्षापेक्षा जास्त काळ कार्यरत असतील त्यांनाच रेशन दुकानांचे वाटप केले जाईल पण ज्या ठिकाणी बचत गटच अस्तित्वात नसतील आणि नव्याने स्थापन होत असेल तर त्यांची फिजिबिलिटी व्यवस्थित असेल त्यांनाच असे वाटप करण्यात येईल.

श्रीमती सुधा जोशी : महोदय, माझ्या कल्पनेप्रमाणे राज्यामध्ये सर्वत्रच बचत गट आहेत परंतु ज्यावेळी आपण एखादया संस्थेला अनुदान देण्याचा निर्णय घेतो त्यावेळी त्या संस्थेसाठी किमान तीन वर्षाची अट असतेच. म्हणून गेली दोन तीन वर्षे ज्या बचत गटांनी काम केले असेल, त्यांचे काम आपल्या डोळयासमोर असेल म्हणून यासाठी कुठला तरी नियम, कुठले तरी निकष ठेवणे आवश्यक आहे. म्हणून ज्या बचत गटांचे तीन वर्षांपासून काम असेल त्यांना रेशन दुकानाचे वाटप करण्याबाबत शासन विचार करणार काय ? (........2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्रमांक 12760 .........

श्री. सुनील तटकरे : महोदय, या सूचनेचा विचार करण्यात येईल.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, शासनाने दिनांक 3 जानेवारी रोजी एक जी.आर. काढला असून त्यामध्ये 1 लाख 5 हजार धान्य दुकाने व किरकोळ रॉकेल विक्रीचे परवाने देण्याचे आदेश माननीय राज्यपालांच्या सहीने काढले. माझी माननीय मंत्री महोदयांना अशी सूचलना आहे की, ज्यांच्या बाबतीत तक्रारी झालेल्या आहेत अशा लोकांचे परवाने रद्द झालेले आहेत अशांच्या बाबतीत हा निर्णय लागू केला तरी चालेल पण ज्यांनी गुन्हे केलेले नाहीत, व्यवस्थितपणे त्यांची दुकाने चालू आहेत त्यांचाही यामध्ये समावेश आहे. म्हणून ज्यांचे काहीच गुन्हे नाही अशा परवानाधारकांची दुकाने रद्द न करता तसेच वाढती लोकसंख्या व शहरीकरणांचा विचार करुन महिला बचत गटांना नव्याने परवाना देण्याबाबत शासन विचार करणार काय ?

श्री. सुनील तटकरे : महोदय, सभागृहात मी यापूर्वीच सांगितले तेच पुन्हा सांगतो की, यादृष्टीने शासन नक्की विचार करील.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, रेशन दुकानांचे परवाने देण्याबाबतचा जो निर्णय घेतला आहे त्यामुळे असा प्रश्न निर्माण होत आहे की, एका गावात किती दुकाने शासन देणार आहे ? कारण एका गावात जर 50 बचत गट असतील तर त्यातील किती बचत गटांना असे परवाने देण्यात येतील ? आणि जवळजवळ 1 लाख युवक या निर्णयामुळे बेकार होणार आहेत त्यांचाही विचार शासनाला करणे आवश्यक आहे त्याबाबत शासन काय निर्णय घेणार आहे ?

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प.क्र.12760...

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांच्या अगोदर ज्या सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारले होते त्यांना जे उत्तर दिले आहे ते पुन्हा येथे देतो. महिला बचत गटांना धान्य दुकाने देताना त्या त्या भागातील दुकानांची फिझिबिलिटी लक्षात घेऊन दुकानाचा एरिया डिफाईन केला आहे. जे महिला बचत गट सतत 3 वर्ष आर्थिदृष्टया सक्षम असतील त्यांना स्वस्त धान्य दुकान दिले जाईल. तसेच जेथे एका पेक्षा जास्त महिला बचत गट आर्थिकदृष्टया सक्षम असतील त्याचा ठराव ग्रामसभेपुढे जाईल व त्यानुसार दुकानाचे वाटप केले जाईल. परंतु, जेथे एकच महिला बचत गट असेल त्यास स्वस्त धान्याचे दुकान दिले जाईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आपण मला सर्वात शेवटी संधी दिल्याबद्दल आभारी आहे. महिला बचत गटांना स्वस्त धान्याची दुकाने दिली जावीत म्हणून अनेक वर्षापासून महिला संघटनांकडून, महिला संस्थांकडून सूचना येत होती. शासनाने कुठलाही धोरणात्मक निर्णय हा चांगल्या हेतुने घेतला पाहिजे. आज किती महिला बचत गट सक्षम झाले आहेत ? याचा विचार शासनाने कधी केला आहे काय ? किती महिला बचत गटांमार्फत वस्तूंचे उत्पादन करीत आहे हे शासनाने कधी पाहिले आहे काय ? इच्छा असो वा नसो काही महिला बचत गटांनी स्वस्त धान्याची दुकाने सुरू केली आहेत. काही ठिकाणी महिला बचत गटांनी स्वस्त धान्याची दुकाने सुरू केली असली तरी त्या बचत गटाचा प्रमुख स्वस्त धान्याचे दुकान मिळणारे म्हणून तिचा पती असतो. तेव्हा माझी अशी सूचना आहे की, शासनाने जिल्हावार असेसमेंट घेऊन निर्णय घ्यावा. जेणेकरून हे काम अधिक सोपे होईल.

श्री.सुनील तटकरे : ठीक आहे.

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, मला एक सूचना करावयाची आहे आणि प्रश्न देखील विचारावयाचा आहे. स्वातंत्र्य सैनिकांची मुले, अपंग, महिला संघटना, मागासवर्गीय महिल्यांच्या संघटना इत्यादींनां स्वस्त धान्य दुकाने देण्यात आली आहेत. तेव्हा माझा असा प्रश्न आहे की, सध्या असलेली 50000 स्वस्त धान्य दुकाने बंद करून ती दुकाने महिला बचत गटांना चालवण्यिासाठी शासन देणार आहे काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, या प्रश्नासंबंधीचे उत्तर मी आधीच दिलेले आहे.

**सभापती** : या प्रश्नाला मी सर्वांत जास्त वेळ दिलेला आहे. महिला बचत गटांच्या माध्यमातून प्रत्येक गावाला काम देण्याची आवश्यकता आहे. जी प्रस्थापित स्वस्त धान्य दुकाने आहेत, ती अपंग, स्वातंत्र्य सैनिकाची मुले, माजी सैनिक इत्यादींना देण्यात आलेली आहेत. तेव्हा या दोघांचे समाधान कसे होईल, यातून योग्य मार्ग कसा काढता येईल यासंबंधीचा निर्णय मंत्रिमंडळात घ्यावा अशी सदनाची भावना आहे. त्यादृष्टीने मंत्रिमहोदयांनी समन्वय साधावा.

श्री.सुनील तटकरे : होय.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

....

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे.

**मु.शी.**: तारांकित प्रश्नांची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्री.गणेश नाईक (राज्य उत्पादन शुल्क मंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने "उल्हासनगर (जि.ठाणे) येथे राज्य उत्पादन शुल्क विभागाने धाडी टाकून जप्त केलेल्या बनावट विदेशी दारूचा साठा" या विषयावरील सर्वश्री संजय दत्त, सुधीर सावंत, सुधाकर गणगणे, धनाजी साठे, श्रीमती सुधा जोशी, श्री.यशवंतराव गडाख, वि.प.स. यांच्या दिनांक 6 एप्रिल 2005 रोजी,उत्तरित झाल्या तारांकित प्रश्न क्रमांक 2013 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली.

(प्रेस : येथे अधिकची माहिती छापावी.)

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते व इतर वि.प.स. यांनी "अमरावती महापालिकेतर्फे चालविल्या जाणाऱ्या महात्मा फुले शिक्षण हमी केंद्र योजनेंतर्गत पटावर बोगस नावे दाखवून दहा लाख रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचे डिसेंबर 2005 मध्ये उघडकीस येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. यांनी "खाजगी वन संपादनाच्या 1975 च्या कायद्याच्या तरतुदींच्या अंमलबजावणीला नुकतीच सुरुवात होऊन पुणे जिल्हयासह राज्याच्या विविध भागात अत्यल्प व अल्प भूधारक शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात येत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने तातडीने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "सहा वर्षांपूर्वी ॲलन मार्टी व लीली मार्टी यांना मालाड येथील पंचतारांकित हॉटेलमध्ये मुलांवर लैंगिक अत्याचार करताना करण्यात आलेली अटक, सदर जोडप्याला सुप्रीम कोर्टाने देश न सोडण्याच्या अटीवर जामीन देऊनही पासपोर्ट नसताना ते देशाबाहेर पळूण जाणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.धोंडीराम राठोड यांनी "माजी मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांच्या पाथर्डी, जिल्हा अहमदनगर येथील पुतळयाभोवती तेथील काही गाव गुंडांनी व धन दांडग्यांनी अतिक्रमण करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. या विषयावर लक्षवेधी सूचना स्वीकारण्यात आलेली आहे. ही लक्षवेधी सूचना घेण्याबाबत मी प्राधान्य देईन.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मा.सभापती**....

यानंतर सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील यांनी "महाराष्ट्रातील बागायतदार शेतकऱ्यांकडून सहकारी पाणी पुरवठा संस्थेच्या कार्यक्षेत्रातील पाझर पाणीपट्टीची रक्कम भरली जात नसणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. या विषयावर लक्षवेधी सूचना स्वीकारण्यात आलेली आहे.

यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी "दिनांक 16 मार्च, 2006 रोजीच्या दहावीच्या परीक्षेतील मराठी विषयाच्या प्रश्न पत्रिकेतील चुकीबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. यांनी "दिनांक 19 मार्च, 2006 रोजी भामरागड तालुक्यातील लष्कर खेडयावर सशस्त्र नक्षलवाद्यांनी केलेला हल्ला, त्यामध्ये दोन आदिवासी तरुणांची झालेली निर्घृण हत्या व सहा जण गंभीर जखमी होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने तातडीने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे, विनोद तावडे, नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी "मुंबईतील परंपरागत मासे विक्री करणाऱ्या कोळी महिलांच्या मंडईतील जागा पुनर्विकासाच्या नावाखाली पालिका प्रशासनाने बिल्डर्सच्या घशात घातल्यामुळे त्या विरोधात कोळी महिलांतर्फे दिनांक 20 मार्च, 2006 रोजी काढण्यात येणारा मोर्चा" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, श्रीकांत जोशी व इतर वि.प.स. यांनी "गेल्या चार-पाच दिवसांपासून पैठण (जिल्हा औरंगाबाद) येथे मेंदूच्या तापाने थैमान घातल्यामुळे सुमारे 4500 नागरिक तापाने फणफणत असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

..3..



SJB/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.भारवि.... 15:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मा.सभापती**....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण व इतर वि.प.स. यांनी "मुंबईतील भायखळा, बोरीवली व महाड (जि.रायगड) येथील खटाव मिलमध्ये उत्पादन सुरु असणे, भायखळा व बोरीवली येथील जमिनींच्या विक्रीतून उपलब्ध होणाऱ्या निधीतून कामगारांची कायदेशीर देणी देण्याचे मान्य केलेले असतानाही कामगारांना एक रुपयाही न देणे" या विषयावर नियम ९३ अन्वये सूचना दिली आहे. तो नियम ९३ चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे. इतर सर्व सूचना मी दालनात नाकारलेल्या आहेत.

-------

नंतर श्री.कांबळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माझ्याकडे नियम 93 अन्वयेच्या सूचनेसंदर्भातील दोन निवदने प्राप्त झालेली आहेत. पहिले निवेदन सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांच्या नियम 93 अन्वयेच्या सूचनेसंबंधी आहे, परंतु संबंधित माननीय मंत्रीमहोदय खालच्या सभागृहात असल्यामुळे, ते आल्यानंतर निवेदन करण्यात येईल. दुसरे निवेदन सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील व इतर सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या नियम 93 अन्वयेच्या सूचनेसंबंधी आहे.

----

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## विशेष उल्लेखांसंदर्भातील उत्तरे संबंधित विभागांकडून मिळत नसल्याबाबत

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मला विशेष उल्लेख व इतर बाबींसंदर्भात उत्तर मिळत नसल्याबाबत औचित्याचा मुद्दा मांडावयाचा आहे. विशेष उललेख मांडल्यानंतर त्याची उत्तरे एका महिन्यात देण्यात यावीत अशी लोकप्रतिनिधींची अपेक्षा असते व त्याप्रकारे नियमात तरतूद देखील आहे. परंतु आताचे गतीमान शासन यांची उत्तरे देत नाही, ही आमची व्यथा आहे. सभापती महोदय, विशेष उल्लेखांना प्रतिसादच मिळत नसेल तर विशेष उल्लेख ठेवायचे की नाहीत, हा प्रश्न निर्माण होतो. उत्तरेच मिळत नसतील तर हे सर्व युजलेस ठरते. सन्माननीय सदस्यांना तत्संबंधी वेळेवर उत्तरे मिळावीत यासंबंधी शासनास आपण काही निदेश द्यावेत. त्याचप्रमाणे सभापती महोदय, आम्ही सगळे आमदार निरनिराळ्या खात्याच्या मंत्रीमहोदयांना निरनिराळ्या विषयांसंदर्भात पत्रे लिहितो, परंतु त्याची पोचपावती मिळत नाही. तरी, किमान संबंधित पत्रांना पोचपावती देण्यात यावी आणि त्याचे उत्तर आले तर अधिकच चांगले आहे. सभापती महोदय, शासन या संदर्भात दखल घेत नाही, या गोष्टींचा साधा उल्लेखही करत नाही की, यासंबंधी साधी कारवाई करत नाही आणि शासन गतीमान असल्याचे हे शासन सांगत आहे. सभापती महोदय, गती कोणती आहे ? विरोधी पक्षाला नाकारण्याची की त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्याची. तरी, सभापती महोदय, या संदर्भात आपण लक्ष घालून शासनास निदेश द्यावेत. त्याचप्रमाणे लोकप्रतिनिधींच्या प्रोटोकॉलचा एक महत्वाचा विषय आहे. प्रोटोकॉल जानेवारी महिन्यात सर्व लोकप्रतिनिधींना मिळाला पाहिजे होता. परंतु हा प्रोटोकॉल आजपर्यंत तयार इ ाालेला नाही, ही अतिशय गंभीर बाब आहे. सभापती महोदय, हे सगळे प्रश्न गतीमान शासनाशी निगडीत आहेत. तरी, आपण यासंबंधी निदेश द्यावेत.

**सभापती** : ठीक आहे.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, गेल्या वर्षी मी पर्टिक्युलरली 27 निवेदने माननीय शालेय शिक्षणमंत्र्यांना दिली होती. परंतु त्या एकाही निवेदनाचे उत्तर आले नाही. त्याचप्रमाणे माननीय मंत्रीमहोदय कार्यालयात देखील मिळत नाहीत. सभापती महोदय, या सर्व बाबींची तड प्रश्नांच्या रुपाने सभागृहात लागेल का ?

## साहित्यिक बा.सी.मर्ढेकर यांच्या स्मारकाविषयी

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, औचित्याच्या मुद्याद्वारे मी पुन्हा या ठिकाणी उभी आहे. सभापती महोदय, आज बा.सी.मर्ढेकर यांची 50 वी पुण्यतिथी आहे. मी गेल्या 2 वर्षात प्रत्येक अधिवेशनात बा.सी.मर्ढेकर यांच्या स्मारकासंबंधी या ठिकाणी टाहो फोडते आहे. शासनाने गेल्या चार वर्षापूर्वी या संदर्भात निर्णय घेऊन 20 लाख रुपयांची तरतूद केली आहे. सभापती महोदय, सदर ठिकाणी जाऊन माननीय पालकमंत्र्यांनी उद्‌घाटनही केले आहे. परंतु गेल्या चार वर्षात इकडची काडी तिकडे झालेली नाही. तरी, आपण या संदर्भात शासनास निदेश द्यावेत. सभापती महोदय, शासनाने निर्णय घेऊन तरतूद केल्यानंतर हा पैसा जातो कुठे ? अशाप्रकारे साहित्यिकांचे स्मारक उभारावयाचे ठरविल्यावर त्याचे पुढ काय होते ? गेल्या चार वर्षात यासंबंधी कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही, त्यामध्ये काहीही परिवर्तन झालेले नाही. फक्त त्या गावचे रस्ते सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांच्यामुळे झाले आहेत. हे स्मारक शासनास करावयाचे आहे की नाही ? तरी, सभापती महोदय, मी आपल्याला विनंती करते की, आपण यासंबंधी निदेश द्यावेत.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार व अन्य सन्माननीय सदस्य या संदर्भात मला माझ्या दालनात भेटले होते. त्यांनी या संदर्भातील भावना माझ्याकडे मांडलेल्या आहेत. विशेष उल्लेख व इतर सूचनांसंबंधी शासनाचे लक्ष वेधण्याचा त्यांनी माझ्या माध्यमातून प्रयत्न केला आहे. या दोन्ही गोष्टींसंदर्भात मी माननीय संसदीय कामकाजमंत्र्यांना सन्माननीय सदस्यांसमोरच फोनवरुन सांगितले आहे की, ज्या सन्माननीय सदस्यांनी विशेष उल्लेखाची सूचना सभागृहात मांडली आहे, त्या विशेष उल्लेखाच्या सूचनेचे उत्तर एका महिन्यात संबंधित सन्माननीय सदस्यांस लेखी स्वरुपात पाठवावे.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती....

त्याची एक प्रत माहिती करीता विधानमंडळ सचिवालयाकडे पाठवावी. दुसरे असे की लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून सातत्त्याने शासनाच्या अनेक विभागांकडे पत्र व्यवहार होत असतो. हा पत्र व्यवहार होत असतांना सन्माननीय मंत्री महोदयांनी त्या पत्राची पोच प्राधान्याने देऊन तो प्रश्न मार्गी लावून त्याबाबत जर निर्णय झाला असेल तर तो निर्णय सुध्दा संबंधित लोकप्रतिनिधींना कळविणे हे शासनाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे असे मला वाटते. त्या अनुषंगाने काम करणे जरुरीचे आहे. येथे माननीय मंत्री श्री. गणेश नाईक हे उपस्थित आहेत त्यांनी हया सर्व भावना संसदीय कामकाज मंत्र्यांना कळवाव्यात. संसदीय कामकाज मंत्र्यांना अशा सक्त सूचना आहेत की याबाबत सर्व विभागांना लेखी सूचना पोहचतील असे पहावे. तसेच विशेष उल्लेखाच्या संदर्भातील जे प्रश्न असतील त्यांची उत्तरे एक महिन्यामध्ये बिनचूक पोहचली पाहिजेत. यासंदर्भात नियम करण्यात आलेले आहेत. एक महिन्यात निवेदनाची उत्तरे आलीच पाहिजे अशा प्रकारच्या सूचना संसदीय कामकाज मंत्री यांना करण्यात येत आहे. त्यांनी यामध्ये लक्ष घालावे. त्याच प्रमाणे आज बा.सी. मर्ढेकर यांची पुण्यतिथी आहे, शासनाकडून यापूर्वी त्यांचे स्मारक बांधण्यासाठी 20 लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. आपण सुध्दा त्याबाबत लक्ष घालून त्याचा पाठपुरावा करावा. तसेच संबंधित विभागाने याबाबतीत कार्यवाही करुन पुढील वर्षीच्या पुण्यतिथीला औचित्याचा मुद्दा मांडण्याचा प्रश्न उपस्थित करण्याचा प्रसंग येणार नाही याकडे लक्ष द्यावे. तसेच प्रोटोकॉलच्या संदर्भात मी स्वत: लक्ष घालतो. व तातडीने कार्यवाही होईल असे पाहतो.

------

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मिरज येथील दहावीच्या परीक्षा केंद्रावर इंग्रजी माध्यमाच्या प्रश्नपत्रिका कमी पडणे.

**मु.शी.**: मिरज येथील दहावीच्या परीक्षा केंद्रावर इंग्रजी माध्यमाच्या प्रश्नपत्रिका कमी पडणे,याबाबत प्रा. शरद पाटील, श्री. जयंत पाटील, विधान परिषद सदस्य यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री. हसन मुश्रीफ ( शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील दुरुस्ती करतो. निवेदनाच्या ओळ क्रमांक 4 मध्ये " सदर पेपरची नियत वेळ सकाळी 11.30 ते 1.30 अशी होती. त्या ऐवजी 11 ते 1.30 " अशी दुरुस्ती वाचण्यात यावी.

सभापती महोदय, प्रा. शरद पाटील, श्री. जयंत पाटील, विधान परिषद सदस्य यांनी "मिरज येथील दहावीच्या परीक्षा केंद्रावर इंग्रजी माध्यमाच्या प्रश्नपत्रिका कमी पडणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस. येथे सोबतचे निवेदन छापावे )

-----

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, मिरज येथील न्यू इंग्लिश स्कूल मध्ये इंग्रजी माध्यमाच्या प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांना 6 तास उलटून गेले तरी मिळाल्या नव्हत्या त्या ठिकाणी त्यांना 6 तास डांबून ठेवण्यात आले. या संदर्भात पालकांना सुध्दा माहिती देण्यात येत नव्हती. या सगळया प्रकारास परीक्षामंडळ जबाबदार आहे. परंतु मंत्री महोदयांनी निवेदनाच्या उत्तरात सांगितले आहे की, या प्रकाराला केवळ मुद्रणालय जबाबदार आहे. तशा स्वरुपाचे विधान त्यांनी निवेदनात केलेले आहे. निवेदनाच्या शेवटच्या ओळीमध्ये असे म्हटलेले आहे की, " पॅकिंगमधील त्रुटीमुळे हा प्रकार घडला असून त्याची गंभीर दखल घेऊन संबंधित मुद्रणालयाने यापुढे या घटनेची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत कळविण्यात येईल". परंतु आता जे घडले आहे त्याची जबाबदारी कोणाची आहे ? याबातचा उल्लेख निवेदनात करण्यात आलेला नाही, कोण पर्यवेक्षक यास जबाबदार आहे ? याबाबत शासनाने काही निकष ठरवून दिलेले आहेत काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे खरे आहे की, मिरज येथील न्यू इंग्लिश स्कूल मध्ये केंद्र क्रमांक 2206 यामध्ये 595 विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यातील 364 हे इंग्रजी माध्यमाचे व 201 हे मराठी माध्यमाचे व 30 विद्यार्थी हे कन्नड माध्यमाचे होते. पेपरर्सचे सर्व गठ्ठे प्रेस मधून येतात व प्रेसला त्या ठिकाणी कळविण्यात आलेले असते की, या प्रश्नपत्रिकांचे गठ्ठे कोणत्या केंद्रावर पोहचवावे. मराठी माध्यमाच्या काही गठ्ठयांवर इंग्रजी माध्यम लिहीलेले होते, त्यामुळे 244 प्रश्नपत्रिका हया इंग्रजी माध्यमाच्या कमी पडल्या आहेत.

यानंतर श्री. सांगळे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MJS/ KGS/ MAP/ प्रथम श्री.विठ्ठल खर्चे .... 15:35

श्री.हसन मुश्रीफ ...

तेथे विद्यार्थ्यांना दोन ते अडीच तास ठेवण्यात आले होते. त्यावेळी विद्यार्थ्यांना खाण्यासाठी केळी, बिस्कीटे व लस्सी देण्यात आली होती. या प्रकरणी मुद्रणालयाची चूक आहे ही बाब खरी आहे. त्या मुद्रणालयास ब्लॅक लिस्टमध्ये टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल.

श्री.श्रीकांत जोशी : गेल्या काही दिवसांपासून होत असलेल्या बोर्डाच्या परीक्षांच्या गोंधळाबाबत शिक्षक संघटनांशी चर्चा करुन त्यांना जो प्रश्न विचारला तोच प्रश्न माननीय मंत्रिमहोदयांना विचारलेला आहे. पैसे घेऊन बोर्ड सदस्य नेमण्यात येतात. बोर्डाच्या कारभारामध्ये नेहमी गोंधळ होत असल्यामुळे, बोर्डाचा कारभार सुधारण्यासाठी शिक्षण तज्ज्ञ बोर्ड सदस्य नेमण्यात येणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी या ठिकाणी चुकीची माहिती देत आहे. या वर्षी बोर्ड सदस्यांची नेमणूक करण्यात आलेली नाही. एस.एस.सी. बोर्डाकडे अनेक वर्षांपासून प्रेस आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हाच प्रश्न गेल्या वर्षी मार्च महिन्यामध्ये उपस्थित झाला होता. त्यावेळी पेपर कमी आल्याच्या कारणामुळे शासनाने मुद्रणालय बदलण्यात येईल असे सांगितले होते. ज्यावेळी मुद्रणालयात पेपर छापण्यासाठी जातात त्यावेळी बोर्डाचा अधिकारी तेथे उपस्थित असतो. त्याच्या समोर पॅकींग केले जाते. हे पॅकींग बरोबर आहे किंवा नाही हे तपासण्याची जबाबदारी संबंधित अधिका-याची असते. पुढील वर्षी या प्रकारची पुनरावृत्ती होणार नाही असे आश्वासन मागच्याही वर्षी दिले होते. माझा माननीय मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, त्याच मुद्रणालयामध्ये पेपर छापण्याचे काम दिले होते काय ?

श्री.हसन मुश्रीफ : दरवर्षी अशाप्रकारच्या गंभीर घटना घडतात ही बाब खरी आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, गेल्या वर्षीचे मुद्रणालय बदलण्यात आलेले आहे. त्या मुद्रणालयाकडे पेपर छापण्याचे काम देण्यात आलेले नाही. प्रश्नपत्रिका एवढया गोपनीय ठेवल्या जातात की, कोणत्या प्रकारच्या प्रश्नपत्रिका आहे हे मला मंत्री असून सुध्दा समजत नाही.

श्री.व्ही.यू. डायगव्हाणे : सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे गेल्या मार्च महिन्यामध्ये अशाच प्रकारचा प्रश्न निर्माण झाला होता. त्यावेळी मुद्रणालयास ब्लॅक लिस्टमध्ये टाकून त्याबाबत चौकशी करण्यात आली होती. परंतु चौकशी अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यू. डायगव्हाणे ...

बुलढाणा व यवतमाळ शहरांमध्ये बारावीच्या संदर्भात गोंधळ झालेला आहे. बुलढाण्यात बारावीच्या परीक्षेच्या वेळी फिजिक्स पेपरच्या ऐवजी बायलॉजीचे पेपर सापडल्यामुळे फिजिक्स विषयाचा पेपर फुटला होता. या संदर्भात एक-दोन महिन्यांच्या आत चौकशी करुन जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : याबाबत उच्चपदस्थांकडून चौकशी करण्यात येऊन दोषींवर कडक कारवाई करण्यात येईल.

प्रा.शरद पाटील : मिरज शहरामध्ये अशाच प्रकारची घटना घडली असल्यामुळे चौकशी करुन जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : याबाबत उच्चपदस्थांकडून चौकशी करण्यात येऊन दोषींवर कडक कारवाई करण्यात येईल.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अमरावती जिल्हयातील मोर्शी तालुक्यात टंचाईग्रस्त गावांना पाणी सोडण्यासाठी झालेल्या आंदोलनामध्ये पोलिसांच्या गोळीबारात तरुणाचा झालेला मृत्यू.

**मु. शी.** :अमरावती जिल्हयातील मोर्शी तालुक्यात टंचाईग्रस्त गावांना पाणी सोडण्यासाठी झालेल्या आंदोलनामध्ये पोलिसांच्या गोळीबारात तरुणाचा झालेला मृत्यू याबाबत सर्वश्री दिवाकर रावते, मधुकर सरपोतदार, अरविंद सावंत, अनंत तरे, डॉ.दीपक सावंत, डॉ,नीलम गोव्हे, सर्वश्री विलास अवचट, सुरेश जेथलिया, गोपीकिशन बाजोरिया, ॲड अनिल परब वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री याबाबत सर्वश्री दिवाकर रावते, मधुकर सरपोतदार, अरविंद सावंत, अनंत तरे, डॉ.दीपक सावंत, डॉ,नीलम गो-हे, सर्वश्री विलास अवचट, सुरेश जेथलिया, गोपीकिशन बाजोरिया, ॲड अनिल परब वि.प.स. यांनी "अमरावती जिल्हयातील मोर्शी तालुक्यात टंचाईग्रस्त गावांना पाणी सोडण्यासाठी झालेल्या आंदोलनामध्ये पोलिसांच्या गोळीबारात तरुणाचा झालेला मृत्यू." या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

**( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )**

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**निवेदनानंतर**

श्री.व्ही.यू. डायगव्हाणे : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आम्ही सुध्दा याच विषयावर 93 ची सूचना दिली होती. मात्र आमच्या सूचनेमधील कंटेट थोडासा वेगळा होता. त्यावेळी आपण आम्हाला सांगितले होते की, या सूचनेशी आमची सूचना क्लब करण्यात येईल. असे असताना सुध्दा आम्ही दिलेली प्रा.बी.टी. देशमुख, श्री.वसंतराव खोटरे, श्री.जी.एल. अैनापुरे व श्री.नानासाहेब बोरस्ते यांची नावे या निवेदनात आलेली नाहीत. ही नावे निवेदनामध्ये यावयास पाहिजे व आम्ही दिलेल्या सूचनेतील कंटेटच्या आधारे आम्हाला या ठिकाणी प्रश्न विचारण्याची मुभा द्यावी.

**सभापती** : आपण दिलेल्या नावांचा सूचनेमध्ये समावेश केला जाईल.

( यानंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, अतिशय गंभीर स्वरूपाचा आणि भीषण असा प्रकार येथे घडलेला आहे आणि त्यावेळी झालेल्या गोळीबारामध्ये श्री.प्रफुल्ल राऊत या 22 वर्षीय युवकाचा मृत्यू झालेला आहे. सभापती महोदय, परवा नवी मुंबईतील घणसोली येथे झालेल्या पोलीस गोळीबारासंबंधात येथे चर्चा झाली त्यावेळी माननीय उपमुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले आहे की, सदर गोळीबारामध्ये जे जखमी व मृत झालेले आहेत त्यांना सर्वसाधारणत: मदत देता येत नाही पण यावेळी आपण मदत देत आहोत. तशाच प्रकारे याही गोळीबारात मृत्यू पावलेल्या या युवकाच्या नातेवाईकांना आपण मदत करणार आहात का ? तसेच या घटनेबाबत दंडाधिकाऱ्यांना चौकशी करण्याचे आदेश दिलेले आहेत तर ही चौकशी केव्हा पूर्ण होईल ? दुसरे असे की, या ठिकाणी शिवसेनेच्या माध्यमातून एक मोठे आंदोलन उभे राहिलेले आहे आणि अशा वेळी हा जो काही प्रकार घडला त्यामध्ये पोलिसांची काहीही चूक नाही, कोठल्याही पोलीस अधिकाऱ्यावर या संदर्भात कारवाई करण्याची आवश्यकताच नाही असे शासनाचे निश्चितपणे मत आहे काय ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या अशा घटनेमध्ये जो मृत आहे त्याला मदत करण्याचे शासनाचे धोरण असेल त्याप्रमाणे याही घटनेत जे मृत झाले आहत त्यांना निश्चितपणे मदत केली जाईल. तसेच पोलिसांचा यामध्ये काही दोष आहे काय अशा स्वरूपाचा जो प्रश्न विचारला आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की, तेथे सुरूवातीस जेव्हा दोन्ही जमाव एकत्र आले त्यावेळी वेळोवेळी पोलिसांनी लाऊडस्पीकर वरून सांगितले की, शांतता राखावी अन्यथा पोलीस कारवाई करावी लागेल. तरीही जमाव शांत झाला नाही तेव्हा सुरूवातीस लाठीमार करण्यात आला, त्यानतर अश्रूधूर सोडण्यात आला आणि त्यानंतर गोळीबार पोलिसांनी केलेला आहे. म्हणजेच पोलिसांनी आपल्या कार्यपद्धतीप्रमाणे या घटनेमध्ये कारवाई केलेली आहे.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सर्वात कमी सिंचन क्षमता असलेल्या जिल्ह्यामध्ये माणसे पाणी मागण्यासाठी मोर्चा घेऊन येतात, आक्रमकपणे मोर्चा घेऊन येतात ही एक प्रकारे आनंदाची गोष्ट असली तरी त्या घटनेमध्ये शेवटी एकाचा मृत्यू होतो ही दु:खद गोष्ट आहे. सभापती महोदय, का म्हणून ही माणसे तेथे एवढा मोर्चा घेऊन आली ? या निम्न चारगड प्रकल्पासाठी आम्ही 10-12 वर्षांपासून पाठपुरावा करीत आहोत. 16 जून 1982 ला 2775 हेक्टर सिंचन क्षमतेच्या या प्रकल्पास मध्यम प्रकल्प म्हणून प्रशासकीय मान्यता दिली गेली होती. त्यानंतर

..... यू 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. देशमुख ....

6.4.1994 ला 1595 हेक्टर सिंचन क्षमतेसाठी म्हणून सुधारित प्रशासकीय मान्यता दिली गेली. त्यानंतर 21 मार्च 1989 च्या राजपत्रात भाग 4-ब मध्ये 17 गावे लाभक्षेत्रामध्ये घेतली होती आणि 17 मार्च 1998 च्या राजपत्रातील 4-ब मधील पृ.185 वर लाभक्षेत्रातील विठ्ठलपूर, इनामपूर, वरोली, भालोड, तरोडा, खेड ही गावे वगळून टाकली. आता निम्न चारगड म्हणून हा प्रकल्प देण्यासाठी तयार आहे. परंतु आता याला एक महिन्यामध्ये मान्यता आपण द्याल काय ? ...

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांना मी सांगू इच्छितो की, या नियम 93 च्या सूचनेतील विषय हा गृहखात्याशी संबंधित आहे आणि आपण प्रश्नाद्वारे मांडत असलेला विषय हा पाटबंधारे विभागाशी संबंधित आहे ...

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी या संबंधात मुद्दाम वेगळी नोटीस दिलेली होती. मी दिलेल्या नियम 93 च्या सूचनेमध्ये हा विषय मांडलेला होता. ...

**सभापती** : ठीक आहे. मी आता हे निवेदन येथे रोखून धरतो. आणि आपल्या विषयाशी संबंधित मंत्र्यांना देखील या निवेदनावरील चर्चेच्या वेळी बोलावून घेतो म्हणजे मग यावर एकत्रित चर्चा आपल्याला करता येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हा अतिशय संवेदनशीन असा विषय आहे. त्या ठिकाणी झालेल्या आंदोलनामध्ये श्री.प्रफुल्ल राऊत हा युवक मृत्यूमुखी पडला आहे. त्यामुळे तेथे मोठा जनक्षोभ झालेला आहे. तेव्हा या निवेदनावर चर्चा करताना माननीय उपमुख्यमंत्री स्वत: सदनामध्ये उपस्थित राहिले तर ते या संबंधित गरीब शेतक-यांना न्याय देऊ शकतील. तेव्हा माननीय उपमुख्यमंत्री तसेच पाटबंधारे मंत्री या दोन्ही मंत्र्यांच्या उपस्थितीत हे निवेदन झाले तर या विषयाला न्याय मिळू शकेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( यानंतर श्री. सरफरे ... व्ही 1 ..

**सभापती** : माननीय मंत्री श्री. गणेश नाईक यांनी याबाबत नोंद घ्यावी.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, होय.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, नियमात बसणारी विनंती मी आपणास करणार आहे. निवेदन राखून ठेवतांना अशी पध्दत आहे की, आम्ही जे मुद्दे दिले आहेत ते त्या निवेदनामध्ये समाविष्ट झाले पाहिजेत. नाही तर असे होईल की, "हेही विचारताती तेही विचारताती, माणूस कशाने मेला कोणीच विचारीत नाही, माणूस कशास्तव मेला", माणूस कां मेला?

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

सभापती महोदय, महत्तम अनुशेष असलेल्या जिल्हयामध्ये पाण्यासाठी लोकांनी मोर्चा काढला. त्यामध्ये दुर्दैवाने 22 वर्षाच्या एका तरुणाचा दुःखद मृत्यू झाला आहे. त्यामध्ये कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न महत्वाचे आहेतच. परंतु त्याचबरोबर या तीन मुद्दयाची मी स्पेसिफिक नोटीस दिली होती. ती नोटीस ॲडमिट झालेली आहे. मी त्या दिवशी सभागृहामध्ये ही बाब लक्षात आणून दिली व माननीय सभापतींनीही सांगितले आहे. माझे असे म्हणणे आहे की, माननीय सभापतींनी आज हे नियम 93 चे निवेदन राखून ठेवले आहे. याबाबत उत्तर कुणी द्यावे? यामध्ये जॉईंट रिस्पॉन्सिबिलीटी आहे. मी नोटीसमध्ये मुद्दे दिले आहेत म्हणून मुद्दाम सांगतो. यामध्ये पहिला मुद्दा असा की, " मध्यम प्रकल्प म्हणून 16 जून 1982 ला 2775 हेक्टरला मान्यता दिली होती की नाही? मग त्याला कापून टाकला. आणि 12 वर्षांनी 6.4.1994 ला लघु केला. ही गोष्ट खरी आहे की नाही?" आणि मग तुम्ही राजपत्रात प्रसिध्द केले. 17 पैकी 6 गावे काढून टाकली, त्या 6 गावचे लोक तुमचे गॅझेट घेवून फिरतात की, आम्हाला कां काढून टाकले? निम्न चारघड प्रकल्प हा फिजिबल आहे. तुमच्या विभागाने तुमच्याकडे सबमिट केला आहे. त्याला आपण मान्यता देत नाही हे अयोग्य आहे. असे तीनही मुद्दे दिले आहेत. हे मुद्दे नियम 93 च्या निवेदनामध्ये समाविष्ट झाले पाहिजेत. दोन-चार माननीय सदस्यांनी नोटीस दिली असेल तर त्यामधील मुद्दे एकत्र करुन नोटीस देतो व त्यावर आधारीत निवेदन करण्यात येते अशी आपली पध्दत आहे. नाही तर मीच एकटयाने गॅझेट वाचून दाखवितो. त्यांनी म्हटले पाहिजे की, हे वाचून दाखविलेले गॅझेट खोटे आहे. तसे उत्तर दिले पाहिजे. तेव्हा हे नियम 93 चे निवेदन येईल त्यावेळी मी नमूद केलेले मुद्दे त्या निवेदनामध्ये यावेत. अशाप्रकारे आपण त्या दिवशी निर्णय दिलेला आहे. आज माननीय

प्रा. बी. टी. देशमुख...

सभापतींनी पुन्हा निदेश दिले आहेत. त्या दृष्टीने आपण निदेश द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण आसनावर येण्यापूर्वी माननीय सभापतींना आम्ही विनंती केली होती की, नियम 93 च्या सूचनेला उत्तर देण्याकरीता माननीय उपमुख्यमंत्री व माननीय जलसंपदा मंत्र्यांनी सभागृहामध्ये उपस्थित राहणे आवश्यक आहे. त्यानंतर माननीय सभापतींनी माननीय कामगार मंत्री श्री. गणेश नाईक यांना तशाप्रकारच्या सूचना दिल्या. तेव्हा याबाबत आपण निर्णय देण्यापूर्वी ही बाब आपल्या माहितीकरीता आपल्या निदर्शनास आणीत आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, नियमाला धरुन माझा असा मुद्दा आहे की, अनेक माननीय सदस्यांनी एकाच विषयासंबंधी नियम 93 अन्वये सूचना दिली असेल तर त्या सर्व सूचना एकत्र केल्या जातात. त्याबाबत माननीय सभापतींना अधिकार आहे. ही बाब त्या दिवशी लक्षात आणून दिल्यानंतर सुध्दा ते मुद्दे वगळले गेले आहेत. ते मुद्दे निवेदनामध्ये समाविष्ट करुन तशाप्रकारचे निवेदन शासनाकडून करण्यात यावे अशी माझी विनंती आहे..

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी दिलेल्या नियम 93 च्या सूचनेतील वगळण्यात आलेल्या मुद्दयांचा समावेश करुन तशाप्रकारचे सुधारीत निवेदन करण्याबाबत माननीय गृहमंत्री व माननीय जलसंपदा मंत्र्यांना कळविण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी दिलेल्या नियम 93 च्या सूचनेतील मुद्दे वगळण्यात आले आहेत.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु...

विनंती आहे की, पुढच्यावेळेला निवेदन येईल, त्यामध्ये सन्माननीय सदस्यांचे मुद्दे घेऊन निवेदन तयार करावे, त्याचे उत्तर ते सामुहिक देतील. वेगळे निवेदन द्यावयाचे असेल तर तसे करावे, म्हणजे सन्माननीय सदस्यांचा प्रश्न रहाणार नाही.

**उपसभापती** : शक्य तो या आठवडयात निवेदन करावे, नाही तर पुढील सोमवारी करावे. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या सगळया मुद्यांचा अंतर्भाव करुन निवेदन करण्यात यावे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आपला आभारी आहे.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

**पृ.शी.** : रत्नागिरी जिल्ह्यातील मोरेक्स पेट्रोकेमिकल्स कंपनीत लागलेली आग.

**मु.शी.** : रत्नागिरी जिल्ह्यातील मोरेक्स पेट्रोकेमिकल्स कंपनीत लागलेली आग, याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.गणेश नाईक (कामगार मंत्री) : सभापती महोदय, डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी "रत्नागिरी जिल्ह्यातील मोरेक्स पेट्रोकेमिकल्स कंपनीत लागलेली आग,"या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

डॉ.नीलम गोऱ्हे :सभापती महोदय, प्रत्येक अधिवेशनाच्या वेळी केमिकल कंपन्यांमध्ये रासायनिक स्फोट होतात व त्याबाबत 93 च्या सूचनेद्वारा प्रश्न उपस्थित केला जातो. प्रस्तुत निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की,"लोटे परशुराम औद्योगिक वसाहतीमध्ये अग्निशामक दल नाही." परंतु 93 ची सूचना देण्या मागचा आमचा हेतू हाच होता. पुढे म्हटलेले आहे की, "तीन ते सहा महिन्याच्या कालावधीमध्ये अग्निशमन यंत्रणा व त्यासाठी लागणारे मनुष्यबळ पुरविण्याचे आश्वासन दिलेले आहे." बजेटच्या वेळेस आणि पुरवणी मागण्यांच्या वेळेस वेळोवेळी यासाठी आर्थिक तरतूद करण्याबाबत सूचना दिलेल्या होत्या काय ? वर्षानुवर्ष त्या ठिकाणी आग विझविण्याची यंत्रणा नाही. त्या ठिकाणी यंत्रसामुग्रीचा विमा काढलेला होता काय ?

श्री.गणेश नाईक : त्या परिसरामध्ये अग्नीशमन यंत्रणा उभारण्यासाठी मनुष्यबळ पुरविण्याचें आश्वासन दिलेले होते, त्याप्रमाणे पुढील अधिवेशनाच्या आत त्या भागामध्ये अशाप्रकारची यंत्रणा उभारली जाईल, तसेच विमा काढण्याबाबतच्या सूचना दिल्या जातील.

श्री.श्रीकांत जोशी : गेल्या तीन अधिवेशनामध्ये स्फोटाच्या संबंधाने चर्चा झालेली आहे. इंडस्ट्रीयल सेफ्टी ॲन्ड फॅक्टरीज ॲक्ट प्रमाणे जे ज्वालाग्रही पदार्थ आहेत, त्या संबंधाने डेंजरस व हाझार्डस आर्टिकल्स ॲक्टमध्ये तरतूद आहे. त्याप्रमाणे इंडस्ट्रीयल एरिया, फॅक्ट्री लेन, कलेक्टर कार्यातयात सचिव या ठिकाणी व्यवस्था करण्याची आवश्यकता आहे. रिझर्वेशन असेल तर त्या ठिकाणी हॅन्डलिंग युजेस वापरावे, अशाप्रकारे स्पष्ट म्हटलेले आहे. केमिकल फक्टरी,वळूंज येथील स्फोटामध्ये चौघेजण मरण पावलेले आहेत. त्या संबंधात जी कलमे दाखविण्यात आलेली आहेत, ती चुकीची आहेत. कंपनी बरोबरच एमआयडीसीमधील कलेक्टर देखील दोषी ठरतात. कायद्याचे पालन करुन कायदेशीर कारवाई पूर्ण केली जाणार आहे काय ? ही कारवाई कलेक्टर अंतर्गत करावी लागते. त्याप्रमाणे पालन केलेले आहे काय ?

श्री.गणेश नाईक : हाझार्डस केमिकल, हायली इन्फेमेबल केमिकल यांची वर्गवारी केली जाते. त्या त्या केमिकलच्या फॅक्टरीमध्ये त्या दर्जाचे अधिकारी ठेवलेले असतात. त्या ठिकाणी तशी व्यवस्था नसेल तर व्यवस्थापनावर कारवाई केली जाते. तशी त्या ठिकाणी कारवाई करण्यात आलेली आहे.

--

4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

**पृ.शी.** : रायगड जिल्ह्यातील महाड औद्योगिक वसाहतीमधील वसुंधरा रसायन लि. या कंपनीत विषारी वायू पसरल्याने कामगारांचा झालेला मृत्यू.

**मु.शी.** : रायगड जिल्ह्यातील महाड औद्योगिक वसाहतीमधील वसुंधरा रसायन लि. या कंपनीत विषारी वायू पसरल्याने कामगारांचा झालेला मृत्यू.,याबाबत सर्वश्री अनंत तरे, श्री.अरविंद सावंत,विलास अवचट, डॉ.दीपक सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.जयंत पाटील वि.प.स. यांनी दिलेली तनयू 93 ची सूचना.

श्री.गणेश नाईक (कामगार मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री अनंत तरे, श्री.अरविंद सावंत,विलास अवचट, डॉ.दीपक सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.जयंत पाटील वि.प.स. यांनी रायगड जिल्ह्यातील महाड औद्योगिक वसाहतीमधील वसुंधरा रसायन लि. या कंपनीत विषारी वायू पसरल्याने कामगारांचा झालेला मृत्यू विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यान्नंतर श्री.बरवड .....

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, कच्च्या मालात सोडियम सल्फाइड टाकून तो रंगविरहित करण्याची प्रक्रिया ही व्यवस्थापनाने अयोग्य पध्दतीने नुकतीच चालू केली होती. या घटनेनंतर औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाने, कामगारांच्या सुरक्षिततेची खबरदारी घेतल्याशिवाय कच्चा माल रंगविरहित करण्याची प्रक्रिया बंद करण्याचे आदेश दि. 15.3.2006 रोजी दिले आहेत. सभापती महोदय, त्या ठिकाणी 15 मार्चला अपघात घडला आणि प्रक्रिया बंद करण्याचे आदेश 15 मार्चलाच दिले असे म्हटले आहे. प्रक्रिया बंद करण्याची सूचना शासनाने केव्हा दिली होती ? निवेदनामध्ये पुढे असे म्हटले आहे की, या प्रकरणी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत सविस्तर चौकशी चालू आहे. चौकशी पूर्ण झ ााल्यावर आढळलेल्या कायदे भंगाबाबत फौजदारी खटला भरण्यात येईल. ही चौकशी शासन किती दिवसात पूर्ण करणार ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, 14.3.2006 रोजी हा अपघात घडला आणि त्यानंतर दुसऱ्याच दिवशी अशा प्रकारची प्रक्रिया करु नका अशा प्रकारचे आदेश देण्यात आलेले आहेत.

श्री. विलास अवचट : शासनाने चौकशीचे आदेश दिले आहेत. ती चौकशी किती दिवसात पूर्ण होणार आहे ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, त्या ठिकाणी पोलिसांनी सुध्दा गुन्हा दाखल केलेला आहे आणि पोलिसांकडून कशा प्रकारे चौकशी झालेली आहे याबाबत मला सांगता येणार नाही परंतु सन्माननीय सदस्य श्री. विलास अवचट साहेबांनी विचारल्याप्रमाणे लवकरात लवकर ती चौकशी करण्यात येईल.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

**पृ. शी.** : सोलापूर जिल्हयातील तेलगाव सीना येथील एका महिलेची आणि तिच्या मुलाची नग्न धिंड काढणे.

**मु. शी.** : सोलापूर जिल्हयातील तेलगाव सीना येथील एका महिलेची आणि तिच्या मुलाची नग्न धिंड काढणे याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, सर्वश्रीमती कांता नलावडे, संजीवनी रायकर, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री विलास अवचट, अनंत तरे, डॉ. दीपक सावंत, ॲड. अनिल परब व श्री. अरविंद सावंत, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, सर्वश्रीमती कांता नलावडे, संजीवनी रायकर, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री विलास अवचट, अनंत तरे, डॉ. दीपक सावंत, ॲड. अनिल परब व श्री. अरविंद सावंत, यांनी "सोलापूर जिल्हयातील तेलगाव सीना येथील एका महिलेची आणि तिच्या मुलाची नग्न धिंड काढणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, एका दलित महिलेची आणि तिच्या मुलाची नग्न धिंड काढण्यात आली आणि त्या महिलेला त्वरित न्याय मिळालेला नाही. ही घटना माननीय मंत्रिमहोदयांच्या जिल्ह्यामध्ये घडलेली आहे. 8 आरोपींना पकडलेले आहे असे निवेदनात म्हटले आहे. आम्हाला लोक भेटले आणि त्यांचे असे म्हणणे आहे की, ज्यांनी धिंड काढली ते खरे आरोपी बाहेरच आहेत. यामध्ये तथ्य काय आहे ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, संबंधित महिलेने ज्यांची ज्यांची नावे दिलेली होती त्या सगळ्या लोकांना अटक केलेली आहे. या व्यतिरिक्त इतर कोणा दुसऱ्याचे नाव निष्पन्न झाले तर त्यांनाही अटक करण्यात येईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, ही घटना घडण्याच्या अगोदर 9 तारखेला त्या महिलेने हे लोक आम्हाला धमक्या देतात, त्रास देतात आणि आमच्यावर हल्ला होण्याची शक्यता आहे अशा प्रकारची तक्रार तेथील शिवसेनेचे आमदार श्री. उत्तमप्रकाश खंदारे यांच्याकडे केली होती आणि आमदार श्री. उत्तमप्रकाश खंदारे यांनी संबंधित पोलीस स्टेशनला त्या महिलेला संरक्षण द्यावे अशी विनंती केल्याचे स्वत: आमदार श्री. उत्तमप्रकाश खंदारे आणि संबंधित दलित महिलेने मला सांगितले. त्या महिलेचे असे म्हणणे आहे की, 9 तारखेला या लोकांवर प्रतिबंधात्मक कारवाई झाली असती तर हा प्रकार घडला नसता. म्हणून त्या महिलेने तक्रार करुनही म्हणून संबंधित पोलीस स्टेशनच्या ज्या अधिकाऱ्यांनी त्याची दखल घेतली नाही त्यांच्यावर कारवाई करणार काय ? सभापती महोदय, या ठिकाणी निवेदनामध्ये दिलेले उत्तर सुध्दा चमत्कारिक आहे. निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, "मानवी हक्क अभियान या संघटनेचे पदाधिकारी असल्याचा परिचय सांगणाऱ्या एका व्यक्तीने उपरोक्त महिलेसह अपर पोलीस अधिक्षक, सोलापूर यांची भेट घेतली." तुमच्या पोलीस स्टेशनच्या लोकांनी हा माणूस खरोखरच त्या संघटनेचा पदाधिकारी आहे की नाही याची खातरजमा करुन न घेता असे उत्तर देणे म्हणजे कोठे तरी त्या माणसावर हेत्वारोप करण्यासारखे आहे.. माननीय मंत्रिमहोदय विधान परिषदेत उत्तर देत आहेत. त्या संघटनेची, त्या संस्थेची, त्या महिलेची सुध्दा विश्वासार्हता गमाविण्याचा प्रकार आपण आपण करीत आहात असे वाटते. म्हणून या निवेदनामध्ये दुरुस्ती केली पाहिजे. निवेदनामध्ये पुढे असे म्हटले

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

डॉ. नीलम गोऱ्हे ....

आहे की, "या प्रकाराची चौकशी व्हावी असे निवेदन दिले." तपास केला असता अशी धिंड काढण्याची घटना घडली की नाही ते या निवेदनामध्ये द्यावयास पाहिजे होते. घटना घडलेली असावी असे शासनाला सांगावयाचे आहे असे दिसते. विधिमंडळाच्या पटलावर सुस्पष्ट उत्तर दिले पाहिजे. तेथील आमदारांनी आणि त्या महिलेने सांगून देखील त्या पोलीस स्टेशनच्या ज्या अधिकाऱ्यांनी दखल न घेतल्यामुळे धिंड काढण्याचा प्रकार घडला त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणार काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, 9 मार्चला त्यांना धमकी दिली अशी तक्रार दिली होती त्याप्रमाणे एन.सी. दाखल झाली होती. त्याप्रमाणे पोलीस कॉन्स्टेबल श्री. माने यांना चौकशीसाठी गावात पाठविले होते. त्यांनी ज्यांची नावे दिली होती ते संबंधित लोक त्या ठिकाणी नव्हते. ते त्या ठिकाणी सांगून आले की, या लोकांना घेऊन पोलीस स्टेशनला यावे. पोलिसांनी याची दखल घेतली नाही असे नाही. त्यांनी दखल घेतलेली आहे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MHM/ SBT/ MAP/ पूर्वी श्री.बरवड 16:00

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ही गंभीर घटना आहे. गोंदिया जिल्हयामध्ये असा प्रकार झालेला होता आणि त्या प्रकाराची सीडी माझ्याकडे आहे. या प्रकाराबाबत पोलीस स्टेशनला कोणी तरी तक्रार केली म्हणून गुन्हा दखल केला असे निवेदनामध्ये सांगितलेले आहे. असा प्रकार घडलेला आहे हे शासनाला मान्य आहे काय ? पोलिसांच्या चौकशीमध्ये असा प्रकार घडल्याचे सिध्द झालेले आहे काय ? छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. आंबेडकर यांच्या पुरोगामी महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारची धींड काढलेली आहे, हे शासनाला मान्य आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : ज्या लोकांनी असला प्रकार केला त्यांच्यावर गुन्हा दाखल करुन त्यांना अटक केलेली आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, "मानवी हक्क अभियान या संघटनेचे पदाधिकारी असल्याचा परिचय सांगणा-या एका व्यक्तीने उपरोक्त महिलेसह अपर पोलीस अधीक्षक, सोलापूर यांची भेट घेऊन तेलगाव गावातील सदर दलित महिलेची तेथील गावगुंडांनी दि. 11.3.06 रोजी विवस्त्र अवस्थेत धिंड काढली." निवेदनामध्ये पुढे असे म्हटलेले आहे की, "गुन्हयातील एकूण 9 आरोपींपैकी 8आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. सदर आरोपींना न्यायालयीन कोठडीमध्ये ठेवण्यात आले आहे." या 9 आरोपींची नांवे काय आहेत ? एवढा लांच्छनास्पद प्रकार घडून देखील पोलिसांनी आरोपीला न्यायालयीन कोठडी कशी काय मिळू दिली ? ज्या अर्थी या आरोपींना न्यायालयीन कोठडी दिली याचाच अर्थ पोलिसांनी ही केस वीक करुन टाकली. या प्रकरणाची चौकशी ताबडतोबीने सी.आय.डी.कडे देऊन ज्या पोलीस अधिका-याने आरोपींना न्यायालयीन कोठडी कशी मिळेल यादृष्टीने केस रजिस्टर केली, त्या पोलीस अधिका-यावर कारवाई करावी अशी माझी मागणी आहे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : माननीय सदस्यांनी जी माहिती सांगितली त्याची निश्चितपणे चौकशी केली जाईल आणि त्यामध्ये कोणी दोषी आढळले तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

**उपसभापती** : पोलिसांनी पोलीस कस्टडी मागितली होती काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : पोलिसांनी पोलीस कस्टडी मागितली होती. न्यायालयाने न्यायालयीन कोठडी दिली.

श्री. श्रीकांत जोशी : अशा प्रकारची घटना घडलेली असेल तर त्याबद्दल सरकारचे मत काय आहे ? तसेच 145 लोकांवरही गुन्हे दाखल करावे लागतील.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : यातील एका महिला आरोपीला न्यायालयाने पोलीस कोठडी दिलेली आहे.

श्री. दिवाकर रावते : निवेदनामध्ये ही माहिती दिलेली नाही.

श्रीमती संजीवनी रायकर : त्या महिलेची तीन तास धिंड काढण्यात आली. धिंड काढताना तेथे मध्ये कोणते पोलीस स्टेंशन नव्हते काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : ही गावातील घटना आहे. गावामध्ये पोलीस स्टेशन नाही.

श्री. दिवाकर रावते : मग पोलीस पाटीलवर कारवाई करावी.

श्री. रमेश निकोसे : आज 21व्या शतकात एका दलित महिलेला नग्न करुन तिची गाढवावरुन धिंड काढण्याचा अतिशय लांच्छनास्पद प्रकार घडलेला आहे. या प्रकरणी शासनाने आरोपींना ताबडतोब अटक केल्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे..

परंतु मला हे सांगावयाचे आहे की, आरोपींना न्यायालयीन कोठडी दिली असली तरी केस दाखल झ ााल्यानंतर पुरावे बदलले जातात. आरोपींची स्टेटमेंट बदलली जातात आणि पोलीस स्टेशनमधील अधिकाऱ्यांवर दबाव टाकला जातो. असे प्रकार जर कोणी करीत असतील तर त्यासाठी शासन काय करणार आहे ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या गावातील पोलीस पाटील किंवा एस.डी.ओ. काय करीत होते ? त्यांची जबाबदारी आहे किंवा नाही ?

श्री. सिध्दराम म्हेत्रे : सभापती महोदय, या गावाला पोलीस पाटील नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, संबंधित महिला घाबरुन दोन दिवस जंगलात लपली होती. हे त्या गावातील लोकांना किंवा एस.डी.ओ.ला माहीत नाही काय ?

**उपसभापती** : या सूचनेवरील निवेदन मी स्वत: वाचले आहे. या प्रकरणाची चौकशी स्थानिक पोलिसांकडे न देता सीआयडीकडे किंवा अन्य एखाद्या अधिका-याकडे द्यावी आणि त्याबाबतचा अहवाल येत्या 8-10 दिवसांमध्ये सादर करावा.

श्री. सिध्दराम म्हेत्रे : सभापती महोदय, ठीक आहे.

-----

...2

**पृ.शी.**: तेजस्विनी महिला वसतीगृह,कोल्हापूर येथील महिलांचे लैंगिक शोषण.

**मु.शी.**: तेजस्विनी महिला वसतीगृह,कोल्हापूर येथील महिलांचे लैंगिक शोषण याबाबत सर्वश्री डॉ.दीपक सावंत,अनंत तरे,डॉ.नीलम गोऱ्हे,श्री.अरविंद सावंत,श्री.विलास अवचट, ॲड.अनिल परब,वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री. सिध्दराम म्हेत्रे(गृहराज्यमंत्री) : सभापती महोदय, वि.प.स.सर्वश्री सर्वश्री डॉ.दीपक सावंत,श्री.अनंत तरे,डॉ.नीलम गोऱ्हे,श्री.अरविंद सावंत, श्री.विलास अवचट,ॲड.अनिल परब यांनी तेजस्विनी महिला वसतीगृह,कोल्हापूर या संस्थेतील महिलांचे लैंगिक शोषण या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती मा. सदस्यांना अगोदरच वितरीत केल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**निवेदनानंतर**

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, अतिशय अस्वस्थ करणारी आणि भयानक स्वरुपाची अशी ही घटना घडलेली आहे. स्थानिक पातळीवर आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. निवेदनामध्ये पोलीस कस्टडी/न्यायालयीन कस्टडी असे म्हटले आहे याचा नेमका अर्थ काय ? पोलीस कस्टडी मिळाला आहे किंवा न्यायालयीन कस्टडी मिळाली आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे :सभापती महोदय, एकूण पाच आरोपी आहेत. त्यापैकी काहींना पोलीस कस्टडी आणि काही आरोपींना न्यायालयीन कस्टडी मिळाली आहे. म्हणून दोन्हींचा उल्लेख करण्यात आला आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, तेजस्विनी महिला वसतिगृहातील महिला त्याठिकाणी जाऊन पोहोचल्या आणि त्यांनी तक्रार केली म्हणून हा प्रकार उघडकीस आला. ज्या ज्या ठिकाणी महिलांची वसतिगृहे आहेत किंवा संस्था आहे तेथील महिलांची पोलीस स्टेशनमध्ये जाऊन तक्रार करण्याचा हिंमत होत नाही. गेली अनेक वर्षे मी मागणी करीत आहे की महिलांची वसतिगृहे आहेत त्यावर देखरेख करण्याचे काम पोलीस महिला सुरक्षा समितीकडे सोपविले जाईल काय ? त्यासाठी पोलीस अधीक्षक आणि पोलीस आयुक्त यांनी या समितीला पूर्णपणे सहकार्य देण्याबाबत शासन सूचना देईल काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सन्माननीय सदस्यांनी चांगली सूचना मांडलेली आहे त्याप्रमाणे संबंधितांना सूचना देण्यात येतील.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, सदर गुन्हयातील आरोपींची नांवे काय ? तेथे किती वर्षापासून हे आरोपी काम करीत आहेत आणि कोणत्या पदावर आहेत ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, एकूण पाच आरोपी आहेत. त्यामध्ये वसंत महादेव पवार,बाळासाहेब घोडके,शोभा प्रताप शिंदे,सुलोचना मिस्त्री आणि मुकुंद कोळे अशी आरोपींची नांवे असून या सर्वांना निलंबित करण्यात आले आहे.

यानंतर श्री. खर्चे पी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नेरुळ (नवी मुंबई) हद्दीत महिलेचे प्रेत आढळून येणे.

**मु.शी.**: नेरुळ (नवी मुंबई) हद्दीत महिलेचे प्रेत आढळून येणे याबाबत श्री.अनंत तरे, डॉ. नीलम गो-हे, श्री. विलास अवचट, डॉ. दीपक सावंत, श्री.अरविंद सावंत, ॲड. अनिल परब वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री अनंत तरे, डॉ. नीलम गो-हे, श्री.विलास अवचट, डॉ. दीपक सावंत, श्री.अरविंद सावंत, ॲड. अनिल परब यांनी "नेरुळ (नवी मुंबई) हद्दीत महिलेचे प्रेत आढळून येणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, तुर्भे पोलिसांच्या हद्दीत दिनांक 8 जानेवारी 2006 रोजी ही घटना घडली आहे असे निवेदनात म्हटले आहे. सदर डोके तुर्भे येथील मयत स्त्रीच्या सापडलेल्या धडाशी निगडीत आहे काय ? याचा शोध घेण्यासाठी दोन्ही प्रकरणातील व्हिसेरा, अवयव व हाडे डी.एन.ए. तपासणीसाठी न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा, मुंबई येथे पाठविण्यात आले आहेत व उक्त दोन्ही प्रकरणांचा तपास चालू आहे असेही येथे म्हटले आहे. हे 14 मार्च, 2006 चे प्रकरण मी समजू शकतो कारण ते लेटेस्ट आहे. परंतु दुसऱ्या प्रकरणामध्ये तर दोन ते अडीच महिन्यांचा कालावधी लाटलेला आहे. या तपासासाठी तसेच अहवाल प्राप्त होण्यासाठी अजून किती कालावधी लागणार आहे ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : महोदय, पहिले प्रकरण डी.एन.ए. तपासणीसाठी न्याय वैद्यानिक प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आलेले आहे. इतर ठिकाणी वेगवेगळे मृतदेह तर काही ठिकाणी धड सापडलेले असल्यामुळे दुसऱ्या प्रकरणाची चौकशी सुरु आहे.

----------------

.............3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: जे.एन.पी.टी. बंदरातून आलेल्या भंगाराच्या कंटेनरमध्ये जिवंत काडतुसे आढळून आल्याबाबत.

**मु.शी.**: जे.एन.पी.टी. बंदरातून आलेल्या भंगाराच्या कंटेनरमध्ये जिवंत काडतुसे आढळून आल्याबाबत या विषयासंबंधी श्री. अनंत तरे, डॉ. नीलम गो-हे वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. नीलम गो-हे (विधानसभा सदस्याद्वारा निर्वाचित): अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे. अशी विनंती करतो.

"उरण येथील जेएनपीटी बंदरातून आलेल्या भंगाराच्या कंटेनरमध्ये जिवंत काडतुसांची पोती आढळल्याचा धक्कादायक प्रकार दिनांक ११ फेब्रुवारी, २००६ रोजी वा त्या सुमारास घडणे, परिणामी त्या परिसरात पसरलेले घबराटीचे व असंतोषाचे वातावरण, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे : महोदय, काडतुसांमुळे घातपात होऊ शकतो अशा प्रकारे वेगवेगळी रसायने बेकायदेशीररित्या आणण्याचा हा गंभीर प्रकार आहे. म्हणून या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने माननीय मंत्री महोदयांना मला असे विचारावयाचे आहे की, कंटेनर उघडल्यावर एका प्लॉस्टिकच्या गोणीमध्ये काडतुसे आढळून आली असे निवेदनात म्हटले आहे. या बंदाराला हे कंटेनर पोहचेपर्यंत ज्या ज्या टप्प्यातून हा माल येथपर्यंत येतो तेथपर्यंत सुरक्षा व्यवस्थेच्या तपासणीमध्ये एकाही ठिकाणी या कंटेनरची तपासणी झाली नाही काय ? कारण सौदी अरेबियामधून हे कंटेनर मागविले आहेत. त्या ठिकाणाहून एकाही ठिकाणी सुरक्षा व्यवस्थेने विचारणा केली नाही काय ? इतक्या सोप्या पध्दतीने हा घातक व्यापार चाललेला असतो. खरे तर जगामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावरुन शस्त्रास्त्रे आणि त्यासाठी लागणाऱ्या रसायनांचा व्यापार अशा सोप्या पध्दतीने होत असल्याचे दिसून आले आहे. महाराष्ट्र आणि भारतावर अमेरिकेने यासंदर्भात बराच सज्जड दबाव आणलेला आहे व त्यामध्ये शासन केवळ उदासीनतेची भूमिका घेत आहे काय? म्हणून सौदी अरेबियामधून जे.एन.पी.टी. पर्यंत हे कंटेनर आले त्याची कुठल्या कुठल्या टप्प्यावर चौकशी झालेली आहे ? याचा खुलासा झाला पाहिजे. आपले शासन पोस्ट मार्टेम आणि मुडकी व धड व हाडे अशाच प्रकारे नंतर उत्तरे देत असते. परंतु अशा प्रकरणांमध्ये जे जे लुप होल्स असतील त्यासंदर्भात काय कारवाई करणार आहे ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : महोदय, या सर्व प्रकरणाचा तपास न्हावा-शेवा येथील कस्टमचे अधीक्षक श्री. राव हे करीत आहेत.

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, कस्टमचे अधिकारी तपास करीत आहेत ही टेक्निकल बाब आम्हाला देखील समजते. परंतु सातत्याने आपल्या राज्यात असे प्रकार उघडकीस येत आहेत. म्हणून पूर्वी असे प्रकार जे घडले आहेत त्यांच्या संदर्भातील कस्टमचे अहवाल आपल्याकडे येत असतील. अशा प्रकारे ठराविक मार्गावरुन आणि ठराविक प्रकारचीच तस्करी नेहमी होत असते. यासंदर्भात माहिती आहे काय असे विचारले असता त्याला मंत्री महोदय उत्तर "नाही" म्हणून सांगतात आणि विषय संपला असे होते. परंतु यासंदर्भात शासनाने काय कारवाई करण्याचे ठरविले आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

........5

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : कस्टमचा अहवाल आमच्याकडे येत नाही कारण हा विषय केंद्रशासनाच्या अखत्यारितील असल्यामुळे स्वतंत्रपणे त्यासंबंधीचा तपास करण्यात येत आहे. तसेच सन्माननीय सदस्या यांनी ज्या सूचना केल्या त्यांच्या भावना केंद्रशासनाकडे कळविण्यात येतील.

श्री. श्रीकांत जोशी : महोदय, कस्टमच्या अखत्यारित या गोष्टी असल्याची आम्हाला कल्पना आहे. आमच्या जालना जिल्हयात देखील अशा प्रकारचे भंगार येत असते. मुख्य प्रश्न असा आहे की, गेल्या काही दिवसांमध्ये मराठवाडयासारख्या ठिकाणी सुध्दा अशा स्क्रॅबमधून स्फोटके सापडून तीन कामगार मृत्युमूखी पडले आहेत.

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी...

हे प्रकार वाढत चालले आहेत. गृह विभाग प्रत्येकाची तपासणी करू शकत नाही. त्यामुळे बंदरामधील इनबिल्ड सुरक्षा अधिक वाढविण्यासाठी शासन केंद्र शासनाकडे आग्रह धरणार आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सजेशन फॉर ॲक्शन.

....

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: आगाशी (विरार,जि.ठाणे) येथे तरूणीला होमकुंडात ढकलून बळी देण्याचा घडलेला प्रकार.

**मु.शी.**: आगाशी (विरार,जि.ठाणे) येथे तरुणीला होमकुंडात ढकलून बळी देण्याचा घडलेला प्रकार यासंबंधी श्रीमती संजीवना रायकर,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई शिक्षक) : अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करते.

"दिनांक 11 फेब्रुवारी, 2006 रोजी आगाशी (विरार, जि.ठाणे) येथे एका तरुणीला होमकुंडात ढकलून बळी देण्याचा प्रकार घडणे, संपूर्ण भाजलेल्या अवस्थेत तिला केईएम रुग्णालयात दाखल केल्यानंतर दिनांक 14 फेब्रुवारी, 2006 रोजी तिचा मृत्यू होणे, ही घटना अंधश्रध्देतून उद्‌भवली असण्याचा जनतेकडून संशय व्यक्त करण्यात येणे, शासनाने या संदर्भात चौकशी करुन मृत्यूस जबाबदार असणाऱ्या व्यक्तिविरुध्द गंभीर कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना क्रमांक 2 पुकारण्यात येण्यापूर्वी शासनाने जे लेखी उत्तर दिले आहे, त्यात शासनाला काही सुधारणा करावयाची आहे काय ? असा प्रश्न मी विचारू इच्छितो.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृहराज्यमंत्री) : नाही अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, श्री.विजय हरिश्चंद्र मांगेला यांच्या नवीन घरामध्ये पुजेला मुलगी गेली असताना अचानकपणे श्री.विजय मांगेला यांच्या भाचीच्या अंगात दैवीचा संचार झाल्यामुळे तिने एका मुलीला अग्निकुंडात ढकलून दिले. हा एक बळी देण्याचा प्रकार असून तो अंधरध्देतून घडलेला आहे. असे असताना शासनाने लेखी निवेदनात नमूद केले आहे की, "अंधश्रध्देतून की अन्य कारणाने सदर मुलीला अग्निकुंडात टाकले याबाबत झालेल्या तपासात कोणतेही कारण निष्पन्न झालेले नसून त्याबाबत सखोल तपास चालू आहे." परंतु, हा अंधश्रध्देचा बळी नाही असे शासनाचे म्हणणे आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, हा अंधश्रध्देचा प्रकार आहे. त्यामुळे ज्यानी कोणी हे कृत्य केले आहे, त्याच्याविरूध्द सगळी कलमे लावण्यात आलेली आहेत.

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, मुलीला अग्निकुंडात टाकले हे तपासात निष्पन्न झालेले आहे म्हणजे हा अंधश्रध्देचाच बळी आहे. आज 21 व्या शतकात अंधश्रध्दा दिवसेंदिवस वाढत चालली आहे. तेव्हा याबाबत शासन काय करणार आहे ? शासन अंधश्रध्दा निर्मूलन विधेयक आणू पहात आहे, ते केव्हा आणणार आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, लवकरात लवकर अंधश्रध्दा निर्मूलन विधेयक सभागृहापुढे येणार आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मी सुरूवातीला शासनाला विचारले होते की, लेखी उत्तरामध्ये काही सुधारणा करावयाची आहे काय ? पण त्यास शासनाच्यावतीने 'नाही' असे उत्तर देण्यात आले. हे निवेदन मंत्रिमहोदयांनी वाचलेले दिसत नाही. या निवेदनावरून शासन अंधश्रध्देच्या बाजूने उभे आहे असे दिसते. या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, "पुजा चालू असताना श्री.विजय हरिश्चंद्र मांगेल्या यांच्या भाचीच्या अंगात देवीचे वारे आले होते." म्हणजे खरेच देवीचे वारे आले होते असे शासनाला म्हणावयाचे आहे काय ? तेव्हा अशा चुकीच्या उत्तरासंबंधी शासनाने माफी मागितली पाहिजे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या प्रश्नाला अनुसरूनच माझा प्रश्न असा आहे की, "पुजा चालू असताना श्री.विजय हरिश्चंद्र मांगेल्या यांच्या भाचीच्या अंगात देवीचे वारे आले होते." असा अहवाल कोणा अधिकाऱ्याने लिहिला आहे व त्याचे नाव काय आहे ? ...4...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, श्री.विजय मांगेला यांच्या घरी वास्तूशांती होती. पुजा चालू असताना श्री.विजय हरिश्चंद्र मांगेला यांची भाची अंगात देवीचे वारे आले असल्याचे हावभाव करीत असल्यामुळे कदाचित तसे लिहिले असेल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी मोघम उत्तर देता कामा नये. शासनाच्यावतीने येथे पॉझिटीव्ह स्टेटमेंट दिले आहे. मंत्रिमहोदय प्रत्येक ठिकाणी जाऊ शकत नाहीत हे मी समजू शकतो. तरी पण "पुजा चालू असताना श्री.विजय हरिश्चंद्र मांगेला यांच्या भाचीच्या अंगात देवीचे वारे आले होते." याची खात्री कुठल्या अधिकाऱ्याने करून घेतली होती व त्याचे नाव काय आहे ?

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य जे म्हणत आहेत ती बाब कोणत्याही अधिकाऱ्याने नव्हे तर साक्षीदाराने सांगितलेली आहे. साक्षीदाराने जसे निवेदन केले होते तसे निवेदन या ठिकाणी आलेले आहे. कारण पोलीस ज्यावेळी घटनास्थळी तपासासाठी गेले होते त्यावेळी साक्षीदारांनीच "पुजा चालू असताना विजय मांगेला यांच्या भाचीच्या अंगात देवीचे वारे आले होते" असे सांगितले होते.

श्री.दिवाकर रावते : महोदय, विजय मांगेला याच्या भाचीच्या अंगात आल्यामुळे तिने शेजारची मुलगी ज्यावेळी पुजा चालू असलेल्या ठिकाणी देवदर्शनासाठी गेली असता त्या मुलीला होम कुंडात उडी टाकण्यास सांगितले. तसेच निवेदनातील शेवटच्या परिच्छेदामध्ये म्हटले आहे की, "अंधश्रध्देतून की अन्य कारणाने सदर मुलीला अग्निकुंडात टाकले याबाबत झालेल्या तपासात कोणतेही कारण निष्पन्न झालेले नसून, त्याबाबत सखोल तपास चालू आहे." महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख आणि श्री.जितेंद्र आव्हाड यांनी विचारल्यानुसार, ज्या अधिकाऱ्यांनी शासनाला हे निवेदन दिले आहे त्याचे नाव कळणे आवश्यक आहे. अंधश्रध्देचा कायदा करणाऱ्या सरकारने अशा प्रकारे सभागृहात निवेदन करणे ही बाब अतिशय गंभीर आहे. त्यामुळे ज्या अधिकाऱ्याने हे निवेदन केले आहे त्याच्यावर आपण काय कारवाई करणार आहात ? त्या अधिकाऱ्याला या निवेदनाबाबत जाणीव आहे की नाही ? त्या अधिकाऱ्याला आपण पाठीशी तर घालीत नाही ना ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, कोणालाही पाठीशी घालण्याचा प्रश्न नाही. सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्यानुसार त्या अधिकाऱ्यावर योग्य ती कारवाई केली जाईल.

श्री.जितेंद्र आव्हाड : महोदय, असे निवेदन करणे म्हणजे अख्ख्या महाराष्ट्राचा अपमान आहे. त्यामुळे....

**उपसभापती** : सन्माननीय मंत्री महोदयांनी संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई केली जाईल असे सांगितले आहे. त्यामुळे नेमक्या कारवाई संदर्भात ते आताच काही सांगू शकणार नाहीत असे मला वाटते.

श्री.दिवाकर रावते : उपसभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी त्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार आहोत ते जर आताच सांगितले तर त्याला महत्व राहील.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, एखाद्या लक्षवेधी सूचनेवरील निवेदन आल्यानंतर केवळ "छापल्याप्रमाणे" असे म्हणणे योग्य नाही. ज्या लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनावर चर्चा होणार आहे ते निवेदन माननीय मंत्री महोदयांनी वाचणे आवश्यक आहे. मी माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छिते की, त्यांनी हे निवेदन वाचले होते काय ?

( उत्तर आले नाही.)

प्रा.बी.टी.देशमुख : मला वाटते त्या अधिकाऱ्यांनी ही खात्री करुन घेतली असावी की,....

**उपसभापती** : मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, सदनातील सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन या लक्षवेधी सूचनेसंबंधी सुधारित निवेदन मागवून घ्यावे. ज्या अधिकाऱ्यांनी अशाप्रकारे माहिती पुरविली असेल त्यांच्यावर शासनाने योग्य ती कारवाई करावी. त्यामुळे या लक्षवेधी सूचनेवरील सुधारित निवेदन येईपर्यंत ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात येत आहे. आता लक्षवेधी सूचना क्रमांक-3 चर्चेला घेण्यात येईल.

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महिला बचत गटांच्या संदर्भात शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी न होणे.

**मु.शी.**: महिला बचत गटांच्या संदर्भात शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी न होणे या विषयावर सन्माननीय सदस्या प्रा.फौजीया खान, सर्वश्री रणजितसिंह मोहिते-पाटील, सदाशिवराव पोळ, विनायकराव मेटे, जितेंद्र आव्हाड, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा.फौजीया खान (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय ग्रामविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते व त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"बचत गटांनी व ग्रामीण कारागिरांनी उत्पादीत केलेल्या वस्तुच्या विक्री व्यवस्थेसाठी तालुका पंचायत समितीच्या स्तरावर किमान एक विक्री केंद्र आणि जिल्हा परिषदांच्या स्तरावर प्रत्येक तालुक्यासाठी किमान दोन विक्री केंद्रे सुरु करण्यास शासनामार्फत जिल्हा परिषदांना सांगण्यात आले असणे, ही विक्री केंद्रे कायमस्वरुपी न देता संबंधीत संस्थांना आळीपाळीने देणे, महिला बचत गटांमधील सदस्यांसाठी सामुहिक विमा योजना राबविण्याबाबतही सरकारचा विचार असणे, परंतु यापैकी कुठल्याही बाबीची अद्याप अंमलबजावणी झालेली नसणे, महिलांच्या स्वयंरोजगाराशी हा प्रश्न निगडीत असल्याने आणि त्यांच्या अंमलबजावणीमध्ये विलंब होत असल्याने महिलांमध्ये पसरलेली नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्र) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

:: निवेदन ::

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..4..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनामध्ये असा उल्लेख आहे की, "या योजने अंतर्गत राज्यात तालुका/जिल्हा/विभाग स्तरावर स्वरोजगारींनी तयार केलेल्या वस्तुंना बाजारपेठेची कायम स्वरुपी सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहेत. मैं माननीय मंत्री जी से यह पूछना चाहती हूं कि पूरे राज्य में जिला स्तर पर और तालुका स्तर पर कितने मार्केट सेंटर तैयार हुए हैं, ये सेंटर किस प्रकार के एन.जी.ओ. को दिए जाते हैं, ये सेंटर पूरे राज्य में क्यों नहीं दिए गए हैं ? एन.जी.ओ. को ये सेंटर देते समय उनको मार्केट का अनुभव कितना है, क्या यह देखा जाता है, एम्स एंड ऑब्जेक्ट ऑफ मार्केटिंग बनाए गए हैं या नहीं ? मेरा एक और यह प्रश्न है कि डी.आर.डी.ए. का इन्फ्रास्ट्रक्चर डेवेलपमेंट फंड होता है. क्या इसके द्वारा ब्राण्डेड प्राडक्टस की पॅकेजिंग के लिए फंड देने की तरतूद है ?

यानंतर श्री कांबळे

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, अमरावती, सातारा, पुणे, सांगली, ठाणे, नाशिक, गोंदिया, अहमदनगर, रत्नागिरी, चंद्रपूर अशा 10 जिल्हा परिषदांमध्ये बाजारगाळे किंवा ओटे आहेत. परभणीमध्ये असे काहीच नाही. परभणीमध्ये 4 पी.डी. सस्पेंड झालेले आहेत. दिनांक 18 जून, 2002 ला या संदर्भात आदेश देण्यात आले होते, हे खरे आहे. सभापती महोदय, जिल्हा परिषदा ह्या स्थानिक स्वराज्य संस्था आहेत. त्यांचा पैसा डी.आर.डी.ए. कडे राहतो. आम्ही फक्त या संदर्भात आदेश देऊ शकतो. त्यांना जागा उपलब्ध आहे की नाही, त्यांच्या उत्पादनांसाठी मार्केट आहे की नाही या सगळ्या गोष्टी लक्षात ठेवून प्रत्येक जिल्हा परिषदा आपापल्या स्तरावर निर्णय घेत असतात.

श्रीमती फौजिया खान : अगर ऐसा है तो मार्केट सेंटर चलाने के लिए जो एन.जी.ओ. सिलेक्ट किए जाते हैं, इसके बारे में टप्पे-टप्पे पर देने संबंधी जो नीति अपनाई गई हैं, इस नीति के अन्तर्गत किसे मार्केट सेंटर दिए जाते हैं ? अगर बचत गट को मार्केट सेंटर दिए जाते हैं तो क्या उनका मार्केट का अनुभव देखा जाता है ? मार्केट का अनुभव देखा जाना चाहिए क्योंकि अगर उन्हें मार्केट का अनुभव नहीं होगा तो वे अपनी वस्तु कैसे बेचेंगे ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, कोणत्या एन.जी.ओं.ना मार्केट द्यायला पाहिजे किंवा नाही हा निर्णय डी.आर.डी.ए.ची गव्हर्निंग बॉडी घेत असते. या संदर्भातील निर्णय शासन स्तरावर होत नाही.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय ग्रामविकास मंत्रीमहोदयांनी बचत गटासंदर्भात जरी विस्ताराने उत्तर दिले असले तरी या संदर्भात मला बोलावयाचे आहे. बचत गटांसाठी आम्ही संमेलने ठेवत आहोत, त्यांचे म्हणणे ऐकण्याचा प्रयत्न करत आहोत असे आपण म्हणत आहात. परंतु विभागाने या प्रश्नाचे स्वरुप समजून घेऊन उत्तर दिले नाही असे मला वाटते. सभापती महोदय, जिल्हा परिषदा व नगरविकास विभाग हे दोन्ही वेगवेगळे विभाग आहेत. बचत गट जसे ग्रामीण भागात आहेत तसेच शहरी भागात देखील आहेत. आपण ग्रामीण भागाचा विचार करायला लागलो तर आपल्याला दिसून येईल की, जिल्हा परिषदांना खडू, झाडू, डस्टर या सर्व गोष्टी लागतात. कामधेनू व अन्नपूर्णा योजनेत असे म्हटले आहे की, बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादनांना आपण प्राधान्य दिले पाहिजे. आपण संमेलन भरवून त्यांना कोल्हापूरहून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

मुंबईला यावयास लावणार, मग त्यांना बाजारपेठ कोठून मिळणार ? सभापती महोदय, बचत गटांकडून वस्तू घेण्याऐवजी टेंडर लॉबी व कॉंट्रॅक्टर लॉबी चालविली जात आहे. या निमित्ताने माझी आपणास विनंती आहे की, कामधेनू व अन्नपूर्णा योजनेच्या अंतर्गत बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादनांना शंभर टक्के बाजारपेठ मिळाली पाहिजे. दुसरे म्हणजे आपण उत्तरात म्हटले आहे की, दुकानगाळे, बाजारओटे बांधून बचत गटाला सवलतीच्या दरात वाटप करण्यात येतात. सभापती महोदय, कदाचित आपण हे आठ-दहा जिल्हा परिषदांमध्ये दिली असेल. पण आपण ते संपूर्ण जिल्हयासाठी एक दुकान दिले आहे. जेथे बाजारपेठा आहेत, शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधली जात आहात, तेथे महिला बचत गटांसाठी विक्री केंद्र दिले पाहिजे. या संदर्भात माझी आपणास विनंती राहील की, जिल्हा नियोजन मंडळामार्फत ग्रामविकास विभागाने निर्णय घेऊन प्रत्येक जिल्ह्यामध्ये किमान एक विक्री केंद्र उभारावे आणि जिल्हा परिषदेला लागणाऱ्या सगळ्या वस्तू या बचत गटांमार्फत घेतल्या जाव्यात.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, या संदर्भात मागच्याच फेब्रुवारीमध्ये बैठक झाली. त्यावेळी सर्व जिल्हा परिषदांचे सी.ई.ओ., सभापती कोल्हापूरमध्ये होते. त्यावेळी माननीय मंत्रीमहोदयांनी असा निर्णय घेतला की, प्रत्येक जिल्हा परिषदेच्या हेड क्वॉर्टरवर मार्केट उभारुन सर्व बचत गटांच्या वस्तुंसाठी वेगवेगळे स्टॉल्स ठेवावेत.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे...

त्यांना रोटेशन प्रमाणे गाळे देण्यात येतात, गाळे वितरीत करण्यासाठी सुपरव्हिजन पी.डी. यांचे असते. बचत गटातर्फे ज्या वस्तू तयार करण्यात येतात त्या कंम्पलसरी जिल्हापरिषदेने घ्यावयास पाहिजेत असे त्यांच्यावर आपण बंधन घालू शकत नाहीत. कारण जिल्हा परिषद ही स्थानिक स्वराज्य संस्था आहे. जिल्हा परिषदेच्या जनरल बॉडीमध्ये यासंदर्भातील निर्णय घेण्यात येतात तो अधिकार जिल्हा परिषदेचा आहे. परंतु यामध्ये कदाचित जर दर आणि क्वालिटी सारखीच असेल तर त्याप्रमाणे आदेश काढण्यात येतील.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, महिला बचत गटांच्या संदर्भात ही लक्षवेधी चर्चेला आलेली आहे. महाराष्ट्र शासनाने बचत गट तयार करण्यासाठी मानधन म्हणून 10 हजार रुपये दिलेले आहे. 1,18,249 एवढे बचत गट तयार करण्यात आलेले आहेत. त्यापैकी, 80,480 एवढया महिला बचत गट आहेत. उर्वरित बचत गटांचे काय झाले. निवेदनात असे म्हटलेले आहे की, 21367 बचत गटांनी आपला स्वतंत्र व्यवसाय सुरु केलेला आहे. आपण 10 हजार रुपयांची मानधन त्यांना दिलेले आहे त्यामुळे इतर जे बचत गट आहेत ते बंद पडलेले आहेत काय ? शासनाकडून देण्यात आलेला पैसा वाया गेलेला आहे काय ?

श्री. विजयसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे 1,18,249 बचत गटांची स्थापना करण्यात आलेली आहे. त्यापैकी 80480 महिला बचत गट आहेत, एकूण स्थापन बचत गटांपैकी 21367 बचत गटांनी आपला स्वतंत्र व्यवसाय सुरु केलेला असून त्यापैकी 15553 महिला बचत गट आहेत. भारत सरकारकडून जे पैसे येतात त्याप्रमाणे ते महाराष्ट्रातील जिल्हयामध्ये बचत गटांना त्या प्रमाणात वाटण्यात आलेले आहे.

श्रीमती मंदा म्हात्रे : काही महिला बचत गटांना पैसा देण्यात आलेला नाही. काही अधिकाऱ्यांकडून पैसा देण्यात येत नाही.

श्री. विजयसिंह मोहिते-पाटील : भारत सरकारकडून जसे उद्दिष्ट येते त्याप्रमाणे निधीचे वाटप करण्यात येते. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे डीआरडीएमार्फत जर काही अडचण निर्माण होत असेल तर संबंधितांवर निश्चित कारवाई करण्यात येईल.

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, सदर बचत गटाची स्थापना व त्यांचे 3 वर्षापर्यंतचे संगोपन व बळकटीकरण यासाठी स्वयंसेवी संस्थांची मदत घेण्यात येते. कोणत्या प्रकारचे संगोपन व बळकटीकरण या संस्थाचे करण्यात येते. संगोपन व बळकटीकरण करण्यासाठी या संस्था सक्षम असतात काय ? हे काम करण्यासाठी कोणते निकष या संस्थावर लावण्यात आलेले आहेत.

यानंतर श्री. सांगळे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे : सर्व कॉन्ट्रक्ट मिडकॉमला देण्यात आलेले आहे. महिला बचत गटाला सक्षम करण्यासाठी व त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी त्यांच्याकडे सर्व स्टाफ आहे.

श्रीमती कांता नलावडे : माझा महिला बचत गटाच्या संदर्भात प्रश्न आहे. माझी शासनाला विनंती आहे की, या बचत गटांना कायमस्वरुपी काम मिळण्यासाठी तालुकानिहाय फेडरेशन केले तर चांगले होईल.

श्री.रणजित कांबळे : मी आपल्याला या बाबतीत सांगू इच्छितो की, ......

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी चुकीची चर्चा सुरु आहे ही बाब मी आपल्याला निदर्शनास आणू इच्छितो. बाजारपेठ आणि महिला बचत गट या दोन वेगवेगळया बाबी आहेत. हा विषय सहकार खात्याशी संबंधित आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, माननीय मंत्री जी ने मार्केट के बारे में जो उत्तर दिया है, उससे मैं संतुष्ट नहीं हुई हूं. तालुका स्तर पर मार्केट देने की बात की गई है और उनका संगोपन एन.जी.ओ. के माध्यम से कर रहे हैं तथा इस काम के लिए एन.जी.ओ. को 10 हजार रुपये दिए जाते हैं. मार्केट को सक्षम करने के लिए हम बहुत सारे सुझाव देना चाहते हैं ताकि फील्ड पर और अच्छा काम हो सके. इसलिए मंत्री जी इस संबंध में चर्चा करने के लिए एक बैठक आयोजित करें. क्या मंत्री जी इस संबंध में बैठक आयोजित करेंगे ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मार्केट म्हणजे Potential to sell a product. महिला बचत गटांना सक्षम करणे आणि तालुका व जिल्हा स्तरावर मार्केट निर्माण करणे या दोन वेगवेगळया बाबी आहेत.

Smt. Fauzia Khan: Mr. Chairman, Sir, I have asked about the market as a whole and not as an infra-structructure. How it will be managed? It is a linked activity.

श्री.रणजित कांबळे : सन्माननीय सदस्यांचा प्रश्न विचारण्याचा उद्देश वेगळा होता व कागदोपत्री वेगळी माहिती ठेवण्यात आली आहे. त्यांचे कन्फ्यूजन होत आहे.

( यानंतर श्री.सुंबरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी आपल्याला विनंती केली आहे की, त्यांना या विषयावर विस्तृत चर्चा करावयाची आहे. तेव्हा त्यासाठी आपण त्यांना वेळ द्यावी, तसेच त्या चर्चेमध्ये आपण इतरही महिला सदस्यांना सहभागी करून घ्यावे.

श्री. रणजित कांबळे : ठीक आहे. या विषयावर चर्चा करण्यासाठी एक बैठक माननीय मंत्री महोदयांच्या केबिनमध्ये घेण्यात येईल आणि त्यावेळी सर्व महिला सदस्यांनाही बोलाविण्यात येईल आणि त्या बैठकीचा अहवाल देखील सादर केला जाईल.

**उपसभापती** : ठीक आहे. आता यानंतरची लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येईल.

***

..... जीजी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मिरज (जि.सांगली) येथील संगीत रत्न उस्ताद अब्दुल करीम खाँ साहेब यांचा ऐतिहासिक 'गवई बंगला' राष्ट्रीय स्मारक करणे.

**मु.शी.** : मिरज (जि.सांगली) येथील संगीत रत्न उस्ताद अब्दुल करीम खाँ साहेब यांचा ऐतिहासिक 'गवई बंगला' राष्ट्रीय स्मारक करणे याबाबत प्रा. शरद पाटील, श्री.जयंत पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

---

प्रा. शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय सांस्कृतिक कार्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्यांनी याबाबत निवेदन करावे अशी विनंती करतो. --

" मिरज (जिल्हा सांगली) येथील संगीत रत्न उस्ताद अब्दुल करीमखाँ साहेब यांच्या ऐतिहासिक गवई बंगल्याला फेब्रुवारी 2006 मध्ये टाळे ठोकण्यात आल्यामुळे, भविष्यातील स्मारक भुईसपाट होण्याचा निर्माण झालेला धोका, खाँ साहेबांनी गवई बंगल्यात अनेक नामवंत शिष्यांची परंपरा तयार केलेली असणे, सवाई गंधर्व, हिराबाई बडोदेकर, सुभाषबाबू माने, राम कदम, रोशन आरा बेगम, बहिरेबुवा, बाळकृष्णबुवा, कपिलेश्वरी बंधू, सरस्वती राणे, पंडित भीमसेन जोशी, गंगूबाई हनगल, फिरोज दस्तूर, प्रभा अत्रे या त्यांच्या शिष्यांनी भारताचे नाव शास्त्रीय संगीतात अजरामर केलेले असणे, गवई बंगला राष्ट्रीय स्मारक व्हावे यासाठी अनेक संगीत प्रेमींनी माजी मुख्यमंत्री यांच्याकडे मागणी केली असता राष्ट्रीय स्मारक करून शासनाच्या ताब्यात घेण्याचे आश्वासन देवूनही सदर बंगला राष्ट्रीय स्मारक बनण्यास दिरंगाई होणे, त्यामुळे संगीत प्रेमी व जनतेमध्ये पसरलेले नैराश्याचे वातावरण, शासनाने हे स्मारक "जैसे थे" ठेवण्याचा आदेश द्यावा अशी संगीत प्रेमींमधून सातत्याने होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीची केलेली वा करावयाची उपाय योजना व शासनाची भूमिका."

श्री. अशोक चव्हाण (सांस्कृतिक कार्य मंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सुचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

.... जीजी 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( लक्षवेधी सुचनेवरील मा.सांस्कृतिक कार्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, मिरज शहराला एक वैभवशाली अशी संगीताची परंपरा आहे. प्रा.बी.आर.देवधर, स्व.विनायकबुवा पटवर्धन, संगीतरत्न उस्ताद अब्दुल करीमखाँ साहेब आदी संगीतरत्नांनी मिरज शहर नावारूपाला आणले आहे. यापैकी उस्ताद अब्दुल करीमखॉ साहेबांनी मिरज शहरामध्ये आपल्या गवई बंगल्यामध्ये सवाई गंधर्व, हिराबाई बडोदेकर, सुभाषबाबू माने, राम कदम, रोशनआरा बेगम, बाळकृष्णबुवा, कपिलेश्वरी बंधू, पंडित भीमसेन जोशी, गंगूबाई हनगल, फिरोज दस्तूर, प्रभा अत्रे अशा संगीत क्षेत्रामध्ये उत्तम कामगिरी बजाविणाऱ्या गायकांची एक परंपराच तयार केली आहे. सवाई गंधर्वांच्या शिष्यांनी, प्रभा अत्रे यांनी देखील किराणा घराण्याचे प्रतिनिधीत्व केले. सभापती महोदय, भारतीय शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रामध्ये उस्ताद अब्दुल करीमखॉ साहेबांनी अभूतपूर्व असे योगदान दिले आहे. त्याची आठवण म्हणून त्यांच्या निधनानंतर 1938 साली आकाशवाणीने दिल्ली येथे आपल्या कार्यालयासमोर त्यांचा पुतळा उभा केला. त्यांचे नाव आणि कीर्ती केवळ या देशातच नव्हे तर पाश्चात्य देशांमध्ये देखील पसरली आहे. अशा अब्दुल करीमखाँ साहेब यांच्या 'गवई बंगला' या इमारतीचे राष्ट्रीय स्मारक व्हावे, त्यासाठी ही इमारत सरकारने ताब्यात घ्यावी अशी मागणी त्यांच्या सर्व अनुयायांनी आणि संगीतप्रेमी जनतेने अनेक वर्षांपासून केली आहे. माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे हे या राज्याचे अर्थमंत्री होते तेव्हा त्यांनी स्वत: मिरजेला भेट दिली होती त्यावेळी या इमारतीचे राष्ट्रीय स्मारक करण्याबाबत घोषणा देखील केली होती. त्यानंतर सातत्याने ही मागणी होत असताना देखील ती अजून पर्यंत मान्य झालेली नाही. म्हणून मी या लक्षवेधीच्या माध्यमातून ही मागणी येथे उपस्थित केलेली आहे. सभापती महोदय, मिरजेतील 'गवई बंगला' ही जागा आता एका खाजगी व्यक्तीच्या ताब्यात आहे आणि ती व्यक्ती तेथील ही इमारत पाडण्याचा प्रयत्न करीत आहे. त्याला प्रतिबंध करावा आणि शासनाने ती इमारत ताब्यात घेऊन तेथे करीमखाँ साहेबांचे स्मारक उभे करावे अशी मागणी आहे त्यावर शासनातर्फे जे निवेदन करण्यात आले आहे त्या अनुषंगाने मी शासनाला असे विचारू इच्छितो की, या संबंधात जिल्हाधिकाऱ्यांनी जो अहवाल दिला आहे त्यामध्ये त्यांनी काय शिफारस केली आहे ? तसेच हा गवई बंगला पाडण्याचे काम सुरू केलेले आहे त्याला प्रतिबंध करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेले आहेत काय ? आणि या संबंधात जी कागदपत्रे श्री.अजेटराव यांनी सादर केलेली आहेत त्याची पडताळणी जिल्हाधिकारी यांनी केलेली आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, संगीत रत्न उस्ताद अब्दुल करीमखाँ साहेबांच्या गवई बंगल्याच्या संदर्भात माननीय सदस्यांनी उल्लेख केला. त्या अनुषंगाने मला सांगितले पाहिजे की, ही वास्तू जतन करता आली पाहिजे ही शासनाची देखील तत्वत: भूमिका आहे. कोणतीही पुरातन वास्तू राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीत आहे. आणि ती वास्तू राज्य स्मारक म्हणून घोषित करावयाची असेल तर त्या वास्तूची मालकी कुणाची आहे, तिची ऐतिहासिक पार्श्वभूमी काय आहे? याची शहानिशा करावी लागते. या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांकडून महसूल विषयक माहिती प्राप्त झाली आहे. त्यामध्ये त्यावेळच्या खरेदी विक्रीच्या व्यवहाराची माहिती प्राप्त झाली आहे. या बंगल्याची सद्याची मालकी श्री. बयाजी आप्पाजी अजेटराव यांच्याकडे असून उस्ताद अब्दुल करीमखाँ यांच्या निधनानंतर तो बांधण्यात आला असे त्यांचे म्हणणे आहे. अशा परिस्थितीत हा बंगला राज्य स्मारक म्हणून संरक्षित करता येईल की नाही यासंबंधीची कायदेशीर बाजू शासनाला तपासावी लागेल. त्यामुळे या बंगल्याचे पूर्वीचे रेकॉर्ड तपासून पहावे लागेल. तसेच, या बंगल्याचे एकूण क्षेत्रफळ किती? त्याचे मूळ मालक कोण या आनुषंगिक गोष्टींची पूर्ण माहिती घ्यावी लागेल. ती माहिती अप्राप्त असून ती प्राप्त झ ााल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल.

दुसरा विषय असा की, त्या बंगल्यामध्ये कोणकोणत्या प्रकारचे तोडफोडीचे काम झाले आहे? याबाबत माननीय सदस्यांनी विचारणा केली आहे. त्या बंगल्याच्या बाजूला क्वॉर्टरचे बांधकाम झाले आहे. त्या बंगल्याचे सद्याचे मालक श्री. अजेटराव यांनी बंगल्याच्या मूळ वास्तूमध्ये कोणतेही तोडफोडीचे काम केले नाही. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना बंगल्याच्या मुख्य इमारतीमध्ये कोणत्याही प्रकारची तोडफोड करण्यात येवू नये असे कळविण्यात आले आहे. तेव्हा याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई करण्याची शासनाची भूमिका आहे.

श्री. जी. एल. ऐनापुरे : सभापती महोदय, मी मिरज शहरामध्ये राहतो. मंत्रिमहोदयांनी आता त्या बंगल्यामध्ये कोणत्याही प्रकारची मोडतोड झालेली नाही अशी माहिती सांगितली ती वस्तुस्थितीला धरुन नाही. सद्याच्या मालकाने त्या बंगल्याच्या आतमध्ये गोठा केला आहे. त्यामध्ये तो म्हैशी बांधतो. म्हशींना सोडणे आणि आणून बांधण्याचे काम करतो. त्यामुळे या बंगल्याचे सर्व भाग हळू हळू निकामी होत चालले आहेत. ही इमारत मिरज शहरामध्ये दुर्मिळ मानली जाते. या इमारतीच्या खरेदी विक्रीचे व्यवहार चालू होते परंतु जिल्हाधिकाऱ्यांनी त्याबाबत कारवाई

श्री. जी. एल. ऐनापुरे...

केल्यानंतर ते थांबले आहेत. त्या बंगल्याच्या ठिकाणी मोठी आलीशान इमारत बांधण्यात येणार आहे, ही वस्तुस्थिती आहे काय याबाबत शासनाने तपास करावा. त्याचप्रमाणे श्री. अजेटराव यांनी खाँ साहेबांच्या निधनानंतर हा बंगला बांधला असे सांगितले जात आहे ही वस्तुस्थिती नसून खाँ साहेब ज्या माडीमध्ये बसून रियाज करीत होते ती जागा त्या काळातील लोक अजूनही दाखवितात. त्यामुळे याठिकाणी देण्यात आलेली माहिती चुकीची आहे. म्हणून माझी अशी विनंती आहे की, दरम्यानच्या काळात त्या बंगल्याचे सद्याच्या मालकामार्फत सुरु असलेले सर्व कामकाज ताबडतोब बंद करण्यात यावे. आणि श्री. अजेटराव यांना त्या बंगल्यामधून तात्काळ बाहेर काढण्याची कारवाई करावी. तशी कारवाई शासन करील काय?

श्री. अशोक चव्हाण : माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या भावनांशी शासन सहमत आहे. माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे त्या बंगल्याच्या आतमध्ये जनावरे बांधली जात असतील तर ते काम तातडीने थांबविण्यात येईल. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना सांगण्यात येईल की, प्रचलित नियमाप्रमाणे शक्य असेल ती कारवाई करावी. ही कारवाई करीत असतांना या बंगल्याची मालकी खाजगी व्यक्तीकडे असल्यामुळे त्या दृष्टीने कायदेशीर प्रक्रिया आपल्याला पार पाडावी लागेल. ही कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी जेवढा कालावधी जाईल तोपर्यंत हा बंगला आहे त्याच स्थितीमध्ये राहील, त्याचा वापर अन्य कामांसाठी न होता तो रिकामा राहील, त्यामध्ये कोणत्याही गोष्टी घडणार नाहीत याबाबत कारवाई करण्यासंबंधी जिल्हाधिकाऱ्यांना आदेश दिले जातील.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, हा गंभीर मुद्दा आहे. याचे कारण असे की, पुणे येथील सावित्रीबाई फुले स्मारकाची माहिती नंतर प्राप्त झाल्यामुळे गोंधळ झाला. किराणा घराण्याचे ज्येष्ठ गायक अब्दुल करीमखाँ साहेबांचा गवई बंगला संपूर्ण देशामध्ये प्रसिध्द आहे. यामध्ये सर्वात महत्वाची गोष्ट अशी की, बाळकृष्ण बुवा, कपिलेश्वरी, चंद्रकांत बुवा, हिराबाई बडोदेकर, सरस्वतीबाई राणे, मीनाताई फातरफेकर...

(यानंतर श्री. किल्लेदार)

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

20-03-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) II-1

SKK/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.सरफरे... 16:50

श्री.उल्हास पवार (पुढे चालू...

आणि इतर सगळया किराणा घराण्याच्या गायकांनी विनंती केली. त्या जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्रीमती म्हैसकर यांनी हा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविला. तो प्रस्ताव मी शासनाकडे स्वत: नेऊन दिला, त्यांनी फॅक्सही पाठविला. माननीय मुख्यमंत्री यांच्याशी मी या संबंधात बोललो की, पुरातत्व विभागाची किंवा शासनाची योजना आहे. ती जागा बिल्डरने विकत घेतली ही गोष्ट खरी आहे. त्यांनी त्या जागेची पाडापाड सुरु केली. त्यानंतर 29 तारखेला कपिलेश्वरांनी त्यावर स्टे घेतला. त्यानंतर आता शासनाकडून ताबडतोब पावले उचललेली आहेत. संपूर्ण कामकाज थांबविता येईल तशी कारवाई सन्माननीय मंत्रीमहोदयांनी करावी अशी विनंती आहे.

श्री.अशोक चव्हाण : ही वास्तू जतन करण्याची भूमिका तत्वत: शासनाने स्वीकारलेली आहे. फक्त कायदेशीर सोपस्कार पार पाडावे लागतील. सन्माननीय सदस्य श्री.शरद पाटील यांनी त्या ठिकाणी जनावरे बांधली जात होती, असे सांगितले. तसे असेल तर तो प्रकार थांबवता येईल. त्याचबरोबर त्या ठिकाणी कोणतेही बांधकाम होत असेल तर ते ताबडतोब थांबविण्यात येईल. त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे डेव्हलपमेंट न करता, हेरिटेजचे महत्व राखले जाईल. याबाबतीतील कायदेशीर सोपस्कार करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश दिले जातील. त्याचबरोबर येत्या 15 दिवसामध्ये या संबंधातील बैठक घेऊन पुढील कार्यवाही करण्याबाबत पावले उचलली जातील.

प्रा.बी.टी.देशमुख : मी दोन-तीन प्रश्न विचारतो. पहिला प्रश्न असा आहे की, पुरातत्व विभागाने सकृतदर्शनी त्याची पहाणी करुन बांधकाम पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत 16-2-2006 ला जिल्हाधिकाऱ्यांना कळविले. जिल्हाधिकाऱ्यांनी बांधकामास प्रतिबंध करणारे आदेश दिलेले आहेत काय, नसतील तर ते दिले जातील काय ?

श्री.अशोक चव्हाण : तसे जिल्हाधिकाऱ्यांना कळविले होते, त्यानंतर त्यांनी संबंधित नगरपालिकेच्या सी.ई.ओ. आणि महानगरपालिकेच्या आयुक्तांना कळविले होते. त्यावर त्यांनी कार्यवाही केली की नाही याबाबतची माहिती उपलब्ध झालेली नाही. त्या संबधात तातडीने निर्णय घेतला जाईल. त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे डेव्हलपमेंट होऊ नये, याची काळजी घ्यावी असे कळविलेले होते.

प्रा.बी.टी.देशमुख : माझा प्रश्न आहे की, हे पुरातत्व विभागाने आपल्याला कळविले. त्यांनी आपल्याला जो काही रिपोर्ट दिला, त्यावरुन कायदेशीर कारवाई करावी लागेल. त्यावेळेला बांधकाम झाले की त्यानंतर बांधकाम झाले, याबाबत साऱ्या गावाला माहीत आहे. थोर पुरुषाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>विशेष उल्लेख</u>

**पृ. शी.** : घारापुरी बेटावरील शासनमान्य माध्यमिक शाळेला अनुदान न मिळणे.

**मु. शी.** : घारापुरी बेटावरील शासनमान्य माध्यमिक शाळेला अनुदान न मिळणे याबाबत श्री. रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री. रामनाथ मोते यां□ ए□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

" मुंबई जवळील घारापुरी बेटावर शासनमान्य माध्यमिक शाळा असून 1995 पासून शाळेचे कार्य चालू आहे. घारापुरी हे महाराष्ट्रातीलच नव्हे तर जागतिक कीर्तीचे पर्यटन स्थळ असून दररोज हजारो देशी-विदेशी पर्यटक भेट देतात. शाळेला अनुदान न मिळाल्याने ग्रामस्थ संतप्त असून 22 मार्च, 2006 पासून पर्यटकांना प्रवेशबंदी करण्याचा निर्णय घेतला आहे. या महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेख करीत आहे."

सभापती महोदय, अरबी समुद्रातील घारापुरी बेट जे रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यामध्ये आहे त्या बेटावरील माध्यमिक शाळेचा प्रश्न मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून या सभागृहामध्ये उपस्थित करीत आहे. घारापुरी हे जागतिक कीर्तीचे केंद्र असून त्या ठिकाणी दररोज शेकडो देशी-विदेशी पर्यटक भेट देण्यासाठी येतात. घारापुरी बेटावर गरीब, आर्थिकदृष्ट्या कमकुवत आणि मजुरी करणाऱ्या मुलांची शिक्षणाची सोय व्हावी म्हणून एक माध्यमिक शाळा सुरु झालेली आहे. 1995 पासून ही शाळा सुरु असून इयत्ता आठवी, नववी आणि दहावीचे तीन वर्ग आहेत. गेल्या 10-11 वर्षामध्ये त्या शाळेला अनुदान देण्यासंबंधी शासनाने कोणतीही सकारात्मक भूमिका घेतलेली नाही. सध्या या शाळेच्या शिक्षकांना दोन दोन महिन्यांचा पगार मिळालेला नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ SBT/ MAP/ MHM/

श्री. रामनाथ मोते ....

त्या ठिकाणचे ग्रामस्थही त्रस्त आहेत. आपल्याला शासनाकडून कोणत्याही प्रकारची मदत मिळत नाही म्हणून तेथील ग्रामस्थांनी 22 मार्च, 2006 पासून पर्यटकांना त्या बेटावर येण्यास प्रतिबंध करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्या शाळेला अनुदान मिळण्याच्या संदर्भात अनेक मंत्रिमहोदयांनी, आमदारांनी, खासदारांनी प्रयत्न केलेले आहेत. माननीय मंत्रिमहोदय श्री. सुनील तटकरे साहेबांनी प्रयत्न केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील साहेबांनी प्रयत्न केलेला आहे. रायगड जिल्ह्यातील मंत्री श्री. रविशेठ पाटील यांनीही विशेष शिफारस केलेली आहे. दरवर्षी पर्यटकांच्या माध्यमातून कोट्यवधी रुपये राज्य शासनाला आणि केंद्र शासनाला मिळतात. परंतु त्या ठिकाणी गरिबांसाठी सुरु असलेल्या माध्यमिक शाळेला अनुदान देण्यात येत नाही. त्यामुळे ग्रामस्थ चिंताग्रस्त आणि संतप्त झाले असून त्यांनी 22 मार्च, 2006 पासून घारापुरी बेटावर लोकांना येण्यास प्रतिबंध करण्याचा निर्णय घेतलेला आहे. यासंबंधी शासनाने दखल घ्यावी आणि पर्यटकांसाठी ते बेट बंद होणार नाही याबाबतीत उपाययोजना व्हावी म्हणून मी हा विशेष उल्लेख करीत आहे.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ SBT/ MAP/ MHM/

**पृ. शी.** : नालासोपारा येथील बौध्द स्तुपाच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता.

**मु. शी.** : नालासोपारा येथील बौध्द स्तुपाच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेले ) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

" ठाणे जिल्ह्यातील नालासोपारा येथील बौध्द स्तुपाची झालेली दुरावस्था, शिवशक्ती व भीमशक्तीच्या अस्मितेचे प्रतीक म्हणून असलेल्या बौध्द स्तुपाचे जतन करण्याची आवश्यकता लक्षात घेता त्याच्या विकासासाठी शासनाने निधी उपलब्ध करण्याची नितांत गरज, याकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यातील नालासोपारा येथे अत्यंत प्राचीन असे बौध्द स्तूप आहे. त्या ठिकाणी श्री. पी.टी.बोराळे यांनी भेट दिली होती. त्यानंतर वेगवेगळ्या देशातील अनेक बौध्द भिक्कूंनीही भेटी दिलेल्या आहेत. 20 मे, 2004 रोजी महाराष्ट्राचे तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी 1 कोटी 12 लाख रुपयांचा निधी नालासोपारा नगरपरिषदेला या बौध्द स्तुपाच्या सुधारणेसाठी दिले. 6 मार्चला मी नालासोपारा येथील बौध्द स्तुपाला भेट दिली. माझ्या याबरोबर बौध्द भिक्कू आणि दलित समाजाचे लोक तसेच शिवसेनेचे संघटक श्री. शिरीष चव्हाण हे उपस्थित होते. त्या बौध्द स्तुपाची माती देखील चोरी व्हावयास लागली आहे. त्या स्तुपाची हेळसांड होत आहे. हे प्राचीन बौध्द स्तूप पुरातत्व विभागाच्या ताब्यात आहे. नालासोपारा नगरपरिषदेकडे निधी येऊन सुध्दा आमच्या हद्दीमध्ये ते स्तूप येत नसल्यामुळे आम्ही सुधारणा करु

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ SBT/ MAP/ MHM

डॉ. नीलम गोऱ्हे ......

शकत नाही असे नालासोपारा नगरपरिषदेचे म्हणणे आहे. सभापती महोदय, आपलाही त्या परिसराशी जिव्हाळ्याचा संबंध आहे. म्हणून या विशेष उल्लेखाव्दारे मी शासनाने लक्ष वेधू इच्छिते. त्या ठिकाणी बौध्द भिक्कू उपोषणाला बसलेले आहेत. ते बौध्द स्तूप नालासोपारा नगरपरिषदेच्या हद्दीत आहे असे समजले जावे किंवा जिल्हा परिषदेला निधी देऊन त्या बौध्द स्तुपाची सुधारणा करण्याच्या दृष्टीने शासनाने पावले उचलावीत. माननीय सांस्कृतिक कार्य मंत्र्यांनी याची दखल घेऊन ताबडतोब निर्णय घ्यावा अशी विनंती करते.

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, खरे म्हणजे आम्हाला यासंदर्भात लेखी उत्तर पाठविता येईल परंतु ज्या बौध्द स्तुपाच्या बाबतीतील विशेष उल्लेख सन्माननीय सदस्य डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी उपस्थित केलेला आहे तो विषय माझ्या माहितीप्रमाणे नगरविकास विभागाशी संबंधित असावा. तरी सुध्दा ही बाब संबंधित विभागाच्या निदर्शनास आणून जी कार्यवाही अपेक्षित आहे ती करण्याच्या संदर्भात जरुर सांगितले जाईल.

------

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: चिरनेर हुतात्मा स्थळ पर्यटन स्थळ म्हणून घोषित करणे

**मु.शी.**: चिरनेर हुतात्मा स्थळ पर्यटन स्थळ म्हणून घोषित करण्याबाबत श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, चिरनेर जंगल सत्याग्रह घटनेला 75 वर्षे पूर्ण झाली. अमृत महोत्सव साजरा झाला. रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून हुतात्म्यांचे शिल्पपुतळे उभारले गेले. हुतात्म्यांचे आत्मे शांत झाले. मात्र त्यांच्या मनाची खंत अजून कायम आहे. गेली 25 वर्षे हुतात्मा स्थळ चिरनेर येथे पर्यटन स्थळ घोषित करावे अशी तेथील जनतेच्यावतीने मागणी करण्यात आली आहे.

पर्यटन स्थळ म्हणून चिरनेरचे नाव स्थळांच्या यादीत जाहीर झाले. मात्र अधिकृत घोषणा होण्याचे राहून गेले. त्यानंतर जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडून स्थळाबाबत माहिती मागविण्यात आली. परंतु स्थळाला मान्यता देण्याचा प्रस्ताव मात्र धूळ खात पडला आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळण्यासाठी ज्या भूमीच्या मातीत रक्ताचे शिंपणे घालून ज्यांनी प्राणार्पण केले त्यांच्या त्यागातून देशाला स्वातंत्र्य मिळाले, त्यांनी केलेल्या त्यागाची, रक्ताची जाणीव ठेवून शासनाने चिरनेरला पर्यटन स्थळ म्हणून मान्यता द्यावी यासाठी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ KGS/ SBT/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 17:00

**पृ.शी.**: आचार्य विनोबा भावे यांचे त्यांच्या जन्मगावी भव्य स्मारक उभारण्याची केलेली घोषणा

**मु.शी.**: आचार्य विनोबा भावे यांचे त्यांच्या जन्मगावी भव्य स्मारक उभारण्याची केलेली घोषणा याबाबत श्री. विलास अवचट,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. विलास अवचट यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे त्यांनी ती मांडावी.

श्री. विलास अवचट (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"भूदान चळवळीचे प्रणेते आचार्य विनोबा भावे यांच्या गागोदे (ता. अलिबाग, जि.रायगड) या जन्मगावी त्यांचे भव्य स्मारक उभारण्याच्या घोषणेला एक तप उलटून गेले. तरीही स्मारकच काय, स्मारकाची एक वीटही उभी राहिलेली नाही. या बारा वर्षात स्मारकांच्या निमित्ताने ठिकठिकाणी कोनशिलांवर नेतेमंडळीनी आपली नावे कोरुन घेतली असून विनोबाजींचे स्मारक मात्र शासनाच्या विस्मृतीत गेले आहे. याबाबत शासनाने निवेदन करावे."

सभापती महोदय, विनोबाजींचे स्मारक गेले शासनाच्या विस्मृतीत या आयशाची विशेष उल्लेखाची सूचना मी दिलेली आहे. भूदान चळवळीचे प्रणेते आचार्य विनोबा भावे यांच्या गागोदे या जन्मगावी त्यांचे भव्य स्मारक उभारण्याच्या घोषणेला एक तप उलटून गेले तरीही तेथे स्मारकच काय, स्मारकाची एक वीटही उभी राहिलेली नाही. स्मारकांच्या निमित्ताने ठिकठिकाणी लावण्यात आलेल्या कोनशिलांवर नेतेमंडीळींनी आपली नावे कोरुन घेतलेली असून गागोदे हे कोनशिलांचे गाव बनून राहिले आहे. विनोबाजींचे स्मारक मात्र शासनाच्या विस्मृतीत गेले आहे.

सभापती महोदय, आतापर्यन्त तीन मुख्यमंत्र्यांनी चार वेळा याठिकाणी भूमिपूजन केलेले आहे. परंतु आजतागायत त्या ठिकाणी स्मारक उभे राहिलेले नाही ही खेदाची गोष्ट आहे. ज्यावेळी ही घोषणा झाली त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांच्या सचिवांच्या दालनात झालेल्या बैठकीत स्मारकाची रुपरेषा ठरविण्यात आली होती. त्यानंतर रायगड जिल्हा परिषदेने नकाशे व आराखडे तयार केले. गावात आतापर्यन्त चार ठिकाणी कोनशिला बसविण्यात आल्या आहेत. पण त्यापलिकडे काहीच

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विलास अवचट पुढे सुरु...)

दिसत नाही. विनोबाजींचे गाव हे फक्त कोनशिलांचे गाव झालेले आहे. याबाबत शासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी.

--

**उपसभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि सायंकाळी 5.30वाजता पुन: भरेल.

( 5.02 ते 5.30 मध्यंतर)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मध्यंतरानंतर**

(सभापतीस्थानी मा. उपसभापती)

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सभागृहामध्ये आवश्यक ती गणपूर्ती नाही. कामकाज 10 मिनिटांकरिता स्थगित करावे.

**उपसभापती** : ठीक आहे. सभागृहाची बैठक मी 10 मिनिटांकरिता स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक 5 वाजून 30 मिनिटांनी 10 मिनिटांकरिता स्थगित झाली. )

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगिती नंतर )**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**पृ.शी**. : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा.

**मु.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा.

( प्रस्ताव पुन: प्रस्तुत झाला )

( चर्चा पुढे सुरु .......

श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय,माननीय राज्यपालांचे अभिभाषण ही प्रथा आपल्या राज्यात प्रथम सन 1948 साली सुरु झाली आणि त्या अभिभाषणावर चर्चा घेण्याची प्रथा सन 1950 पासून सुरु झालेली आहे. त्यावेळच्या चर्चेमध्ये स्वातंत्र्यपूर्व काळातील अनुभव व त्यासाठी केलेले खडतर प्रयत्न अशा प्रकारची चर्चा होत असल्याचे आपण ऐकले व वाचलेले आहे. पण आज मात्र विकासाची गंगा समाजाच्या शेवटच्या माणसापर्यंत पोहचली पाहिजे अशा प्रकारची चर्चा या अभिभाषणातून आपण ऐकत आहोत. गेल्या वर्षी आपल्या राज्यात 26 आणि 27 जुलै रोजी महाभयंकर अशी अतिवृष्टी झाली व त्यावेळी मुंबईत जवळपास 994 मि.मि. एवढा पाऊस पडला होता. राज्यात देखील कृष्णा, पैनगंगा, भीमा आणि वैनगंगा सारख्या मोठया नद्यांना आलेल्या पुरामध्ये 1200 लोक मृत्युमुखी पडल, 27 हजार पशुधनाला आपल्याला मुकावे लागले, 6 लाख घरांची पडझड झाली, गांवेच्यागांवे वाहून गेली. अशा परिसिथतीत राज्य सरकार आणि जनतेने मागे न राहता मदत करण्याची भूमिका घेतली होती. माणसी 20 किलो अन्नधान्य आणि 10 लिटर रॉकेलचे वाटप शासनाच्या माध्यमातून करण्यात आले. शेतीच्या पिकासाठी झालेल्या नुकसानीपोटी 450 कोटीची नुकसान भरपाई देखील देण्याची भूमिका शासनाने घेतली. अशा प्रकारे सर्व नुकसानीसाठी 1200 कोटी रुपये शासनाने खर्च केले आहेत. मी या निमित्ताने महाराष्ट्रातील जनता आणि शासनाचे मनापासून कौतूक करावेसे वाटते की अतिशय मोठया धैर्याने या जनतेने संकटात सापडलेल्या लोकांना मदत करण्याची भूमिका या काळात घेतली आहे. या प्रलयंकारी पावसाळयानंतर मुंबईत तसेच राज्यात ठिकठिकाणी जी रोगराई पसरली, त्यात नवीन लेप्टोस्पॉयरोसिससारख्या रोगाची भर पडली व त्यासाठी हाफकिन आणि धीरुभाई अंबानी इंन्स्टिटयूटसारख्या संस्थांनी शासनाच्या हाकेला साद दिली व या दोन संस्थांच्या माध्यमातून या रोगावर तातडीने उपचार सुरु झाले ही देखील अभिनंदनाची बाब आहे.

(यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ KGS/ MAP/ खर्चे... 17:45

श्री.रणजितसिंह मोहिते पाटील...

गेल्या वर्षी विदर्भामध्ये दुष्काळ पडल्यामुळे कास्तकऱ्याला काही पर्याय राहिला नाही. कास्तकारांची आर्थिक परिस्थिती हाताबाहेर गेल्यामुळे त्यांना आत्महत्या करावी लागली. यासाठी शासनाने डॉ.एस.एम.स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली. या समितीने केलेल्या सूचनेनुसार शासनाने 2 हेक्टरपर्यंत प्रति हेक्टर रुपये 1000/- प्रमाणे रोखीने मदत देण्याचा निर्णय घेतला. या बरोबरच विदर्भातील सहा जिल्हयांकरिता 25 हजार रुपयापर्यंतच्या थकित अल्पमुदती कर्जाच्या परतफेडीसाठी टप्पे पाडून दिलेले आहेत. तसेच कापूस एकाधिकार योजने अंतर्गत असलेला 750 कोटी रुपये भांडवल निधी 12 टक्के व्याजासह 35 लाख शेतकऱ्यांना परत करण्याचा निर्णय घेतलेला आहे. देशाचे कृषि मंत्री माननीय श्री.शरद पवार यांनी महाराष्ट्रासाठी 161 कोटी रुपयांचे फलोत्पादनासाठी विशेष पॅकेज दिले. त्यांचे देखील मी आभार मानतो. राज्यामध्ये जवळपास 15 टक्के शेती ओलिताखाली आहे. हे प्रमाण 30 टक्क्यांवर न्यावे अशी मी शासनाला विनंती करीत आहे. तसेच महाबीज योजना अंमलात आणली आहे, त्याबद्दल देखील मी शासनाचे आभार मानतो. आज राज्यामध्ये 104 तालुके कायम स्वरूपी दुष्काळी आहेत, त्यांच्यासाठी एखादे महामंडळ स्थापन करावे. तसेच कुंभी कासार योजनेसाठी निधीची तरतूद देखील करावी अशी मी मला या निमित्ताने विनंती करावयाची आहे. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीदिनी दरवर्षी पंचायत राज मध्ये लक्षणीय कामगिरी करणाऱ्या पचांयत राज समितीचा आणि कर्मचाऱ्यांचा गौरव करण्याचे शासनाने ठरविल्याबद्दल मी शासनाचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. 100 वर्ष पूर्ण केलेल्या राज्यातील ग्रंथालयांना त्यांचा दर्जा सुधारण्यासाठी आणि जुन्या व दुर्मीळ ग्रंथांचे जतन करण्यासाठी प्रत्येकी रुपये पाच लाखाचे अनुदान मंजूर केले आहे, त्याबद्दल देखील मी शासनाचे अभिनंदन करतो. या ग्रंथालयांचा उपयोग शिक्षणासाठी व्हावा या उद्देशाने अनुदान मंजूर केल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. महाराष्ट्र राज्य हे सांस्कृतिकदृष्टया पुढारलेले राज्य आहे. त्यामुळे या राज्यातील नाटयसंस्था, नाटयकर्मी यांना अनुदान देण्याचे जाहीर केले आहे. तसेच सोलापूर येथे झालेल्या साहित्य संमलेनाला शासनाने मदत केल्याबद्दल मी शासनाचे मन:पूर्वक आभार मानतो व येथे थांबतो. धन्यवाद.

....

..2..

श्री.प्रमोद नवलकर (मुंबई पदवीधर) : सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील अभिनंदनाचा जो प्रस्ताव मांडण्यात आला आहे, त्याला शिष्टाचार म्हणून पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. त्यांच्या अभिभाषणावर दोन शब्द बोलणे आवश्यक वाटते म्हणून मी बोलणार आहे. मी अधिक वेळ घेणार नाही. कारण मला माहिती आहे की, यावर अनेक सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. स्पष्टपणे आणि परखडपणे बोलावयाचे झाले तर या अभिभाषणामध्ये माहिती नाही असे काही नाही. जी माहिती आहे, ती प्रत्यक्षात कधी उतरत नाही. मंत्रिमहोदय जे आश्वासन देतात ते कधी प्रत्यक्षात उतरत नाही. तरी आपण हा उपद्व्याप करीत आहोत. माझ्याकडे 8 वर्षापूर्वीची राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत आहे. आजची आणि पूर्वीच प्रत जवळजवळ तीच आहे. त्यात थोडा फार फरक असेल. सीमा प्रश्नाबद्दल एक शब्द देखील बोलायला शासन तयार नाही. माननीय राज्यपाल हे तीन वर्षापूर्वी मुख्यमंत्री असतानाचे त्यांचे भाषण मी बघत होतो.

यानंतर श्री.बोर्डे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.भारवि.... 17:50

श्री.प्रमोद नवलकर....

सीमा प्रश्न सोडविण्यासाठी माझे शासन कटिबदध्द आहे असा उल्लेख आहे. परंतु महोदय, मला वाटते यातील सत्यता शोधणे फार आवश्यक आहे. आज राज्यपाल महोदयांचे भाषण केवळ पूर्वी चालत आले म्हणून होत आहे. ते भाषण केवळ परंपरा म्हणून सुरु आहे. मी माननीय राज्यपाल महोदयांची माफी मागून सांगेन की, राज्यपालांचे पद बरखास्त करण्यात यावे. कारण हे पद आज केवळ शोभेचे पद झाले आहे. ब्रिटीशकाळामध्ये संस्थानिकांना जसे महत्व असायचे तसे महत्व आज या पदाला राहिलेले नाही. आज राज्यपालांशिवाय राज्य चालू शकते असे मला वाटते. कारण आज हे पद शासनाच्या कामकाजामध्ये अडथळा निर्माण करीत आहे असा अनुभव येत आहे. उदाहरण म्हणून मी सांगेन की, काही दिवसांपूर्वी डान्स बारबंदीचे विधेयक जेव्हा माननीय राज्यपाल महोदयांकडे स्वाक्षरीसाठी पाठविण्यात आले तेव्हा काही मुद्दे उपस्थित करुन त्यांनी स्वाक्षरी करण्यास बराच वेळ लावला. राज्यातील राज्यपालांचे आणि मुंबईतील शेरीफचे पद कशासाठी ठेवले आहे हेच मला कळत नाही. मुंबई शहराला 9-10 महिने शेरीफच नव्हते. नवीन शेरीफांची नेमणूक झाली हे मला वाटते कोणाला माहीतही नसेल. 9-10 महिने शहराला जरी शेरीफ नव्हते तरी काही बिघडले नाही. त्यामुळे हे पदच काढून टाकावे असे मला वाटते. तसेच राज्यामध्ये जी महामंडळे आहेत त्यातील अनावश्यक महामंडळे बंद करणे आवश्यक आहेत. कारण या महामंडळावरील जे अध्यक्ष आहेत त्यांच्यावर शासनाचा बराच पैसा खर्च होतो आहे. माननीय राज्यपाल महोदयांच्या राज भवनावर टीका करण्याचा मला काही अधिकार नाही. परंतु मी सदनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या राज भवनावर जवळजवळ साडेतीन ते चार कोटी रुपये माननीय राज्यपाल महोदयांची बडदास्त ठेवण्यासाठी खर्च केला जातो. त्यामुळे या गोष्टींचा फेरविचार होऊन, निर्णय घेतला जावा अशी माझी मागणी आहे.

महोदय, राज्याचे गृहमंत्री आज कोठे गेले हे मला माहीत नाही. त्यांना "बारफेम" म्हटले जाते. त्यांनी राज्यामध्ये काही गोष्टी बंद केल्या आणि काही गोष्टी सुरु ठेवल्या आहेत. त्यांनी ज्या गोष्टी बंद केल्या त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. कारण एखाद्या हिरोप्रमाणे त्यांनी डान्स बारबंदी केली. परंतु माझ्या मते तो निर्णय अतिशय चुकीचा होता. कारण ज्यावेळी न्यायालयामध्ये ही केस उभी राहिल त्यावेळी ती 10 मिनिटे सुध्दा टिकणार नाही असे मला वाटते.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रमोद नवलकर....

कारण या केसच्या संदर्भात सरकार काहीएक उत्तर देऊ शकणार नाही. राज्यामध्ये बंद करण्यासाठी केवळ त्यांनी "बार" निवडून काढले. परंतु मुंबईमध्ये अजून कोणकोण आणि कोठे कोठे धुमाकूळ घालत आहे हे मात्र त्यांनी पाहिले नाही. कारण तळमजल्यावर नाचण्यास त्यांनी बंदी केली परंतु तोच नाच जर पहिल्या, दुसऱ्या वा तिसऱ्या मजल्यावर होत असेल तर त्याला मात्र मनाई नाही. आज मुंबईमध्ये मोठया प्रमाणावर वेश्या व्यवसाय चालू आहे. परंतु त्याकडे लक्ष नाही. केवळ बार बालांवर आरोप करणे चुकीचे आहे. त्यामुळे प्रथम त्यांच्यावरील आरोप मागे घ्यावा लागेल. आपण मला सांगा की, तरुण पिढी बिघडण्यासाठी केवळ बारबालाच कारणीभूत आहेत काय ? आज आपल्याकडे 1 लाख 22 हजार अधिकृत वेश्या आहेत. त्याशिवाय अनेक पार्लर्स आहेत. वास्तविक पाहता बिअर बारचे क्षेत्र नवीन नाही. सभापती महोदय, कदाचित आपल्याला नरीमन पॉईंट येथील "सोनिया महल" हा बार माहीत असेल.

**उपसभापती** : मला माहीत असेल असे आपण कसे गृहीत धरले ?

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदय, त्यामुळेच मी "कदाचित" हा शब्दप्रयोग केला आहे. महोदय, सोनिया महल हा बार गेल्या 22-23 वर्षांपासून सुरु आहे. त्याच्यावर मात्र एकही धाड पडली नसेल असे मला वाटते. कदाचित नावामुळे टाकली नसेल. महोदय, असे किती तरी अड्डे मोकळे ठेवलेले आहेत. महोदय, बारबंदीची केस कोर्टात उभी राहिल्यानंतर शासन काय सांगणार आहे? सभापती महोदय, मसाज सेंटर, डान्स स्कूल यांच्या माध्यमातून असे प्रकार अनेक ठिकाणी घडत आहेत. वर्तमानपत्रामध्ये टेलिफोन नंबर्ससंदर्भात छापून येते. त्या नंबरवर फोन केल्यानंतर त्यांचा प्रतिनिधी घरी येतो आणि एक हजार रुपये घेतो.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSK/ MAP/ MHM/ SBT/ KGS यापूर्वी श्री. बोर्डे .. 17.55

श्री. प्रमोद नवलकर ....

आणि ते 11 पत्ते देतात, त्या पत्त्यांवर सगळे अड्डे असतात. सभापती महोदय, हे सर्व काही राजरोसपणे चाललेले आहे. मुंबईमध्ये एड्सचा प्रादुर्भाव फार मोठ्या प्रमाणावर होत आहे. तो प्रादुर्भाव तळमजल्यावरुन झालेला नाही आणि बारबालाच्या क्षेत्रांतूनही झालेला नाही. पहिल्या मजल्यावर जी घाण आहे, दुसऱ्या मजल्यावर जी घाण आहे, त्या वेश्यांच्या अड्ड्यातूनच हा सर्व प्रादुर्भाव झालेला आहे. सभापती महोदय, इकडे कोणीही फिरकत नाही किंवा त्यांना विचारतही नाही. सभापती महोदय, मुंबई, पुणे आणि बंगलोरमध्ये रशियाच्या वेश्या आलेल्या आहेत. त्यातील काही मुंबईमध्ये अलिकडेच पकडल्या गेल्या आहेत. सभापती महोदय, हे अतिशय गंभीर आहे. येथे एक आंतरराष्ट्रीय बाजारपेठ निर्माण झाल्यामुळे हे झाले आहे. रशिया, युक्रेन, उजबेगिस्तान, तुरकेमिनिस्तान, बेलारुस येथून या सर्व मुली आलेल्या आहेत. आपण त्या सर्व मुलींची एकदा झ ाडती घ्याच. मी माझा एक अनुभव आपल्याला सांगतो की, अशाच एका रशियन मुलीला दुसरी एक मुलगी माझ्याकडे घेऊन आली. तिचा व्हिसा दुसऱ्या दिवशी संपत होता. ती अतिशय नव्हर्स होती याचे कारण म्हणजे तो व्हिसा जर रिन्यू झाला नसता तर तिला अटक झाली असती. मी ज्यावेळी या संदर्भात विचारले तेव्हा रशियाचा व्हिसा या ठिकाणी रिन्यू करता येत नसून तो दिल्लीतच करावा लागतो, असे सांगण्यात आले त्यानंतर दोन महिन्यांनी तीच मुलगी मी मुंबईत पाहिली. जिने मला तिची ओळख करुन दिली तिला मी याबाबत विचारले. कारण एका दिवसात तर ते काम शक्य नव्हते. ती म्हणाली, " ती गोव्याला गेली आणि स्टॅम्प मारुन आली. " मग मला कळले की, गोव्यात कोणत्याही देशातील मुलींना व्हिसा मिळतो. सभापती महोदय, यामुळे गोवा हे एक वेगळे नंदनवन झालेले आहे. सभापती महोदय, याची शासनाने दखल घेणे फार आवश्यक आहे. मी या संदर्भात आपल्याला अजून एक उदाहरण देतो की, तीन महिन्यांपूर्वी सिध्दीविनायक मंदीरासमोर रहेजाने एक " लक्झरी टॉवर " नावाची इमारत बांधली. त्या टॉवरच्या टॉप फ्लोअरवर असलेली नणंद, 74 वर्षे व भावजय 72 वर्षे यांना अटक करण्यात आली. त्यांना अटक का केली ? तर, दोघीजणी वेश्यागृह चालवत होत्या. सभापती महोदय, तो फ्लॅट अडीच कोटी रुपयांचा असून कधीही कोणालाही न परवडणारा असा आहे. मी आपल्याला अशी अनेक उदाहरणे देऊ शकतो. ज्यावेळी आपण टोपाझवर धाड घातली, त्यावेळी

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रमोद नवलकर ....

पोलिसांनी साडे तीनशे मुली पकडल्या. एखाद्या कॉलेजमध्ये असाव्या एवढ्या मुली त्या ठिकाणी दिसल्या होत्या. मला हा विषय पुन्हा काढावयाचा नाही. मी या विषयी बऱ्याच वेळा सभागृहात बोललो आहे आणि खूप काही लिहिले आहे.

सभापती महोदय, लाल दिव्याच्या गाड्या नेमक्या कोणासाठी आहेत, हे कोणीच सांगू शकत नाही. तुमच्या मंत्र्यांना आणि लाल दिवा लावणाऱ्यालाही हे माहित नाही. लाल दिव्याचा एवढा सर्रास वापर चालला आहे की, शहरात शेकडो गाड्या आता लाल दिवे लावून फिरत आहेत. मी आपल्याला एक उदाहरण देतो. मी प्रोटोकॉल मिनिस्टर असताना इंकमटॅक्सचे चीफ कमिशनर माझ्याकडे आले आणि मला म्हणाले की, मला परत लाल दिवा मिळेल का ? त्यावेळी मी सांगितले मिळणार नाही. कारण आमचाही काही प्रोटोकॉल आहे. मी लाल दिवा आपल्याला देऊ शकत नाही. ते पुन्हा येऊन मला भेटले आणि मला म्हणाले, बाकीच्या राज्यांमध्ये जो चीफ कमिशनर असतो, त्यांना मात्र लाल दिव्याची गाडी असते. इथे आल्यानंतर माझे स्टेट्स कमी झाले आहे. त्यामुळे एक स्पेशल केस म्हणून त्यावेळी त्यांना लाल दिव्याची गाडी मंजूर करण्यात आली. आज आपण कधीही चर्चगेटवरुन चर्नीरोडला गेलात तर आपल्याला दिसेल की एका बाजुला इंकमटॅक्सचे ऑफीस आहे. त्या कार्यालयाच्या खाली 15-20 पांढऱ्या गाड्या उभ्या असतात. त्या गाड्या पाहून मला एकाने विचारले की, मंत्रालय इकडे आले का ? तेथे प्रत्येक गाडीवर अनऑथोराईज लाल दिवा आहे. सभापती महोदय, म्हणजे केंद्र सरकारचे अधिकारीसुध्दा अनऑथोराईज लाल दिवा वापरतात. तीन महिन्यांपूर्वी आपले चीफ सेक्रेटरी श्री. सिन्हा यांनी या संदर्भात एक सर्क्युलर काढले होते की, लाल दिवा हा फक्त अमुक एका लोकांनी वावपरायचा, बाकीच्यांनी वापरायचा नाही. त्यावेळी केवढे मोठे युध्द झाले. सभापती महोदय, कोणीही दाद देत नाही. त्यावेळी नियम केले गेला की, लाल दिवा ज्यांना अधिकृत आहे, त्यांना नंबर आणि स्टीकर दिला जाईल म्हणजे पोलिसांना कळेल. पण पोलिसांना या संदर्भात अजुनही कोणी सांगितलेले नाही. मी यातील धोका आपल्याला सांगू इच्छितो की, उद्या जर अशाप्रकारे लाल दिव्याची गाडी विधान भवनामध्ये खाली आली आणि काही अनर्थ घडला तर मग तुम्ही लाल दिव्यांच्या गाडीची झडती घ्यायला लागाल. सभापती महोदय, हा लाल दिवा पूर्वी वरळीच्या ऑफिसमधून पाठीमागच्या दाराने दिला जायचा.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ SBT/ MAP/ MHM/ KGS/ प्रथम श्री. कांबळे... 18:00

श्री. प्रमोद नवलकर....

आता मार्केटमध्ये लाल दिव्याची सर्रास विक्री होते. दिवसाला तिकडे खूप लाल दिवे विकले जातात. या शरामध्ये या राज्यामध्ये जिकडे-तिकडे लाल दिवे, लाल दिवे फिरतात. मार्केटमध्ये सर्वांकडे लाल दिवे उपलब्ध आहेत. मी आपणास एक उदाहरणादाखल लाल दिवा दाखवितो. लाला दिवा कोणत्याही दुकानात विकत मिळतो.

(सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये लाल दिवा दाखवितात )

सभापती महोदय, हा दिवा गाडीच्या डेकवर सहज लावता येतो, मी सायरन आणायला विसरलो. त्याला सायरन सुध्दा लावता येते. लाल दिवा मिळावा म्हणून बरेच लोक स्वप्न बघत असतात, आता आपल्यापैकी कोणालाही लाल दिवा पाहिजे असेल तर त्यांना दिल्लीला शरद पवार साहेबांकडे जाण्याची गरज नाही, श्रीमती सोनिया गांधी यांच्याकडे जाण्याची गरज नाही, आपण मला फोन करा मी तुम्हाला लाल दिवा आणून देतो तो आपल्या गाडीवर लावा, आणि भक भक करत जा... सभापती महोदय, माझी बरीच मित्रमंडळीं आहेत, मी त्यांच्यासाठी लाल दिवा खरेदी करणार आहे. आणि हेल्मेटवर सुध्दा लाल दिवा लावणार आहे. कारण त्यासाठी कोणतेही नियम नाहीत, हेल्मेटवर दिवा लावा आणि मंत्र्यांच्या पुढे गाडया चालवा, तुमचा दिवा पुढे आणि त्यांचा दिवा मागे, कारण काय तर नियमच नाहीत. खूप मोठया प्रमाणात या लाल दिव्याची चेष्टा करण्यात आलेली आहे. शासन याकडे गंभीरपणे पाहतच नाही. विमानतळावर लाल दिव्याची गाडी थेट आतमध्ये जाते. पण एखादे विमानतळ उडविले गेले तर किती नुकसान होईल याचा विचार करता येत नाही. तरी सुध्दा आपण लाल दिव्यांसाठी कोठलेही बंधन आणत नाही. याबाबत तपासणी करीत नाहीत, त्यांना पकडत नाहीत. कोणाकडे लाला दिवा अधिकृत आहे. याची पाहणी करण्यात येत नाही. मुंबईमध्ये 12 वर्षापूर्वी एक नगरपाल होते त्यांच्याकडे अजूनही लाल दिव्याची गाडी आहे. लाल दिव्याचे नियम आहेत. ज्यावेळी मालक आतमध्ये बसलेला नसेल तेव्हा त्या लाल दिव्याला टोपी घालावी असे नियम आहेत. लाल दिव्याचे नियम कोणी पाळीत नाहीत, कारण यासंदर्भातील नियम कोणालाच माहिती नाहीत. मी एवढे सांगितल्यानंतर लाल दिव्याच्या बाबतीत शासनाने अत्यंत गंभीरपणे या विषयाची दखल घेणे अत्यंत आवश्यक आहे. सिध्दिविनायकाच्या मंदिराला भिंत आहे. परंतु दुसऱ्या मागील गेटमधून व्हीआयपीच्या गाडया सरळ आतमध्ये जातात.

.....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रमोद नवलकर...

लाल दिवा असला तर त्यांना प्रॉयारिटी मिळते. लाल दिवा पूर्वी बदनाम होता. आता तो स्टेटस् झ ालेला आहे. लाल दिव्याच्या वस्तीमध्ये जाणे हे पाप होते. आता सगळीकडे रेडलाईट एरिया करुन टाकलेला आहे, पुणे, सातारा, सोलापूर, कोल्हापूर संपूर्ण महाराष्ट्र हा रेडलाईट एरिया करुन टाकलेला आहे It is a status symbol for you. तुमच्या आयुष्यातील एकमेव स्वप्न कोणते तर ते लाला दिवा पाहिजे, या पलिकडे काही नाही. त्यासाठी मी आज बरीच सोय केलेली आहे. आपणास लाल दिवा लागला तर मला फोन करा मी आपणास तो देऊन टाकेन.

मी आता एक शेवटचा मुद्दा मांडतो. माझ्या सर्व पत्रकार मित्राची क्षमा मागून मी हा मुद्दा मांडू इच्छितो. या विधानभवनाच्या परिसरामध्ये वरचे सभागृह, खालचे सभागृह आणि एक तिसरे सभागृह आहे, ते आमचे पत्रकार मित्र चालवितात. त्याबाबत काही हरकत नाही. परंतु माझा त्याला आक्षेप एवढयाच गोष्टीसाठी आहे की, आता जर तुम्ही मला थांबविले असते तर मी लगेच खाली गेलो असतो व तेथे बोललो असतो. जे येथे बोलायला परवानगी नाही ते तेथे बोलतो. हे अतिशय आक्षेपार्ह आहे याबाबत Contenpt of House म्हणावे लागेल. आता जर आपण मला हा लाल दिवा येथे दाखवू दिला नसता तर मी तिसऱ्या सभागृहामध्ये जाऊन भाषण केले असते, ते सर्व पेपरमध्ये छापून आले असते. कारण तेथे सर्व लोक येतात. माझी आपणाला अशी विनंती आहे की, आपण त्यांच्याशी बोला आणि जोपर्यंत ही दोन सभागृह 5 ते 6 वाजेपर्यंत बंद होत नाहीत तोपर्यंत तिसरे सभागृह उघडू देऊ नका. कारण त्यांच्यावर देखील काही बंधने घालणे आवश्यक आहेत. मी पत्रकार असूनही हे आपणाला सांगत आहे. हे फार आवश्यक आहे नाहीतर काहीही सॅंक्टीटी राहत नाही. मी नावे कोणाची घेत नाहीत. खालच्या सभागृहामध्ये दोन-चार सभासद असे आहेत की, ते सभागृहात बोलतच नाहीत. आणि तिसऱ्या सभागृहात मात्र बोलतात....

यानंतर श्री. सांगळे...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रमोद नवलकर ....

या ठिकाणी बोलावयास मिळाले नाही तर काही सदस्य तिस-या सभागृहामध्ये जाऊन हातवारे करुन बोलतात. याबाबत गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे.

आज मुंबईमध्ये बोगस प्रमाणपत्रांचा खूप सुकाळ झाला आहे. गेल्या 7-8 वर्षांपूर्वी मी याच सभागृहामध्ये सगळया पदवी परीक्षांची बोगस प्रमाणपत्र आणून दाखवली होती व त्यांचे दर सुध्दा सांगितले होते. आता अमेरिकेतील प्रमाणपत्रे मुंबईमध्ये सहजपणे मिळतात. ती प्रमाणपत्रे मी आज आणयला विसरलो, ही प्रमाणपत्रे मी उद्या दाखवीन. बोगस प्रमाणपत्रावर एखादा उमेदवार बँकेत नोकरीला लागल्यानंतर 30 वर्षे नोकरी करुन बाहेर पडला तरी बोगस प्रमाणपत्राची बाब लक्षात येत नाही. म्हणून सर्वांसाठी नियम करणे आवश्यक आहे. ज्यावेळी नोकरीची भरती होते, बढती होते त्यावेळी संबंधित उमेदवारांचे प्रमाणपत्र विद्यापीठाकडे तपासणीसाठी पाठवणे अत्यावश्यक आहे. आज बारबालांपेक्षा कितीतरी घातक अड्डे अस्तित्वात आहेत. आपण फक्त तळमजल्यावर नाचणा-या बारबालांवर बंधन घातलेले आहे, परंतु पहिल्या, दुस-या व तिस-या मजल्यावर चालणारा वेश्या व्यवसाय अगदी मोकाट सुटलेला आहे, येथेच तरुण पिढी बिघडते आहे. बारबालांना सुध्दा कुटुंब आहेत, संसार आहेत. त्यांना वेश्या म्हणून एका गठडीने बांधणे शासनाला शोभणारे नाही. सगळया बारबाला वेश्या नाहीत, त्यातील जेमतेम 5 ते 10 टक्के वेश्या आहेत. काँग्रेस भवनाच्या समोर वेश्याचे कंपाऊंड आहे, त्यांना एक लाख रुपये दिले तरी त्या वेश्या व्यवसाय करणार नाहीत, कारण त्यांचे ठरलेले लोक असतात. त्यांना बदनाम करुन त्यांच्या विरुध्द खटले भरले तर त्यांच्या विरुध्द आपल्याला कोर्टात उभे राहणे सुध्दा अवघड होणार आहे. त्यावेळी आपल्याला विचारले जाईल की, आपण बाकीचे पार्लर बंद का करीत नाहीत ? आज अनेक ठिकाणी डान्सिंग क्लब सुरु आहेत, फिजिओथेरपीचे अड्डे सुरु आहेत ते का बंद करीत नाहीत ? वर्तमानपत्रामध्ये जाहिराती येतात, विशिष्ट टेलिफोन नंबर दिले जातात ते का बंद करीत नाहीत ? फक्त बारबालांवर कशासाठी बंदी आणता ? मी बारबालांची बाजू घेतो असे नाही, परंतु त्याही पेक्षा जे भयानक अड्डे आहेत ते बंद केले पाहिजेत. परदेशातील अनेक वेश्या या ठिकाणी येतात, त्यांच्याजवळ व्हिसा सुध्दा नसतो. याबाबत सर्वकष कारवाई होणे गरजेचे आहे. एवढे बोलून माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचे अभिनंदन करतो व माझे दोन शब्द संपवतो.

--------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ( नागपूर विभाग पदवीधर ) : माननीय सभापती महोदय, महनीय राज्यपालांनी सोमवार, दि. 13 मार्च, 2006 रोजी राज्य विधीमंडळाच्या पहिल्या अधिवेशनात विधी मंडळाच्या सदस्यांसमोर वाचून दाखवलेले अभिभाषण व त्यातील सर्व ठळक बाबींवर मी खेद व्यक्त करण्याऐवजी त्यांचे मनपूर्वक अभिनंदन करतो. या अभिभाषणातील ठळक मुद्दांबाबत अनेक आश्वासने दिली गेली. या सर्व आश्वासनांबद्दल मी त्यांचे मनपूर्वक अभिनंदन करतो. आघाडी सरकारने दिलेली आश्वासने कधीही पूर्ण होत नाहीत, हा महाराष्ट्रातील जनतेचा आजपर्यंतचा अनुभव आहे. आजपर्यंत काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसच्या आघाडी सरकारने विविध आश्वासने देऊन महाराष्ट्रातील जनतेची दिशाभूल केली आहे.

( यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

जनतेची केवळ दिशाभूल केलेली आहे आणि वचननाम्यामध्ये आश्वासने देऊनही ती 'प्रिंटींग मिस्टेक' होती म्हणून काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा श्रीमती प्रभा राव यांनी सांगितले. ही परंपरा आघाडी सरकारने कायम राखली. त्यांच्या अशाच काही न पूर्ण झालेल्या आश्वासनांचा आढावा मी येथे आपल्या समोर मांडणार आहे.

सभापती महोदय, आघाडी सरकारच्या विसरभोळेपणाबद्दल त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन मला करावेसे वाटते. माननीय उपमुख्यमंत्री महोदयांना मराठीतील एका गीताची आठवण मी देऊ इच्छितो. मराठीतील एक जुने गाणे आहे ..

"विसरशील खास मला, दृष्टीआड होता, वचने ही गोड गोड देशी जरी आता,.."

आघाडी सरकारची कार्यप्रणाली पाहिल्यावर हे गाणे त्यांना अगदी चपखल बसते.

**उपसभापती** : गडकरी साहेब, या गाण्यातील शेवटच्या ओळी खास आहेत, त्यांचीही मी आपल्याला आठवण करून देतो ...

" .. याकरिता दृष्टीआड होऊ नको नाथा "

श्री. नितीन गडकरी : म्हणजे असे होऊ नये ... असुनी नाथ मी अनाथ. असो. सभापती महोदय, निवडणुकीच्या वचननाम्यामध्ये कापसाला 2700 रूपये हमी भाव देण्याचे वचन दिले होते. शेतकऱ्यांच्या कर्जावरील व्याज माफी, तसेच शेतकऱ्यांना मोफत वीज अशी आश्वासने या सरकारने निवडणुकीपूर्वी दिली होती. ती आश्वासने सरकारने पाळली नाहीत, शेतकऱ्यांचा विश्वासघात या सरकारने केलेला आहे त्याबद्दल मी आघाडी सरकारमधील सर्व मंत्र्यांचे आणि माननीय राज्यपालांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो.

सभापती महोदय, आघाडी सरकारचे मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांचे तर मला विशेषत्वाने अभिनंदन करावयाचे आहे. त्यांनी महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांना चांगले धडे दिले आहेत. निवडणुकीमध्ये दिलेली आश्वासने ही पाळण्यासाठी नसतात असे ते म्हणाले होते. इतकेच नव्हे तर आघाडी सरकारच्या या मुख्यमंत्र्यांनी असेही म्हटले आहे की, या निवडणुकीचा वचननामा झाला तेव्हा मी मुख्यमंत्री नव्हतो. त्यामुळे त्यावेळी दिलेल्या आश्वासनांना आपण जबाबदारच नाही असे म्हणून त्यांनी राज्यातील जनतेच्या जखमेवर मीठ चोळले आहे. अशा भावनाहीन आणि अविश्वासूपणाचे मूर्तीमंत उदाहरण ठरलेल्या विलासरावांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. म्हणजे पक्षाच्या

..... एसएस 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

प्रदेशाध्यक्षा सांगतात की, 'प्रिंटींग मिस्टेक' आहे आणि मुख्यमंत्री म्हणतात की, 'दिलेल्या आश्वासनांना मी जबाबदारच नाही.' अशा प्रकारे त्यांनी महाराष्ट्रातील जनतेचा विश्वासघात केलेला आहे. त्या मुख्यमंत्र्यांचे त्यांनी केलेल्या या विश्वासघाताबद्दल आणि त्यांनी लिहून दिलेले भाषण येथे येऊन अगत्याने वाचून दाखविल्याबद्दल माननीय राज्यपालांचे देखील मी येथे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि आताचे केंद्रीय ऊर्जा मंत्री माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे यांचेही मी या निमित्ताने अभिनंदन करतो. त्यांनी काय सांगितले ? त्यांनी म्हटले आहे की, निवडणुकीत दिलेली आश्वासने हा राजकीय स्टंट होता, व्यूहरचनेचा भाग होता. अशा प्रकारची वक्तव्ये करून त्यांनी शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली आहेत. त्यामुळे केंद्रीय ऊर्जा मंत्री देखील अभिनंदनास पात्र आहेत. सभापती महोदय, केंद्रीय ऊर्जामंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी दै.सकाळ या वृत्तपत्राला मुलाखत दिली आहे. त्यामध्ये त्यांनी सांगितले की, महाराष्ट्राने गेल्या 6 वर्षांमध्ये एकही मे.वॅ. वीज निर्मिती केलेली नाही, नवीन वीज निर्मिती प्रकल्प आकार घेऊ शकला नाही ही निश्चितपणे महाराष्ट्राला भूषणावह बाब नाही. सभापती महोदय, हे कोणी सांगितले तर जे या अगोदर 3 वर्षे या राज्याचे मुख्यमंत्री होते त्या श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी. एवढेच नव्हे तर या माजी मुख्यमंत्र्यांनी केलेल्या या वक्तव्याबद्दल त्यांचे, तसेच महाराष्ट्राचे काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मंत्रीगणांचे, आमदारांचे तसेच त्या पक्षांचे प्रदेशाध्यक्ष श्रीमती प्रभा राव तसेच श्री.अरूणभाई गुजराथी या सर्वांचेच मी अभिनंदन करतो. महाराष्ट्रातील जनतेला टोपी घालणाऱ्या या सर्वांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो ... सभापती महोदय, स्वदेशीचा विचार महात्मा गांधी यांनी या देशातील जनतेला सांगितला. पण आता तो मूळ, ओरिजिनल माल भंगारामध्ये गेला आणि परदेशी मालाला महत्त्व आले. त्यावेळी टोपी घालणारे ओरिजिनल होते आणि आता हे प्रसंगानुरूप टोपी घालणारे दुसऱ्यांना टोपी घालत आहेत.

( यानंतर श्री. सरफरे .... टीटी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये सततची नापिकी आणि कर्जबाजारीपणामुळे शेतकरी आत्महत्या करीत राहिले. मात्र राज्यातील आघाडी सरकारने या शेतकऱ्यांच्या आत्महत्या नापिकी आणि कर्जबाजारीपणामुळे होतात हे मान्य करण्याचे सौजन्य देखील दाखविले नाही. त्याबद्दल मी आघाडी सरकारचे आणि आघाडी सरकारला माझे म्हणणाऱ्या माननीय राज्यपालांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. थोर फिलॉसॉफर आदरणीय उपमुख्यमंत्री महोदयांचे मी कौतुक करतो. त्यांनी या आत्महत्त्यांबाबत लोकसत्तेत लेख लिहिला . त्यांनी लिहिले की, या आत्महत्त्यांबाबत फार चिंतन केले पाहिजे. त्यांनी केलेल्या चिंतनातून एक अमृत निघाले. त्यांनी सांगितले की, आत्महत्त्या या नापिकी व कर्जबाजारीपणामुळे नव्हे तर मद्याच्या अतिसेवनामुळे आणि मानसिक संतुलन बिघडल्यामुळे झाल्या. त्या लेखाचा आधार घेवून त्यांनी मानसिक संतुलन बिघडले अशाप्रकारचा निष्कर्ष माननीय उपमुख्यमंत्र्यांनी लेख लिहून काढला. आणि महाराष्ट्रातील जनतेच्या, शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम केले. मुंबई हायकोर्टामध्ये पी.आय.एल. झाली, त्यामध्ये टाटा इंस्टिटयुट ऑफ सोशल सायन्सेसला चौकशी करायला सांगितले. आम्ही या सभागृहामध्ये या विषयावर 8 ते 10 वेळा सभात्याग केला. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांना एकेक लाख रुपये द्या अशी आम्ही मागणी केली. माननीय मुख्यमंत्र्यांनी नागपूरच्या अधिवेशनामध्ये देण्याचे कबूल केले. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या परिवाराला युती सरकारने एकेक लाख रुपये दिले. त्याप्रमाणे आपण मदत देवू असे सांगितले. परंतु आजपर्यंत 331 शेतकऱ्यांच्या परिवाराला केवळ अंशिक मदत केली. टाटा इंस्टिटयुट ऑफ सोशल सायन्सेसने मुंबई हायकोर्टामध्ये जो अहवाल दिला आहे त्यामध्ये 1042 आत्महत्त्या नापिकी आणि कर्जबाजारीपणामुळे झाल्याचे मान्य केले आहे. आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये तर माननीय महसूलमंत्री श्री. नारायण राणे यांनी दिलेल्या उत्तरामध्ये 1100 आत्महत्त्या नापिकी व कर्जबाजारीपणामुळे झाल्याचे म्हटले आहे. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी मला हे गणित समजावून सांगावे की, 1100 आत्महत्त्या नापिकी व कर्जबाजारीपणामुळे झाल्या असतांना केवळ 331 शेतकऱ्यांच्या परिवाराला अंशिक मदत केली. बाकीच्या 800 ते 850 शेतकऱ्यांना आपल्याकडील आकडेवारीप्रमाणे आपण अजून मदत कां केली नाही? परवाच्या दिवशी माननीय मुख्यमंत्री यवतमाळला गेले आणि त्यांनी पुन्हा एक घोषणा केली की, आत्महत्त्येसंबंधी शासनाने जे नियम तयार केले आहेत त्यामध्ये आम्ही सुधारणा करु आणि पुन्हा एकदा या सर्व प्रकरणांची तपासणी करु व त्यानंतर या शेतकऱ्यांना मदत करु. सभापती महोदय, 3-4 वर्षाचा

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

काळ गेला. बिचाऱ्या शेतकऱ्याचा परिवार उघडयावर पडला आहे.परंतु आत्महत्त्या करणाऱ्या परिवाराला एकेक लाख रुपयांची मदत देण्याचे सौजन्य राष्ट्रवादी कॉंग्रेस व कॉंग्रेसच्या सरकारने दाखविले नाही. त्याबद्दल या सरकारचे आणि या सरकारने लिहून दिलेले भाषण वाचून दाखविणाऱ्या माननीय राज्यपालांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो.

सभापती महोदय, या राज्यामध्ये शेतकऱ्यांचे मसिहा म्हणणारे काही नेते आहेत. ही गोष्ट खरी आहे की, त्यांना शेतीतील बरीच माहिती आहे. जेव्हा आंध्र प्रदेशमध्ये शेतकरी आत्महत्त्या करावयास लागले तेव्हा देशाचे पंतप्रधान माननीय श्री. मनमोहनसिंह त्या ठिकाणी गेले व त्यांनी आंध्र प्रदेशातील शेतकऱ्यांनी आत्महत्त्या करु नये याकरीता 500 कोटी रुपयांचे पॅकेज आंध्र प्रदेश राज्याला दिले.आणि 60 कोटी रुपयांची मदत आत्महत्त्या केलेल्या शेतकऱ्यांच्या परिवाराला दिली. सभापती महोदय, मला सांगताना अतिशय वाईट वाटते की, माननीय केंद्रीय कृषी मंत्री व महाराष्ट्राचे जाणते राजे दिल्लीमध्ये असतांना महाराष्ट्रामध्ये शेतकरी आत्महत्त्या करीत आहेत. परंतु केंद्र सरकारने फुटकी कवडी सुध्दा दिली नाही. माननीय ऊर्जा मंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे केद्रीय मंत्री आहेत. महाराष्ट्रामध्ये 4 हजार मेगावॅट वीजेचा तुटवडा आहे . "राजा उदार झाला आणि हाती भोपळा दिला". त्यांनी 100 मेगावॅट वीज दिली, परंतु ती आली की नाही माहीत नाही. पेट्रोलियम मंत्री माननीय श्री. मुरली देवरा साहेब मंत्री आहेत. देशात सर्वात जास्त डिझेल व पेट्रोलचे भाव महाराष्ट्रात आहेत व गॅस देखील मिळेनासा झाला आहे. चौथे मंत्री बॅरिस्टर ए. आर. अंतुले साहेब त्यांच्याबाबत काय सांगावे? त्यांना अजून ऑफिस मिळाले नाही. बिचारे घरात बसून काम करतात. आजच्या वर्तमानपत्रातील बातमीनुसार त्यांच्याकडील खाते काढून घेतले. एक गोष्ट चांगली आहे की, माननीय अंतुले साहेबांना अन्याय करावयास काही अवसर नाही. त्यांच्या हातामध्ये कोणतेही बजेट नाही व कामही नाही. ते बिन खात्याचे मंत्री आहेत. देशाचे गृहमंत्री माननीय श्री. शिवराज पाटील असतांना महाराष्ट्र राज्यामध्ये गुन्हेगारीच्या प्रमाणामध्ये दरवर्षी सरासरीपेक्षा तीन पटीने वाढ झाली आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु...

माझी आकडेवारी चुकली असेल तर दुरुस्त करा. परंतु माझ्या आकडेवारीप्रमाणे वाढ झालेली आहे. या सगळयामध्ये एक गोष्ट खरी आहे की, आमच्या शेतकऱ्यांचे नेते आहेत, मसिहा आहेत, राजे आहेत.त्या आमच्या कृषी मंत्र्यांनी महाराष्ट्रातील आत्महत्त्या केलेल्या शेतकऱ्यांच्या परिवाराकरिता मदत न करता त्यांच्या सरकारने आंध्र प्रदेशामधील शेतकऱ्यांना मदत केली. महाराष्ट्र सरकारला फुटकी कवडीही दिली नाही. याबाबत केंद्रीय कृषी मंत्र्यांचे आणि त्यांच्या काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसच्या सरकारचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. सभापती महोदय, आत्महत्त्येचा विषय खूप गंभीर होऊ लागल्यानंतर जनतेचे लक्ष विचलित करण्याकरिता, आघाडी सरकारमधील उपमुख्यमंत्री सावकारांवर कारवाई करु लागले. त्या कारवाईचे मी समर्थन करतो. परंतु सभापती महोदय, खरे सावकार कोण ? बिहारमध्ये गेले तरी शेतकऱ्याला साडे आठ टक्के व्याजाने कर्ज मिळते, ओरिसामध्ये साडे आठ टक्के दराने कर्ज मिळते, कारण तेथे सहकारी बँका नाहीत. गरिबांकरिता या सरकारने सहकार उघडला, 5 टक्के व्याजाने नाबार्डचे कर्ज मिळते. त्यामध्ये 3 टक्के राज्य सहकारी बँक, 3 टक्के जिल्हा सहाकारी बँक आणि 3 टक्के सेवा सहकारी सोसायट्याचे कर्ज ॲड केल्यानंतर 13 आणि 14 टक्क्यांनी शेतकऱ्यांना कर्जाचा पुरवठा होतो.

सभापती महोदय, नागपूर जिल्हा बँकेमध्ये दीडशे कोटीचा घोटाळा आहे, नांदेड जिल्हा सहकारी बँकेमध्ये अडीचशे कोटी रुपयाचा घोटाळा आहे, उस्मानाबाद जिल्हा सहकारी बँकेमध्ये 275 कोटीचा घोटाळा आहे, कोल्हापूर जिल्हा सहकारी बँकेमध्ये 60 कोटी रुपयाचा घोटाळा आहे, वर्धा जिल्हा सहकारी बँकेमध्ये 50 कोटी रुपयाचा घोटाळा आहे. या बँकांनी राज्यातील शेतकऱ्यांकडून दामदुपटीने व्याजाने कर्ज वसूल करण्याचे काम सुरु केलेले आहे. सभापती महोदय, भूविकास बँकेने किती व्याज घेतलेले आहे, त्याबाबतची श्वेतपत्रिका काढावी अशी माझी मागणी आहे. 10 हजार रुपयाच्या कर्जापोटी दोन-दोन लाख रुपये वसूल केलेले आहेत. अजूनही भूविकास बँकेची वसुली करण्याचे काम सुरु आहे. सांगली जिल्ह्यामधील एका सहकारी बँकेच्या संबंधाने 'लोकसत्ता' या दैनिकामधील पहिल्या पानावर बातमी छापून आलेली होती. उप मुख्यमंत्री महोदयांनी ती बातमी वाचली असेल. त्या बँकेने 50 हजार रुपयाच्या कर्जापोटी अडीच लाख रुपये वसूल केलेले आहेत. मर्सिडीस गाडी विकत घ्यावयाची असेल तर साडे सहा आणि सात टक्के व्याज दर आहे आणि टॅक्टर विकत घ्यावयाचा असेल तर 13 आणि 14 टक्के व्याज लावले जाते. हाऊसिंग लोन घ्यावयाचे असेल तर साडेसात टक्के व्याज दर आहे. या देखील तुमच्या

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु....

गप्पाच आहेत. व्याज कमी झाले, असे सांगितले जाते परंतु हा संशोधनाचा विषय होईल. घर बांधायचे असेल तर साडे सहा, सात टक्के व्याजाने कर्ज आणि गहू, तांदूळ आणि ज्वारी, ऊस, कापूस लावायचा असेल तर साडेबारा, तेरा, चौदा टक्के व्याजाने कर्ज दिले जाते. 'जाणता राजा','शेतकऱ्याचा मसिहा', म्हणून सगळीकडे त्यांची पोस्टर्स लावता. अशी विचारणा केली जाते की, श्री. अडवाणी आणि श्री. वाजपेयी नावाचे शेतकरी महाराष्ट्रामध्ये आहेत काय ? नाहीत. श्री.पाचपुते नावाचे शेतकरी आहेत, श्री. आर.आर.पाटील नावाचे शेतकरी आहे , श्री. विलासराव देशमुख नावाचे शेतकरी आहेत, श्री. उल्हास पवार नावाचे शेतकरी आहेत, श्री.गणगणे नावाचे शेतकरी आहेत. असे सगळीकडे वाजवत फिरा. आज काय स्थिती आहे ? विदर्भामध्ये 1200 पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या, त्यांच्या कुटुंबियांना फुटकी कवडी, हातात भुरका आणि यवतमाळच्या पुढे गेल्या नंतर आदिलाबादमध्ये आत्महत्त्या झाली तेथे मदत आणि पुन्हा 'जाणता राजा'च्या नावाने डमरु वाजवायला,बॅन्ड वाजवायला जाणते कार्यकर्ते उत्साहात तयार असतात. काहीही झाले तरी 'आमचे जाणते राजे', 'आमचे जाणते राजे' असे सांगितले जाते.

सभापती महोदय, भूविकास बँका, सेवा सहकारी सोसायट्या, राज्य सहकारी बँका या सरकारच्या आहेत, त्या बरखास्त करण्याचा अधिकार सरकारचा आहे, त्यांना गाईडलाईन सरकार देते, त्यांचे निती नियम सरकार ठरविते. सहकार मंत्र्यांच्या बाबतीत मी काय बोलू ? ते " झाले, झ ाले, करुन टाकले",असे सांगतात. 'काय झाले, काय केले', हे कळायला मार्ग नाही. सन्माननीय उपमुख्यमंत्री आपण इतके दिवस सांगली जिल्ह्यामध्ये रहाता, सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम काय बोलतात, हे तुम्हाला तरी कळते काय ? त्याबाबत तुम्ही मोकळेपणाने सांगा. कळले तर मी माझे शब्द दुरुस्त करेन. ते दणादण घोषणा करुन टाकतात, काही पत्ता नसतो. सभापती महोदय, सगळया बँका या सरकारच्या आहेत, सरकारचा अधिकार आहे. पण सरकारमध्ये कोण आहे ? मुख्य सचिव ,मंत्री, ग्रुप ऑफ कॅबीनेट मिनिस्टर आणि त्याचे प्रमुख मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री. म्हणून मला सांगावयाचे आहे की, महाराष्ट्रातील खरे दोनच सावकार आहेत. एक म्हणजे सन्माननीय श्री.आर.आर.पाटील साहेब आणि दुसरे श्री विलासराव देशमुख साहेब. तुम्ही एका फटक्यामध्ये भूविकास बँकेचे कर्ज ओटीएस करु शकता. सन्माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख करु शकतात. मला सांगावयाचे आहे की, सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांच्यावर तुम्ही विश्वास ठेवू नका, फाईल बोलवा.शेतकरी आत्महत्त्या करतात,त्याला त्यांच्यावर जिल्हा

SKK/ MHM/ SBT/

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु....

सहकारी बँकेचे कर्ज, सेवा सोसायटयांचे कर्ज, भूविकास बँकांचे कर्ज कारणीभूत आहे. याची चौकशी करा. तुमच्या रेकॉर्डवर 1100 शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केलेल्या आहेत, परंतु माझ्या रेकॉर्डप्रमाणे 1450 शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केलेल्या आहेत.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

मी त्यांची नावे आणि पुस्तिका प्रकाशित केली. आत्महत्या केलेल्या किती लोकांवर जिल्हा बँकेचे, भूविकास बँकेचे, विविध कार्यकारी सोसायट्यांचे कर्ज होते याची चौकशी करा. त्यांचे मालक तुम्ही आहात. या सरकारवर काय कारवाई करणार ? माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील हे छान बोलतात. आमच्या पक्षाच्या नाशिक येथील बैठकीत पक्षाच्या ठरावात त्यांना बोलका बाहुला असे म्हटले होते. माननीय श्री. आर.आर.पाटील साहेब, आपण रागावू नका. सभापती महोदय, केवळ बोलून हा प्रश्न सुटणार नाही. लोकांचा यांच्यावर विश्वास नाही. खऱ्या सावकारावर कारवाई करावयाची असेल तर ती कारवाई या सरकारवर केली पाहिजे. माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री यांच्यावर कारवाई केली पाहिजे. निर्णय न करता शेतकऱ्यांना खोटी आश्वासने देण्याचे, त्यांच्याबद्दल पोकळ घोषणा करण्याचे काम चालू ठेवले त्याबद्दल माननीय मुख्यमंत्र्यांचे, माननीय उपमुख्यमंत्र्यांचे आणि माननीय राज्यपालांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. कै. हिरामण पाटील या शेतकऱ्याने आपल्या मृत पत्नीच्या विरहामुळे आत्महत्या केल्याचा खोटा पंचनामा राज्यसरकार मार्फत करण्यात आला होता. ज्यावेळी कोर्टात केस आली त्यावेळी न्यायाधीशांनी विचारले की, तुम्ही त्यांना मदत का केली नाही ? त्यावेळी माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांच्या गृह विभागाने अहवाल दिला की, त्याच्या पत्नीचे आणि त्याचे भांडण झाले म्हणून त्याने आत्महत्या केली. त्यावेळी दुसऱ्या वकिलाने सांगितले की, त्याची पत्नी 14 वर्षापूर्वी मयत झालेली आहे. ही बाब जेव्हा मुंबई उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली तेव्हा त्यांनी सरकारला फटकारले. त्यांनी सरकारला चार खडे बोल सुनावले. त्यानंतर मग सरकारने त्याच्या परिवाराला मदत देण्याचे आदेश काढले. यांनी 850 खोटे पंचनामे केले आहे. मी जबाबदारीने आरोप करतो. मी सभागृहाच्या बाहेरही आरोप करतो. वाटल्यास आपण माझ्यावर बदनामीचा दावा दाखल करु शकता. 1100 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्याचे सरकारने मान्य केले आहे. त्यापैकी 850 शेतकऱ्यांना फुटक्या कवडीचीही मदत केली नाही. शेतकऱ्यांचे नाव घेऊन राज्य करणारे हे सरकार आहे. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज यांचे नाव घेऊन काम करणारे हे सरकार आहे. माननीय श्री. आर.आर.पाटील साहेब, हे जे खोटे पंचनामे केले त्यामुळे तुमच्या विभागाने शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळलेले आहे. त्याबद्दल महाराष्ट्रातील

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

श्री. नितीन गडकरी .....

तमाम शेतकऱ्यांच्यावतीने मी तुमचे अभिनंदन करतो. या सरकारचे अभिनंदन करतो. किती छान काम चालू आहे ? मी एक गोष्ट सांगतो. एका ऑफीसमध्ये चार तसबिरी लावल्या होत्या. त्यामध्ये एक तसबीर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची होती. दुसरी तसबीर महात्मा ज्योतिबा फुले यांची होती. तिसरी तसबीर छत्रपती शिवाजी महाराज यांची होती व चौथी तसबीर महात्मा गांधी यांची होती. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, काय दैवदुर्विलास आहे ते बघा. मी सगळया दलित, शोषित समाजाकरिता काम केले तरी नवबौध्द समाज मला आपला समजतो. महात्मा ज्योतिबा फुले म्हणाले की, मी महिलांकरिता, समाजातील तळागाळातील लोकांच्या सुधारणेकरिता काम केले पण माळी समाजच मला आपले मानतो. छत्रपती शिवाजी महाराज यांनी हिंदूपतपादशाही स्थापन केली. त्यांनी या देशाला नवीन विचार दिला. त्यांचे राज्य हे खरे सेक्युलर राज्य होते. सर्वांना समान न्याय देणारे ते जाणता राजा होते. ते म्हणाले की, माझे दुर्दैव असे आहे की, मराठा समाज मला आपला मानतो. मराठा समाज असे सांगतो की, छत्रपती शिवाजी महाराज आमचे आहेत. त्यावर महात्मा गांधी म्हणाले की, तुम्ही तिघेही वाईट वाटून घेऊ नका. ते म्हणाले बाबासाहेब, तुमच्या मागे नवबौध्द उभे आहेत. शिवाजी महाराजांच्यामागे मराठा उभे आहेत. महात्मा ज्योतिबा फुले यांच्यामागे माळी उभे आहेत पण माझा दैवदुर्विलास असा आहे की, माझ्या मागे फक्त सरकारच्या भिंती उभ्या आहेत, बाकी कोणीही उभे नाहीत. कारण त्या भिंतीवर त्यांचा फोटो लागलेला आहे. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांच्या नावाने यांनी राज्य केले. सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे आता सभागृहात उपस्थित नाहीत. यांनी श्री. रामदास आठवले यांची काय हालत केली ? मंत्री बनवता बनवता त्यांची वाट लावली. त्यांनी कपडे शिवून ठेवले होते, कोट शिवून ठेवला होता. आमच्या विदर्भातील प्रा. जोगेंद्र कवाडे, श्री. रा. सू. गवई, श्री. मुकुल वासनिक तसेच श्रीमती उज्ज्वला शिंदे, श्रीमती सुलेखा कुंभारे, प्रा. लक्ष्मणराव ढोबळे या सगळ्याची निवडणुकीमध्ये वाट लावली. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराजांचे नाव घेऊन राज्य करतात. यांनी नवीन धंदा सुरु केला आहे. हे जातीयवादी नाहीत, हे सांप्रदायिक नाहीत. हे सेक्युलर आहेत. पण हे जाती- जातींची सम्मेलने घेत आहेत.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 18:30

(श्री. नितीन गडकरी पुढे सुरु...)

ज्या लोकांची राजकारणामध्ये चलती नसते, ज्या लोकांचे सत्तेमध्ये महत्व कमी झालेले असते असे लोक जाती-जातीची संमेलने घेऊ लागतात. ते सांगतात की, बघा मला एखादे पद दिले नाही तर मी विरोधात जाईन. नागपूरमध्ये तेली समाजाचे संमेलन झाले.... सभापती महोदय, नव्या मुंबईमध्ये झ ालेला संघर्ष किती क्लेशदायक आहे ? त्या संघर्षाची सुरुवात आणि शेवट कोठे आला ? काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या सारखे जातीयवादी आणि सांप्रदायवादी पक्ष राजकारामध्ये देशात कोठेही नाहीत. हे पक्ष जाती-जातीमध्ये भांडणे लावतात आणि जातीयवादी दुस-याला म्हणतात. बीजेपीमध्येही जातीवर विचार होतो. श्री. बाळासाहेब ठाकरे हा एकच नेता मी पाहिला. त्यांनी केव्हाही जातीवर आधारित राजकीय निर्णय घेतला नाही. तुम्ही ओ.बी.सी.ची तेली समाजाची संमलने घेतली. एक भुसावळचे आमदार आणि दुसरे पडलेले आमदार, त्यांनी तेली समाजाला, ओ.बी.सी. समाजाला प्रतिनिधीत्व देण्याची मागणी केली. अशा प्रकारे तुम्हाला सेक्युलर समाज घडवायचा आहे काय ? सभापती महोदय, जातीच्या आधारावर माणूस मोठा होत नाही तर गुणवत्तेच्या आधारावर तो मोठा होतो. जातीवर आधारित, स्पृश्यास्पृशतेवर आधारित समाजरचना उचलून फेकली पाहिजे. हे कर्तृत्व या सरकारने दाखववे. या सरकारच्या जातीवादी आणि सांप्रदायवादी दृष्टीकोनाबद्दल मी या सरकारचे आणि मंत्र्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. या सरकारची भूमिका "वरुन किर्तन आतून तमाशा" अशीच सुरु आहे.

सभापती महोदय, या शासनाने आमच्या विदर्भासाठी पॅकेजच्या खूप घोषणा केल्या. पण आमच्या हातात अजून एकाही पॅकेजचा लिफाफा पडलेला नाही. शेतक-यांचेच पैसे शेतक-यांना दिले. 1972-73च्या दरम्यान मी शाळेत होतो. तेव्हा पासून आमच्या ऊस पिकविणा-या शेतक-यांचे 3 टक्क्याप्रमाणे या सरकारने पैसे जमा केले. त्यातील 350 कोटी परत केले. आमचेच पैसे आम्हाला दिले. दाढी एकाची जळते आणि बिडी भलताच पेटवतो. या सरकारने आमच्या शेतक-यांकडून 350 कोटी रुपये घेतले, 25-30 वर्षे ते पैसे स्वत:कडे ठेवले आणि आता आमचेच पैसे आम्हाला वापस केले....वाजवा टाळ्या.. 1000 कोटी मधले 350 कोटी दिले. बाकीच्या पैशासंबंधी जी.आर.निघत आहेत. सरकारने जे पॅकेज जाहीर केले त्या पॅकेजची अंमलबजावणी झाली हे सांगण्याची हिंमत सरकारमधील कोणत्या मंत्र्यांमध्ये आहे काय ? पॅकेजच्या संदर्भात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.नितीन गडकरी पुढे सुरु...)

सरकारने काय केलेले आहे ? अमुक इतके पैसे अमुक एका तारखेला वाटले हे सरकारने सांगावे. दुर्दैवाने एकही जी.आर. निघलेला नाही. आमच्या तोंडाला पाने पुसण्याचे, राज्यातील शेतक-यांची फसवणूक करण्याचे काम या सरकारने केलेले आहे त्याबद्दल या सरकारचे आणि माननीय राज्यपालांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. कापूस उत्पादक शेतक-यांना 2700रु. भाव देतो असे सांगून या शासनाने कापूस उत्पादक शेतक-यांची फसवणूक केलेली आहे. भारताचे पंतप्रधान श्री. मनमोहन सिंग यांनी श्रीमती मिश्रा यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्रात सातत्याने होणा-या आत्महत्यांसंबंधी माहिती घेण्यासाठी एक कमिटी नेमली. त्या कमिटीने असा अहवाल दिला की, महाराष्ट्र सरकारचे कापसाचे अर्थकारण हे शेतक-यांच्या आत्महत्येला जबाबदार आहे. आज परिस्थिती अशी आहे की, 85 टक्के आत्महत्या ह्या कापूस उत्पादक शेतक-यांच्या झालेल्या आहेत. आज राज्यातील कापूस उत्पादक शेतक-यांची परिस्थिती अत्यंत वाईट आहे. अशाही परिस्थितीमध्ये सरकारने सव्वालाख शेतक-यांच्या वीज पंपाचे कनेक्शन तोडलेले आहे. कापसाचे एकरी 3 क्विंटल उत्पादन होते, 2300रुपये असलेला भाव आज 1300 ते 1400 रुपयावर आलेला आहे. शेतकरी आत्महत्या करीत आहेत. अशा परिस्थितीत या सरकारने सव्वालाख शेतक-यांच्या वीजपंपाचे कनेक्शन तोडलेले आहे. शेतक-यांची फसवणूक करणा-या या सरकारचे मी अभिनंदन करतो.

...नंतर श्री. कानडे...

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.शिगम 18:35

श्री. नितीन गडकरी ...

सभापती महोदय,शेतक-याने घेतलेल्या जुन्या कर्जाची पुनर्रचना करण्यात येईल असा पॅकेजमध्ये उल्लेख करण्यात आला होता. परंतु बँका शासनाचे आदेश मानायला तयार नाहीत. जे काही पैसे द्यावयाचे आहेत ते आधी आम्हांला द्या मग आम्ही कर्ज सेटल करु असे बँकांचे अधिकारी सांगतात. सभापती महोदय, पीक विमा योजना ही एक अतिशय चांगली योजना शासनाने आणली. मी त्याबद्दल शासनाचे अभिनंदन करतो. परंतु पीक विमा योजनेनुसार गावामध्ये 50 टक्के शेतकऱ्यांची आणेवारी 50 टक्केपेक्षा कमी असेल तर तुम्हांला या योजनेचा फायदा मिळेल. म्हणजे उदाहरण द्यावयाचे झाले तर एकाच शाळेत सगळया शिक्षकांना गट विमा योजना लागू केली परंतु एखादा शिक्षक मेला तर त्याला पैसे मिळणार नाहीत. 50 टक्के शिक्षकांनी मरा आणि विमा योजनेचे पैसे घ्या. अशी पीक विमा योजनेची स्थिती आहे. कायदा आणि सुव्यवस्थेबाबत सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. प्रमोद नवलकर याठिकाणी बोलले. राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती किती सुंदर आहे पण एका गोष्टीबद्दल माझा आक्षेप आहे. मी मंत्रीमहोदय श्री. म्हेत्रे साहेबांना सांगू इच्छितो की, आघाडी सरकारचे स्टँडर्ड कमी करु नका. टेपमध्ये 5 लाख रु. घेतल्याचा जो उल्लेख झाला आहे तो योग्य नाही. हे आघाडी सरकारच्या प्रतिष्ठेला बाधा निर्माण करणारे आहे. पैसे घ्यावयाचे असतील तर करोडोमध्ये घ्या. 5 लाख रु. शिपाई घेतो. तुमच्यामुळे महाराष्ट्र सरकारचे स्टँडर्ड घसरते. श्री. म्हेत्रे साहेबांना मी विनंती करतो की, आपले सिनियर कसे वागतात,आपले बाकीचे लोक कसे वागतात ते पहा. 50 लाखाच्या आत बोलायचे नाही असे ठरवा. सभापती महोदय, सुनील मोरे नावाच्या शिपायाने दारु पिऊन मरीन लाईन्स पोलीस ठाण्यात मुलीवर पोलीस चौकीमध्येच बलात्कार केल्यानंतर दारु पिणाऱ्या पोलिसांना सेवेतून काढून टाकले जाईल अशी घोषणा उपमुख्यमंत्री महोदयांनी केली. परंतु आता पोलीस देखील आत्महत्येकडे वळू लागले आहेत. मी नांव घेत नाही उपमुख्यमंत्री महोदयांना माहीत असेल असे मला वाटते. उपमुख्यमंत्र्यांची स्थिती म्हणजे "उरलो केवळ बोलण्यापुरताच" अशी झालेली आहे. "काय होतास,काय झालास तू" " मैं बोलूंगा तो बोलोगे की बोलता है." हे सगळे पाहून सहृदयी,सुसंस्कृत आणि सहनशील लोक टाळया वाजवतात. आमचे मित्र ॲड. गुरुनाथ कुलकर्णी आणि श्रीमती सुधा जोशी दोघेही कर्तृत्ववान आमदार आहेत. ॲड. गुरुनाथ कुलकर्णी हे प्रॅक्टीस चालत नाही म्हणून राजकारणात आलेले नाहीत. ते कधी कधी राणे साहेबांची सुध्दा वकिली करतात. निस्पृह,पारदर्शी आहेत. काय

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.शिगम 18:35

श्री. नितीन गडकरी ...

करणार "आपलेच दात आणि आपलेच ओठ" . दर वेळेला श्रीमती सुधा जोशी यांनी राज्यपालांच्या अभिनंदनाचा ठराव मांडायचा आणि ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी त्याला अनुमोदन द्यावयाचे हे मी कित्येक वर्षापासून पहात आहे. आता मंत्रिमंडळ विस्तारात तरी या दोघांचा विचार करा. ॲड.गुरुनाथ कुलकर्णी वेळ पडली की राणे साहेबांच्या मदतीला धावून जातात. मला वाटते आता यावेळी तरी त्यांचा विचार करा. मी एकच विनंती करीन की, पुढील वेळी तरी या दोघांवर ठराव मांडायची आणि त्याला अनुमोदन देण्याची वेळ येऊ देऊ नका.

यानंतर श्री. खर्चे पी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. कानडे..... 18:40

श्री. नितीन गडकरी ......

महोदय त्यांची अगोदर कुठेतरी व्यवस्था करावी, परिस्थिती फार गंभीर आहे. सुधा ताईंना त्यावेळी युतीचे सरकार चांगले वाटले होते असा त्यांच्या भाषणात उल्लेख आहे. आघाडी सरकार नियोजनशून्य आहे, हे आता आपल्याला पूर्णपणे पटते परंतु पर्याय नाही. म्हणून अशी परिस्थिती आहे की,

तुका म्हणे उगे रहावे, जे जे होईल ते ते पहावे,
पदरी आपली आमदारकी पाडून घ्यावी,
मंत्रिमंडळ विस्ताराकरिता सतत प्रयत्नशील रहावे"

परंतु मी आता आपल्याला शुभेच्छा देतो की पुढच्या वेळी पुन्हा आपल्यावर राज्यपालांच्या आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव मांडण्याची वेळ येऊ नये. अध्यक्ष महाराज, या राज्यात एका दलित महिलेची नग्न धिंड निघते ही या राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची स्थिती आहे. मला एका गोष्टीचे समाधान वाटते की, एवढे सगळे सहन केले जाते, साहेब आर.आर. पाटलांना अजिबात विचारत नाही, किती सहनशील आहे, त्यांच्या सहनशीलतेची मी दाद देतो आणि इतक्या कठीण प्रसंगात देखील ते आपल्या मागे उभे राहतात, याबद्दल त्यांचे शासनाचे व आपले देखील मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. माननीय रामदासजी आठवले साहेबांबद्दल सांगावयाचे झाल्यास त्यांच्या चेहऱ्यावरील भ्रमनिरासाच्या रेषा पाहता शरदराव पवारांबद्दल ते काय म्हणतात तर -

हमसे क्या भूल हुई, जो ये सज़ा हमको मिली
अब तो चारों ही तरफ बंद, मंत्री मंडल विस्तार की गली

बिचारे रामदासजी दरवेळी कोट घालतात आणि वाट पाहतात की मला मंत्रिपदाची शपथ घेण्यासाठी निरोप येईल, परंतु सगळं व्यर्थ. आम्ही कॉलेजमध्ये असतांना एक सुंदर तरुणी होती. तिचे सौंदर्य एकदम चांगले होते पण फक्त डोळयात फरक होता. ती एखादया वेळी हसली की पाच-पन्नास तरुणांना वाटायचे की ती आपल्याकडेच पाहून हसली. तशी परिस्थिती राष्ट्रवादीच्या बाबतीत आहे. मग आर.आर. पाटील असोत अथवा दिल्लीचे नेतत्व असो ते एक वेळ हसले की नागपूरहून 40 एक एम.एल.सी. तरी नक्कीच तयार होतील. सगळया जिल्हयांमध्ये हेच सुरु आहे. आता नाही तर पुढच्या वेळी नक्कीच, अशा आशेवर सगळे असतात, बिच्चारे.

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : माननीय गड़करी जी आपने कही गीत की पंक्ति को सुन कर मुझे भी दो पंक्तियां याद आई हैं. वह इस प्रकार है -

तुझे क्या सुनाऊं मेरे दिलरुबा, तेरे सामने मेरा हाल है
तेरी एक निगाह की बात है, मेरी जिंदगी का सवाल है

श्री. नितीन गडकरी : म्हणून आता शरद पवार साहेब ज्यावेळी दिसतील त्यावेळी चित्रपट अभिनेता संजीवकुमारच्या खिलौना या चित्रपटातील स्टाईलमध्ये रामदासजी म्हणतील -

खिलौना जानकर तुम तो मेरा दिल तोड़ जाते हो
मुझे इस हाल में किसके सहारे छोड़ जाते हो
मेरे दिल से ना लो बदला, जमाने भर की बातों का
चले जाना चुनाव के बाद, अभी से क्यों मुँह मोड़ जाते हो

अशा प्रकारे वाट लावली, खिलौना तोडून टाकला. मघाशी मी सांगितले की, हे जाती-पातीचे राजकारण फार भयंकर असते. माननीय उप मुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील हे माझे मित्र आहेत. मी जरी टीका करीत असलो तरी काही बाबतीत त्यांच्याबद्दल मला नेहमीच आदर आहे, मी त्यांचा आदर ठेवतो, मी त्यांच्याबद्दल चांगले बोलतो. माझा स्वभाव असा नाही की आतमध्ये एक आणि बाहेर भलतेच. पण एक विनंती करतो की त्यांनी राष्ट्रवादीच्या जाती-पातीच्या मेळाव्यांना जाऊ नये, हे चांगले नाही, त्याने तुमचे समर्थन होणार नाही. आमच्या पक्षात सुध्दा मी सांगितले की, जाती-पातीचे राजकारण जे आहे ते म्हणजे Backwardness is becoming political interest who is more backward, त्याची स्पर्धा सुरु आहे उत्तर प्रदेशामध्ये देखील ब्राम्हण म्हणतात की आम्हाला सवलती पाहिजेत. एक दिवस हा जातीचा भस्मासूर संपूर्ण समाजव्यवस्थेला समाप्त केल्याशिवाय राहणार नाही. म्हणून माणसाचा मोठेपणा हा जातीवर नव्हे तर त्याच्या गुणांवर आहे. डॉ. आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज आणि महात्मा ज्योतिबा फुले यांनी कधी जाती-धर्माचा उल्लेख केला नाही तर मानवतेच्या इतिहासात संपूर्ण समाजाची सेवा करण्याचा वसा त्यांनी घेतला होता. मला माझ्या आई-वडिलांपेक्षाही छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आदर आहे. माझे सर्वात जास्त प्रेम शिवाजी महाराजांवरच आहे. त्यांचे इतिहासाचे पुस्तक मी वाचले नसते आणि त्यांचे कतृत्व समजायला मला अवसर मिळाला नसता तर कदाचित मी राजकारणात आलोही नसतो, एवढी माझ ी त्यांच्यावर श्रध्दा आहे.

यानंतर श्री. भारवि .......

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

20-03-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) ZZ 1

BGO/ MHM/ SBT/ 18:45

श्री.नितीन गडकरी...

मेहरबानी करून या मोठया लोकांना जातीपातीमध्ये टाकू नका. वाटले तर श्री.छगन भुजबळ साहेबांना वरचे पद द्यावे. श्री.भुजबळ यांना थोडे बाजूला सारल्यामुळे श्री.आर.आर.पाटील यांची गाडी पुढे निघाली. तेलगी प्रकरणामुळे श्री.भुजबळ यांची गाडी पुढी गेली नाही. त्याचे खापर माझ यावर फुटले. तेलगी प्रकरणामुळे बरेच पाणी पुलाखालून वाहून गेले. श्री.भुजबळांना संधी मिळत नाही म्हणूनच श्री.भुजबळ साहेबांनी दिल्ली येथे मेळावा घेतला. मध्यंतरी ते मायावती यांना देखील भेटण्याचा प्रयत्न करीत होते, पण आपण त्यांना भेटू दिले नाही. त्यामुळे कदाचित ते उद्या शिवसेनेत देखील जाऊ शकतील किंवा अन्य वेगळे काहीही करू शकतील. शेवटी विचारापेक्षा पद हे मोठे असते. त्यांना मोठे पद मिळत नसेल तर मग त्यांनी देखील काय करावे ? दुसरा त्यांना काहीच मार्ग नसल्यामुळे ते मेळावे घेतात. तेव्हा माझी माननीय उपमुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, जातीपातीचे राजकारण बाजूला ठेवावे. सामाजिक मूल्यांवर निष्ठा ठेवून जातीपातीचे राजकारण करणे बंद केले पाहिजे. कुठल्याही जातीचा कार्यक्रम असेल तर मी तेथे जात नाही. माझ्या जातीची जी संस्था आहे, त्यावर चुकीने माझे नाव लिहिले गेले. त्यास मी काळे लावायला सांगितले. आज खरा जातीयवादी कोण आणि सांप्रदायिक कोण हा संशोधनाचा मुद्दा आहे. जे नाहीत त्यांची जातीयवादी प्रतिमा आहे. मी संघात अनेक वर्ष होतो. तेथे वेगवेगळया जातीचे हजारो लोक एकत्र बसतात आणि एकाच वेळी जेवतात. तेथे कुठेही जातीयता नसते. पण संघ जातीयवादी आहे अशी प्रतिमा काही राजकीय पक्षाने निर्माण केली आहे. 95 टक्के एकाच जातीचे जे मंत्री घेतात, स्वतःला पुरोगामी, प्रगतिशील म्हणवून घेतात ते आज जातीयवादाच्या विरोधात आहेत. इमेज वर्सेस रियालिटी आहे. मला असे वाटते की, प्रगल्भ राजकारण समृध्द आणि समर्थ करावयाचे असेल तर जातीवादी कार्यक्रम बाजूला ठेवला पाहिजे. मी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांचे अभिनंदन करतो. या दोघांमध्ये सुंदर समन्वय आहे. राष्ट्रवादीचा उपमुख्यमंत्री पोलीस ठाण्याचा लिलाव करीत आहे, असे आपल्या सहकाऱ्याबद्दल सत्य, परखड मत प्रामाणिकपणे मुख्यमंत्र्यांनी मांडलेले आहे. त्यावर आपले उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील चूप राहणार का ? ते लगेच म्हणाले आपण प्रथम सहकार आणि पणनकडे लक्ष द्यावे. आज राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरू आहेत,याला तुम्हीच जबाबदार आहेत, असा देखील टोला हाणला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

किती समन्वय आहे तो पहा. एकमेकांच्या जवळ बसून एकमेकांचे पाय खेचण्याची स्पर्धा या दोघामध्ये लागली आहे. आपल्या राज्यातील गृहराज्य मंत्री श्री.सिध्दाराम म्हेत्रे यांना विसरणे शक्य नाही. त्यांच्याबद्दल मी मघाशी बोललो आहे. सभागृहात उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले की, श्री.म्हेत्रे यांच्यावर करण्यात आलेल्या आरोपाची कॅसेट तपासून बघावयाची आहे. या कॅसेटमधील संभाषणाची चौकशी/तपास न करता ती कॅसेट शासनाने पुरावा म्हणून कोर्टाला सादर केली आहे. आपल्या शासनाचे गतिशील अधिकारी कॅसेटमधील संभाषणाची चौकशी/तपासणी न करता कोर्टाला सादर करतात म्हणजे हा श्री.म्हेत्रे यांच्यावर अन्याय आहे. या प्रकरणातील श्री.आर.आर.पाटील यांची कुंचबणा मी काल पाहिली. शेवटी श्री.आर.आर.पाटील यांनी मार्ग काढला. कारण एकमेकाला सांभाळणे आवश्यक आहे. कारण त्यांचा पक्ष हा मोठया भावाच्या भूमिकेत आहे. सन्माननीय श्री.सिध्दाराम म्हेत्रे यांचे कर्तृत्त्व श्री.आर.आर.पाटील यांनी जवळून पाहिले आहे. त्यांच्या कर्तृत्त्वाचा, अनुभवाचा, अनुभूतीचा सत्त्संग श्री.आर.आर.पाटील यांना मिळतो. तो मला मिळत नाही. तरी देखील ते शांतपणाने छोटया भावाप्रमाणे त्यांना सांभाळून घेत आहेत. म्हणूनच मी श्री.आर.आर.पाटील आपल्या सहनशीलवृत्तीला दादा देतो. राज्यपालांच्या अभिभाषणातील 24 व्या मुद्दात नमूद करण्यात आले आहे की, "पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाची योजना राबवित असून, पोलीसबलामध्ये वाढ करण्यासाठी पोलीस ठाण्यांच्या संख्येत वाढ करण्याचा तसेच पोलिसांची सुमारे 10,500 इतकी नवीन पदे निर्माण करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे." माननीय उपमुख्यमंत्र्यांनी गेल्या 20 वर्षातील राज्यपालांची अभिभाषणे काढून पहावीत. त्यात तेच मुद्दे आहेत. शासन म्हणून आपण काहीही करा, पण त्यात डॉ.कृष्णासाहेबांना कशाला ओढत आहात ?

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.भारवि.... 18:50

श्री.नितीन गडकरी....

सन्माननीय नवलकरसाहेब तुम्ही आणि मी सुध्दा या पापामध्ये सहभागी आहोत, कारण तुम्हाला आठवत असेल की, तुम्ही मंत्री असताना राज्यपाल महोदयांचे अभिभाषण करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली होती. तुम्ही त्या समितीचे संयोजक आणि मी सदस्य होतो. त्यावेळी माननीय राज्यपाल महोदयांचे भाषण करण्यासाठी आपण दोघेही बसलो होतो.

महोदय, राज्यात बॉम्बस्फोट घडवून आणणाऱ्यांना राज्य सरकारने योग्य साक्षीदार न उभे केल्यामुळे पुराव्या अभावी न्यायालयाकडून सूट मिळाली आणि राज्याची सुरक्षा वेशीवर टांगून राज्यातील आघाडी सरकारने ठराविक समाजाच्या तुष्टीकरणासाठी जनतेच्या जीवाशी खेळ केला. महंम्मद पैगंबरांचे कार्टून काढल्यामुळे नागपूर बंद पाडले जाते आणि तीन-तीन लाख व्यक्तींकडून या मुंबईमध्ये मोर्चा काढला जातो. त्यावेळी तुम्ही त्यांच्यांशी किती सांभाळून बोलता ? सेक्युलरिझम याचा मराठी अर्थ म्हणजे सर्व-धर्म-समभाव असा होतो. Secularism does not mean appeasement of minorities. अल्पसंख्यांकाचे तुष्टीकरण हा सर्व-धर्म-समभाव होत नाही. मुंबईमध्ये मुस्लिम बांधवांनी मोठा मोर्चा काढला. तुमचे मी कौतुक करतो. परंतु ज्यावेळी सरस्वती आणि लक्ष्मी या देवतांची नग्न चित्रे काढली गेली त्यावेळी तुम्ही दखल घेतली काय ? डेन्मार्कमध्ये महंम्मद पैगंबरांचे कार्टून काढण्यात आल्यामुळे आपल्या राज्यात मोर्चे निघाले. मुंबईमध्ये तर फार मोठया संख्येने मोर्चा निघाला. त्यावेळी टाईम्स ऑफ इंडियाच्या कार्यालयावर दगडफेक झाली, गाडयांवर दगडफेक झाली. परंतु त्यावेळी तुम्ही शांत आणि संयंमित राहिला. ज्यावेळी सरस्वती आणि लक्ष्मी या देवतांची नग्न छायाचित्रे काढली गेली त्यावेळी आपण कारवाई करण्याचे साधे सौजन्य सुध्दा दाखविले नाही. त्यामुळे अल्पसंख्यांकाचे तुष्टीकरण करणाऱ्या सरकारचे मी मनापासून अभिनंदन करतो.

महोदय, देशाचे पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी मुंबईची हवाई पाहणी केली, त्यानंतर श्रीमती सोनिया गांधी यांचा रोड-शो झाला. त्यावेळी डॉ.मनमोहन सिंग यांनी सांगितले की, मुंबईची ड्रेनेज यंत्रणा फार जुनी झाली आहे. त्यामुळे ड्रेनेज यंत्रणा बदलविण्यासाठी केंद्र सरकार ठोस आर्थिक सहाय्य करेल. मागच्या वर्षाच्या बजेटमध्ये नॅशनल अर्बन रिन्युअल मिशनमध्ये 7 हजार कोटी रुपयांची तरतूद केली आणि त्यातील 2 हजार कोटी रुपये महाराष्ट्राला मिळणार होते. परंतु आज मार्च महिना संपत आला तरी, एक फुटकी कवडी सुध्दा राज्याच्या हातात

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

मिळाली नाही. पूरग्रस्त, अतिवृष्टीसाठी 12,500 कोटी मिळणार होते. परंतु त्यातील केवळ 850 कोटी रुपये प्राप्त झाले. मुंबईसाठी 12,500 कोटी रुपयांची योजना तयार केली गेली. परंतु त्यातील एक फुटकी कवडीही राज्याला मिळाली नाही. त्याबद्दल मी केंद्र सरकारचा गुणगौरव व अभिनंदन करतो.

परवा ज्यावेळी देशाचे पंतप्रधान मुंबई दौऱ्यावर आले त्यावेळी त्यांनी सांगितले की, मुंबईचे शांघाय करणार आहोत. मला वाटते या काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने मुंबईचे शांघाय नव्हे तर व्हेनीस बनविले आहे. त्यामुळे या सरकारचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. या शासनाने फुटक्या केंद्र सरकारकडून एकही पैसा न आणल्याबद्दल मी पुन्हा एकदा शासनाचे अभिनंदन करतो. परंतु या सरकारने काही क्षेत्रात केलेली प्रगती अविस्मरणीय, ऐतिहासिक आणि क्रांतीकारक आहे. गेल्या दोन वर्षात या महाराष्ट्रात या सरकारने जनरेटर, इन्व्हर्टर आणि हेल्मेट या तीन बाबींमध्ये उत्तम काम केलेले आहे. त्या कंपन्या जोरात काम करीत आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

सभापती महोदय, बराच वेळ झाला असल्याने मी पूरस्थिती व कुपोषणाच्या विषयावर माझे विचार मांडत नाही. ज्या ज्या गोष्टींसाठी मी माननीय राज्यपालांचे व शासनाचे अभिनंदन केले, त्यामध्ये काही एक चूक असेल तर मी आपली उभा राहून क्षमा मागीन. सभापती महोदय, शासनाने महाराष्ट्राची वाट लावली आहे. क्रमांक एकवर असलेल्या महाराष्ट्राला या शासनाने सहाव्या क्रमांकावर नेले आहे. राज्यात 16-16 तास लोडशेडींग सुरु आहे. मार्च, एप्रिल या महिन्यांतही काही काही ठिकाणी 12-12 तास लोडशेडींग सुरु आहे. महाराष्ट्रातील एका जनरेशनचे, कॉलेजच्या, शाळेच्या विद्यार्थ्यांचे शासनाने नुकसान केले आहे. विजेविना मुले अभ्यास करु शकत नाहीत. सभापती महोदय, येथे उद्योगपती कशाला येतील ? या संदर्भात माझे शासनाला आवाहन आहे. श्री. पतंगराव कदम, श्री. विलासराव देशमुख, श्री. अशोक चव्हाण हे उद्योगपती अमेरिकेला नऊशे कोटी रुपयांची गुंतवणूक आणावयास गेले. त्यावेळी त्यांनी पत्रकार परिषद घेतली. अमेरिकेच्या उद्योगपतींना विचारले की, आम्ही ज्या ठिकाणी इन्व्हेस्टमेंट करणार आहोत, त्या ठिकाणी वीज आहे का ? त्यावेळी आपल्याकडून आम्ही प्रयत्न करीत आहोत असे सांगण्यात आले. सभापती महोदय, अमेरिकेचे उद्योगपती 15 हजार कोटी, 20 हजार कोटी एवढ्या प्रमाणात गुंतवणूक करणार आहेत. ज्या राज्यात वीज नाही, त्या ठिकाणी ते कशाला येतील ? सभापती महोदय, उद्योगपती आले नाहीत, तर तरुणांना रोजगार कसा मिळेल ? महाराष्ट्रामध्ये बेरोजगारी वाढली आहे. बेरोजगारी आता कमी होणार नाही. महाराष्ट्राचा क्रमांक 1 वरुन 6 वर गेल्यामुळे मी शासनाचे अभिनंदन करतो. तसेच माननीय राज्यपाल महोदयांचे देखील अभिनंदन करतो. या सत्य परिस्थितीवर कितीही विचार केला तरी काहीएक फरक पडणार नाही. अजुनही हे सांगतात की, विजेच्या लोडशेडींगला मुंडे व गडकरी जबाबदार आहेत. सभापती महोदय, आपण सत्तेवर येऊन 6-7 वर्षे झाली. 1-2 वर्षे झाली असती तर ठीक आहे. 7 वर्षांत तुमच्याकडे पाळणा हलला नाही तर त्याला गडकरी आणि मुंडे जबाबदार कसे ? आपण होमिओपॅथीची आणि आयुर्वेदाची तपासणी करुन घ्यावी. आम्ही याला जबाबदार कसे ? तुम्ही आम्हाला मदतही मागितली नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते नाहीत. ते असते तर मला म्हणाले असते की, आपण सल्ला कशाला देता ? सभापती महोदय, विजेच्या प्रश्नावर मी या सभागृहात अनेक वेळा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

सल्ला दिला. परंतु श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी माझा सल्ला गंभीरपणे घेतला नाही. सभापती महोदय, अशा अकार्यक्षम, भ्रष्ट सरकारचे अभिनंदन करण्याची वेळ सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी व सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांच्या आयुष्यामध्ये पुढे कधीही येऊ नये, अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

----

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, माननीय महामहिम राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल जो अभिनंदनाचा प्रस्ताव या सभागृहात मांडलेला आहे, त्याचे समर्थन करण्यासाठी आणि त्याला मन:पूर्वक पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, महाराष्ट्राला एका अभुतपूर्व अशा नैसर्गिक आपत्तीची पार्श्वभूमी आहे. महाराष्ट्रावर महाभंयकर संकट आले होते आणि हे केवळ एक संकट नव्हते तर संकटांची मालिकाच तयार झालेली होती. या सगळ्या संकटांचा सामना सर्वार्थाने करण्यासाठी राज्य सरकार कटिबध्द आहे, कृतिशील आहे, निर्णय घेणारे आहे अशाप्रकारचे वातावरणच नव्हेतर वास्तवतेचे चित्र देखील माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातून या ठिकाणी तुम्हा आम्हाला ऐकायला मिळाले. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर आताच अनेक आदरणीय सदस्य बोलले. सन्माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरीही बोलले. या सदनाचे सदस्य नसलेल्या अनेकांचा उल्लेख या ठिकाणी केला गेला. त्याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही. परंतु साधारणपणे तसा उल्लेख करु नये असा संकेत आहे. तरीही ते आम्ही सहन केले. सभापती महोदय, आपण बराच वेळ त्यांना त्यांचे विचार मांडण्यासाठी दिला, त्यांचे सर्व विचार आम्ही ऐकून घेतले.

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी )**

( यानंतर श्री. वि. खर्चे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार...

एक गोष्ट मी सांगू इच्छितो की अभूतपूर्व प्रर्जन्यवृष्टी या महाराष्ट्रामध्ये विशेषत: मुंबईमध्ये झाली. अशी पर्जन्यवृष्टी 75 ते 100 वर्षात झालेली नाही असे खूप वर्तमानपत्रामध्ये आलेले आहे. पण पाश्चिमात्य वर्तमानपत्रामध्ये असे आले की, जगामध्ये एकाच दिवशी किंवा दोन दिवसांमध्ये 12 तासांच्या अंतरामध्ये एवढा अभूतपूर्व पाऊस जो आतापर्यंत चेरापुंजी येथे रेकॉर्ड झालेला होता, चेरांपुजी येथे जगातील अतिवृष्टी होते, त्याहीपेक्षा अधिक पाऊस मुंबईमध्ये आणि उल्हासनगर परिसरामध्ये व महाराष्ट्रातील अनेक जिल्हयांमध्ये झालेली आहे. आणि ती मालिका अजूनपर्यंत चालूच आहे. अजूनही अवेळी गारा पडतात, अवेळ पाऊस पडतो. त्यामुळे संत्रा, द्राक्षे यांचे नुकसान होत आहे. अनेक पिकांचे नुकसान होत आहे. अशा सगळया पार्श्वभूमीवर राज्य सरकार अतिशय समर्थपणे या सगळया प्रश्नांचा सामना करीत करीत पुढे निघालेले आहे. हे वास्तव आपण सर्वांनी कबूल केले पाहिजे. या ठिकाणी हे सांगितले पाहिजे की, विरोधी पक्षाचे काम हे लोकशाहीमध्ये सरकारवर अंकुश ठेवणे, त्यांच्या चुका दाखविणे, सरकारवर टीका करणे, हे लोकशाहीतील काम आहे. त्याचाही अतिरेक होता कामा नये. मुंबईमध्ये अतिवृष्टीच्या वेळी सरकारने जी मदत केली त्याचा पाढा मी येथे वाचू इच्छित नाही. सर्व पक्षांनी सामजस्यांची भूमिका घेऊन वितरण व्यवस्थेमध्ये, या संकटांचा सामना करतांना सर्वांनी सहकार्य केलेले आहे. अमेरिकेतील कॅटरिना येथे काय घडले, कमी लोकसंख्येचे शहर असून तेथे काय झाले ? तेथे किती अतिरेक घडला, कायदा आणि सुव्यवस्था कशी बिघडली, अतिरेकी कारवाया झाल्यात, लुटमार, चोऱ्या, बलात्कार झालेत, त्या ठिकाणी मिलिटरीला गोळया घालण्याचे आदेश देण्यापर्यंत परिस्थिती गेली होती. या सगळया पार्श्वभूमीवर मुंबई व महाराष्ट्रावर पर्जन्यवृष्टीचे जे संकट आले होते, त्या संकटाचा सामना सरकारने व लोकांनी किती चांगला केला हे महाराष्ट्राने दाखवून दिलेले आहे. मी अतिशय नम्रपणे सांगू इच्छितो की, अनेक गोष्टींचा उल्लेख या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी केलेला आहे, सन्माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर यांनी सभागृहात अनेक बाबी सांगितल्या आहेत. त्यामध्ये चारित्र्यहननाच्या संदर्भात माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांच्या जवळ जाऊन खोटा फोटो काढण्याचा कोणी प्रयत्न केला, तेव्हा सन्माननीय सदस्य श्री. नवलकर साहेबांनी या सभागृहात सांगितले होते की या

.....2.....

VVK/ KGS/ MHM/ SBT/ MAP/ प्रथम श्री. कांबळे.. 19:00

श्री. उल्हास पवार...

लोकांना कोणाच्या घरात घुसण्याचा अधिकार कोणी दिला ? कोणाच्या घरात कोण काय करतो हे पाहण्याचा अधिकार यांना कोणी दिला ? प्रसार माध्यमाचे भांडवल करुन चारित्र्यहनन करण्याचे काम करुन या सगळया राजकीय प्रतिनिधींकडे एक वेगळया नजरेने पाहण्याची दृष्टी आणि भयानकता समाजामध्ये निर्माण झालेली आहे. ती मोडून काढली पाहिजे, ती संपविली पाहिजे. अशा प्रकारची भावना सन्माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर यांनी व्यक्त केली आहे. कोणावरही आरोप असतील, मी येथे आरोपीचे समर्थन करणार नाही. त्यामध्ये मग माननीय मंत्री श्री. सिध्दाराम म्हेत्रे असोत, की, माननीय मंत्री श्री. अनिस अहमद असोत, परंतु जोपर्यंत अंतिम आरोप सिध्द होत नाहीत, तोपर्यंत त्याच त्याच विषयाचा ऊहापोह वारंवार केल्यामुळे तीच बातमी वर्तमानपत्रामध्ये जात त्यामुळे वर्तमानपत्रातून लोकांपर्यंत चुकीचा संदेश जातो. यातून राजकीय लोकांची प्रतिमा डागाळण्याचे काम होत आहे, हे बरोबर नाही. जे दोषी असतील त्यांचे समर्थन कोणी करु नये. जे दोषी असतील त्यांना शासन होईलच, त्यांच्यावर योग्य ती कारवाई झाली पाहिजे, परंतु त्या गोष्टींचा वारंवार उल्लेख केल्यामुळे जनतेपुढे एक वेगळे चित्र निर्माण होते, ही एक दुर्दैवाची बाब आहे. 26 जुलै, 2005 ला खूप मोठया प्रमाणात प्रचंड असा पाऊस पडला. आणि 27 जुलैला राज्य सरकारच्या हेलिकॉप्टरच्या पायलटने खराब हवामान असल्यामुळे सदर परिस्थितीची पाहणी करु शकत नाही, असे माननीय मुख्यमंत्री व माननीय उपमुख्यमंत्री यांना त्यांनी नकार दिला. माननीय मुख्यमंत्री यांनी सरकारच्यावतीने आपल्या नेव्हीच्या हेलिकॉप्टरर्संना विनंती केली, व दोन हेलिकॉप्टर त्यांनी बरोबर घेतली. त्यामध्ये माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री, माननीय अर्थमंत्री आणि तीन दूरदर्शनच्या वाहिन्या यांनी विनंती केली की आमचेही कॅमेरामन आपल्या बरोबर घ्या. आणि ही पाहणी करा.

यानंतर श्री. सांगळे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MJS/ MAP/ KGS/ प्रथम श्री.विठ्ठल खर्चे ..... 19:05

श्री.उल्हास पवार .....

एक तास वीस मिनिटे पाहणी केल्यानंतर पुढे जाण्याकरिता नेहमीच्याही पायलटांनी सुध्दा हवामानामुळे विरोध केला होता तेव्हा माननीय मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री तेथून उतरले व माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री व सर्व अधिका-यांनी महाड पासून ते कोल्हापूर-सांगली पर्यंतचा संपूर्ण महाराष्ट्राचा धावता दौरा केला. हे आपण सर्वांनी पाहिले आहे. दुर्देवाची बाब अशी की, ज्या वृत्तवाहिनीने, चॅनेल्सने दुस-या हेलिकॉप्टरमध्ये आमची व्यवस्था करावी असे सांगितले होते, जे त्या ठिकाणी गेले, ज्यांनी चित्रिकरण केले, त्यापैकी एकाने चित्रवाहिनीचा कॅमेरा माननीय अर्थमंत्र्यांच्या हातात देऊन आपण चित्रिकरण करावे असे सांगितले. अशाप्रकारे चित्रिकरण केल्यानंतर सुध्दा तो वृंतात तीन चॅनेल्सपैकी एकाही चॅनेलने दाखवला नाही, किंवा सांगितले नाही. अतिशय संकटग्रस्त वातावरणात, खराब हवामान असताना, राज्य सरकारच्या हेलिकॉप्टरच्या पायलटने पुढे जाण्यास विरोध केलेला असताना सुध्दा माननीय मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि नेते मंडळी यांनी परिस्थितीची पाहणी केली. अशाप्रकारे समोर आलेल्या सर्व प्रश्नांचा सामना करण्यासाठी सर्व नेतेमंडळी आणि आघाडीचे सरकार मनापासून प्रयत्न करीत आहे हे सिध्द केलेले आहे आणि करुनही दाखवले आहे. भारताच्या इतिहासामध्ये रोखीने पैसे देण्याची अशी एकही घटना घडलेली नाही, अशी घटना महाराष्ट्रामध्ये घडली आहे. ज्यावेळी ही घटना घडली त्यावेळी 24 तास मंत्रालय जागे होते, याबाबत शासनाने ताबडतोबीने निर्णय घेतला. पंचनामा करण्यासाठी विलंब होत असेल तर, प्रसंगी पंचनामा करु नका, एखादी चुकीची मदत दिली गेली तरी चालेल, पण चेकशिवाय रोखीने पहिल्यादांच ताबडतोबीने कोटयावधी रुपयांची मदत करणारी घटना महाराष्ट्रामध्ये घडलेली आहे याबाबतची नोंद न घेता कसे चालेल ? म्हणून माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणामध्ये याबाबतचा केलेला उल्लेख अतिशय महत्वाचा आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेबांनी दुस-या एका मुद्याचा उल्लेख केला, मी आपल्या मताशी सहमत आहे. कुठल्याही पुरोगामी राजकीय नेत्याने कुठल्याही जातीय मेळाव्याला जाता कामा नये. परवा मी नागपूर येथे स्वर्गीय यशवंराव चव्हाण यांच्या जयंतीला गेलो होतो, त्या ठिकाणी मी भाषणामध्ये अतिशय प्रामाणिकपणे सांगितले की, जातीय विचारांनी किंवा जातीयतेने प्रेरीत झालेले जे मेळावे असतील तेथे जाऊ नये. आपल्या देशामध्ये ओबीसी असतील किंवा अन्य जाती असतील, यासारख्या 2500 पोटजाती आहेत. ज्या संख्येने लहान आहेत, त्यांनी काय करायचे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार .....

महात्मा गांधीजींच्या स्वप्नातील, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्वप्नातील आणि परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील ...... महात्मा गांधीजींनी स्वराज्य शेवटच्या माणसासाठी असल्याचे सांगितले आहे. जर तो शेवटचा माणूस सर्वार्थाने गरीब असेल, सामर्थ्यवान नसेल तर त्याने कोणाकडे आवाज उठवावयाचा ? ही बाब खरी आहे. सर्व धर्म समभाव, सर्व धर्म आदरभाव, आपण धर्मनिरपेक्ष म्हणतो, कुणी निधर्मी म्हणतो, कुणी आणखी काय म्हणतो, मी या मताशी सहमत आहे. या निमित्ताने सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेब आपण या ठिकाणी काँग्रेस किंवा आघाडी सरकारवर जो आरोप केलेला आहे त्याबाबत मी अतिशय नम्रपणे सांगू इच्छितो की, ....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, याबद्दल मी क्षमा मागतो. नागपूरच्या समाजाच्या कार्यक्रमाला माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख आले नव्हते आणि मी सुध्दा तेथे गेलो नव्हतो. त्या ठिकाणी राष्ट्रवादी पक्षाचे लोक मात्र हजर होते.

श्री.उल्हास पवार : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख केला होता. या संदर्भात मी सांगू इच्छितो की, ज्यावेळी स्वर्गीय पंडित जवाहरलाल नेहरु यांनी महात्मा गांधीजींना पहिल्या मंत्रिमंडळाची जी यादी दाखवली होती, त्या यादीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि डॉ.राजकुमारी अमृत कौर यांचे नाव नव्हते. तेव्हा महात्मा गांधीजींनी त्यांची नावे पेन्सिलने लिहिली. हे मी सांगत नाही, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सहकारी बॅ.माने यांनी या सर्व गोष्टी लिहून ठेवलेल्या आहेत. त्यामुळे ही जी आत्मियता आहे, ही ढोंगीपणाची नाही. एवढेच नव्हे तर जेव्हा घटना ....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी महात्मा गांधीजींबद्दल बोललो नव्हतो, मी नजिकच्या काळाबद्दल बोललो होतो.

श्री.उल्हास पवार : पंडित जवाहरलाल नेहरुंनी घटना समिती झाल्यानंतर ड्राफ्ट कमिटीचा अध्यक्ष कोणाला करायचे ? याबाबत त्यांनी महात्मा गांधींकडे विचारणा केली व यासाठी आपण परदेशी तज्ज्ञांना बोलवू असे सांगितले. यावर महात्मा गांधीजी पंडित जवाहरलाल नेहरुं यांच्याकडे पाहून अतिशय मिश्किलपणे हसले व त्यांनी पंडित जवाहरलाल नेहरु यांना सांगितले की, या देशामध्ये विद्वान आहेतच. यावर पंडित जवाहरलाल नेहरुंनी विचारले कोण आहेत ते विद्वान ? यावर महात्मा गांधीजींनी सांगितले की, The most sufferer person of this country

MJS/ MAP/ KGS/ प्रथम श्री.विठ्ठल खर्चे ..... 19:05

श्री.उल्हास पवार .....

should be the Chairman of this Draft C0mmittee and that is, Dr.Babasaheb Ambedkar अशाप्रकारे काँग्रेस नेत्यांचे बहुमत असताना सुध्दा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची ड्राफ्ट कमिटीच्या अध्यक्षपदी नेमणूक करण्यात आली. मला या ठिकाणी सांगावेसे वाटते की, आपल्या नाटय संमलेनाचे अध्यक्ष प्रा.दत्ता भगत, ज्यांच्या "वाटा-पळवाटा" हे नाटक खूप गाजलेले आहे, ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीतील आहेत, त्यांनी सांगितले आहे की, या घटना समितीच्या ड्राफ्ट समितीमध्ये एकूण 349 ब्राम्हण सदस्य होते.

यानंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार ....

त्या समितीचे चेअरमन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना केले. हा जो कॉंग्रेसचा, गांधी-नेहरूंच्या कॉंग्रेसचा विचार आहे, आघाडी सरकारचा विचार आहे तो आज नाही तर अगदी पहिल्यापासूनच तो राबविण्याचा विचार कॉंग्रेसने केलेला आहे. सन्माननीय श्री.गडकरी साहेब आपण आघाडी सरकारवर या ठिकाणी आरोप करण्याचा प्रयत्न केला आहे ...

श्री. नितीन गडकरी : आता तर राणे, भुजबळ देखील गांधीवादावर भाषणे करू लागले आहेत., उल्हास पवार बोलतच नाहीत. ..

श्री. उल्हास पवार : तसेच नाही, भारतीय जनता पक्षाने देखील आता गांधीवादी समाजवाद घेतलेला आहे. गांधीवादी समाजवादाचा स्वीकार तुम्ही देखील केला होता. सभापती महोदया, या माध्यमातून मला एवढेच सांगावयाचे आहे की, 1962 साली आर.शंकरन् केरळ राज्याचे मुख्यमंत्री झ ाले आणि ते देशातील पहिले दलित मुख्यमंत्री होते, श्री.दामोदरन् संजीवय्या हे दुसरे दलित मुख्यमंत्री त्यानंतर श्री.जगन्नाथ पहाडिया हे तिसरे दलित मुख्यमंत्री झाले आणि अशा प्रकारे अनेक अल्पसंख्यांक तसेच दलित समाजाचे मुख्यमंत्री या देशात झाले. या महाराष्ट्राचेच सांगावयाचे तर खास करून मी सांगेन की, श्री.वसंतराव नाईक यांच्यासारखे मुख्यमंत्री की जे साडेअकरा वर्षे मुख्यमंत्री होते. त्यांची जात, पोटजात कोणीही विचारली नाही. किंबहुना संपूर्ण महाराष्ट्राने शेतकऱ्यांसाठी आदर्श मुख्यमंत्री म्हणून त्यांच्याकडे पाहिले. त्या अगोदर श्री. कन्नमवार मुख्यमंत्री झाले होते. आंध्र मध्ये त्यांचे मूळ असले तरी शेवटी ते स्वातंत्र्य सैनिक होते ते देखील सामान्य समाजातील होते पण त्यांनाही या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद दिले गेले. माननीय श्री.यशवंतरावजी चव्हाण देशाचे संरक्षण मंत्री झाले तेव्हा माननीय श्री.कन्नमवार यांना मुख्यमंत्री केले गेले. त्यानंतर या राज्यामध्ये बॅ. अंतुले, श्री. सुशीलकुमार शिंदे हेही मुख्यमंत्री झाले. तेव्हा मला सांगावयाचा मुद्दा हा आहे की, मतभेद होतात तेव्हा नेत्यांच्या या बाकीच्या गोष्टींचा उल्लेख केला जाऊ नये. गडकरी साहेब, तुमची आणि मुंडे यांची मैत्री साऱ्या महाराष्ट्राला माहीत आहे. म्हणून मी तिचा या निमित्ताने येथे उल्लेख करतो. आता कल्याणसिंग आणि उमाभारती यांना प्रसंग आल्यावर आपण दूर केलेच ना ? म्हणून लगेच तुमच्यावर त्याबाबत आरोप करता कामा नये. उलट आपली ही परंपरा आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून आजपर्यंत या महाराष्ट्रात कॉंग्रेसने ही परंपरा सांभाळली

......3इ 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पवार ....

आहे. अशा प्रकारे कृतीशील विचार करणारे, सर्वांना सामावून घेणारे आणि सर्वांना समान न्याय देण्याचा प्रयत्न करणारे असे हे आघाडीचे सरकार आहे. म्हणून या ठिकाणी अतिशय प्रामाणिकपणे मी हे मुद्दे मांडतो., बाकी विस्ताराने बोलण्याची आवश्यकता नाही, कारण वेळ खूप झालेला आहे. तेव्हा माननीय राज्यपालांचे अभिनंदन करून त्यांच्या अभिभाषणावरील माझे मनोगत मी थांबवितो. जयहिंद, जय महाराष्ट्र.

****

..... 3इ 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, माननीय राज्यपालांनी जे अभिभाषण या दोन्ही सभागृहाला उद्देशून केले त्यावर खेद व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. या अभिभाषणामध्ये उल्लेख आहे की, शासन 15 ऑगस्ट पूर्वी मुंबईतील आस्थापनांतून बाल कामगार प्रथेचे उच्चाटन करील. त्यासाठी एक कृतीदलाची स्थापनाही करण्यात आलेली आहे. सभापती महोदया, बालकामगार म्हणजे काय ? या विषयी खरे म्हणजे आपल्याला पहावे लागेल. मध्यंतरी शासनाने जरीकाम करणारे जे बाल मजूर होते त्यांना शोधून काढले आणि त्यांना त्यांच्या गावी पाठविण्याचा प्रयत्न केला होता. अनेक आस्थापनांवर धाड टाकली होती. परंतु शासन हे विसरते आहे की, बालकामगार हा केवळ जरीकामच करीत नाही किंवा फुगे बनविण्याचेच काम करीत नाही तर हॉटेल्समधून देखील काम करतात. आज हॉटेलांमध्ये चहा-पाणी ने-आण करणारे कोण आहेत ? भीक मागणारी मुले म्हणजे देखील बालकामगारच आहेत. इतकेच नव्हे तर प्लास्टिक गोळा करणारे, कचरा गोळा करणारेही बाल कामगार म्हणूनच गणले गेले पाहिजेत. यावर आपण का विचार केला नाही ? आपल्याला खरोखरी या प्रथेचे उच्चाटन करावयाचे असेल तर या प्रत्येक बाजूकडे पाहणे अत्यंत आवश्यक आहे. आपण अनेकदा म्हणतो, या सभागृहामध्ये देखील अनेकदा ऊसतोड कामगारांविषयी चर्चा होते तेव्हा त्यांच्या मुलांसाठी शाळा, वस्तीशाळा बनविल्या गेल्या. पण त्या शाळा चालल्या काय ? आपल्या या साऱ्या योजना कागदावरच राहिल्या आणि बालकामगार या योजनांपासून उपेक्षित राहिले. सभापती महोदया, बालसुधार गृहाचे दरवाजे तोडून बालसुधार गृहातील काही मुले 31 डिसेंबरला पळून गेली. त्यातील किती क्रिमिनल होती आणि किती खरोखरी बाल कामगार होते हेही आपल्याला तपासून पहाणे आवश्यक आहे. शासनाला यामध्ये खरोखरी काम करावयाचे असेल तर वीट भट्टीवर काम करणारे जे बाल कामगार आहेत त्यांचाही आपणास विचार करावा लागेल. बरेचदा हा विषय चर्चेला येतो. पण या अभिभाषणामध्ये याचा उल्लेख नाही. कोणत्याही प्रकारची ठोस योजना यामध्ये दिलेली दिसत नाही. शासन केवळ म्हणते आहे की, बाल कामगार प्रथेचे आम्हाला उच्चाटन करावयाचे आहे. ..

( यानंतर श्री. सरफरे .... 3एफ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

जो प्रश्न या सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चेला आला त्याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये करण्यात आलेला नाही. कोणत्याही प्रकारची ठोस योजना यामध्ये राज्याला दिलेली दिसत नाही. शासन म्हणते की, बाल कामगार प्रथेचे आम्ही उच्चाटन करु. परंतु यासंबंधीची आकडेवारी पाहिली तर साधारणपणे 60 टक्के बाल कामगार झोपडपट्टीमध्ये रहातात. त्यातील 10 टक्के मुले चोरी-गुंडगिरी करतात, 10 टक्के मुले शाळेत जात नाहीत, 10 टक्के मुले भावा-बहिणीकडे काम करतात,आणि 30 टक्के मुले आरोग्याला धोकादायक असलेल्या आस्थापनेतून काम करतात. त्याकडे मी शासनाचे लक्ष वेधतो आणि शासन त्याबाबत कोणती कारवाई करणार आहे याचे आम्हाला उत्तर मिळाले पाहिजे.

दुसरा एक महत्वाचा मुद्दा असा की, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये ग्राहकांना वीजेचा पुरवठा सुरळीतपणे करण्यासाठी सर्व जनतेला वीजेचा वापर कमी करण्याचे आवाहन केले आहे. आज दहावी आणि बारावीच्या परीक्षेला बसलेली मुले किती भयंकर दिव्यातून जात आहेत. माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांनाही लोड शेडींगला सामोरे जावे लागत आहे, त्यामुळे अभ्यास होत नाही, परीक्षेला बसू शकत नाही. येणाऱ्या एप्रिल व मे महिन्यातील उन्हाळयामध्ये आपण काय करणार आहात ठाऊक नाही? आज राज्यामध्ये 12 ते 18 तास लोडशेडींग चालू आहे.मध्यंतरी अशी टूम आली होती की, मुंबईमध्ये लोडशेडींग होणार आहे त्यामुळे मुंबईतील सर्व लोक घाबरुन गेले होते. काही दिवस मुंबईच्या रस्त्यावर उभारलेल्या होर्डींगवरील दिवे विझविण्यात आले होते. आता पुन्हा ते चालू करण्यात आले. मी सभागृहाचे एका गोष्टीकडे लक्ष वेधतो की, मी परवा चर्चगेटपासून पश्चिम व पूर्व उपनगरापर्यंत फेरफटका मारण्यासाठी गेलो. रात्री 10 वाजल्यानंतर दुकाने बंद झाली होती. परंतु त्यांच्या शोकेसमध्ये सुशोभित केलेले पुतळे ज्यांना आपण मॅन्युकुअर म्हणतो, अशा वेगवेगळया प्रकारच्या कपडे घालून सजविलेल्या पुतळयांच्या डोक्यावर लाईट पाडलेला असतो. आपल्या लिंकिंग रोडवरुन जर आपण फेरफटका मारला तर वंदना साडी सेंटर नावाच्या दुकानाच्या दुसऱ्या मजल्यावर व तळ मजल्यावर सुशोभित केलेल्या शोकेसमध्ये तरुणींचे पुतळे ठेवण्यात आले असून त्या पुतळयांच्या डोक्यावर हॅलोजनचे लाईट लावण्यात आले आहेत. अशाप्रकारे रिबॉक, मॅनोरम सारख्या अनेक दुकानातील रात्रभर चालू असलेले दिवे आपण कधी विझविणार आहात? मुंबईमध्ये सद्‌गुरु फ्रेम नावाचे प्रसिध्द दुकान आहे. त्या दुकानामध्ये रात्रभर लाईट जळत असतात याचा आपण विचार



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

करणार आहात की नाही? रात्री चालू केलेले व सकाळी 9 वाजेपर्यंत चालू असलेले हे दिवे जर आपण बंद केले तर आज ज्या मुलांच्या घरामध्ये वीज नाही त्यांना अभ्यास करण्याकरीता रात्रीच्या वेळी वीज मिळेल आणि त्या मुलांचे भविष्य उज्ज्वल होईल.

सभापती महोदया, नंदूरबार जिल्हयामध्ये बर्ड फ्लू हा कोंबडयांवरील रोग पसरला. या रोगाने आता जळगाव आणि नाशिक जिल्हयामध्ये थैमान घातले आहे. परंतु त्याबाबत राज्य सरकारने काही ठोस उपाय योजना केल्याचे दिसत नाही. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये फक्त नवापूर आणि नंदूरबारचा उल्लेख करण्यात आला आहे. तेव्हा या बर्ड फ्लूला आळा घालण्यासाठी आपण कोणती उपाय योजना करणार आहात याची माहिती मिळणे आवश्यक आहे. कारण हा रोग बर्ड टू हयुमन झाला तर काय करणार? या रोगाला आळा घालणारी आपल्याकडे यंत्रणा आहे काय? त्या करीता अर्थसंकल्पामध्ये तरतूद केली आहे की नाही हे उद्या सभागृहामध्ये सादर होणाऱ्या अर्थसंकल्पामधून आम्हाला समजेल. खरे म्हणजे या बर्ड फ्लूच्या धोक्याचा इशारा जागतिक बँक संघटनेने सहा महिन्यापूर्वी दिला होता. काल प्रश्नोत्तराच्या वेळी मंत्रिमहोदयांनी यासंबंधी ठोकळेबाज उत्तर दिले की, ज्या अधिकाऱ्यांना हा धोका सहा महिन्यापूर्वी कळला असेल त्यांच्यावर कारवाई करु. बर्ड फ्लू येणार आहे हे सहा महिन्यापूर्वी समजले होते, डॉ. स्वाती पिरामल यांनी राज्य सरकारला कॉप्युटरच्या मदतीने या बर्ड फ्लूचा कसा प्रसार होतो हे दाखविले होते, त्याचे डेमॉस्ट्रेशन करुन दाखविले होते. तेव्हा हे शासन झोपले होते. आणि आता माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये त्यासंबंधी त्रोटक उल्लेख आहे. यापूर्वी यु.के. मध्ये बर्ड फ्लू येऊन गेला त्यावेळी त्यांनी कोणती उपाययोजना केली होती?

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (पुढे सुरु....

कॅप्ट्यू बर्डवर बंदी घातली, पक्षी इम्पोर्ट करण्यावर बंदी घातली गेली. महाराष्ट्रात बर्ड फ्ल्यू येऊन देखील उपाययोजना करण्याबाबतचे कोणतेही धोरण राज्यात राबविले नाही. आपल्याकडे कोणत्याही प्रकारची तपासणी करण्यासाठी प्रयोगशाळा नाही. ज्या प्रमाणे हॉकाँगमध्ये रॅपिड टेस्ट केली जाते. म्हणजे बर्ड फ्ल्यू झालेल्या एखाद्या माणसाचे रक्त तपासले तर 10 मिनिटामध्ये त्याचा रिपोर्ट येऊ शकेल,अशी व्यवस्था केलेली आहे. त्यांनी देखील दुसऱ्यांकडून तंत्रज्ञान विकसित करुन घेतलेले आहे. अशाप्रकरचे आपल्या राज्याने कोणत्याही प्रकारे प्रयत्न केले नाहीत, हे मला खेदाने सांगावेसे वाटते. आख्या महाराष्ट्रातील तीन माणसे, डॉ.डोके याच्या बरोबर दिल्लीला जाऊन ट्रेनिंग घेऊन आलेली आहेत. उद्या जर महाराष्ट्राला बर्ड फ्लूची लागण झाली आणि बर्ड टू ह्युमन अशाप्रकारचा प्रसार होऊ लागला, महामारी आली तर ही तीन माणसे उपचारासाठी पुरेशी आहेत काय ? हा पश्न आपल्या सर्वांसमोर उभा रहातो. इतक्या दिवसामध्ये स्पेशल मोलॅक्युलर टेकनिक विकसित करण्याची आवश्यकता होती, याबाबतीत देखील शासनाने अतिशय शांतता बाळगली आहे. केवळ पोल्ट्री फार्म वर्कर्सना, किंवा पोल्ट्री फार्म धारकांना पैसे देऊन हा प्रश्न सुटणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी तेथे काम करणाऱ्या लोकांना देखील पैसे मिळणे आवश्यक असल्याबाबत सांगितले. शासनाने ते मान्य केलेले आहे. श्री.तावडे साहेब, पैसे प्रत्यक्षात हातात मिळतील तेव्हा पाहू. आता नुसते आश्वासन मिळालेले आहे. पण बर्ड फ्ल्यूच्या बाबतीत शासन अतिशय उदासिन आहे, असेच दिसून येते.

सभापती महोदया, "चिकन गुनिया" म्हणून रोग आलेला आहे, अशाप्रकारचे आरोग्य मंत्र्यांनी काल स्टेटमेंट केलेले आहे वास्तविक पहाता, त्याला कोणताही आधार नाही. कोणत्या आधारावर त्यांनी हे स्टेटमेंट केले ? माहिती नाही. सभापती महोदया, 46 क्रमांकाच्या परिच्छेदामध्ये म्हटलेले आहे की, "माझ्या शासनाने प्राथमिक आरोग्य केंद्र आणि रुग्णालयातील पायाभूत सुविधा सेवा सुधारण्यासाठी "राज्य ग्रामीण आरोग्य अभियान" सुरु केलेले आहे." हे नेमके कोणते अभियान आहे माहीत नाही. परंतु मला असे वाटते की, केंद्र सरकार प्रत्येक आरोग्य केंद्रासाठी 20 लाख रुपये देते, तशाप्रकारचे अभियान असावे, असा माझा समज आहे. तसे कोणी याबाबतीतील स्पष्टीकरण केलेले नाही. मी अनेकांना "राज्य ग्रामीण अभियान", काय आहे, याचे काही स्पष्टीकरण आहे काय ? त्यावर कोणी उत्तर देऊ शकलेले नाही.

SKK/ MAP/ KGS/

डॉ.दीपक सावंत (पुढे सुरु.....

सभापती महोदया, गेल्यावेळी कुपोषणासाठी "राजमाता जिजाऊ माता बाल पोषण मिशन" अशाप्रकारची संस्था स्थापन केली होती. त्याचे ऑफीस संभाजी नगरमध्ये म्हणजेच औरंगाबादमध्ये होते, त्याचे अध्यक्ष श्री.रमणी म्हणून आय.ए.एस. ऑफीसर होते. आजपर्यन्त त्यांनी काय काम केले ? याबाबत सभागृहाला याची काहीच माहिती नाही. या योजनेमधून ग्रामीण भागाला, आदिवासी भागाला जोडणारे रस्ते जोडले जातील, असे ठरले होते. कालच मोखाडा येथील रस्त्यांचा प्रश्न चर्चेला आलेला होता. तेथील रस्ते वाहून गेलेले आहेत. 17 लाख रुपये केलेला खर्च वाया गेला. कालच्या प्रश्नावलीतील प्रश्न पाहिले तर मोखाडा येथील रस्त्यांच्याविषयीचे तीन प्रश्न होते. मोखाडा भाग हा अति संवेदनशील भागामध्ये मोडतो. त्या ठिकाणी "राजमाता जिजाऊ योजना" राबवत असाल तर हे रस्ते आजपर्यन्त मागे का राहिले ? सभापती महोदया, आम्ही जेव्हा येथे आवाज उठवितो, त्यावेळेस आमच्या तोंडावर मिशन फेकून आम्ही त्या प्रश्नामध्ये कार्यरत आहोत असे सांगितले जाते. परंतु त्याचा अहवाल सादर होत नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई गोऱ्हे आणि मी, डॉ.अभय बंग यांचा अहवाल सभागृहामध्ये सादर व्हावा म्हणून जंगजंग पछाडले. शेवटी त्या अहवालाचे काय झाले ? शेवटी, तो अहवाल बासनातच गुंडाळला गेला. तशीच ही योजना आहे. असे सांगितले जाते की, हा प्रयोग म्हणून ही योजना चालू केलेली आहे. प्रत्यक्षात कुपोषणाची काय स्थिती आहे ? याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री.गडकरी साहेब आपल्या भाषणामध्ये सांगणार होते, परंतु ते वेळेच्या अभावी बोलले नाहीत. मला सांगून गेले की, तुम्ही या विषयावर बोला, म्हणून सांगून गेले. या कुपोषणाची परिस्थिती अतिशय भयानक आहे. मध्यंतरी माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील साहेबांनी मेळघाटचा दौरा केलेला होता. त्यावेळेस सांगितले होते की, प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये आणि ग्रामीण रुग्णालयामध्ये पेडियाट्रीक डॉक्टरांची आणि गायनाकॉलॉजिस्ट डॉक्टरांची व्यवस्था करु. साहेब आपण तेथून गेल्यानंतर दोनच दिवसामध्ये तेथील डॉक्टर पळून गेले. मी आपल्याला विनंती करु इच्छितो की, आपल्याला खरोखर ही योजना राबवावयाची असेल तर ज्या दिवशी डॉक्टरांना अपॉईनमेंट द्याल, त्याच दिवशी त्यांना सहा महिन्यानंतरचे रिलिव्ह लेटर द्यावे आणि सांगावे की, तुम्हाला सहा महिनेच येथे काम करायचे आहे. तरच तेथे डॉक्टर रहातील. दुसऱ्या सहा महिन्यासाठी दुसऱ्या डॉक्टरांची पोस्टींग करावी. असे केले तर तेथे डॉक्टर रहातील. कारण त्याला माहिती असते की, मला सहा महिनेच काम कराचे आहे, माझी ही पनिशमेंटची पोस्टींग नाही.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

अशा प्रकारे जर आपण केले तर खरोखर त्या भागात आपल्याला डॉक्टर्स मिळतील आणि त्या भागातील आरोग्याची व्यवस्था जी 100 टक्के नादुरुस्त झाली आहे ती 40 टक्के तरी दुरुस्त होईल. सभापती महोदया, न्याय वैद्यक प्रयोगशाळेविषयी या सभागृहामध्ये अनेक वेळा बोलले गेले. न्याय वैद्यक प्रयोगशाळेमध्ये आज हजारो प्रकरणे प्रलंबित आहेत. आपण त्यासंदर्भात उल्लेख केला आहे. त्या ठिकाणी पदांची निर्मिती झालेली नाही. पदनिर्मिती झाली असेल तर ती पदे भरली गेलेली नाहीत. आज आपल्याकडे 27 हजार पेक्षा जास्त नमुन्यांचे रिपोर्टस् यावयाचे बाकी आहेत. 2005 मधील किती नमुन्यांचे रिपोर्टस् यावयाचे असतील, 2006 मधील किती नमुन्यांचे रिपोर्टस् यावयाचे असतील याची आकडेवारी आता माझ्याकडे नाही पण 2004-05 मधील 27 हजार नमुन्यांचे रासायनिक विश्लेषण करावयाचे शिल्लक असल्याची माझी माहिती आहे. आपण मोबाईल न्याय वैद्यक प्रयोगशाळा सुरु केली. त्याला प्रतिसाद मिळाला नाही. ती प्रयोगशाळा सुध्दा बंद आहे. मी हे जबाबदारीने सांगतो. आज आपल्याला ब्रेन मॅपिंग टेस्ट करण्याची आवश्यकता भासते. आपण कोठे तरी कमी पडतो म्हणून ब्रेन मॅपिंग टेस्टची आवश्यकता भासते. आज जी गुन्हेगारी वाढली आहे ती पोलिसांमध्येच वाढली आहे. अचूक कसे खोटे बोलावयाचे आणि कायद्यातील पळवाटा कशा काढावयाच्या हे त्यांच्यापेक्षा चांगले आणखी कोणाला माहीत असणार ? त्यामुळे नवीननवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे लागते. आधुनिकीकरणाला आमचा विरोध नाही. चंदीगडला एखादी टेप पाठविली की, नंतर त्या ठिकाणाहून रिपोर्ट येतो. त्यासंदर्भात आपल्याकडे तंत्रज्ञान विकसित केले असले तरी त्यासाठी तंत्रज्ञ असणे महत्वाचे असते. नाही तर त्या सर्व गोष्टी पाण्यात जातील. सभापती महोदया, आपण मला बोलण्यासाठी वेळ दिला त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो आणि मी माझे भाषण संपवितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2...

RDB/ KGS/ MAP/

श्री. रमेश निकोसे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, महामहिम राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यासाठी मी उभा आहे. या वर्षभरामध्ये महाराष्ट्रावर अनेक संकटे आली आणि ही संकटे अशी आली की, त्यातून सावरणे सरकारला फार कठीण गेले. अजूनही ते काम चालूच आहे. महाराष्ट्रामध्ये पाऊस आला नाही म्हणून साधूसंतांनी पूजा करण्यास सुरुवात केली. जिकडेतिकडे यज्ञ व्हावयास लागले. माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख हे पंढरपूरला गेले. त्यांनी पंढरीनाथाला सांगितल की, माझ्या महाराष्ट्राला वाचव. ते तिकडून परत आले आणि दोन चार दिवसांनी पाऊस सुरु झाला. गेल्या 75 वर्षात महाराष्ट्रात जेवढा पाऊस झ ाला नाही तेवढा पाऊस त्यावेळी झाला. त्यामध्ये जनावरे वाहून गेली. शेतकऱ्यांची पिके बुडाली. सोयाबीनचे पीक बुडाले. भंडारा जिल्हयामध्ये धानाचे नुकसान झाले. कापसाचे नुकसान झाले. शेतकरी हवालदिल झाले. मुंबईमध्ये मिठी नदीला पूर आला. मिठी नदीला एवढा पूर आला की, त्या प्रवाहामध्ये टेम्पो, स्कुटर्स, मोटारगाड्या सापडल्या. जिकडेतिकडे पाणीच पाणी भरले होते. दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात बातमी आली की, माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख हे वर्षा बंगल्यामध्ये बसून हा पूर पाहात होते. ते मदतीला धावले नाहीत. समजा ते जर पुराच्या ठिकाणी गेले असते आणि सरकारी गाडी वाहून गेली असती तर एवढ्या पुरामध्ये कशासाठी जावयाचे हे माननीय मुख्यमंत्र्यांना समजत नाही काय असेही लोक म्हणाले असते. सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी सांगितले की, दोन हेलिकॉप्टर्समधून माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री यांनी मुंबईचा सर्व्हे केला. ते टी.व्ही. चॅनेल्सच्या लोकांनाही घेऊन गेले होते परंतु दुसऱ्या दिवशी एकानेही ती बातमी दिली नाही. माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री हे निष्क्रिय आहेत अशी बातमी देण्यात आली. मला हे समजत नाही की, माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख पंढरपूरला गेले आणि त्यांनी देवाकडे प्रार्थना केली म्हणजे त्यांचे इंद्रदेवाबरोबर डायरेक्ट संबंध होते काय ? दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात बातमी आली की, ते वर्षा बंगल्यात बसून पूर पाहात होते.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रमेश निकोसे पुढे सुरु...)

महाराष्ट्र शासनाने शेतक-यांचे तप्त अश्रू पुसण्यासाठी जरुर मदत केलेली आहे, त्याबद्दल मी या सरकारचे तसेच महामहिम राज्यपालांचे अभिनंदन करतो. ही मदत करुन देखील विरोधासाठी विरोध करायचा म्हणून ठिकठिकाणी विरोधात बोलले गेले, वर्तमानपत्रातील बातम्या देखील विरोधात छापल्या गेल्या. पण "गैर तो गैर, अपनों ने भी क्या कम किया" या पंक्तीप्रमाणे स्वपक्षाचे लोक सुध्दा माननीय मुख्यमंत्र्यांच्या विरोधात बोलू लागले, ही अत्यंत खेदजनक बाब आहे. या शासनाने लोकांना तातडीने मदतीचा हात दिलेला आहे. जेवढे पाहिजे होते तेवढे या सरकारने दिलेले आहे.

या राज्यातील शेतक-यांची स्थिती अत्यंत भयानक आहे. फळबाग लागवडीसाठी शंभरटक्के अनुदान देण्याची घोषणा शासनाने केली. शेतक-यांनी या घोषणेनुसार संत्री, मोसंबीची झाडे लावली. परंतु शेतक-यांना अनुदान मिळालेले नाही. मी शेतक-यांना विचारले की, शासनाने जाहीर केलेल्या अनुदानाप्रमाणे आणास काही अनुदान मिळाले काय ? त्यावेळी शेतक-यांनी नाही म्हणून सांगितले. अनुदान मिळाले नाही तर झाडे कशी जगवायची असा प्रश्न शेतक-यासमोर आहे. शेतकरी शेतामध्ये स्वत: राबत असताना त्याला मजूर देखील लावावे लागतात. या मजुरांचा संसार मजुरीवर असल्यामुळे दर आठवड्याला त्या मजुरांना कोणत्याही परिस्थितीमध्ये मजुरी द्यावीच लागते. तेव्हा माझी या निमित्ताने शासनाला अशी विनंती आहे की, फळबाग योजनेंतर्गत शेतक-याला जी शंभर टक्के मदत जाहीर केलेली आहे ती लवकरात लवकर द्यावी. तसेच या आर्थिम मदतीमध्ये वाढ करावी अशीही माझी शासनाला विनंती आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये अनेक चांगल्या गोष्टींचा अंतर्भाव केलेला असून त्याची मी वेळेच्या अभावी पुनरावृत्ती करु इच्छित नाही. मुंबईचे वैभव वाढविण्याच्या संदर्भात माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये उल्ल्ेख करण्यात आलेला आहे. परंतु मी सांगू इच्छितो की, परदेशातील पर्यटक भारतामध्ये येऊन त्याने दिल्ली, ताजमहाल पाहिल्यानंतर आता भारतात काय पाहाण्यासारखे आहे असा जेव्हा विचार करील त्यावेळी त्याला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे चैत्यभूमी येथील स्मारकाचे स्मरण झाले पाहजे अशा त-हेचे हे भव्य-दिव्य स्मारक शासनाने करावे. चैत्यभूमी येथील स्मारकासाठी शासनाने 10कोटी रु. दिले. त्यानंतर 5 कोटी रु.दिले. पण काम मात्र अत्यंत संथ गतीने सुरु आहे. ज्यांनी भारताची घटना लिहिली त्यांचे स्मारक हे वैभवशाली असे व्हावयास

.2..

(श्री. रमेश निकोसे ...)

पाहिजे. त्यासाठी राज्याने अन्य राज्यांडे मदत मागावी, केन्द्राकडे मदत मागावी आणि भव्य-दिव्य असे स्मारक करावे अशी माझी या निमित्ताने शासनाला विनंती आहे.

तालिका सभापती महोदया, गांधीजींनी "खेड्याकडे चला" असे म्हटले होते. गांधीजींनी बरोबर म्हटले होते. औद्योगिक धोरणाच्या बाबतीत, शासन कुणाचे असले तरी - मग ते युतीचे असो अथवा आघाडीचे असो - प्रत्येकाच्या भावना तीव्र आहेत. दुर्दैवाने सांगावे लागते की, मुंबईतील तसेच नागपूर मधील गिरण्या बंद पडल्या आणि गिरणी कामकार उद्ध्वस्त झाले. परंतु शासनाच्या औद्योगिक धोरणामध्ये बदल झाला नाही. जुने ब्रिटीशकालीन नियम नगररचना विभाग आजही अमलांत आणू पहात आहे. विरार, वसई, बिले-बाफने याठिकाणी पडिक जमीन असून त्याठिकाणी उद्योजक उद्योग सुरु करण्याची परवानगी मागत आहेत. परंतु ती परवानगी त्यांना दिली जात नाही. आज मुंबईमध्ये परप्रांतीयांचे लोंढेच्या लोंढे येऊन आदळत आहेत. त्यांना रोखा असे आपण म्हणत असलो तरी त्यांना कसे रोखणार ? माझी शासनाला या निमित्ताने अशी विनंती आहे की, वसई, विरार, रायगड याठिकाणच्या पडिक जमिनीमध्ये उद्योजकांना उद्योग सुरु करण्याची परवानगी द्यावी. या पध्दतीने शासनाने औद्योगिक धोरण राबविले तर गावातील लोक गावातच राहातील. ते मुंबईकडे धाव घेणार नाहीत.

...नंतर श्री.कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.शिगम 19:35

श्री. रमेश निकोसे .....

सभापती महोदया, गेल्या तीन वर्षापासून अनुशेष भरण्याचे धोरण सरकारने आखलेले आहे. आतापर्यंत 1 लाख 40 पदे अनुशेषामधून भरली असे सांगितले गेले. त्यानंतर काही लोक औरंगाबाद येथील हायकोर्टाच्या बेंचपुढे गेले. त्यानंतर एक जीआर सरकारने काढला आणि अनुशेष भरण्याचे काम थंड पडले आहे. मी शासनाला विनंती करतो की, अनुशेष भरण्याची मोहीम पुन्हा सुरु करावी. आजही अनेक विभागांमधून बॅकलॉग भरलेला नाही. सभापती महोदया, मी जिल्हा उद्योग केंद्रामध्ये गेलो होतो. पंतप्रधान रोजगार योजनेबाबत माहिती विचारली असता मला दु:खाने सांगावेसे वाटते की राज्य सरकारने या योजनेमध्ये एकही पैसा दिलेला नाही. केंद्र सरकारकडून जो पैसा येतो त्यामध्ये कार्यालय चालवावे लागते,मटेरियल प्रिंट करावे लागते. तसेच उद्योगधंदे काढण्यासाठी प्रोत्साहन द्यावे लागते. केंद्र सरकार 500 रु. देते त्यामध्ये प्रशिक्षणासाठी 300 रु. खर्च होतात. विद्यार्थ्यांना स्टायपेंड दिला जातो. परंतु राज्य शासनाने गेल्या 10 वर्षात एकही पैसा दिलेला नाही. औद्योगिक क्रांती केल्याशिवाय लोकांना रोजगार कुठून मिळणार असा प्रश्न आहे. राज्यामध्ये अंगणवाडया निर्माण करण्यात आल्या. अंगणवाडयांच्या माध्यमातून स्त्रियांना आणि विधवांना नोकऱ्या मिळाल्या. परंतु सप्टेंबरपासून या कर्मचाऱ्यांना पगार नाही. सकस आहार योजनेमध्ये सांगण्यात आले की बजेट पास झाल्यानंतर पैसे मिळतील. याकडे शासनाने तातडीने लक्ष द्यावे. सभापती महोदया, विदर्भातील दलित साहित्यिक कै.ना.रा.शेंडे यांचे स्मारक होणे गरजेचे आहे. कै.शेंडे हे विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष होते. त्यांच्या काळातील न.चि.केळकर,प्र.के.अत्रे,वि.स.खांडेकर,ना.सी.फडके आणि ग.त्र्यं.माडखोलकर यांच्या तोडीचे साहित्यिक होते. त्यांनी अनेक पुस्तके आणि कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यांनी आपल्या काळामध्ये 25 वर्षे ग्रामीण भागात साहित्य संमेलन भरविले होते. ते गणेशपूर,जि.भंडारा येथील रहिवासी होते. या दलित साहित्यिकाचे घर स्मारक म्हणून व्हावे यासाठी मी जिल्हाधिकारी,भंडारा यांना स्वत: भेटून पत्र दिले होते. परंतु त्या पत्राची दखल घेण्यात आली नाही. जिल्हाधिकारी यांनी या पत्राकडे लक्ष दिले नाही याचे मला दु:ख होते. त्यांनी मृत्यूपूर्वी वैनगंगेच्या तिरावर स्मशानामध्ये आपली समाधी बांधली होती. अशा या थोर साहित्यिकाच्या स्मारकाकडे शासनाने लक्ष देणे आवश्यक आहे.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे ...

सभापती महोदया,

" समझ समझ को समझ के समझो
समझ समझ भी एक समझ है.
मेरी समझ को तुम ना समझे
तो क्या मेरी ही समझ ना-समझ है"

शेतकऱ्यांचे अश्रू पुसण्यासाठी आपण हाताला काम दिले पाहिजे. पाच एकर,तीन एकर जमीन नापिकी झाल्यामुळे शेतकरी आत्महत्या नाही करणार तर काय करणार ?

यानंतर श्री.खर्चे पी.

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे .........

विदर्भात आत्महत्त्यांचे प्रमाण जास्त आहे. मग यवतमाळ, चंद्रपूर, भंडारा अथवा नागपूर असो, ज्या ज्या ठिकाणी जुने तलाव आहेत त्यातील गाळ काढला तर त्या ठिकाणची पाण्याची पातळी वाढेल पण तसा कुठलाही प्रयत्न शासनाने केला नाही, त्यामुळे शेतकरी केवळ जळतच राहिला. या निमित्ताने मी असे सांगू इच्छितो की,

"जली को बुझाना नही कोई मुश्किल,
बुझी को जलाना नही कोई मुश्किल,
यारो, दिल की लगी को बुझाना,
है बडा मुश्किल."

अशा प्रकारे आपला प्रपंच चालवितांना ज्या गोष्टींना शेतकऱ्याला सामोरे जावे लागते त्या म्हणजे मुलांचे शिक्षण होत नाही, मुलीचे लग्न होत नाही, लोड शेडींगला देखील सामोरे जावे लागते. अशा वेळी तो दरिद्री नारायण आत्महत्या करण्यासाठी प्रवृत्त होतो. कारण सावकाराकडून 10 टक्क्याचे कर्ज त्याने उचललेले असते. माननीय राज्यपालांच्या भाषणामध्ये या गोष्टीचा उहापोह झ ालेला आहे म्हणून केवळ विरोधासाठी विरोध नको म्हणून मी या अभिभाषणाचे समर्थन करीत आहे. शेवटी आपले राज्य हे पुरोगामी राज्य असून ते समृध्द झाले पाहिजे. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या सगळया गोष्टींचा विचार करुन जे प्रयत्न केले त्याप्रमाणे हे राज्य भरभराटीस आणावे अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

-----------------

........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

महोदया, माननीय राज्यपालांचे अभिभाषण खरे म्हणजे राज्यशासनाचा वर्षभराचा राज्यकारभार कसा यासंबंधीचे मूल्यमापन व प्रतिबिंब त्यामध्ये दिसून येते. परंतु आपण त्यांचे अभिभाषण ऐकल्यानंतर त्यातील ठराविक बाबी या महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील आघाडी कायम राखण्यासाठीच, जणू विकास प्रक्रियेला ग्लोबल व्हिजन देण्याचाच प्रयत्न झाल्याचे यातून आपल्याला दिसून येते. त्यातही किती तथ्य आहे याची मला शंका येते. माननीय राज्यपालांचे अभिभाषण हे नवीन नाही तर प्रत्येक वर्षी तेच तेच अभिभाषण आपण ऐकत आलो आहोत. मुळातच यावेळचे जे भाषण झाले आहे ते केंद्रशासनाच्या योजनांवरच आधारित आहे असे वाटते कारण राज्यशासनाच्या ठोस योजना व कार्यक्रम यांचा आभास या अभिभाषणातून जाणवत होता. मागील वर्षी 40 लाख बेरोजगारांना नोकऱ्या मिळतील, विदेशी गुंतवणूकीचे प्रस्ताव घोषित करण्यात आले होते परंतु त्यातील किती लोकांना नोकऱ्या मिळाल्या आणि किती कोटीचे प्रस्ताव आले हा संशोधनाचाच विषय म्हणता येईल. माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणामध्ये उल्लेख करतांना मागील वर्षीच्या जुलै महिन्यात जी नैसर्गिक आपत्ती ओढवली होती त्यासंदर्भात सरकारने आपलेच कौतुक थोडयाफार प्रमाणात करुन घेतले, जे पूरग्रस्त आहेत त्यांना काही मदत मिळाली मुंबईमधील झोपडपट्टीतून काही प्रमाणात मदत दिली परंतु मोठमोठया इमारतींच्या तळमजल्याचे पूर्णपणे नुकसान झालेले असतांना त्यांचा सर्व्हे अजूनही झालेला नाही व त्यांना काडीचीही मदत मिळाली नाही. शेतकऱ्यांच्या बाबतीत विचार केला तर संपूर्ण राज्यात 1200 पेक्षा जास्त व्यक्ती मृत झाल्या आणि 27000 हून अधिक जनावरे वाहून गेली. ज्यांची जनावरे वाहून गेली त्यांनाही मोबदला मिळाली नाही. महाडजवळच जुईनगर या गावात तर पूर्ण गांवच दरड कोसळल्यामुळे मृत्युमूखी पडले, त्यातील काही लोकांना अजूनही शासनाची मदत मिळालेली नाही. आपद्ग्रस्तांना मदत करण्यात खरे म्हणजे स्वयंसेवी संस्था मोठया प्रमाणात पुढे आल्या होत्या. शासनाकडून अन्न-धान्याचे वाटप झाले पण अन्नधान्याचे वाटप करतांना या आपत्तीमध्ये कोण व किती लोक अडकलेले होते याचा सर्व्हे देखील पूर्णपणे झालेला नाही.

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे...

जे आपत्तीमध्ये सापडले नाहीत, त्यांना देखील मदत केली आहे, हे आमच्या लक्षात आले आहे. मुंबईमध्ये हाहाकार उडण्याला अनेक कारणे आहेत. प्लास्टिक पिशव्यांचे कारण हे महत्त्वाचे आहे. मुख्यमंत्र्यांच्या बैठकीमध्ये केवळ हेच एक कारण मुंबईच्या हाहाकारासाठी नाही असे सांगून या हाहाकाराबाबत विचार केला पाहिजे असे मी सुचविले होते. शासनाने वारंवार पडणाऱ्या दुष्काळाबद्दल देखील वक्तव्य केले आहे. दुष्काळग्रस्त तालुक्यांसाठी महामंडळ स्थापन करण्यात येईल असे शासनातर्फे सांगण्यात आले होते. त्याचे काय झाले ? आज पाऊस पडला काय किंवा न पडला काय राज्यातील काही भाग दुष्काळी आहे मान्य करावे लागेल. त्यासाठी शासनाने दुष्काळग्रस्त भागांसाठी लवकरात लवकर महामंडळ स्थापन करणे गरजेचे आहे. आज राज्यातील अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. विदर्भ, मराठवाडा येथे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे. पश्चिम महाराष्ट्रामध्ये देखील काही शेतकऱ्यांना आत्महत्या केल्या आहेत. या शेतकऱ्यांनी व्यसनामुळे आत्महत्या केल्या असे शासनातर्फे सांगण्यात येते. पण हे काही खरे कारण नाही.

मार्चच्या पहिल्या आठवडयामध्ये महाराष्ट्रातील काही भागांमध्ये गारपीट झाली. यामुळे संत्रा व धानासह अन्य पिकांचे देखील नुकसान झाले. तसेच, शेतकऱ्यांच्या घरांचे देखील नुकसान झ ाले. या गारपिटीमुळे काही जनावरे देखील मृत्युमुखी पडली. त्याची सुध्दा दखल येथे घेणे आवश्यक आहे.

विजेच्या संदर्भात शासनाने धोरण जाहीर केले होते. परंतु, प्रत्यक्षात एक मे.वॅ.वीज निर्मिती देखील शासनाने केलेली नाही. आज ग्रामीण भागातील 35 टक्के घरांमध्ये वीज पोहोचलेली नाही. गेल्या वर्षी 1200 मे.वॅ.वीज प्रकल्पाची घोषणा केली होती. ती मार्गी लावण्यासठी शासनाने प्रामाणिकपणे पावले उचलली नाहीत. आज 8-10 तास भार नियमन होत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. तसेच, या भारनियमानाचा फटका ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रासुध्दा बसत आहे. ग्रामीण भागातील शाळांमध्ये परीक्षेच्या दिवशी वीज नसल्यामुळे अपुऱ्या प्रकाशात पंख्याविना पेपर विद्यार्थ्यांना सोडवावे लागत आहे. तेव्हा यापुढे परीक्षेच्या कालावधीत त्या त्या केंद्रांवर विजेची सोय उपलब्ध करून देणे अत्यंत गरजेचे आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे...

भिवंडी येथील बाल कामगारांची सुटका करण्यात आली आहे. आज धारावी येथील चर्म उद्योगामध्ये बाल कामगारांचा वापर करण्यात येतो. तसेच, मानखुर्द, शिवाजी नगर येथे अजूनही बाल कामगार जरीचे काम करीत आहेत. छोटया-छोटया खोल्यांमध्ये 50-50 मुले राहत आहेत. या बाल कामगारांना 10 ते 12 तास काम करावे लागते. एवढचे नव्हे तर जे मालक आहेत, ते या बाल कामगारांचे लैगिंक शोषण करीत आहेत, हे देखील लक्षात आले आहे.

सभापती महोदया, कायदा व सुव्यवस्थेवर बऱ्याच जणांनी चर्चा केली आहे. आज आपल्याकडे पोलीस दल लोकसंख्येच्या मानाने अपुरे आहे. घणसोली येथील दंगल आटोक्यात न येण्याचे मुख्य कारण अपुरे पोलीस दल हेच आहे. आज प्रत्येक जिल्हयामधील लोकसंख्या वाढत आहे. तेव्हा पोलीस दलाची संख्या कशी वाढेल याकडे शासनाने लक्ष देणे गरजेचे आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.भारवि.... 19:50

श्रीमती कांता नलावडे....

आज महिलांवर रोज अत्याचार होत आहेत. चार महिन्यांच्या मुलीपासून ते 70 वर्षाच्या वृध्देवर लैंगिक अत्याचार, बलात्कार होताना दिसून येत आहे. एवढेच नव्हे तर सामूहिक बलात्कार सुध्दा होत आहेत. नांदेड-नगर मध्ये वासनाकांडाच्या घटना उघडकीस आल्या आहेत. परंतु यासंदर्भात माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात कसलाही उल्लेख दिसून येत नाही. अभिभाषणातील मुद्दा क्रमांक-32 मध्ये असे म्हटले आहे की, "स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीदिनी, दरवर्षी, पंचायत राज मध्ये लक्षणीय कामगिरी करणाऱ्या पंचायत राज संस्थांचा आणि कर्मचाऱ्यांचा गौरव करण्याचे शासनाने ठरविले आहे." महोदय, ही अतिशय चांगली गोष्ट आहे. परंतु प्रत्यक्षात पंचायत राज संस्थांचा कारभार पाहिला तर, खरोखरच कागदी घोडे नाचविले जात आहे असे आपल्या निदर्शनास येईल. या संस्थांकडून तळे अस्तित्वात नसले तरी तळयातील गाळ काढण्यासाठी 2 लाख रुपयांचा निधी खर्च केला जात आहे. महोदय, आम्ही पंचायती राज समितीच्या माध्यमातून राज्याचा दौरा करतो. अमरावती जिल्हा परिषदेचा ज्यावेळी समितीने दौरा केला त्यावेळी त्या जिल्हा परिषदेमध्ये 6 गट विकास अधिकाऱ्यांची नेमणूक झाली नसल्याचे निदर्शनास आले. मग अशा परिस्थितीत लक्षणीय कामगिरी करणाऱ्या पंचायत राज संस्थांना आपण कशा प्रकारे निवडणार आहात ? त्यांना पुरस्कार कसा देणार आहात ?

आज सकाळी सदनामध्ये महिला बचत गटांच्या संदर्भात चर्चा झाली. महिलांना सक्षम करण्यासाठी महिला बचत गटांकडे रेशनिंग दुकाने देणार आहोत असे सकाळी चर्चेमध्ये सांगितले गेले. परंतु केवळ त्यांच्याकडे दुकाने देऊन त्या सक्षम होतील असे मला तरी वाटत नाही. जर त्यांना खरोखरच सक्षम बनवावयाचे असेल तर त्यांच्या उत्पादनाला योग्य बाजारपेठ मिळवून देणे आवश्यक आहे. उदा.कोकणमध्ये मासेमारी व्यवसाय मोठया प्रमाणावर चालतो. त्यामुळे त्या ठिकाणी महिलांना प्रशिक्षण देऊन, त्यांच्या उत्पादनाला बाजारपेठ मिळवून दिली तरच तेथील महिला सक्षम होऊ शकतील.

महोदय, "संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता मोहीम" अंतर्गत हगणदरी मुक्त गाव ही योजना जाहीर करण्यात आली होती. परंतु खरोखर राज्यात किती गांवे हगणदरी मुक्त झाली आहेत, याचा आढावा सर्वांच्या समोर येणे गरजेचे आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.भारवि.... 19:50

श्रीमती कांता नलावडे....

नंदूरबार जिल्हयातील नवापूर येथे बर्ड फ्ल्यू हा रोग येऊन, त्याचे लोण आता जळगांवपर्यंत पोहोचले आहे. सातारा जिल्हयातील औंधमध्ये 400 कोंबडया अचानक मरण पावल्या. त्यामुळे नेमक्या कोणत्या आजारामुळे या कोंबडया मरण पावत आहेत याकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे.

महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये असा उल्लेख आहे की, "अनुसूचित जातीच्या युवकांचे पोलीस दल आणि सैन्य दलातील भरतीचे प्रमाण वाढविण्यासाठी त्यांना विशेष पूर्वप्रशिक्षण देण्यात येणार आहे." परंतु माझी तर अशी मागणी आहे की, पोलीस किंवा सैन्य दलामध्ये निवड करताना उमेदवारांची गुणवत्ता आणि मानसिकता तपासण्याचे निकष लावण्याची आवश्यकता आहे.

उद्योग विकासासाठी किंवा नवीन गुंतवणीकिला आकर्षित करण्यामध्ये वीज टंचाई ही मोठी अडचण निर्माण झाली आहे. मुंबईच्या विकासाबद्दल आम्ही गेली दोन वर्षे तेच तेच ऐकत आहोत. मुंबईमध्ये जी कामे सुरु आहेत, ती कामे वर्षानुवर्षे रखडलेली आहेत. झोपडपट्टी पुनर्वसन विकास योजना तशीच पडून आहे. मुंबईतील रस्ते एमएमआरडीए अंतर्गत पूर्ण केले जातात. परंतु विक्रोळी-जोगेश्वरी किंवा अंधेरी-घाटकोपर या रस्त्यांची कामे अनेक वर्षापासून रखडलेली आहेत. अनेक वर्षे उलटून गेली तरी रस्ते पूर्ण होत नाहीत. साधा 500 मीटरचा रस्ता तयार करण्यामध्ये अनेक वर्षे उलटून जातात तरी देखील तो पूर्ण होत नाही.

महोदय, म्हाडामध्ये लोकांना प्रॉपर गायडन्स मिळत नाही. अनेक प्रस्ताव म्हाडाकडे धूळ खात पडलेले आहेत. म्हाडाकडून केवळ क्युरीज काढल्या जातात. परंतु त्यांच्याकडून योग्यप्रकारे स्क्रुटीनी मात्र केली जात नाही. म्हणून म्हाडामध्ये डेव्हलपमेंट ऑफिसरची नेमणूक होणे अत्यावश्यक आहे. तसेच नवीन मुंबई उभारण्यामध्ये "सिडको" या संस्थेचा मोठा वाटा आहे. परंतु अजूनही नवी मुंबईसाठी शेत जमिनी गेलेल्या भूमीपुत्रांचा प्रश्न सुटलेला नाही. साडे बारा टक्के योजनेंतर्गत तेथील भूमिपुत्रांचा प्रश्न प्राधान्याने सोडविला पाहिजे.

नंतर श्री.कांबळे....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSK/ MAP/ MHM/ KGS/ SBT यापूर्वी श्री. बोर्डे .. 19.55

श्रीमती कांता नलावडे ....

सभापती महोदय, आपण माननीय राज्यपालांचे अभिभाषण पाहिलेच आहे. त्यामध्ये महिलांवरील अत्याचार, बालमृत्यू तसेच पर्यटनासंबंधी अधिक विचार व्हावयास हवे होते. सभापती महोदय, प्रत्येक महिन्याला शासनाचे एक मासिक प्रकाशित होते. त्या मासिकामध्ये गेल्या वर्षी घेण्यात आलेल्या सर्व 54 निर्णयांची यादी दिलेली आहे. सभापती महोदय, हे मासिक जर आपण बारकाईने वाचले तर गेल्या वर्षी घेतलेला एकही निर्णय पूर्णत्वाला गेलेला दिसत नाही. एवढे सांगून मी आपली रजा घेतो.

----

( यानंतर श्री. शर्मा ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नतिकोद्दीन खतिब (महाराष्ट्र विधान सभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदया, माननीय राज्यपाल महोदय के अभिभाषण पर आभार व्यक्त करने के लिए मैं खड़ा हुआ हूँ. राज्यपाल महोदय अपने अभिभाषण में राज्य की नीतियों के बारे में बताते हैं. इस साल हमारे राज्य में नैसर्गिक आपत्ति आई. मेरे पहले के वक्ताओं ने भी कहा कि इस राज्य में सूखा पड़ा, अतिवृष्टि हुई और अभी मराठवाडा, विदर्भ और पश्चिम महाराष्ट्र के कुछ भाग में गारपीट भी हुई. इस राज्य में जो संकट आए, हमारे शासन ने उन का बहुत अच्छी तरह से मुकाबला किया. इस राज्य के शेतकरी को और मुंबई के गरीब लोगों का जो नुकसान हुआ था, उसकी कुछ न कुछ भरपाई दी गई. इस वजह से उनको कुछ सहारा मिला और इसके लिए मैं शासन को धन्यवाद देता हूँ.

सभापति महोदया, इसी तरह से हमारे राज्यपाल महोदय के अभिभाषण में खास तौर से राज्य में जो हिस्से दुष्काल पीड़ित हैं, वहां के किसानों की फसल बराबर नहीं होती है और वे कर्ज-बाजारी हो गए हैं और आत्महत्या की तरफ जा रहे हैं. इसके लिए महाराष्ट्र शासन ने विदर्भ के लिए पैकेज दिया और इस वजह से हमारे विदर्भ के किसानों को काफी फायदा हुआ और उन्होंने राहत की सांस ली. इसके लिए मैं शासन को मुबारकवाद देता हूँ. इसी प्रकार से शासन ने जो साहूकार ज्यादा ब्याज पर पैसा देते थे, उनके ऊपर निर्बंध लाया गया और महाराष्ट्र में ऐसे 940 लोगों को अन्दर किया गया. जिन लोगों ने उन साहूकारों से पैसा लिया था, उनके लिए माफी की घोषणा की गई और इस तरह से किसानों को राहत मिली. मैं सरकार से विनंती करता हूँ कि किसानों को बैंकों की तरफ से फायनेन्स की सुविधा दिलाई जाए और उनको किसान क्रेडिट कार्ड दिए जाएं तो इससे उनको बहुत फायदा होगा. इससे जो शेतकरी साहूकार की तरफ जाते थे और बाद में आत्महत्या करते थे, वे उस तरफ नहीं जाएंगे.

सभापति महोदया, हमारे शासन ने मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, नांदेड़ और अन्य जिलों में झोंपड़पट्टी में रहने वाले गरीब लोगों के लिए जवाहरलाल नेहरु नेशनल अरबन रिन्यूवल मिशन नाम की योजना शुरु की है. इसमें झोंपड़पट्टी में रहने वाले गरीब लोगों के लिए घर बनाए जाएंगे. शासन ने यह योजना बड़े शहरों के लिए लागू की है. मैं शासन से विनंती करता हूँ कि इस योजना को आप राज्य की "बी" और "सी" क्लास की नगरपालिकाओं के साथ साथ बड़ी बड़ी ग्राम पंचायतों में भी यह योजना लागू की जाए, ताकि वहां पर झोपड़पट्टी में रहने वाले गरीब लोगों को घर मिल सके.

. . . 3N-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्री खतिब जारी

सभापति महोदया, हमारे राज्यपाल महोदय ने अनुसूचित जमाति के युवकों की पुलिस और मिलिट्री में भर्ती करने की योजना के बारे में कहा है, इसके लिए मैं उनको मुबारकवाद देता हूॅं.

.. . . भाषण जारी, नंतर तालेवार.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



पूर्वी श्री शर्मा ... श्री नतिकोद्दीन खतिब.....

सरकार ने एक बहुत ही अच्छी योजना बनाई है. लेकिन मैं संबंधित विभाग के माननीय मंत्री जी से यह विनती करुंगा कि इस राज्य में जो अल्पसंख्यांक समाज है, मुस्लिम समाज है, उनके लिए भी ऐसी कोई योजना बनाई जाए ताकि इन अल्पसंख्यांक समाज के लोग भी मिलिट्री एवं पुलिस विभाग में जा सके और इस देश की मुख्य धारा से जुड़ सके.

सभापति महोदय, आदिवासी समाज के बच्चों के लिए सरकार ने थाना, नाशिक, नंदुरबार, अमरावती एवं गडचिरोली इन 5 आदिवासीबहुल जिलों में 5 निवासी स्कूल स्थापित करने का निश्चय किया है. इसके लिए मैं सरकार को मुबारकबाद देता हूं. लेकिन मेरी माननीय मंत्री जी से विनती है कि जिस प्रकार से आदिवासी बच्चों को मुख्य धारा से जोड़ने के लिए सरकार ने 5 निवासी स्कूल शुरु करने का निश्चय किया है, उसी प्रकार से अल्पसंख्याक समाज के बच्चों के लिए और खास तौर से मुस्लिम समाज के बच्चों के लिए भी निवासी स्कूल की योजना शुरु की जाए. ताकि मुस्लिम समाज एवं अन्य अल्पसंख्याक समाज के बच्चे शिक्षा में आगे आ सके और देश की मुख्य धारा से जुड़ सके.

सभापति महोदय, सरकार से मेरा अनुरोध है कि बिना अनुदान तत्व पर और कायम बिना अनुदान तत्व पर मान्यता प्राप्त स्कूलों को अनुदान देने के संबंध में तत्काल निर्णय लिया जाए. खास तौर से अल्पसंख्याक समाज के लिए स्थपित किए गए स्कूलों को ज्यादा से ज्यादा और जल्द से जल्द अनुदान देने के संबंध में निर्णय लिया जाए. इन शब्दों के साथ माननीय राज्यपाल महोदय का आभार मानते हुए मैं अपना भाषण समाप्त करता हूं. धन्यवाद.

..................................

इसके बाद श्रीमती गो-हे का भाषण

अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ SBT/ MHM/ MAP/ KGS/ प्रथम श्री. कांबळे.. 20:00

डॉ. नीलम गोऱ्हे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडलेले आहेत. त्या मुद्दांची मी पुनरावृत्ती न करता इतर जे मुद्दे मांडावयाचे राहिले आहेत ते मी मांडणार आहे. मराठी भाषेच्या संदर्भात राज्यभर चळवळ उभी करतांना ज्या शहरांची वेगाने वाढ होत आहे त्यामध्ये मुंबई, पुणे, नाशिक, ठाणे त्याचप्रमाणे जळगांव या अनेक शहरांमध्ये मराठी भाषेमध्ये दुकानांच्या पाट्या लावाव्यात यासाठी आंदोलने चालू आहेत, या सदनामध्ये माननीय उपमुख्यमंत्री हजर आहेत. दुकानांच्या ज्या पाटया आहेत त्या मराठी भाषेमध्ये लावण्यात यावयास पाहिजेत. शॉप ॲक्ट च्या संबंधित अधिकाऱ्यांनी सर्व दुकानदारांना नोटीसा काढलेल्या आहेत की, त्यांच्या दुकानांची नावे त्यांनी मराठीमध्ये लावली पाहिजेत. ज्या ज्या दुकानांवरती मराठी पाटया लावलेल्या नाहीत, यासंदर्भात ही बाब अनिवार्य करण्याच्या सूचना सगळया महाराष्ट्र भर अधिकाऱ्यांना दिल्या गेल्या पाहिजेत. पुणे शहरामध्ये आंदोलन केल्यामुळे तेथील कामगार आयुक्त शॉप ॲक्ट प्रमाणे दुकानाच्या पाटया मराठीमध्ये लावल्या पाहिजेत याबाबत कार्यवाही करीत आहेत. अशा सूचना सर्व महाराष्ट्रभर शासनातर्फे सर्व अधिकाऱ्यांना देण्यात आल्या पाहिजेत. आपल्या अतिशय प्रतिष्ठेच्या मुंबई मधील आर्थिक संस्था ती म्हणजे "बॉम्बे स्टॉक एक्सचेंज", आणि प्रत्येक ठिकाणी "बॉम्बे स्टॉक एक्सचेंज" चे नाव सी.एन.बी.सी. वर बी.एस.सी. असे दर्शविले जाते. बॉम्बे स्टॉक एक्सचेंजचा इंडेक्स किती आहे यातून हे नाव भारतभर सगळीकडे सातत्याने जात असते. यासंदर्भात 20 ऑक्टोबरच्या दैनिक सामना पेपरमधील अंतरंगमध्ये श्री. कमलाकर दरवडे यांनी एक सुंदर लेख लिहीलेला आहे. त्यासंदर्भात महाराष्ट्र सरकारने केंद्र सरकारकडे पाठपुरावा करुन "बॉम्बे स्टॉक एक्सचेंज" चे नांव "मुंबई स्टॉक एक्सचेंज" करण्याच्या संदर्भात पावले उचलली पाहिजेत. या ठिकाणी माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाच्या निमित्ताने ही गोष्ट छोटी असली तरी ती अत्यंत महत्वाची आहे. मुंबईमध्ये केंद्र सरकारने नवीन मंत्री दिलेले आहेत. मला मुंबईतील सदस्यांना एक विनंती करावयाची आहे की आपण सत्ताधारी बाकावर बसत असतांना सरकारचे अभिनंदन करतात, परंतु मला माझी व्यथा व्यक्त करतांना असे वाटते की, विधानसभा व विधानपरिषद हे दोन्ही सभागृह अतिशय महत्वाची आहेत. लोकशाहीमध्ये असे आपण म्हणत असतो. असे असून देखील पहिली 5 वर्षे काही कारणांमुळे सन्माननीय सदस्य श्री. छगन भुजबळ

.....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

हे त्यावेळी मंत्री होते. परतु आता विधानपरिषदेचा एकही सदस्य मंत्रिमंडळात नाही. याचे मला खरोखर आश्चर्य वाटते. काल-परवाच्या महाराष्ट्र टाईम्स् मध्ये श्रीमती प्रतिमा जोशी यांनी "आबांची पार्टी " म्हणून एक सुंदर लेख लिहीलेला आहे, तो मी वाचलेला आहे. त्याचे मला खूप आश्चर्य वाटले.

यानंतर श्री. सांगळे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे ....

खेदाची व दु:खाची गोष्ट अशी आहे की, माननीय मंत्रिमहोदय, डॉ.विमल मुंदडा यांचा अपवाद सोडला तर विधानसभा आणि विधानपरिषद या दोन्ही सभागृहांमधील एकही महिला सदस्य राज्य मंत्रिमंडळामध्ये नाही. याबाबत कोणालाही खंत कशी वाटत नाही ? मी विरोधी पक्षाच्या बाकावर बसलेले असल्यामुळे हे सर्व काही बोलत आहे, असे नाही. युतीच्या शासनामध्ये कॅबिनेटमध्ये देखील विधानपरिषदेचे सदस्य होते हे मी या ठिकाणी सांगू इच्छिते. आज महिलांना संधी मिळाली पाहिजे असे सांगितले जाते. परंतु काही लोकांचा महिलांच्या आरक्षणाला उघडपणे विरोध असतो. त्यामुळे त्यांच्याकडून आपण अपेक्षा करावयाची की नाही, हा वेगळया चर्चेचा विषय होऊ शकतो. मी या ठिकाणी वैयक्तिकपणे सांगू इच्छिते की, विधानसभेमध्ये दुस-या पक्षाचे सदस्य असतील तर त्या कोणालाही स्थान द्यावेसे वाटत नाही. जो पर्यंत महिलांना राजकीय प्रतिष्ठा देत नाहीत, तोपर्यंत महिलांनी केलेल्या कोणत्याही मागणीकडे कुचेष्टेने पहायचे व सोडून द्यायचे, ही बाब बरोबर नाही. जो पर्यंत स्त्री मतदारांची लॉबी होत नाही, तो पर्यंत आपण महिलांची थट्टा करु शकता. तसेच प्रत्येकाची अशी अपेक्षा असते की, त्या त्या पक्षातील सदस्यांनी स्वत:च्या पक्षासाठी भांडावे. या ठिकाणी असा प्रश्न आहे की, महिलांना राजकीय प्रतिष्ठा, राजकीय सन्मान व निर्णय प्रक्रियेमध्ये संधी देणे आवश्यक आहे. आज महाराष्ट्रामध्ये पंचायती राज बद्दल फार कौतूक केले जाते. परंतु जिल्हा परिषदेच्या असलेल्या अध्यक्षा, महिला महापौर व महिला सरपंच यांना मदत करण्यासाठी महिला मंत्रिमहोदयांची चांगल्या प्रकारची लॉबी असणे अत्यावश्यक आहे. महिलांचे विविध प्रश्न, विविध मंत्र्यांसमोर मांडून सोडविण्यासाठी, मंत्रिमंडळामध्ये महिलांना स्थान असणे अत्यावश्यक आहे व यासाठी ताबडतोबीने पावले उचलणे गरजेचे आहे. सभापती महोदया, हा अतिशय गंभीर विषय आहे. पुढील काळामध्ये आम्ही हा विषय सातत्याने सुरु ठेवणार आहोत.

सभापती महोदया, माझा पुढील मुद्दा असा आहे की, मनोरा आमदार निवास येथील लिफ्ट कर्मचा-यांनी एक निवेदन दिलेले आहे. प्रत्येक वेळी मनो-याच्या लिफ्टमधून जात असताना मला अतिशय खंत वाटते. त्यांनी आपल्या निवेदनामध्ये गेल्या 4-5 महिन्यांपासून पगार मिळाला नसल्याचे नमूद केलेले आहे. त्यांच्याकडे असलेल्या एकूण 40 लिफ्टमनपैकी फक्त 10 लोकांना राखीव लिफ्टमन म्हणून ठेवण्यात आलेले आहे उर्वरित लिफ्टमनांना इतर कामे करावी लागतात. त्यांची अशी मागणी आहे की, प्रत्येक महिन्याला 5 दिवसांच्या सुट्टया देऊन उर्वरित 26 दिवसांचा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे ....

बेसिकप्रमाणे पगार मिळावा. अशाप्रकारे त्यांचा कॉन्ट्रक्टर पगार सुध्दा देत नाही ही वस्तुस्थिती आहे. तसेच त्यांनी असेही सांगितले आहे की, आम्ही जर पाणी पिण्यासाठी बाहेर गेलो तरी, आम्हाला ताबडतोब मेमो दिला जातो, यामुळे आम्हाला अतिशय मानसिक त्रास सहन करावा लागतो अशा प्रकारचे निनावी निवेदन दिलेले आहे. याबाबत योग्य ती कार्यवाही होणे गरजेचे आहे.

माझा पुढील मुद्दा सर्वोच्च न्यायालयाने मुंबई गिरण्यांच्या संदर्भात दिलेल्या निर्णयासंबंधीचा आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालामुळे त्याला काहीच अपील नाही. त्यामुळे हा प्रश्न चुकीचा आहे, असे नाही. गिरण्यांच्या संदर्भात विकास होत असताना त्या ठिकाणी जे कामगार आहेत, त्यांच्या जागांबद्दल कोणीच विचार करु नये, असा त्याचा अर्थ होत नाही. आमची अशी अपेक्षा होती की, सवोच्च न्यायालयाकडून अशा प्रकारचा निकाल आलेला असला तरी, गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न, त्यांच्या रोजगारांचा प्रश्न याबाबतीत राज्य शासनाने एखादा मोठा निर्णय घेणे अपेक्षित होते. याबाबत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये काहीच उल्लेख दिसत नाही. आज एका बाजूला ज्याप्रमाणे शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत, त्याचप्रमाणे गिरणी कामगारांच्या झालेल्या आत्महत्या आपण अनेक ठिकाणी पाहत आहोत. दि. 6 मार्च रोजी माननीय मुख्यमंत्र्यांनी हुंडयाच्या प्रश्नाबाबत मंत्रालयामध्ये एक बैठक घेतली होती. या बैठकीमध्ये हुंडयाच्या प्रश्नाला चालना देण्याच्या दृष्टीकोनातून काय करता येईल, हुडयांसाठी होत असलेला छळ थांबवण्यासाठी काय करता येईल ?

यानंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. गोऱ्हे ....

त्यांची काही चांगली विधाने आम्ही वाचली. परंतु या सगळ्या पाठीमागे राजकीय इच्छाशक्ती नसल्यामुळे 8 मार्च या जागतिक महिला दिनी देखील काही घटना घडल्या. त्यामुळे संभाजीनगर येथे अश्लिल एसएमएस पाठविण्याचा गुन्हा उघडकीस आला. हा तिसरा सायबर क्राईम आहे. अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डीमध्ये एका महिलेला तिने दोन महिन्यांपूर्वी तक्रार केली होती म्हणून तिला चाबकाने फोडून काढले आहे. त्या घटनेतील आरोपीला घटना घडल्यानंतर 3-4 दिवसांनी अटक झालेली आहे. परंतु आज देखील पाथर्डीतील समाज आहे त्यांच्या या विषयी भावना तीव्र आहेत. या घटनेतील आरोपीस हद्दपार केले पाहिजे किंवा त्याहून कडक कारवाई त्याचेवर झाली पाहिजे अशी त्याच्याविषयी तेथे भावना आहे. सभापती महोदया, 8 मार्च या जागतिक महिला दिनाच्या दिवशी पुणे येथील वडगाव धायरी येथे एका महिलेचा संशयास्पद मृत्यू झालेला आहे. त्याबद्दल पुण्यातील महिला वकिलांच्या संघटनेने काळे फलक करून शासनाचा निषेध केला आहे आणि सदर महिलेच्या मृत्यू प्रकरणाची चौकशी सीआयडी तर्फे व्हावी अशी मागणी केली आहे.

सभापती महोदया, शेतकऱ्यांच्या आत्महत्येबद्दल बरेच काही सांगितले जाते आणि गेले आहे. पण अकोट येथील दीपाली कोल्हे या मुलीने वक्तृत्व स्पर्धेमध्ये भाग घेऊन भाषण केले आणि घरी येऊन तिने आत्महत्या केली. तिच्या कुटुंबाला मी भेट दिली. त्यावेळेस हा हुंड्याचा देखील प्रश्न आहे असे लक्षात आले. तेव्हा या आत्महत्या प्रकरणांमध्ये याचेही बरेचसे नाते आहे. तेव्हा या विषयी संशोधन बरेचेसे केले आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या होऊ नयेत म्हणून पॅकेजही दिले गेले. पण ज्या ज्या कुटुंबांमध्ये आत्महत्या झालेल्या आहेत त्या कुटुंबांना भेट देऊन त्या कुटुंबातील मुलांना शिक्षण सहजगत्या मिळावे यासाठी प्रस्थापित योजनांतून कसा फायदा देता येईल हे आपण पाहिले पाहिजे. सभापती महोदया, मी जेव्हा अकोट येथील कु. दीपाली कोल्हेच्या घरी भेट दिली तेव्हा मला असे दिसले की, तिच्या चार बहिणींचे शिक्षण अर्धवट राहिले आहे आणि इतरही अनेक अडचणी आहेत. त्यामुळे तणावग्रस्त स्वरूपातच मला तिचे कुटुंबीय भेटले. म्हणून मला असे सांगावयाचे आहे की, आत्महत्या होतात त्या कुटुंबियांच्या पुनर्वसनाचा कार्यक्रम आपण प्राधान्याने हाती घेतला पाहिजे. आता आपण पुनर्वसनाचे दृष्टीने प्राधिकरण निर्माण केलेले आहे तर त्याच्या मार्फत या कुटुंबियांचे देखील पुनर्वसन केले गेले पाहिजे असे मला वाटते.

..... 3क्यू 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. गोऱ्हे ....

सभापती महोदया, मला दुर्दैवाने याबाबतीतही अुल्लेख केला पाहिजे की, अतिवृष्टीमध्ये ज्यांच्या होड्या वाहून गेल्या आहेत, त्यांना अजूनही नुकसान भरपाईबाबतचे आदेश मिळालेले नाहीत. त्याचबरोबर पुणे शहरातील कासेवाडी येथील झोपडपट्टी एक वर्षापूर्वी जळाली होती. त्यानंतर तेथे माननीय मंत्री श्री.अजितदादा पवार आणि आपले पुनर्वसन मंत्री नामदार श्री.कदम साहेब यांनी देखील या झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन केले जाईल असे सांगितले होते. परंतु 15 दिवसांपूर्वीच मी तेथे भेट दिली असता मला दिसून आले की, तेथे उंदीर-घुशींनी थैमान घातले आहे आणि एक वर्ष होऊन गेले तरी या दलित वस्तीचे अजूनपर्यंत पुनर्वसन झालेले नाही. तेव्हा असे अनेक प्रश्न आहेत की ज्याबाबत निर्णय होऊनही त्याबाबत अमलबजावणी झालेली नाही. मला तरी असे वाटते की, अशा सर्वच बाबतीत आपले समाजमन कोडगे होत चालले आहे की काय ? आताही विधान परिषदेमध्ये आम्ही बोललो तर तेवढी तरी दखल घेतली जाते, बाकी काहीच दखल घेतली जात नाही. हा एक भाग आहे की, माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी माझ्या सारख्या कार्यकर्तीला विधानसभेमध्ये पाठविले आहे. अन्यथा आम्ही विधानमंडळामध्ये येऊ शकलो नसतो म्हणूनच मी या विषयामध्ये आपले सर्वांचे लक्ष वेधते एवढे बोलून मी भाषण संपविते. जयहिंद, जय महाराष्ट्र.

****

..... 3क्यू 3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : श्री. रमेश गोवेकर बेपत्ता झाल्याबाबत.

**मु.शी.** : श्री. रमेश गोवेकर बेपत्ता झाल्याबाबत उपस्थित करण्यात आलेल्या औचित्याच्या मुद्यावर माननीय सभापतींच्या निदेशानुसार माननीय उपमुख्यमंत्र्यांनी केलेले निवेदन.

---

श्री. आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री) : माननीय सभापती महोदय, सर्वश्री. मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, सुधीर सावंत, वि.प.स. यांनी आज सकाळी "श्री. रमेश गोवेकर बेपत्ता झाल्याबाबत" उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यावर माननीय सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार मी निवेदन करीत आहे.

महोदय, श्री. रमेश गोवेकर बेपत्ता झाल्याबाबत त्यांचे मोठे भाऊ यांनी मालवण पोलीस ठाणे येथे तक्रार दिल्यानंतर त्यानुसार मालवण पोलीस ठाण्यात नापत्ता व्यक्ती रजि.नं.29/2005 प्रमाणे नोंद घेण्यात आली आहे. त्यानंतर त्यांनी पुन्हा दिनांक 12.11.2005 रोजी शिवसेना प्रचार कार्यास प्रतिबंध व्हावा या उद्देशाने त्यांचे कोणी तरी अज्ञात व्यक्तीने जबरदस्तीने अपहरण केले असल्याची तक्रार दिल्यानुसार मालवण पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. 78/2005, भा.दं.वि.कलम 365 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

( यानंतर श्री. सरफरे .... 3आर 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील...

सदर गुन्हयाचा प्राथमिक तपास अपर पोलीस अधिक्षक, सिंधुदुर्ग यांच्यामार्फत चालू आहे. त्यानंतर दिनांक 28.2.2006 रोजी त्यांच्या मदतीला राज्य गुन्हा अन्वेषण विभागाचे एक अधिकारी व कर्मचारी यांच्या संयुक्त पथकामार्फत याप्रकरणी तपास करण्याचे आदेश देण्यात आले. त्याप्रमाणे स्थानिक पोलीस व राज्य गुन्हा अन्वेषण विभाग यांचे संयुक्त पथक नेमण्यात आलेले आहे. या पथकाचे प्रमुख अपर पोलीस अधिक्षक, सिंधुदुर्ग आहेत.

याच विषयाच्या संदर्भात आज खालच्या सदनामध्ये लक्षवेधी सूचना चर्चेला आली होती.त्यावेळी दोन्ही बाजूकडील माननीय सदस्यांनी या संपूर्ण प्रकरणाचा तपास निपक्षपातीपणे आणि लवकर होण्यासाठी हे प्रकरण चौकशीसाठी सी.बी.आय.कडे सुपूर्द करण्यात यावे अशी मागणी केली. याबाबत शासनाने सी.बी.आय. कडे विनंती केली आणि सी.बी.आय. ने तपास करण्याची तयारी दर्शविली तर हे प्रकरण सी.बी.आय. कडे सुपूर्द करण्यात येईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदया, माननीय गृहमंत्र्यांनी आता सांगितले की, सी.बी.आय. ने तयारी दर्शविली तर त्यांच्याकडे हे प्रकरण सुपूर्द करण्यात येईल. मंत्रिमहोदयांचे हे उत्तर मला आश्चर्यकारक वाटते. शासनाने याबाबत सी.बी.आय. कडे आग्रह धरला पाहिजे. दुसरे असे की, माननीय श्री. आर. आर. पाटील साहेब आपण गृहमंत्री असतांना मालवण येथे दहशत आणि गुंडगिरीचे प्रकार पोलीस आणि गुंडांच्या हातमिळवणीने चालू होते व आहेत, ही बाब आता लपून राहिलेली नाही. सिंधुदुर्ग जिल्हयाचे पोलीस अधिक्षक श्री. प्रसन्ना आहेत. तसेच जिल्हा परिषदेच्या महिला मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवडणुकीच्या अगोदर एका दिवसात जिल्हाधिकारी करण्यात आले. हे अधिकारी जोपर्यंत सिंधुदुर्ग जिल्हयात आहेत तोपर्यंत कोणतीही चौकशी निर्भयपणे होणार नाही. म्हणून मंत्रिमहोदयांकडे आमची मागणी आहे की, तुम्ही कुणाकडेही चौकशी सुपूर्द केली तरी जोपर्यंत या अधिकाऱ्यांच्या बदल्या होत नाहीत तोपर्यंत साक्ष देण्यासाठी माणसे पुढे आली पाहिजेत ती येणार नाहीत. हे दोन अधिकारी त्याठिकाणी आहेत त्यांच्या बाबतीत त्यांच्या हाताखाली काम करणारे अधिकारी खाजगीत वेगळे बोलतात असा अनुभव आहे. म्हणून मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, या दोन्ही अधिकाऱ्यांच्या आपण बदल्या करा. हे प्रकरण तपासासाठी सी.बी.आय. ताब्यात घेईल की घेणार नाही याचा विचार न करता आपण ते सी.बी.आय. कडे चौकशी साठी सुपूर्द करावे. सभापती महोदया, माननीय उप मुख्यमंत्री आपण व माननीय ऊर्जा मंत्री श्री. दिलीप वळसे पाटील यांनी देखील युती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

सरकारच्या काळात अशाचप्रकारे किणी प्रकरण सभागृहामध्ये उचलून धरले होते, व त्यावेळी सी.बी.आय. चौकशीची मागणी केली होती. त्यामुळे हे प्रकरण सी.बी.आय. कडे सुपूर्द करण्यात येईल असे माननीय उपमुख्यमंत्र्यांनी ठामपणे सांगावे.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदया, माननीय सदस्यांना कार्यपध्दती माहीत नसावी असे मला वाटते. सी.बी.आय. ला राज्य सरकार आदेश देवू शकत नाही तर राज्य सरकारच्या वतीने त्यांना चौकशी करण्याबाबत विनंती करण्यात येते. त्यांनी मान्यता दिल्यानंतर ते प्रकरण तपासाकरीता त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात येते. याच प्रकरणाच्या बाबतीत नव्हे तर प्रत्येक प्रकरणाच्या बाबतीत हीच पध्दत अवलंबिण्यात येते. सी.बी.आय. मार्फत चौकशी करीत असतांना राज्यातील अधिकारी चौकशीमध्ये अडचणी व अडथळे निर्माण करतील असे राज्य सरकारला वाटत नाही.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : माननीय सदस्यांनी एक गोष्ट लक्षात घ्यावी की, आवश्यक असलेल्या कार्यपध्दतीनुसार शासनाला कार्यवाही करणे आवश्यक असल्यामुळे शासन त्याप्रमाणे कार्यवाही करील.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदया, घणसोलीच्या दंगलीच्या प्रकरणामध्ये आम्ही आरोप केल्यानंतर व मागणी केल्यानंतर आपण संबंधित अधिकाऱ्यांची बदली केली नाही.परंतु दोन दिवसानंतर आपण त्यांची बदली कां करता? त्याप्रमाणे सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये हे दोन अधिकारी जोपर्यंत आहेत तोपर्यंत तेथील चौकशी निपक्षपातीपणे होणार नाही.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदया, कणकवलीतील घडलेल्या अनेक प्रकारानंतर नागपूरच्या अधिवेशनामध्ये पोलीस अधिक्षकांची बदली करण्याची आम्ही मागणी केली होती. त्यावेळी माननीय गृहमंत्र्यांनी नियमित प्रक्रियेनुसार ज्यावेळी बदल्या करण्यात येतील त्यावेळी या अधिकाऱ्यांच्या बदल्या होतील असे सांगितले होते. या गोष्टीला 3-4 महिने होवून गेले तरी माननीय गृहमंत्री याबाबत जबाबदारीने कारवाई करीत नाहीत.

श्री. आर. आर.पाटील : सभापती महोदया, अधिकाऱ्यांच्या संदर्भात मोघम तक्रारी करण्यापेक्षा आपण स्पेसिफिक तक्रार केली तर मी त्याची चौकशी करीन. आणि चौकशीमध्ये जर ते अकधिकारी दोषी आढळले तर जरुर त्यांच्यावर कारवाई करीन.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.सरफरे..... 20:20

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सन्माननीय मंत्रीमहोदयांना मला एकच प्रश्न विचारावयाचा आहे.ज्यावेळेस सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये विधानसभेची निवडणूक झाली. त्या कालावधीमध्ये काही गोष्टी घडलेल्या आहेत. तेथील जिल्हाधिकारी एका रात्रीमध्ये बदलून टाकले गेले. त्यांच्या जागी दुसरे जिल्हाधिकारी आणले. जे सी.ई.ओ.होते त्यांची जिल्हाधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली. सी.ई.ओ.म्हणून दोन-चार वर्षे काम केल्यानंतर कलेक्टर पदावर नेमणूक केली जाते. परंतु त्यांना कलेक्टर होण्याकरिता काही अवधी असतांना, त्यांची त्या ठिकाणी कलेक्टर म्हणून नेमणूक करण्यात आली. ही नेमणूक कशा पध्दतीने सरकारने केलेली आहे ?

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : आपल्याला त्याचे उत्तर देता येईल काय ?

श्री.आर.आर.पाटील : तो प्रशासकीय निर्णय आहे.

---

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

**पृ.शी.** : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा.

**मु.शी.** : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा.

(चर्चा पुढे सुरु...

श्री.विनोद तावडे (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदया, मी कदाचित राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलणारा शेवटचा सदस्य...

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : बाकीच्या सदस्यांनी नावे विड्रॉ केलेली आहेत काय ? तसे असेल तर आनंदाची गोष्ट आहे.

विरोधी पक्षाचे अनेक सदस्य : अजून आम्हाला बोलावयाचे आहे.

श्री.विनोद तावडे : माझे वाक्य पूर्ण झालेले नाही. शेवटी दोन-चार सदस्य बोलणारे असतात, त्यांना शेवटी फायदा होतो. कारण उत्तर देणारे सभागृहाचे नेते, सन्माननीय उपमुख्यमंत्री हे उपस्थित असतात. त्यामुळे त्याचा नक्की उपयोग होतो. नाही तर अधिवेशन सुरु होऊन एक आठवडा होऊन गेला, आज दुसऱ्या आठवडा सुरु झालेला आहे परंतु माननीय मुख्यमंत्री अजूनही सभागृहामध्ये आलेले नाहीत. असा, शेवटी सदस्यांना बोलण्याच्या संधीचा फायदा होऊ शकतो.

श्री.आर.आर.पाटील (बसून) : मुख्यमंत्री महोदय येथे येऊन गेलेले आहेत.

श्री.विनोद तावडे : मी दोन-चार मुद्दे माझ्या भाषणामध्ये मांडणार आहे.

सभापती महोदया, मिठी नदीचा विकास करण्यासंबंधी राज्यपालांच्या भाषणामध्ये उल्लेख केलेला आहे. याबाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिलेले होते की, मिठी नदीबरोबर पोईसर नाला, कान्हेरी नदीच्या विकासाच्या संबंधाने प्राधान्याचे कामे हाती घेणार आहेत. परंतु याबाबतीत राज्यपालांच्या भाषणामध्ये उल्लेख नाही.

**(सभापतीस्थानी मा.सभापती)**

जवाहरलाल नेहरु नागरी नवीकरण मिशन योजनेचा उल्लेख केलेला आहे. वाल्मिकी आंबेडकर योजना रद्द केलेली आहे काय ? याबाबतचा खुलासा व्हावा. मोफत घरांसाठी एस.आर.ए. स्कीम सुरु केली, ती आता रद्द करुन झोपडपट्टीवासियांकडून पैसे घेण्याची चर्चा सुरु झालेली आहे. 'जवाहरलाल नेहरु नागरी नवीकरण मिशन' योजना सुरु करण्यात येणार आहे. परंतु जोपर्यन्त यु.एल.सी. कायदा रद्द करत नाही, तोपर्यन्त हाऊसिंगला गती येणार नाही. याचा अर्थ वाल्मिकी आंबेडकर योजना बासनात गुंळाळलेली आहे अशी शंका येते.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.विनोद तावडे (पुढे सुरु....

सभापती महोदय, सरकारला विचारावेसे वाटते की, माननीय राज्यपालांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्त्याविषयी सांगितलेले आहे. 940 सावकारांवर खटले दाखल केल्याचा उल्लेख केलेला आहे. 'सकाळ'ग्रुपचे संपादक, श्री.उत्तम कांबळे यासंबंधाने अभ्यास केलेला आहे की, सावकारांमार्फत 67 हजार कोटी रुपयाचे इन्व्हेस्टमेंट केले जाते. आंध्रमध्ये सावकारांकडून शेतकऱ्यांना जास्त पैसे दिले जातात. या विषयामध्ये आपले राज्य सरकार काय विचार करत आहे ? सरकारने सावकारांना कोंडीत पकडलेले आहे. खरे तर त्यांच्यामुळे इकॉनॉमि रन होते. यासाठी दुसरा पर्याय शोधलेला आहे काय ?

सभापती महोदय, विजेच्या लोड शेडींगबाबत बरेच बोलले गेले. कोकणामध्ये पर्यटनाचा विकास करण्याचे सुरु आहे. त्या भागामध्ये पर्यटक येत असतात. त्या ठिकाणी लोड शेडींग केले तर पर्यटनावर त्याचा परिणाम होईल, म्हणून त्या भागामध्ये विजेचे लोड शेडींग होणार नाही, याकडे लक्ष द्यावे.

सभापती महोदय, राज्यामध्ये भ्रष्टाचार कसा फोफावत चाललेला आहे याचे मी उदाहरण देणार आहे. सनमाननीय श्री.गडकरी साहेबांनी दुष्काळामध्ये जनावरांसाठी छावण्या उभारण्यात आलेल्या होत्या. त्या ठिकाणच्या शेणाचा घोटाळा त्यांनी मांडलेला होता. तशाच प्रकारचा शेणाचा घोटाळा मी मांडणार आहे.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

सभापती महोदय, आरे कॉलनीमध्ये 12 हजार म्हशी आहेत. त्या म्हशींचे शेण सरकारच्या मालकीचे असते. त्याची विक्री सरकार करते. 450 मे. टनांऐवजी 17,399 मे.टन शेण बाहेर गेले असे 1997 सालच्या ऑडीटमध्ये म्हटले आहे. माननीय उपमुख्यमंत्री महोदय म्हणतील की, त्यावेळी तुमच्या पक्षाचे सरकार होते. त्यावेळी श्री. नारायण राणे हे मंत्री होते. आता ते तुमच्या सरकारमध्ये आलेले आहेत. त्यासंदर्भात आपण काय करणार आहात ? सभापती महोदय, 1999-2000 मध्ये 2.25 लाख रुपयाला ठेका तेथील कार्यकारी अधिकारी यांनी दिला. पुढच्या वर्षी नवीन कार्यकारी अधिकारी आले. ते माननीय मुख्यमंत्र्यांचे लाडके होते. त्यांनी सन 2000-2001 मध्ये शेणाचा एक वर्षासाठी 7 लाख रुपयांचा ठेका दिला. त्यावेळी 12 हजार म्हशी होत्या. नंतर सन 2001-02, 2002-03 व 2003-04 या तीन वर्षासाठी शेणाचा ठेका 8 लाख 75 हजार रुपयाला दिला. त्याच्या आधी एका वर्षाचा ठेका 7 लाख रुपयांचा होता. 2004 पर्यंत 12 हजार जनावरे होती. प्रत्येक जनावर दिवसाला 10 ते 15 किलो शेण देतात अशी तेथील आकडेवारी आहे. प्रत्येक जनावर दिवसाला 10 किलो शेण देतात असे आपण गृहीत धरु या. म्हणजे 12 हजार म्हशींचे दिवसाला 1 लाख 20 हजार किलो शेण गोळा होते आणि 1 लाख 20 हजार गुणिले 365 केले तर वर्षाला 4 कोटी 38 लाख किलो शेण गोळा होते. 1997-98 या वर्षी आपल्या सरकारने 17 पैसे प्रति किलो असा दर दिला. मार्केटमध्ये त्यावेळी प्रति किलो 50 पैसे दर होता. आपल्या आरे कॉलनीतील शेणामध्ये माती नसते कारण त्या ठिकाणच्या म्हशी सिमेंटच्या प्लॅटफॉर्मवर असतात. त्यामुळे त्या शेणाचे दर जास्त असावयास पाहिजे. सरकारने 17 पैसे दर दिला. त्यावेळी बाजार भाव 50 पैसे होता. 4 कोटी 38 लाख किलो शेणाचे पावसामुळे तसेच उन्हाने वाळल्यामुळे 3 कोटी किलो शेण झाले असे गृहीत धरु या. 3 कोटी किलो गुणिले 50 पैसे असा हिशेब केला तर 2001-02, 2002-03 आणि 2003-04 या वर्षात तीन वर्षात जवळपास 6 कोटी रुपयाचे शेण आपल्या सरकारने खाल्ले. 2004 मध्ये 4 हजार जनावरे वाढली. म्हणजे जनावरांची संख्या 16 हजार झाली. प्रती जनावर रोज 10 किलो शेण देतात असे गृहीत धरु या. 16 हजार गुणिले 10 म्हणजे दिवसाला 1 लाख 60 हजार किलो शेण होते. 1 लाख 60 हजार

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

श्री. विनोद तावडे ......

गुणिले 365 केले तर ते शेण 5 कोटी 84 लाख किलो होते. पाऊस, ऊन यामुळे कमी होऊन ते शेण 4 कोटी किलो झाले असे समजू या. 4 कोटी किलो गुणिले 50 पैसे असा हिशेब केला तर 2 कोटी रुपये होतात. आपली तीन वर्षाची निविदा 8 लाख रुपयाला गेली. म्हणजे 5 कोटी 91 लाख रुपयांचे नुकसान झाले आणि मागचे 5 कोटी 94 लाखाचे नुकसान असे मिळून 11.75 कोटी रुपयांचे शेण आपल्या सरकारने खाल्ले. ते कोणी खाल्ले, कोणाच्या सहमतीने खाल्ले, अंगतपंगत करुन सगळ्यांच्या सहमतीने खाल्ले काय ? आपण म्हणता तो दर धरला तरी सुध्दा हा भ्रष्टाचार 3 ते 4 कोटी रुपयांचा होतो. याकडे मला शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे.

सभापती महोदय, मला आणखी एक प्रकरण मांडावयाचे आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी उल्लेख केला. आमच्या पक्षाच्या नाशिकच्या बैठकीतील प्रस्तावामध्ये माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांचा बोलका बाहुला म्हणून उल्लेख केला. त्यामुळे माननीय उपमुख्यमंत्री रागावले. आम्ही बोलताना असेही म्हणालो की, त्यांनी डान्सबार बद्दलचा चांगला निर्णय घेतला तसेच ते चांगले निर्णय करतात. नंतर मुंबई टाइम्सच्या सन्मान सोहळयात ते भेटले. एखाद्या मुलाला जर आपण म्हटले की, तू असा आहेस तर तो मुलगा म्हणतो, तुझा दादा असा आहे, तुझे बाबा असे आहेत. अशा पध्दतीने माननीय उपमुख्यमंत्री स्टेजवर बोलले. आपण एखादी टीका खिलाडू वृत्तीने घेतली पाहिजे. आम्ही असे का बोललो ? माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये बाल मजुरांच्या विषयी उल्लेख केला आहे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विनोद तावडे पुढें सुरु...)

बालमजुरीचा विषय जेव्हा या सभागृहामध्ये आला त्यावेळी माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले की, 14 सप्टेंबर या बाल दिनाच्या दिवशी मुंबईतील बालमजुरी संपविणार. त्यानंतर त्यांनी डिसेंबरमध्ये घोषणा केली की, 26 जानेवारी पर्यन्त संपूर्ण बालमजुरी संपलेली असेल. त्यानंतर त्यांनी पुन्हा 15 ऑगस्टला अशीच घोषणा केली. बालसुधार गृहातील मुले पळून जात असल्याबाबतची लक्षवेधी सभागृहामध्ये उपस्थित करण्यात आली. माननीय गृहमंत्री हे चिल्ड्रेन अेड सोसायटीचे चेअरमन आहेत. त्या मुलांची हालत काय आहे हे एकदा त्यांनी जाऊन पहावे. नियमाप्रमाणे गुन्हेगार म्हणून येणारी मुले आणि बेवारस सापडलेली मुले यांना वेगवेगळया सुधार गृहांमध्ये ठेवायला पाहिजे. आमच्या राज्याचे माननीय गृहमंत्री हे नुसत्या घोषणाच करीत आहेत. अशा कृतीशून्य घोषणा कशासाठी केल्या जातात? असा माझा त्यांना सवाल आहे.

सभापती महोदय, हे पोलीस खाते अतिशय कार्यक्षम आहे असा अभिभाषणामध्ये उल्लेख करण्यात आलेला आहे. हे पोलीस खाते किती कार्यक्षम आहे याबाबत मी एक उदाहरण देतो. एक भगिनी माझ्याकडे एक तक्रार घेऊन आली. तिची मुलगी विद्याविहारच्या फातिमा हायस्कूलमध्ये इयत्ता 10मध्ये शिकत होती. तिच्या मुलीच्या 10व्ीच्या परीक्षेला बाहेरुन बसायचे होते. 10वीच्या परीक्षेला बाहेरुन बसण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापकांनी अनुमती देणे आवश्यक असते. त्या फातिमा हायस्कूलचे कॅथलिक मुख्याध्यापक प्रिस्ट फादर फिलिप्स गोन्साल्विस हे आहेत. या फादर फिलिप्स गोन्साल्विसने आमच्या भगिनीच्या मुलीला 10वीच्या परीक्षेला बाहेरुन बसण्यासाठी अनुमती देण्याकरिता आमच्या भगिनीचे लैंगिक शोषण करण्याचा प्रयत्न केला. एफआयआरमध्ये काय आहे ते मी आपणास सांगणार आहे. सभापती महोदय, या महिलेने पोलिसांकडे जाण्याची हिंमत दाखवली नाही. मी त्या भगिनीचे मुद्दाम नाव घेत नाही. मी खाजगीमध्ये हे प्रकरण माननीय गृहमंत्र्यांकडे देणार आहे. त्या भगिनीने विनंती करुन सांगितले की, कृपा करुन माझे नाव घेऊ नका. माझी बदनामी होण्यापेक्षा माझ्या जिवाला धोका आहे. म्हणजे पोलिसांविषयी इतकी भीती आहे. तिने आर्चबिशप आणि ऑक्झीलरी बिशपना याबाबतीत लिहिले. माननीय राष्ट्रपतींना ईमेल केला. त्यानंतर माननीय राष्ट्रपतींनी चिफ सेक्रटरींना ईमेल केला. ईमेल क्रमांक 24-सेक्रेटरी/2005 असा आहे. त्यानंतर 21 फेब्रुवारीला पवईच्या पोलीस ठाण्यामध्ये 97/06 कलम

MSS/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. बरवड 20:30

(श्री. विनोद तावडे पुढे सुरु...)

354,506 खाली गुन्हा दाखल करुन त्या भगिनीचा जबाब घेण्यात आला. त्यामध्ये तिने असे सांगितलेले आहे की, "ते मुख्याध्यापक वेळी अवेळी माझ्या मोबाईलवर मला एमएमएस करायचे." संपूर्ण डिटेल माहिती मी येथे देत नाही. पुढे तिने असे म्हटलेले आहे की, "फादर फिलिप्स गोन्साल्विस याने माझ्या मुलीला 10वीच्या परीक्षेला बाहेरुन बसण्यासाठी फॉर्मवर सही करुन देतो असे सांगून मला त्याच्या केबिमध्ये बोलावले आणि मी खुर्चीवर बसलेली असताना मला पेपर्स् देण्याच्या निमित्ताने मिठी मारली. मी हरकत घेऊन तेथून निघून गेले. मुलीच्या भवितव्याचा विचार करुन फॉर्मवर त्याची सही आवश्यक असल्यामुळे मी त्याला पुन्हा भेटायला गेले त्यावेळी त्याने त्याचा शर्ट काढून लिंग दिसेल अशारितीने अंडरवेअर काढली." त्या भगिनीने पुढे असे सांगितलेले आहे की, "फादर फिलिप्स गोन्साल्विस हा, घरी कोणी नाही हे बघून, माझ्या पवई येथील घरी आला. ...

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.शिगम 20:35

श्री. विनोद तावडे ....

त्याने आपली पँट खोलून लिंग हातात घरण्याबाबत मला सांगितले.सभापती महोदय, मी आता याबाबत आणखी काही जास्त सांगत नाही. आता गृहमंत्री हे प्रकरण तडीस लावणार याची मला खात्री आहे. 21.2.2006 रोजी पोलीस स्टेशनमध्ये एफआयआर दाखल झाला. हे प्रकरण attempted rape मध्ये का येत नाही ? आपण अतिशय कर्तबगार आणि कर्तृत्ववान आहात मग आपल्या खात्यामध्ये हे असे का ? म्हणून जर आपल्याला "बोलका बाहुला" म्हटले हे चुकले काय?

या महिलेला पोलिसांकडे जावेसे वाटत नाही. 21.2.06 रोजी एफआयआर दाखल झाल्यानंतर या फादरची भोपाळला बदली केली गेली. परंतु त्याच्यावर कारवाई झाली नाही आणि त्याला पकडायला पोलीस गेले नाहीत. या राज्यामध्ये हे असे होत असेल तर आम्ही राज्यपालांचे अभिनंदन करावे का हा प्रश्न पडतो. धन्यवाद.

-----

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आपले विचार व्यक्त करीत असताना जे शेवटचे वाक्य वापरले ते मला महत्वाचे वाटते. ते म्हणाले "असे होत असेल तर आम्ही राज्यपालांचे अभिनंदन करावे का "? सभापती महोदय, सत्ताधारी पक्षातील अनेक माननीय सदस्यांनी सुध्दा राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल खेदच व्यक्त केला आहे. नैसर्गिक आपत्तीमध्ये 450 कोटी रुपयांचे सानुग्रह अनुदान दिले आहे असे अभिभाषणामध्ये म्हटले आहे. याबाबतीत मला खेद होतो. कारण याबाबतीत मी दासगांव,जि.महाड येथील उदाहरण देऊ इच्छितो. या गावावर गेल्या वर्षी पावसाळयामध्ये दरड कोसळली आणि माणसे गाडली गेली. जी काही जिवंत राहिली त्यांचे पुनर्वसन कसे केले आहे ते एकदा जाऊन पहावे. पत्र्याच्या शेडमध्ये ही माणसे रहात आहेत. वर्ष लोटले तरी त्यांचे पुनर्वसन अजून करण्यात आलेले नाही. कोणत्याही नागरी सुविधा दिलेल्या नाहीत. अभिभाषणामध्ये मुद्दे मांडताना प्रत्यक्षात किती लोकांना मदत मिळाली हे पाहणे आवश्यक होते. आता उन्हाळा सुरु होत आहे. पत्र्याच्या शेडमध्ये ही कुटुंबे असल्यामुळे वरुन उन तापणार आणि बाजूने पत्रे तापणार. यापेक्षा झाडाखाली रहायला गेलेले बरे अशी या लोकांची अवस्था आहे. मग आम्ही राज्यपालांचे अभिनंदन करावयाचे काय ? शासनाने प्लॅस्टीक पिशव्यांवर बंदी आणली. 50 एमएम पेक्षा कमी जाडीच्या आणि 8 x 12 से.मी.जाडीच्या पिशव्यांच्या वापरावर बंदी घातली आहे. परंतु रस्त्यावर विकणाऱ्याकडे ही जाडी आणि लांबी-रुंदी मोजणार कोण हा खरा प्रश्न आहे. दुसरा मुद्दा म्हणजे वापरावर बंदी पण उत्पादनावर बंदी नाही. त्यामुळे पिशव्यांचे उत्पादन चालू आहे पण वापरावर बंदी आहे हे कसे काय ? या धोरणात्मक चुका असल्यामुळे मी शासनाच्या निदर्शनास आणू इच्छितो. राज्यपालांच्या अभिभाषणात असा उल्लेख आहे की, केंद्रीय अर्थसहाय्याची वाट न पाहता मुंबईतील नागरी सुविधा प्रकल्प पूर्ण केले जातील. यामध्ये वांद्रे ते वरळी हा सागरी मार्ग आहे. एमएमआरडीएचे प्रकल्प राबविताना जागतिक बँकेबरोबर जो करार करण्यात आला आहे त्यामध्ये असे एक कलम आहे की प्रकल्प राबविताना आजूबाजूला ज्यांचे ज्यांचे वास्तव्य असेल त्यांचे पुनर्वसन करावयाचे. याबाबतीत शासनापेक्षा झोपडपट्टीतील गुंड यांना आजूबाजूला कोण आहेत याची माहिती असते. पूर्व उपनगरातील हायवे पाहिला तर चेंबूर येथील जो उड्डाणपूल आहे त्याच्या अलिकडे रस्त्याचे रुंदीकरण चालू आहे.

यानंतर श्री. खर्चे पी.

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .......

ते रुंदीकरण करण्यापूर्वी तेथे दहा ते पंधरा फुटावर एकही झोपडी नव्हती पण ज्या दिवशी प्रकल्प जाहीर होणार असे कळले त्यावेळी पटापट बांबू लागले व मूळ मुंबईकर जो आहे तो आजही हालअपेष्टेमध्ये दिवस काढत आहे, याचा उल्लेख मी सविस्तरपणाने बजेटच्या भाषणातून करणारच आहे. आज फक्त एवढेच सांगावयाचे आहे की, मुंबईच्या चाळीतील लोकांना राहण्यासाठी जागा मिळत नाही पण अशा प्रकारे झोपडया बांधून फुकटात राहणाऱ्यांचे मात्र पुनर्वसन केले जाते. मालाड आणि गोरगांवमधील हजारो एकरचे प्लॉट मुंबई महानगरपालिका आणि शासन या दोघांनी मिळून अतिक्रमण केलेल्या झोपडया काढून टाकल्या आणि प्लॉट रिकामे केले आणि एमएमआरडीएला कळविले की, आता आपण या जागेचे संरक्षण करावे. त्याप्रमाणे त्यांनी त्या जागेला कुंपण घातले. पण अलिकडच्या 15 दिवसांपूर्वीच वर्तमानपत्राच्या माध्यमातून समजले की, त्या ठिकाणी हजारोच्या संख्येने झोपडया पुन्हा उभ्या राहिल्या. पुन्हा जागतिक बँकेच्या मार्फत कुठलाही प्रकल्प त्या ठिकाणी राबविण्याचा विचार केला तरी त्यावेळी पुन्हा या ठिकाणी अनधिकृत झोपडयांमध्ये राहणाऱ्यांचे प्रथम पुनर्वसन करा असा मुद्दा पुढे येईल. ही या कादयातील सर्वात मोठी अडचण आहे. एका बाजूला सन 1995 चा कायदा आपण अंमलात आणला, 2000 च्या कायदयाबाबत अजून निर्णय नाही परंतु अशाच प्रकारे अनधिकृत बांधकामांना संरक्षण मिळत राहते व याचा उल्लेख मात्र दुर्देवाने माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नाही, यासंदर्भात शासनाने लक्ष घालण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे या शासनाने महाराष्ट्रामधील औद्योगिक वाढीचा दर आपण दिला पण प्रत्यक्षात किती उद्योग आपल्या राज्यात आले ? किती कोटीची गुंतवणूक राज्यात आली ? किती लोकांना रोजगार मिळाला ? यासंबंधी जरा नांवासह माहिती सांगितली तर बरे होईल. मुंबईमध्ये अमुक ठिकाणी इतके उद्योग आले, आय.टी. उद्योग महापे येथे आला आणि अमुक इतक्या भूमिपुत्रांना नोकऱ्या मिळाल्या याचीही माहिती द्यावी. मी या निमित्ताने आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, या राज्यामध्ये एम्प्लॉयमेंट रजिस्ट्रेशन ॲक्ट अस्तित्वात असून नागरिकांना कंपल्सरी नोटिफिकेशन ऑफ एम्प्लॉयमेंट एक्सचेंज ॲक्ट लागू आहे. त्यात नोंदणी केलेल्या किती नागरिकांना नोकऱ्यांचे कॉल जातात. घणसोलीचे प्रकरण यासंदर्भात डोळयाआड करुन चालणार नाही हेच मी जाणीवपूर्वक आपल्या नजरेस आणून देऊ इच्छितो. या ठिकाणी बाल

........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ......

कामगारांसंबंधीचा उल्लेख केला परंतु मी मानखुर्द येथील रिहॅबिलिटेशन सेंटरमध्ये गेलो असता त्या ठिकाणी कोणी फटाक्याच्या कारखान्यात काम करणारी मुले आहेत तर काही जरीकाम करणारी मुले आहेत, त्यांच्या पालकांचा शासन शोध घेणार की नाही ? की सगळेच बेवारस म्हणून सोडून द्यायचे ? आणि आपण पकडून आणायचे व बाल सुधार गृहात नेऊन सोडायचे. हे आपण एकदा कबूल केले होते पण दूरदर्शनवर दाखविले होते की, डोंगरीच्या बाल सुधार गृहातील व्यवस्थापक कसे घाबरतात ? त्यांचे कुटुंबिय देखील घाबरतात. कारण ती मुले फार मोठया प्रमाणात दांडगाई करतात, सिगारेट ओढतात व दारुही पितात अशा प्रकारची व्यसने त्यांना आहेत यासंबंधीचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या भाषणात दिसून येत नाही.

महोदय, शेवटचा मुद्दा मी सांगू इच्छितो की, ग्रामीण पाणीपुरवठयाच्या संदर्भात जनतेच्या सहभागाशिवाय कोणतीही योजना घ्यायची नाही असे सांगण्यात आले पण सगळीकडे सारखेच धोरण कसे राबवून चालणार ? कोकणामधील गावांची रचना ही वाडयांची आहे आणि एका वाडीत जेमतेम 12 ते 25 एवढीच घरे असतात आणि दोन वाडयांमधील अंतर हे किलोमीटने असते. एखादया गावाला पाण्याचा बंधारा अथवा कोल्हापूरी बंधारा असेल आणि त्या बंधाऱ्याच्या दुरुस्तीची अथवा नव्याने बांधावयाचे असेल तर अशा गावातील लोकांनी सहकारी संस्था स्थापन करुन हे काम करणे शक्य होणार नाही. तसेच अशा कोल्हापुरी बंधाऱ्यांवर शेती होते काय ? याचाही शासनाने विचार करावा. त्या बंधाऱ्याचा उपयोग एवढाच होऊ शकतो की त्यातून पाझरणाऱ्या पाण्याचा फायदा त्या भागातील विहीरींना होऊ शकेल. म्हणजे पाण्यासंबंधी सहकारी संस्था किंवा लोकांच्या सहभागाचे जे नियम आणि निकष लावलेले आहेत ते संपूर्ण राज्यासाठी आहेत मात्र कोकणामध्ये हे निकष प्रॅक्टिकली शक्य होणार नाही म्हणून ते निकष आमच्या कोकणात लावू नये अशी माझी हात जोडून विनंती आहे.

यानंतर श्री. भारवि .......

श्री.अरविंद सावंत...

कारण तेथे के.टी.वेअर मोठे नाहीत. कोकणात पाऊस पुष्कळ पडत असला तरी मे महिन्यामध्ये दुष्काळ असतो. नदीवर बंधारा बांधला असेल तर तेथे पाणी वाटप संस्था स्थापन करण्यासंबंधीचा निकष आहे. हा जो निकष आहे तो कोकणामध्ये लावू नये. शेवटी हे अभिभाषण म्हणजे केंद्रीय योजनेच्या भोपळयावर तरंगणारे आहे. त्याचा मी निषेध करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, राज्यापालांच्या अभिभाषणावरील काही मुद्दांच्या संदर्भात मी माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे. आदरणीय राज्यपालांच्या अभिभाषणात काही मुद्दे दुर्लक्षित झाले आहे. या अभिभाषणामध्ये शैक्षणिक क्षेत्रासंबंधी शासनाच्यावतीने कोणत्याही प्रकारचा उल्लेख तसेच शैक्षणिक धोरणाबद्दल देखील कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही.

सभापती महोदय, गेल्या पाच वर्षापासून शिक्षण क्षेत्रामध्ये शिक्षक सेवकांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाने फक्त प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागासाठी शिक्षक सेवकांची योजना काही अटींवर लागू केली होती. परंतु, शासनाने आता वेगवेगळया क्षेत्रामध्ये शिक्षक सेवकांसारखी योजना लागू केली आहे. ती रद्द करण्याच्या संदर्भात शासनाने कोणतेही सूतोवाच केलेले नाही. शिक्षण क्षेत्रातील वेतनेतर अनुदानाचा प्रश्न, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आकृतिबंधाचा प्रश्न, गेल्या पाच वर्षामध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नेमणूक न होणे, अनुकंपा तत्त्वानुसार कोणालाही सेवेत सामावून न घेणे, इत्यादी मुद्यासंबंधीचा उल्लेख राज्यपालांच्या अभिभाषणात आलेला नाही. मूल्यांकनाप्रमाणे काही शाळा अनुदानास पात्र ठरलेल्या आहेत, त्याप्रमाणे सुमारे 3000 तुकडयांना अनुदान मिळावयास पाहिजे होते, त्याबाबतचा उल्लेख देखील अभिभाषणामध्ये आलेला नाही. पुढच्या वर्षापासून इयत्ता पहिली, पाचवी आणि नववीसाठी नवीन अभ्यासक्रम येत आहे. कोणते ध्येय व उद्दिष्ट डोळया समोर ठवून नवीन अभ्यासक्रम ठरविला आहे, या संदर्भातील कोणतीही माहिती किंवा साधा उल्लेख देखील अभिभाषणामध्ये करण्यात आलेला नाही. प्राथमिक शिक्षकांची वेतनश्रेणी, विनाअनुदानित शाळांसाठी वरिष्ठ वेतनश्रेणी ग्राहय धरण्याबाबतचा निर्णय, मातृत्त्व आणि पितृत्त्व रजा इत्यादी विषय शासनाने मान्य केलेले आहेत. या संदर्भात सभापती महोदय, आपण स्वत: निदेश दिलेले असतानासुध्दा शासनाने याबाबीकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. या संदर्भात शासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नसून शिक्षण क्षेत्रामध्ये काम करणाऱ्यांच्या समस्या जशाच्या तशा ठेवलेल्या आहेत. नवीन शाळाना मोठया प्रमाणावर मान्यता दिली जात आहे. शासनाला हे दुकान आता कुठे तरी बंद करावे लागेल..

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

नवीन शाळांना मान्यता देण्यासंबंधी बृहत आराखडा तयार करून जेथे आवश्यक आहे, तेथेच शाळा देणे आवश्यक आहे असा निर्णय शासनाला घ्यावा लागेल. त्यासंबंधीचा देखील कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही. ज्या विद्यार्थ्याला खिचडीची आवश्यकता आहे, त्याला ती मिळत नाही. जो विद्यार्थी चार चाकी वाहनाने येतो, त्याला बारावी पर्यंतचे शिक्षण शासनाने मोफत दिलेले आहे. जे फी भरू शकतात, त्यांना नि:शुल्क योजनेमध्ये समावून न घेण्यासंबंधीचा विचार शासनाने करणे आवश्यक आहे. अनुदानित शाळेमध्ये कायम विनाअनुदानित तुकडया आहेत, या तुकडयांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना दुपारची खिचडी दिली जात नाही. डिस्पॅरिटी निर्माण होऊ द्यायची नाही हे शासनाचे धोरण आहे. पण शासनाकडूनच डिस्पॅरिटी होत आहे. अनुदानित तुकडीतील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन मिळत आहे, परंतु, विनाअनुदानित तुकडीत शिकणारे विद्यार्थी आहेत, त्यांना मात्र मध्यान्ह भोजन मिळत नाही.

सभापती महोदय, आज समाजामध्ये मोठया प्रमाणावर भृण हत्या होत आहे. दिवसेंदिवस मुलांचे प्रमाण वाढत आहे, मुलींचे प्रमाण कमी होत आहे. ही भृण हत्या थांबविण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे ? यासंबंधी शासनाचे नक्की धोरण काय आहे ? याचा कोणताही उल्लेख राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नाही.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.भारवि.... 20:50

श्री.रामनाथ मोते....

केंद्र सरकारने सहावा वेतन आयोग लागू करण्याचे घोषित केले आहे. महाराष्ट्र शासन शासकीय कर्मचारी आणि अनुदानित संस्थेमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी सहावा वेतन आयोग लागू करणार आहे की नाही याबाबतचा कसलाही उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात आलेला नाही. मध्यंतरी शासनाने जाहीर केले होते की, राज्य सरकारी कर्मचाऱ्यांसाठी पाच दिवसांचा आठवडा करणार आहोत. परंतु त्याबाबतही अभिभाषणामध्ये कसलाही उल्लेख नाही.

महोदय, पंचायती राज संस्थांमध्ये जो भ्रष्टाचार होत आहे तो रोखण्यासाठी पंचायती राज समिती अस्तित्वात आहे. परंतु नगरपालिका आणि महानगरपालिका क्षेत्रामध्ये होणारा भ्रष्टाचार रोखण्यासाठी शासनाची कोणतीही यंत्रणा नाही. त्यामुळे ज्याप्रमाणे पंचायत राज समिती अस्तित्वात आहे, तिच्याकडे जसे अधिकार दिले आहेत, तशाच प्रकारची एक समिती गठीत करुन, नगरपालिका आणि महानगरपालिकांतील भ्रष्टाचार रोखण्यासाठी शासनाने उपाययोजना करणे आवश्यक आहे. परंतु त्याचा कसलाही उल्लेख अभिभाषणामध्ये नाही. विना अनुदानित संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या इतर मागासवर्गीयांना शिष्यवृत्ती आणि परीक्षा शुल्क देण्याबाबतचा निर्णय झालेला आहे. सभापती महोदय, आपण या संदर्भात निर्देश सुध्दा दिलेले होते. परंतु अद्यापपर्यंत शासनाने कोणालाही ही सवलत दिलेली नाही.

महोदय, शासन लॉटरीवर बंदी आणण्याचा निर्णय घेत आहे. परंतु या बंदीमुळे जे 5 लाख कामगार या क्षेत्रामध्ये काम करीत आहेत त्यांच्या पुनर्वसनाबाबत शासनाने कोणतीही भूमिका स्पष्ट केलेली नाही. आज राज्यामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. त्यांना शासनाकडून मदत केली जात आहे. परंतु शिक्षण क्षेत्रामध्ये ज्या आत्महत्या होत आहेत त्याकडे मात्र शासन दुर्लक्ष करीत आहे. मी मागच्या अधिवेशनात शिक्षण क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांच्या होत असलेल्या आत्महत्यांसंदर्भातील विषय विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे मांडला होता. परंतु तीन महिने उलटून देखील मला त्याबाबतचे उत्तर मिळालेले नाही. त्यामुळे अशा आत्महत्या रोखण्यासाठी शासन काय उपाययोजना करणार आहे ? शासनाची ध्येयधोरण काय आहेत ? तसेच शासनाची भूमिका काय आहे ? यासंदर्भात कोणतीही माहिती मिळालेली नाही. पूर परिस्थितीवर मात करण्यासाठी शासनाने चांगल्या उपाययोजना केल्या. पूर परिस्थितीमध्ये आपत्ग्रस्तांना जास्तीत जास्त मदत

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

करण्याचा शासनाने प्रयत्न केला. परंतु आजही शिक्षण क्षेत्रामध्ये काम करणाऱ्यांना मात्र ही मदत मिळालेली नाही. ज्या शाळांचे अतिवृष्टीमध्ये नुकसान झाले त्यांना अद्यापपर्यंत शासनाकडून नुकसान भरपाई मिळालेली नाही. शेवटी त्या शाळांनी लोकांकडून मदत उभारुन, कॉम्प्युटर लॅब, लायब्ररी सुरु केली आहे. महोदय, त्यावेळी राज्यातील अनेक भागातील शाळा तीन-तीन दिवस पाण्याखाली होत्या. काही शाळांचे तीन तीन मजले, तीन-तीन दिवस पाण्यामध्ये बुडालेले होते. बाजूला खाडी असल्यामुळे मुंब्रा येथील पाच शाळा तब्बल तीन दिवस पाण्यामध्ये होत्या. उल्हासनगर येथील चांदीभाई कॉलेजची जवळजवळ 1 कोटी रुपयांची लायब्ररी या पावसात उध्वस्त झाली. परंतु कोणत्याही शैक्षणिक संस्थेला शासनाकडून नुकसान भरपाई मिळाली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना, व्यापाऱ्यांना ज्याप्रमाणे शासनाने मदत केली त्याच प्रमाणे ज्या शिक्षण संस्थांचे अतिवृष्टीमध्ये नुकसान झाले आहे, त्या संस्थांना सुध्दा मदत करण्याची खरी गरज आहे.

अनुसूचित जातीच्या युवकांचे पोलीस दल आणि सैन्य दलातील भरतीचे प्रमाण वाढविण्यासाठी त्यांना विशेष पूर्वप्रशिक्षण देण्यात येणार आहे. परंतु हे पूर्वप्रशिक्षण केवळ अनुसूचित जातीतील उमेदवारांसाठी देण्यात येणार आहे. एसटी, ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी च्या उमेदवारांना पूर्वप्रशिक्षण देण्यासाठी त्यांचा समावेश का करण्यात आला नाही ? हेच मला कळत नाही. म्हणून माझी मागणी आहे की, केवळ अनुसूचित जातीच्या उमेदवारांनाच नव्हे तर सर्व मागासवर्गीयांना पूर्वप्रशिक्षण देणे आवश्यक आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना मदत देण्याचा शासनाचा विचार आहे. सध्या 12 संस्था सेंटर्स ऑफ अेक्सिलेन्स म्हणून तयार करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. पुढील चार वर्षामध्ये 50 संस्थाना या माध्यमातून मदत देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. परंतु या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये काम करणारे जे ग्रंथपाल आहेत की, ज्यांचे क्वालिफिकेशन ट्रेन्ड ग्रॅज्युएट असावे अशी शासनाची भूमिका आहे, त्यांना मात्र क्लार्कचा पगार दिला जात आहे. त्या कर्मचाऱ्यांना शासन 4500 ही वेतनश्रेणी देत आहात. ज्या ठिकाणी 200 विद्यार्थी आहेत त्यांना ट्रेनिंग ग्रॅज्युएटचे स्केल दिले जाते. मात्र आमच्या पूर्णवेळ ग्रंथपालांना वेतनश्रेणी खालच्या दर्जाची दिली जात आहे. यासंदर्भात शासनाकडे वारंवार मागणी करुनही शासनाने त्याकडे दुर्लक्ष केले आहे.

..3..



SJB/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.भारवि.... 20:50

श्री.रामनाथ मोते....

महोदय, माननीय राज्यपाल महोदयांनी केलेल्या अभिभाषणातून निदर्शनास येते की, पोलीस दलामध्ये अनेक पदे भरण्यात येणार आहेत. परंतु पोलीस दलामध्ये काम करणारे जे पोलीस बांधव आहेत त्यांना रजा किती मिळतात ? त्यांचे कामाचे दिवस किती आहेत ? त्यांना किती तास काम करावे लागते ? त्यांना निवासाची व्यवस्था आहे काय ? कामाचे ठिकाण आणि डयुटीचे ठिकाण यातील अंतर किती आहे ? याचा विचार मात्र केला जात नाही. सभापती महोदय, या पोलीस बांधवांना चार-पाच तास प्रवास करुन, आपल्या कर्तव्याच्या ठिकाणी यावे लागते. त्यामुळे माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये पोलीस बांधवांना घरे उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीत, सुटया देण्याच्या बाबतीत, कामाचे दिवस कमी करण्याच्या बाबतीत शासनाने काय प्रयत्न केले आहेत याचा कसलाही उल्लेख करण्यात आलेला नाही.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

सभापती महोदय, अंध, अपंगांना नोकऱ्यांमध्ये 3 टक्के आरक्षण ठेवलेले आहे. परंतु अंध, अपंगांचे डेव्हलपमेंट करणाऱ्या, त्यांना शिक्षण देणाऱ्या ज्या संस्था आहेत, त्यांच्याकडे शासनाने दुर्लक्ष केले आहे. त्या संस्थांना वेळवर ग्रॅन्ट दिली जात नाही. तेथील शिक्षकांना वेतन मिळत नाही. सभापती महोदय, अंध, अपंगांच्या शाळांची परिस्थिती अतिशय गंभीर आहे. त्याचप्रमाणे विधी साक्षरता प्रशिक्षण शाळा सुरु आहेत. विधी साक्षरतेची शिबिरे चालू आहेत. आपण या विधी साक्षरतेचा प्रसार शहरी भागातच नव्हे तर ग्रामीण भागात करणे आवश्यक आहे. अशा शिबिरांच्या ठिकाणी सर्व लोकांना एकत्र आणणे आवश्यक आहे. सभापती महोदय, वेळ कमी असल्याने मी शेवटचा मुद्दा मांडून माझे मनोगत संपवितो.

माझा शेवटचा मुद्दा ज्येष्ठ नागरिकांच्या संदर्भातील आहे. या संदर्भात सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी देखील उल्लेख केला. ज्येष्ठ नागरिकांच्या संदर्भात शासनाचे दुर्लक्ष झालेले आहे. बसने प्रवास करताना जेष्ठ नागरिकांना सोयी-सवलती मिळताना त्रास होत आहे. या संदर्भात सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी आपणास सूचना देखील दिलेली आहे. सभापती महोदय, कोणत्याही प्रकारचा वयाचा दाखला ग्राह्य मानण्यासंदर्भात कंडक्टर्स किंवा नियंत्रण अधिकाऱ्याला सांगण्यात यावे. या सर्व बाबींसंदर्भात शासनाने उपाययोजना करणे आवश्यक आहे. सभापती महोदय, वेळ कमी असल्यामुळे मी माझे दोन शब्द येथेच संपवितो. धन्यवाद !

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. जुलैमध्ये जो प्रलयकारी पाऊस झाला, त्याविषयी सरकारने आपले स्वत:चेच खूप कौतुक करुन घेतले आहे. सभापती महोदय, या प्रलयकारी पावसामध्ये जवळजवळ 20 हजार कोटीं रुपयांचे नुकसान झाले आणि मदत फक्त 1200 कोटी रुपयांचीच वाटली. येथून पुढे आपद्ग्रस्तांना मदत मिळणार की नाही, याचे सुतोवाच करायला शासन तयार नाही. केंद्र शासनाकडे मदत मागितली आहे. परंतु ती मदत केव्हा येणार आहे ? ती मदत मिळणार की नाही ? या संदर्भातील विश्लेषण कोणीही करायला तयार नाही. जुलैच्या आपत्तीबाबत केंद्र सरकारने एक आयोग नेमला. त्या आयोगाचे अध्यक्ष विरप्पा मोयली हे होते. सभापती महोदय, त्या केंद्र सरकारच्या आयोगानेच महाराष्ट्र शासनाविषयी वक्तव्य केले ते असे की, " जुलैच्या अतिवृष्टीमध्ये महाराष्ट्र शासनाने बजाविलेली कामगिरी समाधानकारक नव्हती. विविध सरकारी यंत्रणेमध्ये समन्वय नव्हता. एकसूत्री कामांचा अभाव होता. " अशाप्रकारे राज्य शासनाविषयी स्पष्ट मत केंद्रीय प्रशासकीय आयोगाने व्यक्त केले होते. केंद्र शासनाने राज्य शासनावर टीका केली आहे. या अभिभाषणामध्ये मिठी नदीच्या विकासाबाबत उल्लेख झालेला आहे. त्या संदर्भातील सर्व खापर प्लास्टिकच्या पिशव्यांवर टाकून माननीय राज्यपालमहोदय मोकळे झाले. पण मुख्य प्रश्न अतिक्रमणाचा आहे. अतिक्रमणाविषयी गेले आठ महिने सरकारने अक्षम्य दिरंगाई केली. मी शासनाला असे विचारु इच्छितो की, दोन महिन्यांमध्ये 80 हजार झोपडपट्टीवासियांचे संसार उध्वस्त करणारे शासन मिठी नदीच्या अतिक्रमणाबाबत का गप्प आहे ? राज्यात वारंवार पडणाऱ्या दुष्काळाबाबत, शेतकऱ्यांच्या घडणाऱ्या आत्महत्यांबाबत या सदनात बरीच चर्चा झालेली आहे. परंतु ज्या भागात कायमचा दुष्काळ पडतो. उदाहरणच द्यावयाचे झाले तर सांगली जिल्ह्यातील जत, कवठेमहांकाळ, आटपाडी, सांगोला यांच्या पाचवीला दुष्काळ पुजलेला आहे. या भागातील ताकारी म्हैसाळ, टेंभू यांसारख्या योजना गेल्या 25 वर्षांपासून कागदावरच पडलेल्या आहेत. जनता आंदोलन करते. मग आमदार निवडणुकांमध्ये त्या जनतेला खोटी आश्वासने देऊन निवडणूक लढवून येतात. सभापती महोदय, दुष्काळासाठी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे ....

पॅकेज जाहीर केले जाईल, अशी मोठी घोषणा मागील अधिवेशनामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी केली. परंतु आज 20 मार्च उजाडला आहे. माझ्या मते, 21 मार्चच्या आतमध्ये दुष्काळग्रस्तांसाठी पॅकेज जाहीर केले जाईल, असे काही चालू होते. तरी, दुष्काळग्रस्तांसंबंधीची ही घोषणा येत्या 10 दिवसांत सरकार करील, अशी आशा मी या ठिकाणी व्यक्त करतो.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे ...

त्यासंदर्भातील उल्लेख येथे करण्यात आलेला नाही. महामंडळावरील अध्यक्षांच्या नियुक्त्या गेल्या दोन वर्षापासून केलेल्या नाहीत. दुष्काळग्रस्तांसाठी महामंडळाची स्थापना करण्यात येणार होती ते सुध्दा करण्यात आलेले नाही. दुष्काळी जनतेच्या तोंडाला पाने पुसण्याचाच हा प्रकार आहे. मुंबईच्या बाबतील जागतिक शहर बनविण्याची घोषणा झालेली आहे. मला खेदाने नमूद करावेसे वाटते की, सरकाने सांगितले की, 11हजार कोटी रुपये खर्चाच्या काही महत्वाच्या प्रकल्पांसाठी केंद्र सरकारकडे अर्थसहाय्य मागितले आहे. तसेच पुढे असेही म्हटले आहे की, केंद्रीय अर्थसहाय्याची वाट न पाहता, माझ्या शासनाने मुंबई नागरी सुविधा प्रकल्प, वांद्रे-वरळी सागरी जोडमार्ग व मुंबई नागरी परिवहन प्रकल्प यासारखे महत्वाचे प्रकल्प अगोदरच राबविण्यास सुरुवात केली आहे. सभापती महोदय, केंद्र सरकारकडून एकही पैसा आलेला नसतांना ही कामे कशी काय पूर्ण होणार आहेत ? परवाच माननीय पंतप्रधान मुंबईमध्ये येऊन गेले त्यांनी सांगितले की आम्ही मुंबईचे शांघाय बनवू याबाबत बरेच कौतुक करण्यात आले. ते म्हणाले की मुंबईच्या विविध भागाला महत्वाचे स्थान आहे......

**सभापती** : अजूनही दोन तीन सदस्य बोलणार आहेत. मी उपमुख्यमंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, या चर्चेचे उत्तर आपण आज देणार आहेत की उद्या हे सभागृहाने ठरवावे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, उद्या सकाळी 10.30 वाजता या चर्चेवरील उत्तर घेण्यात यावे.

**सभापती** : ठीक आहे, उद्या ही चर्चा सुरु होईल, त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे हे ऑनलेग राहतील व त्यानंतर एक-दोन सदस्य बोलतील त्या नंतर माननीय उपमुख्यमंत्री या चर्चेला उत्तर देतील.

आता सभागृहाची बैठक स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 21.3.2006 रोजी सकाळी 10.30 ते 11.30 पर्यंत विशेष बैठक घेण्यात येईल. त्यानंतर दुपारी 12.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक रात्री 9 वाजून 3 मिनिटांनी, मंगळवार दिनांक 21.3.2006 च्या सकाळी 10.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही